।।ॐ।।

# साधन-पत्रिका

( केवळ खाजगी वितरणासाठी )

।।ॐ।।



# साधन-पत्रिका

वं. दादा भागवत

(केवळ खाजगी वितरणासाठी)

भक्त-भाविकांच्या मार्गदर्शनार्थ

।। ॐ ।।

# साधन पत्रिका – पुनर्मुद्रण

भक्तभाविकांस,

सद्‌गुरूनाथ श्रीदादांनी भक्तभाविकांच्या मार्गदर्शनार्थ एप्रिल १९६० साली प्रथम 'साधन पत्रिका' लिहिली व त्यानंतर यथाकाल त्या पुस्तिकेतील ज्ञानात वृद्धी करत 'साधन पत्रिकेच्या' पुढील चार आवृत्त्याही प्रकाशित झाल्या.

श्रीसद्‌गुरूकृपेने वं. दादांचे गुरूकार्य आज श्रीज्ञानेश्वरीत म्हटल्याप्रमाणे...

इवलेसे रोप लावियेले दारी । तयाचा वेलू गेला गगनावरी ।।

... अशा व्यापक स्वरुपाचे झाले आहे. वं. दादांनी श्रीगुरूआज्ञेने कार्यस्थापना केली, त्यावेळी असलेल्या कार्यकेंद्रांची संख्या मुंबई-पुणे-सातारा-कराड एवढी मर्यादित होती. परंतु आज श्रीगुरूकृपेने ह्या लोककल्याण कार्याची ध्वजा सातासमुद्रा पलिकडेही निरंतर झळकत आहे !

पंचभौतिक देहाच्या चौकटीत जन्माला आलेल्या मानवाला पंचऋणानुबंधामुळे ज्या सुखदुःखांना सामोरे जावे लागते, त्या सुखदुःखांची मूळ कारणमीमांसा समजून घेतल्यास व त्यानुसार आचरण केल्यास मानवी जीवन ईश्वरमय होईल असा विश्वास श्रीदादांना होता; म्हणूनच 'साधन पत्रिकेत' त्यांनी मानवी जीवनातील नानाविध विषयांचा सखोल अभ्यास करून ज्ञानाने ओतप्रोत निवेदने लिहिली. अशी वेळोवेळी संग्रहित केलेली निवेदने जोडून साधन पत्रिकेची ही पाचवी आवृत्ती आज प्रकाशित होत आहे. ह्या आवृत्तीत पूर्वीच्या आवृत्तीतले काही उल्लेख कालबाह्य झाल्यामुळे वगळले आहेत व काही आवश्यक निवेदने जोडली आहेत याची नोंद भक्त-भाविकांनी अवश्य घ्यावी.

।। शुभं भवतु ।।

## सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशकाच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय या प्रकाशनातील कोणताही भाग पूर्वप्रसारीत अथवा अन्य कोणत्याही विद्युत किंवा यांत्रिक माध्यमात प्रक्षेपित तसेच छायांकीत अथवा मुद्रित आणि कोणत्याही भाषेमध्ये भाषांतरीत (अनुवाद) करता येणार नाही.

**श्रीदत्तजयंती**

श्रीसाई शके ३१

गुरूवार, दिनांक २७ डिसेंबर २०१२

अक्षरजुळणी :
गुरूभक्त, रत्नागिरी.

मुद्रक :
श्रद्धा असोसिएटस्,
रत्नागिरी.

प्रकाशक :
**श्रीसाई स्वाध्याय मंडळ,**
'साई धाम', ४७, डिफेन्स कॉलनी,
अल्तो पर्वरी, बारदेश, गोवा - ४०३५२१
दूरध्वनी : ०८३२-२४१२५७१

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ।।**

।। जी भक्तमंडळी आपल्या जीवनाचा अमोल ठेवा प्राप्त करून घेण्यासाठी दैनंदिन जीवनातील आपले कर्तव्य म्हणून "सद्‌गुरू उपासना" करीत आहेत, त्यांच्या **श्रद्धा, सबुरी, कर्तव्य, मानवता** ह्या भावनापूर्ण कर्तव्यास जी "सद्‌गुरूकृपा" कारण झाली तिला ही "साधनपत्रिका" अर्पण ।।

॥ ॐ ॥

श्रीसाई स्वाधाय मंडळ, पर्वरी

# साधन-पत्रिका

# १

## मानवी जीवनातील दुःख कारणमीमांसा व त्यास कार्याचे मार्गदर्शन


| | | |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १-२ |
| २. | दुःख कारणमीमांसा | ३-६ |
| ३. | निराकरण-कुलधर्म व कुलाचार | ७-१५ |
| ४. | विमोचने, दीक्षा | १६-२१ |
| ५. | आचार विचार निश्चितता | २२-२३ |
| ६. | नित्य आहार निश्चितता | २४-२५ |
| ७. | दैवी उपासना | २६-२८ |
| ८. | व्रत वैकल्ये | २९-३२ |
| ९. | दैवी मार्गातील व्यावहारिक द्वैत | ३३-४३ |
| १०. | प्रतिमांचे कार्य | ४४-५४ |
| ११. | समाज कल्याणार्थ कार्याची भूमिका | ५५-६१ |
| १२. | हा मार्ग हाच सुखाचा ठेवा | ६२-६५ |

॥ ॐ ॥

श्रीसाई स्वाधाय मंडळ, पर्वरी

# साधन-पत्रिका

# २

## मानवी जीवनातील दुःख कारणमीमांसा व त्यास कार्याचे मार्गदर्शन


| | | |
|---|---|---|
| १. | कार्याचा उद्देश | ६९-७१ |
| २. | कार्यपद्धतीस शास्त्राधार | ७२-७६ |
| ३. | कार्यपद्धती | ७७-८३ |
| ४. | वैयक्तिक व सामुदायिक उपासना / साधना | ८४-९५ |
| ५. | स्पर्श संवेदना, ज्ञान संवेदना | ९६-१०० |
| ६. | अभिमंत्रित तीर्थ व गोळ्या | १०१-१०३ |
| ७. | पारमार्थिक उन्नतीसाठी आयुर्वेदाची आवश्यकता | १०४-१०५ |
| ८. | श्रीसाई स्वाध्याय मंडळ | १०६-११४ |
| ९. | कार्यपद्धतीची ओळख | ११५-११७ |
| १०. | परमार्थ प्रश्नावली | ११८-१२१ |
| ११. | सेवक व भक्तभाविक नियमावली | १२२-१३० |
| १२. | उपसंहार | १३१-१३६ |


ॐ

## प्रस्तावना

भक्तमंडळीस :-

आपण आपल्या जीवनातील दुःखांचे निराकरण होऊन जीवन सुखी व्हावे म्हणून या ठिकाणी आला आहात. हा आपला हेतू आपण पूर्ण अर्थाने समजून घेतलात का नाही? याउलट ही समिती पूर्णत्वाने आपल्या सर्वांच्या सुखाचा विचार करीत आहे, हे स्पष्ट दिसते. कारण आपला हेतू जीवनातील दुःख दूर व्हावे यापलीकडे जात नाही. दुःखे निर्माण का झाली, पुन्हा होणार याला उपाय काय, याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. हा अभ्यास नित्याने करण्याची सवय झाली तर दुःखे निर्माण होणार नाहीत. रोज आपण जेवतो, झोपतो, नोकरीधंदा करतो. सर्वतोपरी प्रत्येक व्यवहार नित्याचा ठरला आहे. या सर्वावर नियंत्रण असण्यासाठी 'सद्गुरू उपासना' नित्याची होणे आवश्यक आहे. परंतु तेवढाच सुविचार प्रत्येक मनुष्य आजचा उद्यावर ढकलून दुःखे वाढविण्यास कारण होत आहे. या समितीच्या कार्यपद्धतीचा हेतू हाच की, एकदा हे मानवी जीवनाचे सुखदुःखाचे गणित ज्ञान-अज्ञानाने चुकले की ते दुरुस्त करण्यासाठी मनुष्य अनेक प्रयत्न करतो. त्या अनेक प्रयत्नात दैवी प्रयत्नही असतो. दैवी मार्ग हा प्रयत्नाचा मार्ग नाही. तर ती परिपूर्ण सिद्धसिद्धान्त पद्धत असल्याने आपल्या आचरणाने आपले दुःख दूर करता येते. दुःखाची नुसती कारणे समजण्यापेक्षा त्याची मीमांसा अभ्यासिली गेली तर पुन्हा आपल्याला किंवा आपल्या मुलाबाळांना तसे दुःख भोगावे लागणार नाही. उदा. एखादा मनुष्य म्हणतो, 'मला अमुक माणसाने करणी केली किंवा करतो आहे.' 'मी अमुक माणसामुळे बुडलो.' ही दुःखे निर्माण होणारी कारणे झाली. परंतु मीमांसा हे सांगेल की, आपापसातील जन्मजन्मांची ऋणानुबंधने बाकी होती. त्या वेळी यथायोग्य तऱ्हेने त्यांचे निराकरण झाले नाही, त्यामुळे त्या माणसास तुम्हाला करणी करण्याची किंवा बुडविण्याची बुद्धि होते.

आता पहिल्या दुःखकारणाचे निराकरण जेव्हा सांगितले जाते त्या वेळी तुम्हांस 'प्रसाद' पूजनास दिला जातो. या प्रसाद पूजनानंतर तुम्हाला जी सुख, शांति लाभत जाते, तेवढ्यावरच तुमचा दैवी मार्गाने सुखी होण्याचा प्रयत्न थांबतो व आपण हळुहळू येथे येण्याचे बंद करता किंवा 'इतर सेवा माझ्यासाठी नाही' असे समजता. याचाच अर्थ पूर्णपणे अज्ञान निर्माण करून आपण स्वतःची दिशाभूल करता. आपणास निरंतर सुख, समाधान लाभावे अशी इच्छा असल्यास नुसते दुःखाचे कारण समजून किंवा त्याबद्दल येथून दिलेला प्रसाद पूजन करून चालणार नाही. तर ते जन्मोजन्मी लाभावे, म्हणून

'सद्गुरू उपासना'च केली पाहिजे. सद्गुरूकृपेने या कार्यात ज्या अनेक दुःख कारणमीमांसा अभ्यासिल्या गेल्या आहेत, त्या विचारून नित्य जीवनांत पुन्हा ज्ञान-अज्ञानाने आपल्या हातून तशी पातके व प्रमाद घडू नयेत म्हणून धर्माचरणाने वागणे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे.

या अभ्यासाने हातून घडलेल्या जन्मजन्मांच्या पातकांचे व प्रमादांचे प्रायश्चित्त घेतल्याशिवाय सद्गुरू प्रसाद तरी काय करील ? तुमची अपेक्षा नुसते सुखच भोगण्याची आहे. मग दुःख कोण भोगणार ? तर तेही तुम्हालाच भोगले पाहिजे. ते भोगण्याचे ज्ञानही घेतले पाहिजे. कारण जन्मोजन्मीच्या सुख-दुःखास स्वतःचीच कर्मे कारण झालेली असतात. त्याशिवाय किड्या-किटकापासून ते देवादिकापर्यंत जे ज्यांचे ऋण राहिले असेल, तेही यथाशक्ती फेडले पाहिजे. नाहीतर पुनश्च तुमच्या मुलाबाळांना हाच भोग भोगावा लागेल. आज आपण या ठिकाणी आलात, उद्या दुसऱ्या ठिकाणी जाल. तरीसुद्धा सुखप्राप्तीसाठी नशीब तेच न्यावे लागेल. तेव्हां एकदा जीवनाचा हेतू पूर्णपणे समजून घ्या व त्याचा अभ्यास करा. या ठिकाणी जी जुनी मंडळी आहेत, त्यांच्या जीवनातील विमोचनाचे विधी ज्या सिद्धसिद्धान्त पद्धतीने केले, ते तुमच्या सारख्या नवीन भक्तांसाठीही आहेत. आता जन्मोजन्मीच्या दुःख मीमांसा कोणत्या व त्या किती प्रकारांनी असू शकतात ते अभ्यासून या दुःखमीमांसेचे परिमार्जन ईश्वरी उपासनेने करा.

--- --- --



## २. दुःखकारणमीमांसा :

शास्त्राधाराप्रमाणे - १) आधिदैविक २) आधिभौतिक व ३) अध्यात्मिक अशी दुःखमीमांसा सांगितली जाते. तरीसुद्धा आजची आमची नवमतवादी विचारसरणी आणखी दुःखास कारण झाली आहे. जीवनात वेळोवेळी होणारे संस्कार आम्ही मानले नाहीत. धार्मिक संस्काराकडे तर पूर्णपणे दुर्लक्षच केले आहे. (याबद्दलचे पूर्ण विवेचन 'निराकरण पत्रिकेत' केले आहे.)

**आधिदैविक** : या मीमांसेत जे कुलाचार, कुलोपासना व कुलधर्म कुलपरंपरेमध्ये आहेत, त्यांचे पालन आजमितीपर्यंत झाले नाही. शिवाय आपल्या वडिलोपार्जित मूळ गांवच्या ग्रामस्थ ग्रामदेवता यांचाही कुलाचार, कुलधर्म झाला नाही. याव्यतिरिक्त आपल्या गतजन्मातील राहिलेली दैवी उपासना व चालू जन्मातील दुःखनिवारणार्थ भिन्न देवतांची केलेली उपासना, व्रतवैकल्ये, अनुष्ठाने वगैरेपासून निर्माण झालेली जीवनातील अशांतता, दुःखे यांचा समावेश होतो. अशा दोषांचे परिमार्जन झाल्याशिवाय दैवी कृपा लाभणे असाध्य आहे.

**आधिभौतिक** : या मीमांसेचा भाग प्रामुख्याने आज बऱ्याच दुःखास कारण झाला आहे आणि या मीमांसेतील दोष इतके कठीण आहेत की, तुम्ही स्वतः देव झालात तरी तुम्हाला ते सोडणार नाहीत. या मीमांसेतील प्रमुख दोष स्वतःच्या तिसऱ्या पिढीत निर्माण झालेले असतात किंवा कालांतराने पुढेही निर्माण होतात. यापैकी (१) धननाश (२) विद्यानाश (३) संततिनाश. याशिवाय आणखी पांच प्रकार असे : (१) मुलांचा आईवडिलांच्या पश्चात् भाग्योदय (२) माता किंवा पिता हयात असेपर्यंतच भाग्योदय (३) मुलगी जन्मल्यापासून सासरी जाईपर्यंत मातृपितृ घराण्यास उतरती कळा (४) सासरी गेल्यावर सासर घराण्याला उतरती कळा (५) स्वतःची पूर्वजन्मशापित जन्मदशा किंवा अनिष्ट ग्रहदशा. आता वरील सर्व दुःखांचे कारण जन्मजन्मांच्या पातकांचे आहे. त्यात घराण्यांतील वाडवडील मरणोत्तर जीवनानंतर मुक्त झाले नसतील, दुसऱ्याच्या धनाचा अपव्यय केला असेल, निर्वंशाची स्थावर किंवा जंगम इस्टेट घेतली असेल, सावकारी केली असेल, कोणाला नात्यांचा वारसा मिळाला असेल, दत्तकाची किंवा विधवा वारसाची इस्टेट मिळाली असेल, तर वरील दुःखे निर्माण होण्यास कारण होते.

**अध्यात्मिक** : ही दुःखमीमांसा निर्माण होण्यास आपणच बहुतांशी कारण होता. जीवनाबद्दल काहीतरी सुखाच्या भ्रामक कल्पना करून जीवनाचा अपव्यय करणे, वरील दोन्ही शास्त्रे म्हणजे केवळ मूर्खपणा आहे, त्यांचा आचारविचार करणे, देवधर्म मानणे

म्हणजे कमीपणाचे आहे, 'मी एकच ज्ञानी, माझा अभ्यास म्हणजेच सर्वस्व' हे समजून वरील दोन्ही मीमांसेमधील शेषमात्र ऋण कमी करण्याचा जाणून प्रयत्न न करणे यानेच ही दुःखे निर्माण होतात.

आता वरील सर्व दोष हे मानवी जीवनाचा नाश करण्यास कारण झाले आहेत. तरीसुद्धा त्यांचे परिमार्जन करण्यास तुम्ही तयार नाही. मग पुनःश्च हीच दुःखे जास्त प्रमाणात तुमच्या, भावी पिढीत गेली व आणखी दुःखास कारण झाली तर दोष तुमचा का देवाचा, का धर्माचा ? तर या सर्व दुःखमीमांसेचे परिमार्जन म्हणजे 'गुरूकृपा!' ती आपणा सर्वांस लाभावी म्हणून ही समिती अखंड आपल्या सेवेस हजर आहे. वरील एकूण दोषांचे परिमार्जन करून घेणे हा हेतू पूर्ण अर्थाने समजून घेणे व त्याप्रमाणे नित्याचरण करणे म्हणजेच निरंतर सुखाचे वाटेकरी होणे. नुसते ऐहिक सुख मिळावे अशी अपेक्षा करू नका. वरील दोषांच्या परिमार्जनार्थ या ठिकाणी सामुदायिक विधी केले जातात. कारण प्रत्येकाला सुख-समाधान लाभावे यासाठी जे धार्मिक विधी आहेत, त्यांचा खर्च वैयक्तिकरीत्या कोणाला परवडत नाही. यासाठी हे धार्मिक विधी सामुदायिकरीत्या केले जातात व त्यामुळे त्याचा फायदा सर्वांना मिळतो.

वर सूचित केलेले दोष जर तुमच्या दुःखास कारण असतील तर नुसत्या पाच आठवड्यांच्या 'प्रसाद' पूजनाने निरंतर सुखी व्हाल का ? सुखी होण्याचा प्रयत्न केलात तर तो क्षणिक ठरेल. यापुढे जीवनात निरंतर सुखा-समाधानाचा लाभ हवा असेल तर तुम्हाला स्वतःच सेवेचा लाभ जोडून दोषमुक्त व्हावयास पाहिजे. यासाठी तुम्ही 'प्रायश्चित्तपूर्वक सेवा' करण्यास शिकले पाहिजे. तेवढ्यासाठी रोज सायंकाळी जी सेवा या ठिकाणी होते त्यात स्वतः भाग घ्यावयास पाहिजे. वेळ नसेल त्यावेळी कुटुंबातील कोणीही सेवा करावी. वर सूचित केलेल्या दोषांचे परिमार्जनार्थ वेळोवेळी मार्गदर्शन घ्यावे.

पूर्वी एका 'सूचनापत्रा'द्वारे या कार्याची भूमिका जाहीर झालीच आहे. पुन्हा आज त्यापैकी एक बाजू समजावून दिली आहे. वरील दोषांचे परिमार्जनार्थ दैवी निराकरण, उपासना व उपचार सांगणे हे या समितीचे कर्तव्य आहे. आपण किती पटींनी श्रीमंत व सुखी व्हाल, हे गणित समिती सोडवित नाही. जसे, प्रामाणिकपणे महिनाभर नोकरी केली तरच पूर्ण पगार मिळतो, नाहीतर केल्या कामाइतकाच मिळतो, तद्वतच दुःख निवारणार्थ केलेल्या उपासनेइतकेच दुःख दूर होईल. येथे केलेल्या अडचणीच्या मार्गदर्शनानंतरची सेवा आपणांसच करावयास पाहिजे. कदाचित आपणास असे वाटणे स्वाभाविक आहे की, सेवा न करता काही रोख रक्कम दिली तर नाही का चालणार ?



तर त्यासाठी हे कार्य नाही, आतापर्यंत कार्याची एकच बाजू आपण अभ्यासिलीत; म्हणजे स्वतःचा फायदा किती होणार हे पाहिलेत. तर समिती हेच सांगू इच्छिते की, वरील अभ्यासानंतर आपल्या भावी पिढीला 'दुःख कसे असते ?' असे विचारावे लागेल. आज आपण 'सुख कशात व कोठे आहे' हे विचारीत आहात.

समितीच्या वरील कार्यपद्धतीत दुसरा विचार व त्याचा अभ्यासही तितकाच पोषक आहे. पहिल्या बाजूस प्रापंचिक दुःख मीमांसेचा विचार व निराकरण सांगत असता जे प्रायश्चित्त किंवा सेवा करावी लागेल, ती समाजातील जास्तीतजास्त लोक सहजगत्या कशी करू शकतील हाच विचार समजून घेऊन आलेल्या लोकांना सेवा व निराकरण सांगणे हा दुसरा भाग होय. उदा. दैवी कोप किंवा सेवा बाकी असेल तर यज्ञयाग, दानधर्म करावा असे शास्त्र सांगते. हे आज समाजातील किती लोकांना शक्य आहे ? याचा विचार आर्थिकदृष्ट्या होणे आवश्यक आहे. हे समिती समजून घेऊन आलेल्या भक्त-भाविकांस त्यांच्या अडचणीला अनुसरून पाच आठवड्यांचे अनुष्ठान सांगितले जाते. याचा अर्थ कोणीही असा समजू नये की, समितीच्या कार्यपद्धतीस यज्ञयाग, दानधर्म यांचे शास्त्र माहीत नाही. आज समाजाच्या बहुसंख्य गरिबीचा भावार्थ लक्षात घेवून समितीस मार्गदर्शन करावयाचे आहे. हाच 'माणुसकीचा धर्म' समिती निर्माण करू इच्छित आहे. हा सेवेचा पर्याय झाला. आता प्रायश्चित्त पर्यायाचा विचार करू. ज्यावेळी तुमच्या वाडवडिलांनी कोणाचे धन, सावकारी, निपुत्रिकाची स्थावर किंवा अन्य व्यवहार करून पाप निर्माण केले असेल, त्यामुळे जर आपल्याला दुःख झाले असेल तर शास्त्राधार सुवर्णदान, गोदान, गृहदान, यज्ञ, याग, तीर्थयात्रा वगैरे उपाय सुचवितो. सद्गुरू आज्ञा 'श्री हनुमंताचे मंदिरात अकरा किंवा पाच आठवडे नंदादीपात गोडे तेल घालावे' असे सुचविते. अभ्यासूंनी हा भेद जरूर लक्षात घ्यावा. म्हणजे आपणास हे कळेल की, समिती तुमच्या सुख-दुःखांचा विचार आर्थिक दृष्ट्या कोणत्या प्रकारे करीत आहे ! अशा अनेक पर्यायांचे निराकरण समिती तुमच्या अडचणी लक्षात घेऊनच सुचवित असते. त्यामागील भावना हीच असते की, आपण अज्ञानाने केव्हाही भावना व श्रद्धा निर्माण करू नका. ज्ञानाने भावना व श्रद्धा निर्माण झाली तरच 'अखंड सद्गुरू कृपा' काय आहे ते कळेल.

आज जगांत ऐहिक सुखाच्या आहारी गेलेल्या समाजास खऱ्या अर्थाने धर्म समजावून सांगणे कठीण झाले आहे. देव, धर्म किंवा धर्मकृत्य करण्याची इच्छा असूनसुद्धा ते यथायोग्य तऱ्हेने होऊ शकत नाहीत. या मार्गातील प्रत्येक जण स्वतःचा आर्थिक लाभ बुडेल या स्वार्थाने तुमच्या जीवनाबद्दल वाटेल ते भविष्यवाद कथन करत

आहे व आपणांस 'ते मिळणार आहे' या भावनेने आपण नाचत आहात, व तो सांगेल ती कर्मे करून त्याच्या मार्गाचा अवलंब या हेतूने करीत आहात की, या जगात मला खूप पैसा व सुख मिळणार आहे; पण सुज्ञ विचार असा करा की, जर घराच्या बागेत आंब्याचे झाड लावले असेल तर आंबाच मिळेल, पेरू मिळणार नाहीत; व जर भूक लागली असेल तर दुसरा पोटभर जेवून तुम्ही स्वतः ढेकर देऊ शकणार नाही. तद्वतच तुमच्या जन्मजन्मांच्या कर्माचा ठेवाच आपण घेवू शकाल; व अधिक नित्य केलेल्या उपासनेची गुरूकृपा याचे यथार्थ ज्ञान सामान्य माणसास होऊन त्याचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न ही समिति करते. आपण सर्वजण जास्तीत जास्त कसे सुखी व्हाल याबद्दल जी निराकरण पद्धत या ठिकाणी सांगितली जाते, ती पूर्णपणे अभ्यासिलेली आहे. प्रथमच सांगितल्याप्रमाणे मनुष्यास ज्ञान-अज्ञानाने बऱ्याचशा कर्मपरंपरेचा वाटा दुःखास कारण झाला आहे, तर त्याचे नुसते कारण शोधून तुम्ही सुखी होऊ शकणार नाही, तर त्याचे निराकरण झाले पाहिजे. परंतु तुम्हास बाह्य जगतासारखे काहीतरी भ्रामक उत्तर पाहिजे असते व ते येथे मिळत नाही. त्यामुळे आपणास या मार्गाबद्दल अविश्वास वाटतो. आपणा सर्वांची अशी समजूत आहे की, प्रसाद मिळाला व पूजन सुरू झाले की, पैशांचा पाऊस पडेल. तर विचार असा करा की, आलेल्या दुःखाचे परिमार्जन व्हावे म्हणून प्रसाद घेतला आहे, पैशांचा पाऊस पडण्यासाठी नाही. आता आपणास 'पूर्ण सुखी व्हावे' अशी खरोखर तळमळ लागली असेल तर खालीलप्रमाणे प्रसाद घ्यावे लागतील. ते परिपूर्ण सिद्धसिद्धान्त पद्धतीने आत्मसात् केलेले आहेत. हे प्रसाद घेतले असताही आपणासच सेवा करावी लागेल. तरच खऱ्या अर्थाने तुम्ही सुखी व्हाल.

--- --- --



## ३. निराकरण-कुलधर्म व कुलाचार :

प्रथमतः आपणास पाच आठवड्यांचा प्रसाद आपल्या देवादिकांचे कुलधर्म व कुलाचार यासाठी पुजावा लागेल. या पूजनांत आपल्या वाडवडिलांच्या हातून आजमितीला न झालेला व राहिलेला कुलधर्म व कुलाचार मान्य करून घ्यावा लागेल. काही घराण्यांचे कुलाचार व कुलधर्म इतके विचित्र आहेत की, ते आजच्या परिस्थितीत होणेही शक्य नाहीत. असे कुलाचार साधे हळद-कुंकू वाहण्यापासून ते रेडा बळी देण्यापर्यंत असू शकतात. तरी याबद्दल दिलेल्या प्रसादाचे अनुष्ठान मांडून रूढ झालेल्या कुलधर्म, कुलाचारांपासून सोडवणूक करून घ्यावी. हे कुलधर्म, कुलाचार यथायोग्य वेळी न झाल्याने जीवनात अनेक तऱ्हेची दुःखे, शारीरिक व्याधी व प्रापंचिक अशांतता निर्माण झालेली असते व पुढेही रहाते. आपल्या कुटुंबाच्या भावी पिढीच्या परिस्थितीचा विचार करून देवदेवतांचे कुलधर्म व कुलाचार करणे हितावह होणार आहे.

ग्रामदेवता कुलधर्म कुलाचार : दुसऱ्या वेळी आपल्याला आपल्या मूळ गावच्या ग्रामस्थ ग्रामदेवतांबद्दल प्रसाद दिला जातो. प्रत्येकजण आज नोकरी व्यवसायासाठी शहरात आल्यामुळे आपल्या वडिलोपार्जित घराण्याच्या ग्रामदेवपरंपरा (उरूस, जत्रा इ.) विसरला. त्यामुळे मूळ गावच्या देवतांचे कुलधर्मसंबंध राहिले. त्या गावी तुमच्याच घराण्यांनी गावची वतने (देशपांडे, कुलकर्णी, कोतवाल, चिटणीस इ.) उपभोगली. याच वतनांत ग्रामदेवतांचेही उत्पन्न होते. आज त्यापैकी काहीही आपण करू शकत नाही. म्हणून त्याबद्दल त्या देवतांचे कुलधर्म, कुलाचार अंशतः पूर्ण करणे आवश्यक आहे. हे कुलाचार, कुलधर्म न झाल्याने घरात अशांतता, शारीरिक व्याधी, मानसिक अशांतता, फीट येणे, वेड लागणे, मृत संतती जन्माला येणे किंवा पूर्णत्वाने निर्वंश होणे, संसारात एकमेकांचे न पटणे यासारख्या आपत्ती ओढवतात.

कुलदेवदेवता व कुलधर्म, कुलाचार निश्चितता : वरील दोन्ही प्रसाद पूजनानंतर कुलदेवता व ग्रामदेवता यांचे वडिलोपार्जित व आजमितीपर्यंत राहिलेले कुलधर्म व कुलाचार यांची सोडवणूक झाली. आता आपल्या भावी पिढीच्या सुखासमाधानासाठी कुलदेवदेवता व कुलधर्म, कुलाचार यांची निश्चितता करणे आवश्यक आहे. कारण बऱ्याच भक्त-भाविकांची कुलदेवदेवता गोव्यास, कोल्हापूरास, तुळजापूरास किंवा हिमाचल प्रदेशासारख्या दूरच्या ठिकाणी आहे. अशा कुलदेवदेवतांच्या दर्शनास आजच्या परिस्थितीत वारंवार जाणे शक्य आहे का ? ते शक्य नसल्याने पुन्हा वार्षिक कुलधर्म, कुलाचार पहिल्याप्रमाणेच शिल्लक राहून पुन्हा दुःखास कारण होणार. म्हणून आपण ज्या ठिकाणी स्थायिक झाला असाल तेथीलच स्थानिक महालक्ष्मी, महासरस्वती

किंवा अन्य देवता कुलदेवदेवता म्हणून मानणे योग्य होईल. त्याच वेळी कुलधर्म व कुलाचार मान्य करून घेणे आवश्यक आहे. बऱ्याच घराण्यात देवदेवतांच्या नवरात्र महोत्सवात होमहवन करून बळी दिला जात असे व अद्यापही देण्याची पद्धत आहे. काही घराण्यात ब्राह्मण, सुवासिनी व कुमारिका यांना भोजन देऊन साडी, चोळी वगैरे देण्याची परंपरा असे. आजच्या परिस्थितीत यापैकी काय काय शक्य आहे ? याचा विचार करून भावी काळासाठी कुलधर्म निश्चित करणे आवश्यक आहे. विचारांती हेच निश्चित करणे योग्य होईल की, नवरात्रात रोज पूजा अर्चा, साधा नैवेद्य, अखंड नंदादीप अथवा सकाळ संध्याकाळ साजुक तुपाचे निरांजन लावणे, आठव्या दिवशी (अष्टमी) खणा-नारळाची ओटी भरावी, भोजन देणे शक्य नाही म्हणून एका माणसाचा शिधा द्यावा. या शुद्ध, सात्विक कुलधर्म-कुलाचारावर बऱ्याच भक्त भाविकांचा विश्वास फारच कमी बसतो. कारण या सर्व उपासनेत कोठेही 'बोकड किंवा कोंबडा बळी द्यावा' असे सांगितले नाही. तरी अशा विचाराच्या भक्तभाविकांनी हे लक्षात घ्यावे की, दैवी उपासनेस बळी देण्याने देव लवकर प्रसन्न होतात ही रूढ भावना काढून टाकावी. वरील प्रकारे मान ठेवण्यानेच खरा कुलधर्म, कुलाचार होत असतो.

या अनुष्ठान पद्धतीचे मार्गदर्शन करताना एकंदर तुमच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला आहे. नाहीतर शास्त्राधाराप्रमाणे नवचंडी किंवा शतचंडी हवन व दानधर्म करावयास पाहिजे. या प्रामाणिक भावनेशी आपण समरस होता का ? जेव्हा आपणास वरील प्रसादाचे अनुष्ठान मांडण्यास सांगितले जाते, तेव्हा 'नऊ विडे आवाहनाचे मांडा' अशी आज्ञा असते. त्यावरील दक्षिणा ही सुद्धा ऐच्छिक स्वरूपाची असून तुम्ही ही भावना निर्माण करू शकत नाही की, 'परमपूज्य बाबांच्या कृपेने मी आता देवादिकांच्या रूढ झालेल्या कुलाचार, कुलधर्मापासून सुलभ व सात्विक मार्गाकडे जाणार आहे. तेव्हा आज क्षणापर्यंत राहिलेल्या कुलधर्म, कुलाचार ऋणाबद्दल प्रत्येक विड्यावर पाच आणे ठेवावेत. जर याच कुलधर्म, कुलाचाराबद्दल हवन किंवा दानधर्म करावा लागला असता तर शेकडो रुपये खर्च झाले असते. ते श्रीबाबांच्या कृपेने वाचले.'. पण आपली अशी कल्पना आहे की, या विड्यावरील दक्षिणेच्या निमित्ताने समिती पैसे जमा करू पाहते. पण इतक्या स्वार्थबुद्धीपेक्षा प्रथमच आम्ही आपणाकडे अमुक एक रक्कम मागितली असती. या कार्याचा पाया निःस्वार्थबुद्धीने सेवा करावयाची व सेवा करण्यास शिकवावयाचे असा आहे; हे आपणांस कदाचित ठाऊक नसेल म्हणून आपण नवे पाच पैसे ठेवून कुलधर्म-कुलाचारास आवाहन करता. परंतु अशा संकुचित भावनेने आपल्या दुःखाची कारणे मिटतील का ? जे जन्मऋणानुबंधनाचे ऋण (देव, गुरू व पितृऋण)



बाकी असेल ते देऊन मुक्त झाल्याशिवाय निरंतर सुखाचा पाया भावी पिढीसाठी निर्माण होणार नाही.

**वास्तुपुरूष व वास्तुदोष :** आता राहत्या घराच्या वास्तुदोषामुळे निर्माण झालेल्या दुःखाची कारणमीमांसा विचारात घ्या. वास्तुदोषामुळे आपल्या जीवनात सदैव अशांतता रहात असते. कुटुंबात रोज कोणी ना कोणीतरी आजारी असते. नोकरी, धंदा, व्यापार यांत आर्थिक प्रगती होत नाही. मिळालेला पै-पैसा पुरत नाही. शिवाय या वास्तुदोषांचा परिणाम आपल्या मुलांच्या बुद्धीवर होत असतो. त्यामुळे त्यांचे अध्ययन प्रगतीपर होत नाही. काही दोष इतके प्रबळ असतात की, आपल्या मुलामुलींची लग्नकार्येसुद्धा होण्यास अडथळे निर्माण करतात. तसेच संतति होण्यासाठी बाधक असतात. तसेच कोणी वाईट इच्छेने करणी, भानामती, जादुटोणा केला तर त्याचेही निवारण होऊ शकत नाही. अशा वास्तुदोषांमुळे केलेले देवादिकांचे कुलधर्म, कुलाचार किंवा अडिअडचणी प्रित्यर्थ केली जाणारी सेवा हीसुद्धा होऊ शकत नाही. सेवा झालीच तर पूर्णपणे तिचे फल मिळू शकत नाही. आजच्या आधुनिक जगात या देवतेचा विचार शास्त्रीयदृष्ट्या व्हावा तसा होत नाही. परंतु याच देवतेच्या कृपाछायेखाली आपले देवधर्म व आपले कौटुंबिक सुख सामावलेले आहे हे कोणाही आधुनिक पद्धतीने नवीन घर बांधणाऱ्यास पटणार नाही. कारण घर बांधतेवेळी जवळ असणारा पैसा व आधुनिक सुखसोयी याखेरीज जागेच्या इतर दोषांकडे लक्ष दिले जात नाही. परंतु वास्तुशांत करूनसुद्धा वरील दोषांचा अनुभव तेथे रहावयास आल्यानंतर येतो.

आता या दोषांची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे सांगता येईल : राहत्या जागेची वास्तुशांत झाली नसल्यास, ती जागा पूर्वीची स्मशानाची, निर्वंशाची, देवस्थानाची, दानधर्म केलेली, व्याघ्रमुखी, पूर्वी स्थानदैवत असलेली, सावकाराने व्याजापोटी घेतलेली, शिवाय आजुबाजूला विहीर असून त्यात कोणी जीव दिलेली किंवा घर बांधतेवेळी कोणी पडून घातमृत्यु झाला असलेली, आजुबाजूस वड, पिंपळ किंवा औदुंबर असून तो तोडला गेला असलेली, अशा प्रकाराने वर नमूद केलेले दोष कुटुंबामध्ये सदैव दुःखास कारण होतात.

आता शास्त्राधाराप्रमाणे वास्तुशांत किंवा गृहशांत करणे हा एकच मार्ग आहे. आपण जर भाड्याच्या घरात रहात असाल तर शेदीडशे रुपये खर्च करून वास्तुशांत कराल, यावर कोणी विश्वास ठेवणार नाही; व आर्थिकदृष्ट्या ते कोणास सांगणे हितावह होणार नाही. म्हणून येथे सेवकाकरवी वास्तुदेवतेच्या शुद्धीसाठी मंत्राक्षता टाकून वरील दोषांचे निवारण केले जाते व वास्तुदेवतेच्या नावे एक श्रीफळ घरात बांधण्यास दिले

जाते. पण ते करून घेण्यास ब्याच भक्तमंडळींचा विरोध असतो. का ! तर हा विधी करीत असता शेजारी-पाजारी पहातात व चौकशी करतात. या त्यांच्या होणाऱ्या चौकशीसाठी तुम्ही आपला कार्यभाग घालविता. त्यामुळे पुन्हा तुमच्या दु:खास कारण तुमचे अज्ञान ! आजपावेतो याच अज्ञानामुळे आपण खऱ्या मार्गाचा अवलंब करू शकला नाही. समाजात जणू ही विचारसरणीच रूढ झाली आहे की, संकटे-दु:खे आली की, त्याच्या निवारणार्थ गुपचूप देवादिकांच्या मार्गाचा अवलंब करावयाचा. का, तर तो लोकांना कळता कामा नये. बरोबर याचाच फायदा जगातील भोंदू लोक घेवून तुम्ही दु:खनिवारणार्थ त्यांच्याकडे जाताच 'अमुक द्या, आम्ही सर्व करतो' असे सांगतात. आपल्या मागे त्यांनी काही दैवी किंवा अन्य प्रकार केले तर ते आपण पाहू शकत नाही किंवा विचारूही शकत नाही. कारण तुम्ही अशा ठिकाणी जाताना स्वत:च्या मनाला फसवून 'जग काय म्हणेल' या विचाराने गेलात. आता येथील पूर्वीचा वाईट अनुभव जमेस धरून तुम्ही येथूनही तशीच अपेक्षा करीत असाल तर आम्ही स्पष्टपणे असे सांगू इच्छितो की, येथील कार्यकारण काही गुपचूप प्रकारांनी येण्यासाठी व करण्यासाठी नाही. आपण उजळ माथ्याने येण्यातच आपले कल्याण होणार आहे. कारण ज्या अनुष्ठानपद्धती दु:खनिवारणार्थ सांगितल्या जातात, त्यांचे अनुष्ठान कमीतकमी पाच आठवड्याचे तरी असतेच. अशा वेळी कुटुंबातील सर्वांना दु:खनिवारणार्थ मांडलेल्या प्रसादाबद्दल ज्ञान होणे आवश्यक आहे. कारण दु:खनिवारणार्थ मांडलेल्या अनुष्ठानाप्रित्यर्थ जी नित्य उपासना सुचविली जाते, ती कुटुंबातील जास्तीत जास्त मंडळींनी करण्यानेच लवकर सुखप्राप्ती होईल. शिवाय या कार्याचा हेतू देवादिकांचे महत्व, नित्य धर्माचरणाचे महत्व, षोडषादि संस्काराचे महत्व व कुलधर्म-कुलाचार यांचे जीवनातील महत्व ओळखणे हा आहे. धर्मबाह्य विचारसरणीस आमचे विचार पोषक नाहीत. दु:खनिवारणार्थ जे जे मार्गदर्शन होईल, ते कटाक्षाने पाळणे हाच आपल्या आयुष्यातील सुखाचा क्षण !

**वंशदोष व पितृविमोचन :** आता भौतिक दोषांच्या मीमांसेबद्दल जी धर्मपरंपरा आहे ती पूर्णत्वाने समजून घेणे आवश्यक आहे. या दोषांमुळे आज कित्येक घराण्यांची वाताहात झाली आहे. या दोषांचे परिमार्जन पैसे खर्च करूनही होणारे नाही. त्यासाठी सद्गुरूकृपाच जोडली पाहिजे. आजपर्यंत या मार्गातील सिद्धसाधकांनी या दोषांच्या परिमार्जनार्थ काही अभ्यास केला असेल असे वाटत नाही. कारण या दोषांच्या परिमार्जनार्थ शास्त्राधारात 'नारायण नागबली' सांगितलेला आहे व तो करूनही काही कुटुंबियांना दु:खे भोगावीच लागत आहेत. पुन्हा अशी कुटुंबे त्या दु:खपरिमार्जनार्थ या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यासाठी येतात. हे दोष घराण्यात एकदा निर्माण झाले की,



त्या घराण्याचा पूर्णत्वाने नाश केल्याशिवाय रहात नाहीत. बाह्य जगतात या दोषांचे परिमार्जन होण्यासाठी बरेच पर्याय व उपचार सुचविले जातात व ते करण्याचा आपण प्रयत्नही करता; परंतु या ऋणातून मुक्त करणे सर्वसामान्य साधकाचे किंवा ज्योतिषाचे काम नव्हे. कारण या दोष परिमार्जनार्थ तुमच्या गेल्या सात पिढीतील पितरांना आवाहन करावयाचे असते. त्यांनी ज्ञान-अज्ञानाने ऐहिक सुखाच्या वासनेसाठी जी कर्मे केली ती येणेप्रमाणे-तुम्हा कुटुंबियांच्या घराण्यातील गेल्या सात पिढीपर्यंत जे तुमचे वाडवडील वारले, ते त्यांच्या जीवनांत केलेल्या धर्मबाह्य कर्मामुळे, इच्छावासनेमुळे, देवादिकांची उत्पन्ने, सावकारी गुप्त धन ठेवून दुसऱ्यास दु:ख देण्यास कारण झाले किंवा निर्वंशाची स्थावर, धन वगैरे घेण्याने मुक्तावस्थेप्रत पोहोचले नाहीत म्हणून मरणोत्तर जीवनानंतर त्यांना वासनारुपी योनी (पिशाच्चरुपाने मूळ पुरूष इ.) प्राप्त झालेली असते. या त्यांच्या वासनेमुळे तुमच्या जीवनांत धननाश, विद्यानाश व संततिनाश होत असतो. शिवाय पूर्वी सांगितलेले इतरही पाच दोष निर्माण होतात. आता असा विचार करा की, इतक्या प्रकारे आपले जीवन दूषित झाल्यावर आपणास सुखसमाधान लाभेल का ? एक साधे डोके दुखू लागले तर जीव नको होतो आणि हे तर दुखणे जन्मजन्माचे आहे !

या सात पिढीतील कित्येकजण आपल्या तीव्र वासनेमुळे मुक्त होऊ शकत नाहीत. कारण त्यांनी केलेल्या कर्माचे प्रायश्चित्त त्यांनी भोगल्याशिवाय ते मुक्त कसे होणार ? त्या शिवाय त्यांनी इतरेजनांना दु:खे दिली असतील तर त्यांचेही वाडवडील तळतळाटाने त्यांच्या व तुमच्यामागे असतात. अशा वेळी त्रिस्थळी यात्रेला गेलो (प्रयाग, काशी, गया) आणि श्राद्धादी विधी करून दानधर्म केला म्हणजे वाडवडीलांच्या ऋणातून मुक्त झालो म्हणून चालणार नाही. कारण त्यावेळी त्यांनी ज्यांना ज्यांना छळले किंवा ते ज्यांच्या ज्यांच्या ऋणास कारण झाले त्यांना तुम्ही मुक्त केलेत का ? आणि अशा पिंडदानाच्या आवाहनाने तुम्ही त्यांना मुक्तही करू शकत नाही. कारण आता ते आत्मे मरणोत्तर जीवनानंतर तुमचे नसून त्यांनी जीवनात जे जे काही बरेवाईट केले त्या प्रायश्चित्त कर्माचे ते आहेत. तुमची त्यांना मुक्त करण्याची इच्छा ही परोपकारार्थ नाही, तर तुम्हाला त्रास होत आहे, म्हणून तुम्ही त्यांना मुक्त करू पाहता. म्हणजे पर्यायाने त्यांनी ज्या ज्या वासनेने जे जे केले तेच सुख तुम्हाला आज पाहिजे आहे. तेव्हा नुसते वाडवडील मुक्त होऊन चालणार नाहीत, तर त्यांच्या जीवनात आलेला प्रत्येक कार्यकारण, हितसंबंध मुक्त व्हावयास पाहिजे. आज स्वत:चे आयुष्य तुमच्या सुखासाठी धोक्यात घालून हे पितृविमोचन करण्यास सहसा कोणीही साधक तयार होणार नाही. साधारण स्वरूपाची बाधा झाली तर ती जीव नको करते आणि 'हे आवाहन तर तुमच्या

सात पिढीतले तुमचे वाडवडील व त्यांचे संबंधित आत्मे यांना करावयाचे असते.' मग हे आत्मे साधकाला जगात शिल्लक ठेवतील का ? ही जबाबदारी पत्करायची म्हणजे मृत्युला आवाहन करण्यापैकीच आहे. मग आपण प्रश्न असा विचाराल की, जर आमच्या दु:खपरंपरा इतक्या दोषास कारण झाल्या आहेत तर आमचे काय होणार ? तर या दोषपरिमार्जनार्थ या कार्याच्या सिद्धसिद्धान्त पद्धतीस तसा गुरूकृपेचा अमोल प्रसाद मिळालेला आहे की, ज्यामुळे आपण या त्यांच्या जन्म-ऋणानुबंधनातून मुक्त व्हाल. ज्यांना खरोखरच आपले भावी जीवन व भावी पिढ्यांच्या भाग्याचा विचार करावयाचा आहे, त्यांना या दोष-परंपरेतून ऋणमुक्त होता येईल. हा प्रसाद घेतेवेळी घेणाऱ्यांनी आपली भूमिका समजावून घ्यावी. कारण, सात पिढ्या आणि त्याचे संबंध यापासून ऋण मुक्त व्हावे अशी इच्छा असेल तर आपण खरोखरच धर्माचरण करणार आहात का ? असाल तर स्वत:ला पूर्णपणे विसरावे लागेल. 'मी श्रीमंत, मी ज्ञानी, मी इतरांपेक्षा श्रेष्ठ' हे विचार सोडून देऊन परमपूज्य बाबांचे चरणी लीन व्हावे लागेल. गुरूआज्ञेने वेळोवेळी होणारे मार्गदर्शन विचारांत घेऊन नित्याचरण करण्याची सवय लावावी लागेल. वरील दोष-परिमार्जनार्थ दिलेल्या प्रसादाचे पूजन-अर्चन व उपासना नित्याने करून वरील संबंधित मृतात्म्याच्या ऋणमुक्ततेपर्यंत व पुढेही धर्माचरण करणे आवश्यक आहे. यासाठी योग्य ते मार्गदर्शन निराकरण पत्रिकेमध्ये आहे.

कदाचित् तुमची कल्पना अशी असेल की, पैसे देऊन हे सर्व परस्पर नाही का होणार ? तर ते कदापिही शक्य नाही. कारण, आता ज्या दोष-परिमार्जनार्थ तुम्ही प्रायश्चित्त घेणार आहात, ते दोष असेच पैशांच्या अभिलाषेने झालेले आहेत. आणि पुन्हा त्याच पायावर तुम्ही प्रायश्चित्त घेणार असाल तर ते न घेणेच योग्य ठरेल ! आजपर्यंत तुम्हाला जे सुख, समाधान मिळाले नाही, ते पाहिजे आहे ना ? तर मग काहीतरी स्वार्थत्याग हा तुम्हाला केलाच पाहिजे; परंतु बाह्य जगताने तुम्हाला असे भासविले आहे की, दैव-प्रारब्धातून ऋणमुक्त होण्यास चार पैसे खर्च केले की जे, पाहिजे ते मिळते. मग धर्माचरण केले नाही तरी चालेल ! पण इतक्या संकुचित भावनेने देव, धर्म न मानता तुम्ही सुख निर्माण करू शकणार नाही. कालांतराने तरी तुम्हाला भावी पिढीच्या सुखासाठी धर्माचरण करणेच कर्तव्य ठरणार आहे ! ते धर्माचरण यथायोग्य तऱ्हेने होऊन आपले आचारविचार जीवनाला पोषक आहेत किंवा नाहीत हे दाखविणे, हाच या कार्याचा हेतू होय.

ऐहिक सुखासाठी आचवलेल्या आजच्या समाजास पैसा हेच सर्वस्व झाले आहे. जीवनातील ऐहिक सुखाची कल्पना निश्चित नसल्याने त्याच्या प्राप्तीसाठी जो पै-पैसा



लागतो आहे तो ज्या मार्गाने मिळविता येईल त्या मार्गाने मिळवायचा प्रयत्न मनुष्य अव्याहत करतो आहे. आज या अविचाराबद्दल जर तात्विक मार्गदर्शन वरीलप्रमाणे केले तर ते कोणासही पटणार नाही. त्यांनी केलेल्या दुष्कर्मांचा वाटा त्यांनीच दैवी उपासनेने दूर केला होता, राहिलेला तुमच्या वाटणीस आला. तुम्ही आज अनित्य मार्गाने खूप श्रीमंत होण्याची कल्पना मनाशी बाळगली आहे; परंतु तितकेच दु:ख तुमच्या भावी पिढीला भोगावे लागणार आहे हे विसरला आहात. आज तुमच्या जीवनात देवधर्मासाठी निश्चित स्थान नसल्याने ऐन उमेदीमध्ये मिळविलेला पै-पैसा म्हातारपणीसुद्धा दु:खाला कारण झाल्याशिवाय रहाणार नाही. हे विचार केवळ तत्व म्हणून तुमच्या समोर मांडले नसून आजपर्यंत अनेक भक्तमंडळी अशा तऱ्हेचे दु:ख वार्धक्यात भोगत असून एकवेळच्या उदरनिर्वाहास महाग झाली आहेत. तेव्हा आजची पिढी जर या विचाराशी सहमत झाली तर समाजातील बराच अशांततेचा भाग कमी होईल.

**वैयक्तिक कर्म-विपाक :** वर सांगितलेले सर्व निराकरण तुमच्या जीवनाशी संबंधित असलेल्या ऋणमुक्ततेसाठी होते. आता तुम्हास तुमच्या जन्मकारण परंपरेमध्ये असलेले ऋण (पितृ, देव, गुरू) यांच्यापासून मुक्त व्हावयास पाहिजे. रोज नित्याचरणात व पूर्वी घडलेल्या पातकांबद्दल जर काया, वाचा, मनाने प्रायश्चित्त घेतले नाही तर पुनश्च तशी कर्मे हातून घडतात. शिवाय स्वत:ची जन्मकारण परंपरा ही दु:खे निर्माण करण्यास कारण होते, तेव्हा यातून निश्चित जीवन निर्माण होऊन जीवनात निरंतर सुख, शांति लाभावी अशी इच्छा असेल तर जीवनाची दिशा निश्चित करावी लागेल. कारण, प्रथमत: तुम्ही येथे आलात ते दु:ख सांगून सुखी होण्यासाठी. 'माझ्या जीवनात काय काय उणे आहे व ते मला कसे मिळेल' हा एकच स्वार्थ म्हणजे आपले जीवनाबद्दलचे ज्ञान ! आणि त्या ज्ञानाने जे जे मिळेल तेवढी तुमची परमेश्वराबद्दलची निष्ठा ! हेच गणित चुकले. जितके जीवनातील उणे सांगितले तितकी तुमची असमाधानी वृत्ती आज दु:खास कारण आहे, हे सिद्ध झाले. ते असमाधान जाण्यासाठी काया, वाचा, मनाने तुम्ही काही प्रयत्न करणार असाल तर अभ्यासाने हे पटेल की, आजपर्यंत जीवनात खरोखर उणे किंवा उणीव कशाशीच नव्हती. खरी उणीव होती ती परमेश्वराची; पण इतका चांगला विचार येण्यासाठी जे योग्य ते संस्कार जीवनात व्हावयास पाहिजे होते त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून सुखाच्या उणीवा लक्षात घेवून परमेश्वराकडे धावलात. आज जगात स्वत:ला ईश्वरभक्त, ज्ञानी, अनुभवी, गुरूप्रसाद पूर्ण लाभलेला सिद्ध, साधक समजणारासुद्धा या उणीवा उरी बांधून परमेश्वर शोधतो; पण खऱ्या अर्थाने तो 'परमेश्वर' शोधित नसून 'सुखाच्या शोधार्थ परमेश्वर' शोधतो व त्या सुखांची पूर्णावस्था प्राप्त झाली नाही की ढासळतो. 'म्हणजे मला मार्ग पटत नाही', 'या मार्गात

काही तथ्य नाही', असे उद्गार काढतो; पण असा विचार करा की, या तुमच्या स्वार्थाने भरलेल्या जीवनात ज्या उणीवा आहेत त्या पूर्ण झाल्या म्हणजे परमेश्वर आहे का ? किंवा त्याचा आशीर्वाद मिळाला आहे का ? तुमची अशी कल्पना आहे की, 'जे जे मी मागितलेले ते ते मला मिळाले म्हणजे माझ्यावर परमेश्वराची अखंड कृपा आहे.' याच चुकीच्या भावनेने तुम्ही तुमच्या जीवनातील ऐहिक सुखाच्या गरजा आज वाढवून बसला आहात, जोपर्यंत तुमच्या इच्छाशक्तीने हे सर्व सुख प्राप्त होत असते तोपर्यंत तुम्ही देवाला मानता आहात हा भास निर्माण होतो व जेव्हा वासनेने ही इच्छाशक्ती निर्बल होते, तेव्हा पुन्हा दुःखे निर्माण करण्यास कारण तुम्हीच होता. आता प्रामाणिकपणे असा जबाब द्या की, या स्वार्थी सुखाच्या जीवनासाठी तुम्ही खरोखर परमेश्वर मानलात का ? खऱ्या परमेश्वराची कृपा अशी आहे की, 'तुम्ही जीवनात जे जे नाही असे जगाला वाटते, तरीसुद्धा ज्याची तुम्हाला आठवण सुद्धा होत नाही; व जे आहे व नाही याबद्दल आसक्ती नाही हे समाधान म्हणजे ईश्वरी कृपा!' परंतु, हे ऐहिक सुख मिळून तरी तुम्हाला समाधान आहे का ? ते होणार नाही. कारण वासनांच्या पूर्ततेसाठी 'देव शक्तीमान आहे' हे मानणे याचा अर्थ तोही 'वासनारुपी आहे' असा होतो; पण देव तसा नाही. याउलट 'त्याच्याशिवाय जीवन व्यर्थ आहे' ही भावना हे त्याचे रुप आहे. तेच आत्मसात केले पाहिजे.

या वर नमूद केलेल्या ऋणमोचनाच्या निराकरण पद्धतीच्या शास्त्रशुद्ध आधाराने तुम्हाला दुःखमीमांसा कशाप्रकारे असू शकतात हे कळले. या दुःख मीमांसेला तुम्ही आज जरी कारण नसाल तरी त्याचे संबंध तुमच्या जीवनाशी असेच येत राहणार. यासाठी आणखी काही सिद्ध-सिद्धान्त पद्धतीचा अभ्यास कटाक्षाने करावा लागेल. मानवी जीवन हे पूर्णपणे परावलंबी आहे. त्यासाठी ज्याला तुम्ही दैव किंवा नशीब म्हणता ते बनवावे लागते. देवावर, धर्मावर, नशीबावर किंवा ज्योतिषावर विसंबून ते बदलत नाही. सुरुवातीलाच ही भूमिका तुम्ही सांगता की, "आम्हाला दुःख या माणसामुळे झाले" तो जसा एखादा मनुष्य दुःखाला कारण होतो, तसा एखादा सुख निर्माण होण्यासही कारण होतो. एक काळ या जगात असा होता की, आमच्याच वाडवडीलांनी पिढ्यानपिढ्या जे सुख-समाधान भोगले ते आम्हाला वर्षभरसुद्धा लाभू शकत नाही. याला कारण काय ? नुसत्या समाज उन्नतीच्याच कल्पनांनी आम्ही वेडे होऊन 'सुख-सुख' म्हणून ओरडतो आहोत. पण ते लाभण्याचे भाग्य आमच्या हाती नसल्याने, एकमेकांत द्वेष, वैर निर्माण करण्यास आम्हीच कारण झालो. खरोखरच आम्ही दुःखी आहोत का ? हा साधा प्रश्न विचारात घेण्यासही आमच्यापाशी समाधानी वृत्ती नाही. याला कारण आज आमचा देवा-धर्माबद्दलचा अविश्वास.



प्रत्येक मानवाच्या जीवनाला आरंभ तो जन्माला आल्या क्षणापासून जरी होत असला तरी त्याचे जन्माचे कार्य हे त्याच्या पाचव्या दिवसापासून सुरू होते. म्हणून धर्मशास्त्राने या दिवसापासून ते मरेपर्यंत "षोडषादि संस्कार" सांगितले आहेत. आज समाजाच्या विचारांनी विकृत अवस्था, ह्या संस्कारास 'मागासलेली विचार सरणी' म्हणून संबोधते आहे. म्हणून वरील ऋणांतून जरी मुक्त झालात तरी दुःखे संपत नाहीत. या संस्काराचे महत्व न पटल्याने जो दुःखी झाला त्याला काय काय यातना भोगाव्या लागल्या त्या आपण "निराकरण पत्रिकेवरून" अभ्यासात घ्या.

जीवनातील दुःखमीमांसा व कारणे ही जशी दैवी मार्गाचा अवलंब करून दूर होतात. तसेच आणखी काही ऋणानुबंध आपल्या जन्मकारण परंपरेत असतात, की त्यामुळे जीवनातील सुख, शांति, समाधान निर्माण होते. हे ऋणानुबंध म्हणजे माझे दैव असू शकेल. यावर सध्या जरी कोणा भक्तभाविकांचा विश्वास बसला नाही, तरी तो अभ्यास म्हणून नोंद करून ठेवावा. कारण अशी घटना केव्हा ना केव्हा जन्मात घडल्याशिवाय तुम्ही हे जग सोडणार नाही. तत्संबंधीचे विवेचन निराकरण पत्रिकेत अनुभवांनी मांडले आहे.

आज समाज कल्याणासाठी व उन्नतीसाठी जशी अन्य शास्त्राची आवश्यकता आहे तशी याही शास्त्राची असावयास पाहिजे, हे आपण कधीही म्हणणार नाही. यासाठी मानवी जीवनाच्या दुःखपरंपरेला काय काय शास्त्रीय कारणे असू शकतात हे अभ्यासण्याचे कार्य गेली दहा वर्षे चालविले आहे. आपली कल्पना एवढीच आहे की, आरती व दुःखाचे निराकरण यापेक्षा समितीपुढे काही कार्य नाही. तर समितीला समाजकल्याणार्थ हे शास्त्र किती आवश्यक आहे हे सिद्ध करावयाचे आहे. आज पैसा हेच माध्यम आपल्या लोकांचे झाले असल्याने सुख हे पैशावर अवलंबून असते हा विचार निश्चित झाला आहे. त्यामुळे जीवनांत येणाऱ्या आपत्तींना तोंड देण्याचे धैर्य, आत्मविश्वास आपल्यापाशी नाही. यासाठी दैवी उपासनेशिवाय दुसरा कोणताही मार्ग धैर्य, आत्मविश्वास, निष्ठा निर्माण करू शकणार नाही. गेल्या काही वर्षात जी हजारो भक्तभाविक मंडळी आपल्या दुःख निवारणार्थ आली, त्यांच्या दुःखांची मीमांसा निराकरण पत्रिकेत लिहीली आहे, ती या हेतूने की, आज प्रत्येक मनुष्य उठता बसता 'यात काय अर्थ आहे' असे बोलतो. पण तो बोलणारा एकटा असल्याने त्याच्या बोलण्यात तरी काय अर्थ आहे हे त्याला समजणार नाही. म्हणून आजपर्यंत येथे समितीने ज्यांना ज्यांना मार्गदर्शन केले, त्यातून अभ्यासाने ज्या मीमांसा काढल्या त्या निराकरण पत्रिकेत सविस्तर मांडल्या आहेत.

--- --- --

## ४. विमोचने-दीक्षा :

यामध्ये प्रथमतः 'वंशविमोचन' या साधनाचा विचार करणे आवश्यक आहे. घराण्यातील तीन महत्वाचे दोष संपत्ती, विद्या, संतती यांचा नाश होण्यास जे कर्म कारणीभूत होते, त्या कर्मातील दोष या साधनाने गेले पाहिजेत, हे समजले. जी भक्तमंडळी मार्गदर्शनार्थ येत होती, त्यांच्या कुटुंबात वरीलपैकी एकतरी दोष वंशात धारण होताच, हे कळले. अशाप्रकारे दोष सर्वांच्या ठिकाणी आज आहेत. याचे कारण गेल्या शंभर वर्षात आपले आचार-विचार यांचा पत्ता नाही. अमुक जात अमुक धर्म हा सांगण्यासाठी राहिला आहे. नित्याचरणात देव व धर्म आला असता, तर ह्या दोषांची मुक्तता झाली असती. आज जगण्यासाठी जो गुण लागतो तो सत्वगुण, याचा अभाव आहे. वास्तविक तो धर्म बोलण्यात व वागण्यात असावयास पाहिजे. निसर्गातील पक्षी व प्राणी हे आपापल्या धर्माप्रमाणे वागतात; व परमेश्वराने आम्हा मानवांना बुद्धी दिली म्हणून त्या जीवनाचा खेळखंडोबा करणे, हे उचित नव्हे. आपण बाहेर जातेवेळी समाजाने आपल्याला मोठे म्हणावे, म्हणून चांगले कपडे परिधान करण्याची दक्षता घेत असतो; पण घराण्यात जी संतती होणार आहे, ती निरलस, सर्वगुणसंपन्न असावी, अशा विचारार्थ काय केले पाहिजे ? ह्याचे ज्ञान आपल्याला नाही. जन्माला आल्यावर त्या जीवाची प्रगती व्हावी, यासाठी आपण देवाला विचारणा करतो; पण जो जीव जन्माला येणार आहे, त्याची माता-पिता ही खाण असते. जन्माला येणाऱ्या मातीत आचार-विचारपरत्वे दोष असेल, तर त्याचप्रमाणे संतती जन्माला येईल. जी सुधारणा व्हावयास पाहिजे असे शास्त्रज्ञ म्हणतात, ती जीव जन्माला आल्यावर कशी होणार ? समाजात जो डॉक्टर झाला किंवा अलौकिक शास्त्रज्ञ आपण पहातो, त्याच्या जन्माच्याआधी त्याचे मातापिता कसे वागले ? की, ज्यामुळे मुलगा डॉक्टर झाला किंवा शास्त्रज्ञ झाला, हे पाहिले पाहिजे. आज जे जग त्यात बदल झाला नाही; तर जो बदल झाला तो आम्हा मानवांमध्ये झाला आहे. समाजात जे जे आपल्याला दिसते व त्यात सुधारणा व्हावी असे आपण म्हणतो, त्या समाजाची रचना कशी झाली ? यासाठी जो पाया आवश्यक आहे तो इतरांचा न पाहता, आपल्या पायाखाली काय आहे हे पाहिले पाहिजे. तीच माती आकार घेऊन, पुढे आपली संतती निर्माण होते. जन्माला येतेवेळी संततीत जर कमीअधिक दोष असेल तर संपत्ती, जे जगण्याचे साधन आहे; त्याचा लाभ होऊनही, त्या संपत्तीपासून समाधान प्राप्त होत नाही.

समाजात अडचणी असतील; तर किती काळपर्यंत ? ह्या अडचणी आपणांस जागे करण्यासाठी असतात; पण संपत्तीचा मोह आज इतका वाढला आहे की, अडाणी



मनुष्यापासून शिकलेल्या मनुष्यापर्यंत तृप्ती आहे का ? ह्या मोहापायी जीव कसा जातो ? व कसा जगतो ? ही स्पर्धा चालू आहे. जर स्वतःला शांती नाही तर विश्वात व्हावी कशी ? 'शांती'बद्दल भाषणे देणारे पुष्कळ आहेत. पण भाषणे देणारा आपले कर्तव्य काय हे विसरून भाषणात व संभाषणात इतर विषय बोलतो. ज्यामध्ये प्रामुख्याने इतरांची निंदा असते. 'दया, क्षमा, शांती' हे शब्द नुसते बोलण्यासाठी राहिले आहेत. याचे कारण जन्माचे गणित चुकले आहे. ही चूक आज आपल्याला भोगावी लागत असून, पुढे या परिस्थितीकडे दुर्लक्ष केले, तर आपल्याला जगणे अशक्य आहे. आज आपण संपत्ती प्राप्त कराल, परंतु पुढे ही संपत्ती आपल्या नाशाला कारणीभूत होणार असून, त्याचा दोष मुळाशी धारण होतो आहे.

जो आपला पाया देवावर, धर्मावर उभारला आहे; त्याची जागृती व्हावी व सर्वांना सुख लाभावे यासाठी हे कार्य परमपूज्य बाबांनी सुरू केले. परमपूज्य बाबा काही शास्त्रज्ञ नव्हते; पण साध्या फकीराने सर्व जगाला तारावे, असा विश्वास सर्वांना दिला व देत आहेत. ह्या जगाची रीत अशी आहे की, आपल्याला सर्वांनी मोठे म्हणावे व त्यासाठी जगाची निंदा करावी. ह्या जगात साधुसंत येतात व जातात. येताना जगाला तारण्यासाठी येतात व जाताना त्यांचा 'वास' भूतलावर अखंड असतो, म्हणूनच आजपर्यंत आपण तरलो आहोत.

वरील दोष पंच्याहत्तर टक्के मानवांमध्ये आहेत. बाकीचे जे पंचवीस टक्के सुख प्राप्त करते आहेत; त्यांनी ज्यांना दुःख आहे त्यांच्याकडे सहानुभूतीने पहावे. त्यांनी नुसती दारे बंद करून, 'सभोवारच्या जगाने डोळ्यावर देवाधर्माची पट्टी बांधली आहे;' असे म्हणणे हास्यास्पद आहे. धर्मशास्त्राने जे दोष आहेत, त्यांचे निवारण व्हावे अशी तरतूद केली आहे. पण त्यासाठी निराकरण करणारे लोक पाहिजेत. यासाठी जगाकडे धाव घेऊन हे दुःख दूर होणारे नाही. जर आपण मनोभावनेने काही ना काही देवाचे स्मरण केले तर आपले मरण चुकेल व आपल्याला योग्य मार्गदर्शन करणारा 'साधक' भेटेल. जर आपण दुसऱ्यावर विसंबून राहिलो तर सर्वत्र 'बाधक' वाट पहात आहेत. ते आपल्या दुःखाचा व अज्ञानाचा बळी घेतील. ह्यासाठी या मार्गात येण्यापूर्वी सज्ञान व्हा; मार्गस्थ व्हा. नाहीतर मार्ग न समजल्यामुळे, आपले दुःख व आपले कुटुंब म्हणजे पर्यायाने आपला वंश, ह्याचे विमोचन होण्याऐवजी आपला अस्त होईल.

त्याप्रमाणे जे जे कोणी मागदर्शनासाठी येत होते, त्यांना 'निराकरण' म्हणजे काय ह्याची सविस्तर माहिती सांगून, 'वेळ येताच' म्हणजे परमपूज्य बाबांची आज्ञा जेव्हा होईल तेव्हा मी पुढील निराकरण सांगेन, असे सांगत असे. तत्पूर्वी वंश-विमोचनाचा

विधी कसा करावा ह्यासंबंधी विचारविनीमय पुण्यातील वेदशास्त्रसंपन्न गोगटे गुरूजी, जे त्यावेळी आपल्याकडे येत होते, त्यांच्याशी केला. त्यांचे मूळ गांव 'वाई' असे असून वास्तव्य पुण्यास होते. त्यावेळी माझा विषय काय आहे ? काय विधी करणे आवश्यक आहे ? किंवा काय प्रायश्चित्त घेणे भाग आहे ? हे त्यांना सांगितले. त्यावेळी ते म्हणाले, 'मला एक महिना विचार करण्यास द्या. त्या मुदतीमध्ये आणखी जे कोणी विद्वान पुण्यात आहेत, त्यांना मी जाऊन भेटेन व मग आपण भेटू.' त्याप्रमाणे वंशविमोचनाचा आराखडा तयार झाला की, त्यामध्ये प्रधान आवाहन देवांना करून, मग पूजा अर्चा व हवन आदि विधी होता. जो दोष घराण्यात आहे, त्यासाठी संकल्पयुक्त प्रायश्चित्त हवन करावयाचे असून, त्यासाठी सप्त पितृ व मातृ घराण्याचा उच्चार व्हावयास पाहिजे. व त्यांच्या आहुति तीळ व तूप यांनी देऊन हवन करावयाचे व पूर्णाहुतीने सांगता होऊन हा विधी पूर्ण होतो. त्यावेळी भक्तभाविक उपस्थित रहातील त्यांनी प्रायश्चित्त संकल्पाचा उच्चार करावयास हवा.

हा विधी झाल्याबरोबर सुखाचा पाऊस पडेल असे नाही. ह्या विधीमुळे, गतकाळात जे आत्मे परलोकवासी झाले आहेत, त्यांना दोषमुक्त करून, पुढे ह्या आत्म्यांना सद्गती मिळते. पण यामध्ये आपले आचार-विचार यावर त्यांची मुक्तता अवलंबून आहे. नुसता वंशविमोचनाचा संकल्प घेतला, म्हणजे ते मुक्त होतील; असे जर कोणास वाटत असेल तर भगीरथाने जी तपश्चर्या केली तो वेडा होता, असे म्हणावे लागेल. त्याप्रमाणे पहिले वंशविमोचनाचे हवन कल्याणला हाजीमलंग ह्या डोंगरावर झाले. अशा तऱ्हेने पाच हवने तेथे झाली. याचे कारण अभ्यासण्यासारखे आहे. ते असे की, दोष अधिक कर्म यांचे विमोचन होऊन, नंतर ह्या विधीचा दोष कोणालाही लागू नये. कारण हा विधी पहिल्यांदाच आपण करीत होतो. व ज्यावेळी दोषांचा उच्चार केला जात असतो, तो राहत्या वास्तूत होऊ नये. काही विधी असे आहेत की, जे वास्तूच्या बाहेर करावे लागतात. त्याप्रमाणे पाच हवने केल्यानंतर, मग मुंबई, पुणे व गोवा ह्या तीन केंद्रावर हा वंशविमोचन हवन विधी केला गेला. पहिले हवन पुणे, मग मुंबई व मग गोवा ह्या क्रमाने करण्यात आले. कारण हा विधी तीनशेसाठ मैलामध्ये व्हावयास पाहिजे होता. आपली पृथ्वी ही तीनशेसाठ अंशामध्ये जन्माला आली. ह्या पृथ्वीच्या आसमंतात जी पोकळी आहे, त्या पोकळीत प्रथमतः आत्म्याचा प्रवेश होतो. व मग हे आत्मे आपापल्या कर्माप्रमाणे गतीला जात असतात. व परलोकातील पाच लोकात ह्या आत्म्यांना स्थान प्राप्त होत असते. यासाठी हा विधी मकरसंक्रांत झाल्यावर करावयाचा असून त्या विधीसाठी ग्रह हे अनुकूल पाहिजेत. प्रथमतः हा विधी जेव्हा करण्यात आला,



त्यावेळी पृथ्वीची कुंडली हा विचार केला गेला आहे. कारण त्यासाठी 'गुरू' हा सिंह राशीत असताना, ह्या राशीला 'शनि' यावयास पाहिजे. तेव्हा या विधीस तीनशेसाठ वर्षांनी आरंभ झाला. कारण असा योग तीनशेसाठ वर्षांनी येतो. जगात खूप तीर्थक्षेत्रे आहेत. व त्या ठिकाणी पुष्कळ ज्ञानी असे उपाध्ये आहेत. परंतु कोणता विधी ह्या जगाला हितकारक होईल हे पहावे लागते. नाहीतर दर महिन्यात हा विधी होऊ शकतो. पण त्याचे हेतू वेगवेगळे असू शकतात. बरेच लोक ह्याला बळी पडतात. कारण इहजन्मात संतती प्राप्त न होणे, हा दोष कमीपणाचा वाटतो; म्हणून तीर्थक्षेत्री जाऊन, जे सांगतील ते विधी हे लोक करीत असतात. त्यामुळे त्यांचे मनोगत जे 'अपत्य' व्हावे असे असते, त्याऐवजी 'आपत्ती' घेऊन ते घरी येतात. काही प्राप्त व्हावे, अशी इच्छा होणे स्वाभाविक आहे. पण ती इच्छा ईश्वराधीन असते. अशावेळी ईश्वराला प्रसन्न न करून घेता, वासनेला बळी पडून, तीर्थक्षेत्री जाऊन, आपत्ती घरी आणीत असतात. अशी चूक झाल्यावर, जरी तो भक्त गुरूमार्गी झाला तरी ह्या दोषापासून मुक्त होत नाही. यासाठी हा वंशविमोचन विधी केंद्रावरील जे येणारे भक्त व जे पुढे येतील त्यांच्यासाठी दरवर्षी करून, त्या विधीची सांगता एकवीस वर्षांनी केली. त्यासाठी गुरूआज्ञेने संपूर्ण वर्ष, दर पौर्णिमेस मी श्रीनरसोबावाडी ह्या ठिकाणी जाऊन, श्रीरुद्र देवतेचे होमहवन करीत होतो. अकरा पौर्णिमेस हा विधी जेव्हा सिद्ध झाला, तेव्हा 'महारूद्र स्वाहाकार' याचे आवाहन केले गेले. यासाठी समस्त भक्तांना आमंत्रण देण्यात आले. कारण हा विधी पैसे आहेत म्हणून करता येत नाही. ह्या स्वाहाकारात ज्या शक्तीला आवाहन करावयाचे असते, तत्पूर्वी भक्ताचे काया, वाचा, मन दीक्षा देवून तयार करुन घ्यावे लागते. कारण ती शक्ती भूतलावर आल्यावर प्रत्येकाच्या ठायी अंश रुपाने राहिली पाहीजे. हा विधी जगतात शांती नांदावी म्हणून केला जातो, पण तो करण्यामागे काय पथ्य आहे ? हे न समजल्यामुळे शांती प्राप्त न होता आज अशांती जगात पसरली आहे.

ह्या विधीच्या संदर्भात वंशात कर्म विमोचन व ऋणमोचन हा विधी आहे. आपल्या घरण्यात वंश जन्माला येतो. ज्यावेळी जन्म प्राप्त होतो त्यावेळी पूर्वीची वंशाची कीड लागली, तरी तीच परंपरा पुढे कर्म म्हणून आपल्याला भोगावी लागते. ही कीड गेल्याशिवाय संपत्ती, संतति आदी सुख प्राप्त होण्यापेक्षा न होणे बरे. एखादी संतति घराण्यात जन्माला येतेवेळी, जर पूर्वीचा दोष मुक्त झालेला नसेल, तर जन्माला येऊन न्यूनता पहावयास मिळते. अशा दोषामुळे विद्या नाही, संपत्ती नाही, अशी परिस्थिती येते. मग अशा लोकांनी जगावे कसे ? असा दोष जावा म्हणून डॉक्टरी शास्त्र उपाय करीत आहे ; व शोधही लावीत आहे. पण तो किती ? तर दहा टक्के. अशाने हे जग सुखी होईल का ? येणाऱ्या भक्ताना वंशविमोचनाचा लाभ दिल्यावर, त्याबरोबर 'दीक्षा'

याचाही लाभ जोडावयाचा असतो. त्यामुळे बऱ्याच भक्ताना हे कार्य कसे चालू आहे ह्याचा अचंबा वाटला. कारण विमोचन याचा संबंध दीक्षेशी कसा काय ? अशी विचारणा केल्यावर, त्याना मुलाखतीद्वारे हे समजावून सांगितले की, जगात जो कोणी जन्म घेतो, त्याच्या काया-वाचा-मनात पोकळी नाही. दोष हा देहामध्ये कर्मरुपाने असतो; व कर्माचा अडथळा, म्हणजे देहाच्या गतीमध्ये मंदपणा किंवा अधिकपणा येतो. अशामुळे जरी सुख असले, तरी मन:शांती लाभत नाही. शांति व सुख यांची माध्यमे, म्हणजे काया,वाचा, मन; ह्यांची गति वेगवेगळी आहे. मनाची गति अधिक असून, कायेची कमी व मंद असते. अशावेळी शरीर गतिमान होणे, हे महत्त्वाचे आहे. यासाठी पहिले विमोचन व मग दीक्षा यामुळे हळूहळू प्रगति व मग गति, ही अवस्था प्राप्त होते. यामध्ये तीन विमोचने व तीन दीक्षा यांचा देहिक अवस्थेशी संबंध असतो; व पुढील दोन दीक्षा आत्म्यास असतात. जो आत्मा शरीरात धारण झाला आहे, त्याला योग्य मार्गाने वळण यावयास पाहिजे. देहिक अवस्था अधिक आत्मिक अवस्था म्हणजे मानव! बहुतांशी साधक फक्त स्थूल देहाचा विचार करतात. उदाहरणार्थ, अमुक जप केला, अमुक पारायणे केली, अमुक तीर्थयात्रा केल्या, म्हणजे पर्यायाने देहाने किंवा आत्म्याने जन्माला येतेवेळी पाप केले आहे; हीच भावना जमेस धरुन हे लोक साधना करीत असतात. यासाठी गुरूंचे कर्तव्य दोन्ही अंगानी युक्त पाहिजे. एक देहिक व दुसरे आत्मिक. ह्या दोन अवस्थेमुळे जीवन प्राप्त होते. यात एकाची प्रगति केली, तर दुसऱ्या अवस्थेची अधोगति ही नकळत भोगावी लागते. यासाठी गुरू हे माध्यम 'आई' सारखे आहे. आई ज्याप्रमाणे जन्माला येणाऱ्या बालकांचा सांभाळ करते, त्याप्रमाणे 'गुरू' असावयास पाहिजेत.

ह्या तीस वर्षात अनेक भक्त आले व गेले. त्यापैकी कुणाला काय मिळाले ? ऐहिक प्राप्ति काय झाली ? याची चौकशी केली नाही. आपले कर्तव्य हे पुढे जाण्याचे आहे, मागून बघण्यासाठी किंवा बोलण्यासाठी नव्हे. जो आला त्याला गुरुकृपेने काही प्राप्त झाल्याशिवाय राहिलेले नाही. पण 'कृपा झाली'; असे म्हणणारे किती ? याचाही विचार मी केला नाही. आपण आपल्या इष्टकर्तव्यास सदैव जागरूक राहणे; याचा अर्थ कृपेला पात्र होणे, असा आहे. ह्या तीस वर्षात माझा प्रवास सगळ्या हिंदुस्थानभर झाला. त्यावेळी अनेक पवित्र अशी स्थाने मी पाहिली. त्या ठिकाणी जे काही प्राप्त होण्यासारखे होते, ज्याचा लाभ ह्या कार्यास होईल, अशा पवित्र स्थानी मी जाऊन आलो. या भेटीत काय प्राप्त केले असेल ? तर आपली साधना; ज्यामुळे पुरुषार्थ प्राप्त होतो. ह्या त्रिभुवनात तेहतीस कोटी देव आहेत. त्यापैकी किती देवात देवत्व आहे ? हा प्रश्न आहे. बाकीचे नुसते नामधारी आहेत. आपल्यासारखे ! म्हणजे आपण व देव सारखेच! याचा



उपयोग स्वत:लाही नाही व इतरांना म्हणावे तर लाज वाटते, अशी स्थिती आजमितीला आहे. म्हणून अडीच हजार वर्षानंतर नाथांनी 'साईनाथांचे' नाव अजरामर केले.

--- --- --

## ५. आचार, विचार निश्चितता :

प्राप्त झालेल्या जीवनामध्ये निरंतर सुखाची अपेक्षा करणाऱ्या माणसाने आपले आचार विचार निश्चित करणे आवश्यक आहे. ते पूर्णत्वाने निश्चित करण्याचा प्रयत्न दैनंदिन जीवनात तुम्ही करू लागलात की, पूर्णत्वाने तुम्ही सुखी व्हाल. आता प्रश्न असा निर्माण कराल की, 'आमचे आचार, विचार निश्चित नाहीत का ?' काही बाबतीत ते तसे आहेत व काही बाबतीत तसे निश्चित नाहीत. जे निश्चित आहेत त्यांचे सुख तुम्ही अनुभवित आहात. पण जे निश्चित नाहीत तेच दुःख म्हणून तुम्ही विचारण्यास येत आहात.

आचार हा पूर्णपणे कुटुंबाच्या सुखाचा ठेवा आहे. तो निरंतर स्वरूपाचा लाभण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनातील प्रत्येक कर्म हे 'कर्तव्य' म्हणून करण्याची सवय कुटुंबातील नोकरा-चाकरांनासुद्धा लागली पाहिजे. सकाळी उठल्यापासून ते रात्रौ झोपण्यापर्यंतचे सर्व दैनंदिन कार्यक्रम यथायोग्यपणे प्रत्येकाने पार पाडलेच पाहिजेत; व त्याचा अभ्यास व्हावा म्हणून कुटुंबातील प्रत्येकाने झोपण्यापूर्वी 'परमार्थ प्रश्नावली'चा आढावा आपल्या मनाशी घ्यावा. ही 'परमार्थ प्रश्नावली' रोज वाचून त्याप्रमाणे आपण वागू शकलो किंवा नाही हे पहाण्याची सवय प्रत्येकाने लावून घेणे आवश्यक आहे. (ही 'परमार्थ प्रश्नावली' पुढे दिली आहे.)

आयुष्यात लाभणारा प्रत्येक क्षण हा पुनश्च स्वतःला मिळणारा नाही. तेव्हा स्वतःचा व दुसऱ्याचा वेळ कदापिही फालतूपणे खर्च करण्यास कारण होऊ नये. स्वतःचा वेळ तशा प्रकारे जात असल्यास किंवा दुसरा घेत असल्यास प्रामाणिकपणे अपव्ययाच्या दृष्टीने त्याची देवाणघेवाण होऊ देऊ नये व त्याबद्दल स्पष्टवक्तेपणा असावा. हा आचार, विचार पारमार्थिक उन्नतीच्या मार्गातील माणसाने प्रथमतः केला पाहिजे. कारण असे की, आपण किती वर्षे या जगात रहाणार आहोत हे आज आपल्याला ठाऊक नाही. तेव्हा आयुष्यातील दैनंदिन कर्तव्याचा भाग पुरा झाल्यावर राहिलेला वेळ स्वतःच्या उन्नतीसाठीच खर्च केला पाहिजे. त्याचा हिशेब लागल्याशिवाय नुसते तासतास देवाबद्दल, धर्माबद्दल, शास्त्राबद्दल, मार्गाबद्दल चर्चा व प्रवचन देऊन किंवा लिखाण लिहून चालणार नाही, हे मार्गदर्शन समिती आपल्याला आपण येथील निश्चित भक्त झाल्यावर करते.

वरील दोन सिद्धान्त आज तुम्ही आत्मसात केलेत की, जीवनात सुख, शांति निर्माण करण्यास तुम्हीच कारण होता. हे आपले निश्चित झालेले आचार, विचार सद्‌गुरूच्या ठिकाणी इतके एकरूप व्हावयास पाहिजेत की दैनंदिन जीवनात आपल्या



हातून कोणाचा अपमान, उपमर्द, तिरस्कार किंवा अपरोक्ष निंदा, नालस्ती होता कामा नये. तसेच कोणाच्या शरीराला अथवा मनाला क्लेश किंवा दुःख देण्यासही कारण होता कामा नये. ही निश्चितता ज्या भावनेने तुम्ही निर्माण करू शकाल, त्या भावनेचा ओलावा म्हणजेच 'परमेश्वर' आणि ज्याच्यासाठी ही भावना व्यक्त केली गेली तोच 'माणूस धर्म.'

आज जगाच्या निरनिराळ्या तात्विक वादात धर्माबद्दल अनेक प्रकारांनी अेक विचार प्रगट केले जात आहेत. याचा अर्थ असा आहे की, एक खूप पंचपक्वान्न जेवतो आहे व जे उपाशी आहेत त्यांना 'तुम्ही ढेकर का देत नाही ?' असे विचारतो आहे. हीच स्थिती आज समाजात सिद्धसाधक, सुधारक व शास्त्रज्ञ यांची आहे. परंतु अशा संकुचित आचार-विचारांचा 'धर्म' कधीच होऊ शकत नाही. आपण आपले आचार-विचार सद्‌गुरूंच्या ठिकाणी निश्चित केल्यावर आपल्या ठिकाणी एक स्फूर्त भावना निर्माण होऊ लागते की, 'जगातील इतरांना सुख, समाधान देण्यासाठी कायेने, वाचेने, मनाने, निःस्वार्थपणे मला काय प्रयत्न करता येतील ?' ते निःस्वार्थपणे करणे हा विचार म्हणजेच आजचा खरा 'मानव धर्म' होय. तर ही भावना 'पूर्वी माझ्या ठिकाणी होती का ?' नव्हती. कारण 'मी ईश्वरसेवक नव्हतो. देव मानत नव्हतो. मानला तरी आचार-विचार निश्चित नव्हते. त्यामुळे माझ्या ठिकाणी अहंभाव होता. दुसऱ्यास ज्या ज्या प्रकारांनी दुःख देता आले, अप्रामाणिकपणा करता आला, स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याच्या सुखदुःखांचा विचार करता आला नाही.' हे अविचार जाण्यास कारण काय झाले ? तर 'माझे' जीवनाबद्दलचे आचार-विचार सद्‌गुरूरूप झाले. मी देहाने आहे तसाच आहे परंतु वाचेने आणि मनाने पूर्णपणे बदललो. त्यामुळे माझ्या ठिकाणी असणारा दूजाभाव किंवा द्वैत नाहीसे झाले. हाच धर्म आज समितीला आपणा सेवकांकडून जगाला शिकवायचा आहे. म्हणजे तुम्हाला काया, वाचा, मनाने इतरांना सुख-समाधान देण्यासाठी आपले आचार-विचार सद्‌गुरूंच्या ठिकाणी निश्चित करावयास पाहिजेत व हे निश्चित झाले की, इतरेजनही त्याचा विचारपूर्वक स्वीकार करतील व हीच खरोखर पारमार्थिक उन्नती होय. गुरूपीठाची पारमार्थिक उन्नतीबद्दलची व्याख्या हीच आहे की, 'जोपर्यंत निःस्वार्थपणाने आपल्याला आपला आचार-विचार करता येत नाही, तोपर्यंत पारमार्थिक उन्नतीबद्दल चर्चा, वादविवाद किंवा प्रवचन करणे व्यर्थ आहे !'

--- --- --

## ६. नित्य आहार निश्चितता :

आता वरील दोन महत्त्वाच्या विचारांचा अभ्यास केल्यावर आपल्याला आपला नित्य आहार निश्चित करणे आवश्यक आहे. कोणी अशी शंका काढील की, 'आहार काय निश्चित करायचा ?' पण तेच नेमके चुकले आहे. रोज खाण्यातील वासनेमुळेच या देहाच्या ठिकाणी अन्य वासना निर्माण होणार व होतात याबद्दल आपण कधीही शास्त्रीयदृष्ट्या विचार केला नाही व आहार निश्चित करण्याचे कारणही पडले नाही. जीवनांत नित्य आवश्यक असणाऱ्या वस्तु बाजारांत मिळत असतात हे जरी खरे, असले तरी 'आहार पध्दत' परिपूर्ण तऱ्हेने मानवी जीवनातील वासनामय जीवन वासनारहित व्हावे या उदात्त हेतूने किंवा प्रेरणेने केलेली आहे. मनुष्याच्या दैनंदिन जीवनामध्ये आहार-मिमांसेबद्दल बरीच अनावस्था व निष्काळजीपणा दिसून येतो. अशामुळे शारीरिक, बौध्दिक व मानसिक संवर्धन होऊ शकत नाही. मनुष्यप्राणी मात्र जन्मत:च वासनेच्या आहारी गेला असल्यामुळे आहाराच्या वासना नैसर्गिक तीव्र स्वरुपाच्या असणे स्वाभाविक आहे. ज्या मानवी जीवनाची आपल्याला उन्नत्ती करुन घ्यावयाची आहे. ते जीवन वासनारहित होणे शास्त्रदृष्ट्या आवश्यक आहे. तरच सद्‌गुरुकृपेचा अमोल ठेवा आपल्या जीवनामध्ये निरंतर राहू शकेल. नाहीतर वासनेपोटी ह्या देहाची कर्ममय इंद्रिये देहाचे अध:पतन केल्याशिवाय रहाणार नाहीत ! तात्त्विक विवेचन वैदिक अर्थात अनेक शास्त्राधारांनी सांगितले आहे.

एकदा आहार निश्चित केलात की आपली दैनंदिन कर्मे यथायोग्य तऱ्हेने पार पडू लागली व तेच आज अत्यावश्यक आहे. मोठमोठी सिध्दसिध्दान्त पध्दतीची पुस्तके वाचण्यापूर्वी आपण आपला आचार, विचार व आहार हा पाया निश्चित करावयास शिकले पाहिजे. आहार निश्चित करण्यामागे बऱ्याच चांगल्या गोष्टींचा अभ्यास होऊ शकतो. कारण घरांतील एकूण मंडळींची कुटुंबाबद्दलची आस्था कशी आहे, रोजच्या जीवनात क्षणा-क्षणाला होणाऱ्या खाण्याच्या वासना या कशा प्रकारच्या व कशा स्वरुपाच्या असू शकतात व त्या सतत तशा चालू ठेवल्या तर शरीर प्रकृतीस काय अपाय होतो हेही अभ्यासिणे आवश्यक आहे. अशाच वासना वाढल्या की, आहार निश्चितता होऊ शकत नाही व ती झाली नाही म्हणजे आचार-विचार हे शुध्द स्वरुपाने राहू शकत नाहीत.

ही एक साधना आहे; पण तिचाच अभ्यास न करता मनुष्य पुढे काहीतरी मोठे प्राप्त होणार आहे ते अभ्यासण्याचा प्रयत्न करतो. या निश्चिततेत कोणाला कोणताही 'आहार सोडा' असे सूचित केले जात नाही. 'निश्चितता करा' ती अशी, की, महिन्यातून



एकदा कुटुंबातील सर्व मंडळींनी एकत्र बसावे. घरात येणारा एकंदर पै-पैसा किती व आपल्याला खर्च किती करावयाचा आहे असा विचार सामुदायिकपणे करावा. कुटुंबाच्या हिताच्या दृष्टीने तेवढा सुज्ञ विचार आपण कधीही केला नाही व पुढेही करणार नाही. मग बाबांची कृपा तुमच्यावर आहे हे तुम्हाला कसे कळावे ? आज या क्षणी आपला आचार, विचार व आहार निश्चित नसल्याने ही दु:खाची परिस्थिती जीवनाला झोके देत आहे. यासाठी कुटुंबाने एकत्र बसून एक आराखडा, तोही आपल्या परिस्थितीला अनुरूप असा तयार करावा. सोमवारपासून रविवारपर्यंत सकाळ-संध्याकाळ कोणता आहार घ्यावा व परिस्थितीला कोणता झेपेल तो निश्चित करावा. जो एकदा निश्चित केला तो अंमलात आणला गेलाच पाहिजे. पै-पाहुणा जरी आला तरी त्यात बदल होता कामा नये व आलेल्या पै-पाहुण्यांचे कर्ज काढून आदरातिथ्य करु शकलो नाही. याबद्दल खेद वाटता कामा नये. तरच जीवनांतील खरे समाधान कळेल !

या तीन अवस्थांच्या अपेक्षेनेच मनुष्य देवाच्या मागे जातो. त्या तीन अवस्था म्हणजे सुख, शांती, समाधान होय ! हे जरी देवाच्या कृपेने लाभले तरी जीवनांत ते निरंतर टिकविण्यासाठी आपल्याला आपले आचार, विचार व आहार निश्चित करणे भाग आहे. या निश्चित झालेल्या तुमच्या भूमिकेमुळे तुमचे दैनंदिन जीवन सात्विक विचाराचे होऊन नि:स्वार्थता निर्माण होते व आज क्षणापर्यंत स्वार्थाने भरलेले जीवन हळूहळू बदलू लागते. ते पूर्णपणे बदलल्यावर तुम्हांलाही असे वाटेल की या समितीप्रमाणेच मला इतरांना सुख, समाधान, शांती देण्यासाठी या जगांत काय करण्यासारखं आहे ? ही स्फूर्त भावना प्रत्येकाच्या जीवनात निश्चित करण्याचे कार्य तुम्ही करु लागलात की, मानवता-धर्माचा पाया निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. या पारमार्थिक भावनेने विश्वशांती होण्यास वेळ लागणार नाही !

--- --- --

# ७. दैवी उपासना :

यापुढील समितीची भूमिका अगदी स्पष्ट आहे. देव, धर्म यांचा अर्थ स्वतःच्या स्वार्थी भूमिकेने जे लावून बसले आहेत, त्यांचा या विधानाशी खूप विरोध होईल. पण त्यांचा विरोध विचारात न घेता किंवा त्याला उत्तर न देता समितीला आपली भूमिका आपणासमोर आपल्या सुखसमाधानासाठी मांडावयाची आहे, की ज्यात आपण सर्वजण आहात. या ठिकाणी येणाऱ्या बऱ्याच भक्तमंडळींची पूर्वीची सेवा खूप प्रकाराने झालेली असते. त्यात वारांचे उपवास, तिथींचे उपवास, देवजयंती, पुण्यतिथीचे उपवास व इतर अन्य व्रते हे सर्व केले आहे. म्हणजेच आपण फार मोठे ईश्वरभक्त आहोत, असे प्रत्येकाला वाटत असते. पण याबद्दल समिती असे सुचविते की, अशीच उपासना तुमच्या वाडवडिलांनी करुन तुमच्यासाठी आजचं दुःखमय जीवन पाठविले आहे. तुम्हीही तसेच प्रकार करुन तुमच्या मुलाबाळांना ते दुःख पाठवू नका. कारण प्राप्त झालेल्या जीवनातील दुःखाचे ऋणानुबंध जर ज्याचे त्याने भोगले नाहीत, तर पुढे तेच आपल्या मुलाबाळांना भोगावे लागतात व लागणार. तर मग आपणाला आपल्या वाडवडिलांसारखी व्रते, उपासना करुन चालणार नाही. त्यांच्या जीवनात आलेली संकटे टाळण्यासाठी त्यांनी व्रते उपवास, निरनिराळी व्रते व आराधना केली. त्यामुळे केवळ संकटे दूर झाली, पण त्यांचे निर्मूलन झाले नाही. कारण या देवाच्या सेवेत त्यांनी आलेली दुःखे भोगण्याचे सामर्थ्य परमेश्वराजवळ मागितले नाही तर ती संकटे दूर व्हावीत याअर्थाने सेवा केली. त्यावेळी ती संकटे तात्पुरती दूर झाली; व जेव्हा तुम्ही व तुमची मुलेबाळे देवधर्म मानेनासे झालात तेव्हा ती संकटपरंपरा पुन्हा तुमच्या जीवनात आली. प्रत्येकजण येथे आल्यावर अभिमानाने असे म्हणतो की, मी आजपर्यंत कोणाचेही वाईट केले नाही, मग मला अशी दुःखे का ? तर त्याला उत्तर असे की, हा प्रसाद तुमच्याच वाडवडिलांचा! एवढ्याचसाठी जीवनात आलेली दुःखे दूर होण्यासाठी अन्य मार्गाचा अवलंब करु नका. फक्त सद्‌गुरुपाशी असे सामर्थ्य मागा की, माझ्या जन्मऋणानुबंधनात जी जी दुःख कारण मिमांसा असेल ती मी भोगतो, आपण माझ्या पाठीशी असा. हाच खरा परमार्थ आहे की, स्वतःचे दुःख देवालासुध्दा देणार नाही. तर माझ्या इतरेजनांना तरी मी कसा देऊ ? अशा भावनेच्या माणसाला दुःख हे सुखाला कारण झाल्याशिवाय राहिल काय ? यापलिकडे परमेश्वर तरी निराळा आहे का ?

खरा उपवास याचा अर्थ 'गुरुसान्निध बसणे' हा होय. पण आज ते शक्य नाही आजची आपली उपवासाची पध्दत ही दैवी उपासना नसून खाद्यपदार्थांची उपासना आहे. कारण त्यादिवशी साबूदाणा, वऱ्यांचे तांदूळ किंवा काही फलाहार याशिवाय



आपला उपवास होऊ शकत नाही. आता हा उपवास देवाप्रित्यर्थ का खिचडीप्रित्यर्थ ? तर खऱ्या अर्थाने खिचडीप्रित्यर्थ ! तर अशा प्रकारे देवाच्या नावावर अधर्म उपवास, व्रतवैकल्ये करून 'पुण्य जोडतो आहोत' म्हणून देवाला व मनाला फसवू नका ! खऱ्या अर्थाने उपवास करावयाचा झाला तर आपण वर्षातून एकदासुद्धा तो करणार नाही ! कारण वर्षभर दुसऱ्याचा अपमान, उपमर्द, तिरस्कार, दुसऱ्याची अपरोक्ष निंदा, दुसऱ्याच्या मनाला किंवा देहाला क्लेश देण्यास तुम्ही कारण होणार व वर्षातून एकदा शिवरात्रीचा उपवास करून पुण्य जोडणार ! या विचाराचे गणित कोणत्या जगात खरे ठरेल ? तर यासाठी उपवास असा करा की, 'दैनंदिन जीवनात माझ्या हातून काया, वाचा, मनाने कोणाचाही अपमान, उपमर्द, तिरस्कार, दुसऱ्याची अपरोक्ष निंदा, दुसऱ्याच्या मनाला किंवा देहाला क्लेश देण्याजोगे आचरण होणार नाही. अज्ञानाने झालेच तर प्रामाणिकपणे त्याबद्दल सद्‌गुरू नामस्मरण करेन.' या उपवासात खरोखर तुम्ही मनोनिग्रह करण्याचा प्रयत्न करून तो कदाचित् न झाल्याबद्दल पुन्हा सद्‌गुरू नामस्मरण केलेत, म्हणजे उपवासाच्या दिवसाचा अर्थ वर लिहिल्याप्रमाणे म्हणजे 'गुरूसन्निध्य बसणे' हा पूर्ण झाला. म्हणजे आज खऱ्या भावनेने दुःख निवारणार्थ साधना केलीत. येथे अशा अनेक प्रकारच्या कार्यपद्धतीत अशा अज्ञानाबद्दल संमेलनाद्वारे मार्गदर्शन केले जाते. बऱ्याच भक्तभाविकांच्या देवाधर्माबद्दलच्या भावना व विचारांचे कौतुक करावे का खेद करावा हेच समजत नाही. कारण देवाबद्दलचे त्यांचे विचार असे असतात की, 'अमुक एक देव लवकर पावतो व अमुक एक पावत नाही' यामुळे अशा भक्तांना एक वाईट सवयच जन्माची लागते. त्यामुळे संकटे आली की मागचा पुढचा विचार न करता देव, देव्हारे, दरवाजे पूजत हिंडावयाचे. पण ही भावना केव्हाही धार्मिक नाही. कारण कोणताही देव पूजला तरी तो पावण्यांत म्हणजे संकटे दूर होण्यास कारण तुम्ही व्हावयास पाहिजे. देव आहे आरशासारखा. जसे तुम्ही असाल तसे तो तुम्हाला फल देणार. प्रथम दर्शनी तो आपले देवत्व दाखवतच नाही. तुमच्यामध्येही तो अंशमात्र आहे म्हणून संकटे आली की ज्या भावनेने तुम्ही देवाकडेच जाता त्या भावनेला तो निश्चित करतो. दैनंदिन उपासनेने ही भावना जर वाढली तर घरचे देवसुद्धा पावतील व पावतात. पण आपल्याला असा बुद्धीभ्रम झाला आहे की, घरचे देव निर्बल आहेत. देवऋषी मोठे आहेत. असे वाटावयाचे कारण घरच्या देव-देवताबद्दलची अनास्था. आज प्रत्येक जण येथे आल्यावर असे सांगतात की, घरी देवधर्म रोज होतो. पण काही वेळ प्रसंगाने अशांच्या घरचे देव पहाण्याचे भाग्य लाभते. तेव्हा काय दिसते ? देवाचे टाक किंवा मूर्ती कशाची आहे म्हणजे, तांब्याची – पितळेची, पंचधातूची का चांदीची हेच समजत नाही. कारण कैक वर्षे त्या देवांचे उर्ध्वार्जन झालेले नसते. पूजनानंतर

लावलेल्या गंधाच्या चित्रविचित्र आकृत्या भिंतीवर उठलेल्या असतात. देव्हाऱ्याखाली झुरळे, जळमटे, निर्माल्य साठून राहिलेला असतो. देवाचे वस्त्र देव पुसून ते पोतेरे आहे का देववस्त्र आहे हे समजत नाही. नंदादीपाची, समईची तीच स्थिती. अर्धवट जळालेल्या वाती व शेकडो काड्या इतस्तत: पसरलेल्या असतात. शिवाय एखादी पोथी किंवा स्तोत्रे, ती जीर्ण झालेली, काहीतील अध्याय गेलेले असतात म्हणून दुसऱ्याकडून आणलेले. अशा देवांच्या संसारात देव पूजन घरातील लहानात लहान मुलगा करणार किंवा जेवणखाण झाल्यावर सौ. करणार व आपणच करीत असाल तर १० वाजता ऑफिसमध्ये जाण्यापूर्वी जेवणास परवानगी मिळावी म्हणून एक तांब्याभर पाणी त्या देवाच्या डोक्यावर ओतले की वरीलप्रमाणे पूजन करून जेवणाची परवानगी घेता. यास देवधर्म कसा म्हणावा ? व अशा स्थितीत ठेवलेल्या देवांनी तुम्हाला तरी सुख का द्यावे ? बऱ्याच भक्तांना याची जाणीव दिली तर ते परिस्थितीची बाजू पुढे करतात. साफसफाई करण्यास खर्च काहीच नाही. पण आठवड्यातून आम्हाला एक दिवसच सुट्टीचा मिळणार. तेव्हा दुसऱ्याचे उंबरे पूजण्यात वेळ गेल्याने देवाच्या वाटणीला सुट्टीचा दिवस कोणताच नाही. खर्चाचा प्रश्न विचारात घेतला तर स्नो, साबण-पावडर किंवा अन्य सौंदर्य प्रसाधनास जेवढा खर्च महिन्याला येतो त्यात देवधर्म वर्षभराचा होतो. ह्या विचारांशी सहमत होऊन आलेल्या भक्तभाविकांनी आपले देवदेव्हारे व उपासनेच्या पोथ्या व स्तोत्रे जर प्राणापलीकडे जतन करण्याची सवय लावली तर प्राणावर संकट कोसळणार नाही.

--- --- --



## ८. व्रतवैकल्ये :

आजपर्यंत समाजात रूढ झालेल्या या व्रतवैकल्याच्या कल्पना जोपर्यंत बदलण्याचे कार्य किंवा जबाबदारी अधिकारी व्यक्ती म्हणून कोणी हाती घेणार नाही, तोपर्यंत आजच्या आर्थिक परिस्थितीने हतबल झालेला भक्तभाविक आपल्या पूर्वापार कुलधर्म व कुलाचार किंवा कुलोपासना यांच्या परंपरा इच्छा असूनसुद्धा भावी जीवनात करू शकणार नाही. आज ज्ञान अज्ञानाने दुर्लक्ष झालेले कुलाचार, कुलधर्म जास्तीत जास्त दु:खास कारण झाले आहेत. याला कारण देवदेवतार्जनाबद्दलच्या उपासनेचा रूढ झालेला पगडा ! आज सर्वसामान्य माणसाच्या जीवनात गणपती-उत्सव, नवरात्र व अन्य धार्मिक उत्सव हे कुलाचार परंपरेने आहेत. नवरात्र आश्विनात असते. अशा वेळी ते करावयाची इच्छा असून आर्थिक परिस्थिती अनुकूल नसली तर मनुष्य तेच नवरात्र पुढच्या वर्षावर ढकलतो. पुढल्या वर्षी तीच परिस्थिती राहीली तर पुन्हा पुढे ढकलतो. कालांतराने असे म्हणतो की, 'परिस्थितीच जर बदलत नाही तर काय करायचे करून ?' वास्तविक अशा वेळी निश्चित मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. यथायोग्य वेळी देवधर्म झाले तर इतके दु:ख सहन करावे लागत नाही. याबाबत समिती असे मार्गदर्शन करते की, 'ज्या देवाची उपासना किंवा नवरात्र करावयाचे होते, त्या देवाला तुमची परिस्थिती पूर्णपणे माहीत होती.' शिवाय त्या देवालाही तुमच्या आधी ठाऊक असावयास पाहिजे होते की, 'मला माझ्या भक्ताकडून उपासना घ्यावयाची आहे.' मग त्या देवाने जर अडचणीतून मार्ग काढावयाचा तो काढला नाही, तर तुम्ही कर्ज काढून त्या कर्जाचा बोजा देवावर ठेवू नका. कारण तुमचा आश्विन महिना अजून आला नाही. 'प्रश्न असा आहे' की, हे तरी कोणी ठरविले की, 'हा चैत्र, हा आश्विन' 'हा रविवार, हा सोमवार' ? पृथ्वीप्रदक्षिणा केली तर हे लिहीलेले कोठेच सापडत नाही. हे गणित कालमापनाचे आहे. देव मापनाचे नाही. जेव्हा तुम्हाला सवड होईल त्या क्षणी मनोभावनेने तुम्ही तुमचा देवधर्म करा आणि आजच्या जगाच्या परिस्थितीला हेच योग्य ठरणार आहे.

आज समाजाच्या सुख, शांती व योग्य मार्गदर्शनासाठी शास्त्रशुद्ध अनुभवी व अधिकारी साधकांची आवश्यकता आहे. मनुष्य परिस्थितीने वैतागल्यावर जे दैवी म्हणून दिसेल त्याला सुखासाठी कवटाळण्यास धावतो आहे, पण अशा वेळी आजच्या समाजातील साधकांच्या मार्गदर्शनाचे आश्चर्य वाटते. ते असे की, निर्गुण निराकार परमेश्वराचे अस्तित्व त्यांना समजते; परंतु पुढे बसलेल्या हतबुद्ध झालेल्या भक्ताची परिस्थिती समजत नाही. अशा वेळी दु:खपिडीतांना 'नवचंडी, शतचंडी हवन करा', 'याग करा' किंवा अन्य दानधर्म व व्रतवैकल्ये सुचवितात. पण ज्यांना 'दुपारी काय करू'

असा प्रश्न पडला आहे, अशांच्या दुःखनिवारणार्थ दैवी मार्गात निराकरणे नाहीत का ? व अशांना सुख, समाधान मिळावे अशी देवाची इच्छा नाही का ? पण जगाच्या कल्याणासाठी इतका सूज्ञ विचार करण्यास साधकाला वेळ नाही. 'मी व माझी विद्या' हेच सर्वस्व मानून अशी मंडळी समाजाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन विश्वशांती करण्यासाठी धार्मिक विधी करतात. जोपर्यंत समाजातील जास्तीत जास्त दुःखी पिडीत यांना मार्गदर्शन करण्यासाठी तुम्हाला सुलभ निराकरण आत्मसात होणार नाही, तोपर्यंत अशा धार्मिक विधींनी केलेले विश्वशांतीचे प्रयत्न यशस्वी होत नाहीत ! यासाठी येथे आलेल्या भक्तभाविकांस तो मनाने विचारी, परस्परांविषयी जिव्हाळ्याचे प्रेम असणारा व्हावा म्हणून येथील कार्यपद्धतीत साधना शिकविली जाते. आज-पर्यंतचा साधनेबद्दलचा झालेला विचार असा आहे की, नित्य जीवनात जी आपण साधना, उपासना व व्रतवैकल्ये करतो ती सर्व परमेश्वराप्रित्यर्थ असतात. पण खऱ्या अर्थाने साधना, उपासना ही परमेश्वराप्रित्यर्थ नाही. कारण त्या परमेश्वरासमोर बसून परमेश्वराजवळचे काही शोधावयाचे नाही तर स्वतःपाशी जे जगाच्या दृष्टीने हितावह नाही ते सोडावयाचे. 'जगातील दुःखी जीवांमध्येच अंशमात्र परमेश्वर आहे व त्यांची सेवा करण्यासाठीच मला त्या परमेश्वराचा कृपाप्रसाद लाभला आहे' हे त्याच्या समोर बसून जोडावयाचे, हाच खरा 'विश्वशांतीचा यज्ञ' होणार आहे.

वरील विचारांची प्रत्यक्ष साधनापद्धती नित्याचरणामध्ये यावी व आपल्या हातून त्या परमेश्वराची 'सेवा' कोणत्याही अज्ञात कारणाने होऊ नये, या उदात्त हेतूने आतापर्यंत या समितीच्या कार्यपद्धतीच्या मार्गदर्शनार्थ आलेल्या भक्तभाविकांना त्यांच्या उपवास, व्रतवैकल्ये, नवस-सायास यासारख्या उपासनेपासून परावृत्त करून त्यांना आजच्या सामाजिक जीवनाचा पारमार्थिक तत्ववाद शिकविला. तो असा की, तुम्ही आपल्या जन्मऋणानुबंधनातील ऋणामुळे आज दुःखाला कारण झाला आहात. तर त्याबद्दल देवधर्म करून ऋणमुक्त होण्याच्या मार्गाचा अवलंब करीत आहात, पण खऱ्या अर्थाने तुम्हाला 'मानवधर्म' आचरण्यानेच सुख, शांती निर्माण होणार आहे. त्या तुमच्या नित्याचरणातील कर्तव्यामधून समाजकल्याण होण्याचाही बहुमोल ठेवा तुम्ही सहजगत्या प्राप्त करून घेणार आहात. आजपर्यंत केलेल्या उपवास, व्रतवैकल्ये, नवरात्रासारखे वार्षिक महोत्सव यापासून सात्विक समाधान काही लाभले का ? आज सद्‌गुरू आज्ञेने तुम्हाला तुमच्या वडिलोपार्जित कुलधर्म, कुलाचार व कुलोपासना या रूढ धार्मिक विधीपासून ऋणमुक्त केले आहे; ते याचसाठी की, खरा देवधर्म तुम्हाला समजावा. भावी जीवनात समितीच्या शिकवणीप्रमाणे तुम्हाला 'देव' याचा अर्थ समाज आणि 'धर्म' याचा अर्थ स्वतःचे कर्तव्य असा लावावा लागेल ! या विचारांशी तुम्ही



सहमत झालात तर आजच्या परिस्थितीत व कालांतराने समाजावर येणाऱ्या आपत्तीत आजच्या आचार-विचारांनी शह बसेल. आजपर्यंत तुम्ही तुमच्या जीवनात काय काय देवधर्म केलात, असे जर विचारले तर तुम्हाला उत्तर देणे कठीण होईल. आजपर्यंत जगामध्ये मनुष्याने आपल्या जीवनातील आचार-विचारांचा प्रामाणिकपणा देवधर्माबाबत किंवा ऐहिक सुखाबाबत कधीही व्यक्त केला नाही. हे जरी खरे असले तरी मनुष्य स्वभावानुसार त्याच्या जीवनात त्याने केलेल्या देवधर्माचा हिशेब मोठ्या अक्षरांमध्ये लिहीलेला सापडून तत्संबंधीचा उच्चार अनेक वेळा आप्त, इष्ट, गुरूबंधू यांच्यासमोर झाला असेल. पण त्या देवधर्माच्या शतपटींनी जो व्यसनापायी पैसा खर्च झाला आहे, त्याची चुकूनसुद्धा नोंद सापडणार नाही. ही बुद्धीशी प्रतारणा करणारी विचारसरणी याला 'धर्म' म्हणता येईल का ? यासाठी समितीने भक्तभाविकांना असे मार्गदर्शन केले आहे की, आजपर्यंत तुमचे वडिलोपार्जित जे कुलधर्म, कुलाचार व कुलोपासना होत्या, तत्प्रीत्यर्थ तुम्हाला येणारा वार्षिक खर्च याचा हिशेब तयार करा. पूर्वीच्या परंपरेतील खर्चाची बाजू व आजच्या परिस्थितीतील खर्चाची बाजू ही लक्षात घेऊन जो गोरगरिबांच्या कल्याणाचा विचार निश्चित केला आहे, त्याच्या सहाय्यासाठी, वरील दोन्हीमधून निश्चित केलेली रक्कम 'श्रीसाई स्वाध्याय मंडळा'त लिहा. त्याचा विनियोग गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणासाठी व वैद्यकीय सहाय्यासाठी केला जातो.

आज समाजास असाच अध्यात्मिक व पारमार्थिक विचार पाहिजे आहे, म्हणजे जो नास्तिक-आस्तिक वाद चालला आहे, तो वाद नसून प्रत्येकाचे आपल्या जीवनातील कर्तव्य आहे, हे सिद्ध होईल. कारण नवमतवादी समाज भौतिक वाद मानतो, त्यालाही शिक्षणाप्रित्यर्थ आपण काही हातभार लावावा व जो अध्यात्मवादी आहे, त्यालाही देवधर्माप्रित्यर्थ जो खर्च करावयाचा त्याचाही भावार्थ समजेल; आणि आस्तिकानेही आपले कर्तव्य करावे व नास्तिकानेही करावे ही विचारसरणी ज्या दिवशी समाजाच्या दृष्टीने पोषक होईल, त्या दिवशी या समाजाच्या हातून ज्ञान-अज्ञानाने विघातक कृत्य घडणार नाही !

वेदकालापासून जी उपासना, व्रतवैकल्ये समाजाने आपल्या आत्मोन्नतीसाठी करावी असे सांगितले जात आहे, त्यातील महत्वपूर्ण भाव काही स्वार्थी लोकांनी बाजूला केला असावा असे वाटते. कारण काही शतकापूर्वी राजे-रजवाड्यांपासून ते सामान्य माणसापर्यंत जो देवधर्म केला गेला, तो अभ्यासला म्हणजे असे निदर्शनास येते की, देवधर्माने समाजास जी व्रतवैकल्ये, उपवास, उपासना करण्यास प्रवृत्त केले होते, त्यामागे हेतू हाच होता की, धार्मिक भावनेने समाजकल्याणार्थ परोपकार व्हावा. याचे

सत्य इतिहासाकडे दृष्टि टाकली तर पटण्यासारखे आहे, की त्या काळात नुसते देवधर्माचे अवडंबर न माजविता विद्यापीठापासून ते पाण्याची विहीर खोदण्यापर्यंत परोपकार केला गेला. आजच्या समाजाची देवाधर्माबद्दलची विचारसरणी ऐकली तर स्वार्थी अज्ञान प्रकट होते. ते असे की, स्वत:ला स्वत:च्या जीवनापलीकडे काही समाजकल्याणार्थ आपला जन्म आहे हे समजत नाही. मग परोपकार करावा हे तर स्वार्थी विचारांना कधीही न पटण्यासारखे आहे. आणि ज्यांना या कर्तव्याची जबाबदारी पार पाडायची नाही, त्यांच्याच तोंडून देवधर्म हे थोतांड आहे असे बाहेर पडते ! निदान ज्यांना देवाधर्मामधील परोपकार हा थोतांड आहे हे सिद्ध करावयाचे आहे, त्यांनी आपल्या आर्थिक प्राप्तीमधून एखाद्या गरीब विद्यार्थ्याचे शालेय व विश्वविद्यालयीन शिक्षण पुरे केले आहे हे सत्य दाखवावे.

--- --- --



## ९. दैवी मार्गातील व्यावहारिक द्वैत :

ज्या ज्ञात्यांनी या मार्गाचा अवलंब आजपर्यंत केला, त्यांच्याकडून यथायोग्य तऱ्हेचे मार्गदर्शन सामान्य माणसाला होऊ शकत नाही. कारण आपले व्यक्तीमत्व कमी होईल या स्वार्थी हेतुने शास्त्रांच्या सिद्धान्त पद्धतीचे अवडंबर मांडून समाजातील ठराविक वर्गासाठीच ते बसले आहेत. राहिलेला वेळ वेद, वेदान्त, पुराणे किंवा अन्य साधना ग्रंथ अभ्यासून त्यावर नवीन लिखाण करण्याचे प्रयोग चालले आहेत. आज समाजाला खरोखर शास्त्रीय विवेचन व सिद्धसिद्धान्त पद्धत नको आहे. कारण शास्त्राच्या नवीन पुस्तकांची संख्या निरनिराळ्या लोकांच्या नावावर खूपच वाढली आहे. आज अशा पुस्तकांची आवश्यकता आहे का ? या विषयावर जी जुनी पुस्तके आहेत, त्यापेक्षा काही नवीन उपासना किंवा देव या नवीन ग्रंथकर्त्यांना सापडले आहेत का ? फक्त पुस्तकांचे शीर्षक व लेखकाचे नाव हे बदलले म्हणजे झाले का ? आतील विषय एकच आहे. फक्त शब्द बदलून तुम्ही समाजाची आज दिशाभूल करीत आहात. अशामुळे समाजाची या शास्त्राकडे 'शास्त्र' म्हणून पहाण्याची दृष्टी अभ्यासू राहिली नाही. मानवी जीवनास वास्तविक या शास्त्रानेच आरंभ व्हावयास पाहिजे. तरच आमची एकमेकांकडे पाहण्याची संकुचित दृष्टी बदलेल.

अशा अभ्यासू लेखकांनी जी शास्त्रीय विवेचनाची पुस्तके आज समाजात संख्येने वाढविली आहेत, त्यांचा अभ्यास प्रत्यक्षात केलेली साधक मंडळी किती आहेत ? कारण या मार्गाकडे जाण्याची प्रवृत्ती एखाद्यामध्ये निर्माण झाली तर निश्चितपणे कोणता अभ्यास करावा, हे त्या नवीन मनुष्यास समजत नाही. आता समाजातील दुसरा ज्ञाता वर्ग- यांची समाजास मार्गदर्शन करण्याची दृष्टी ही समाजाच्या विचारांस पोषक आहे का ? आज जवळ-जवळ शंभर वर्षे संतमहात्म्य व त्यांचे कार्य प्रत्येकजण वर्णन करण्यासाठी पुढे येत आहे. आपापल्या बुद्धीप्रमाणे व अभ्यासाप्रमाणे ते जे सांगत आहेत, ते समाज अंधश्रद्धेने पुन्हा पुन्हा ऐकत आहे. आता खरोखर या सिद्ध, साधक, अभ्यासू लोकांनी या संतांच्या शिकवणीची पूज्यता ठेवावी. कारण पंढरीला जाणाऱ्या वारकऱ्यापासून ते परदेशगमन करून आलेला प्रत्येकजण ही शिकवण जाणतो आहे. आता यापुढील महत्वाचे कार्य संत शिकवणीचा पाया म्हणून असे व्हावयास पाहिजे की, जसे आजपर्यंत तुमचे ज्ञान ज्ञानेश्वरी इतक्या पूज्य भावनेने त्या समाजाने ऐकले, तसे तो समाज ज्या ज्ञान-अज्ञानाने दु:खास कारण झाला आहे, त्या समाजातील रूढ झालेल्या आचार-विचारांचे उच्चाटन करण्यास तुम्ही त्यांचे म्हणणे तितक्याच सहानुभूतीने ऐकले पाहिजे. ते जर झाले नाही तर या संत-महात्म्यांच्या शिकवणीबद्दलचे आपले विचार हे

‘विचार’ म्हणून समाज लक्षात घेईल. कारण आजच्या जगातील मनुष्य इतका शंकेखोर व हेकेखोर आहे की, जर तो एखाद्या सिद्ध-साधकाकडे गेला व त्याला त्या साधकाने ‘यज्ञ कर’ असे सुचविले व त्यावेळी दुसऱ्यास ‘पूजा कर’ असे सुचविले, तर त्याच क्षणी त्या दोघांत सिद्ध पद्धतीबद्दल विषम भावना निर्माण होते. अशा वेळी साधकांनी हा विचार करावयास पाहिजे की, ‘आपल्या प्रथम भेटीतच आपण त्या दोघांच्या आचार-विचारात द्वैत निर्माण केले आहे. मग पुढील कार्यभाग हे दोघे निश्चित विचाराने कसे करतील ?’ वास्तविक देव जगाकडे एकाच भावनेने पहात आहे आणि तोच त्याचा भक्त त्याच्या कृपेने अनेक भावना निर्माण करून समाजाकडे पहात आहे. हे भावनेतील द्वैत सत्पुरुष, सिद्ध साधक होऊनसुद्धा जर जात नाही, तर समाजाचा उद्धार होईल किंवा तो होणार आहे या आशिर्वादावर आज समाजाने विश्वास कसा ठेवावा ?

या जगात आज अनेक धर्म, अनेक पंथ अस्तित्वात आहेत. त्यांचे तात्त्विक विवेचन मनुष्य आपल्या ज्ञानाप्रमाणे अभ्यासून ज्ञानी होण्याचा प्रयत्न करीत आहे. आज अनादि कालापासून मनुष्य, धर्मातील द्वैत-अद्वैत वादाबद्दल लिहून जगाला शिकविण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु खरे द्वैत आज मानवी जीवनात इतके भरले आहे की, प्रत्यक्ष परमेश्वराला ‘नमस्कार कर’ म्हटले, तर ‘कुठे करु’, ‘कोणाला करु?’ असे प्रश्न निर्माण होतात. परमेश्वराबद्दल इतका भेदभाव आज आहे. या विचारांचा पगडाच आज आमच्या दुःखाला कारण झाला आहे व होत आहे. याचा विचार केव्हा व कोण करणार ? आज जी मंडळी समाजात ‘देवरुप झालेली’ म्हणून ओळखली जात आहेत, ती तरी खऱ्या अर्थाने अद्वैतरुप आहेत का ? वास्तविक समाजातील लोकांच्या भावनेचा व विचारांचा सदुपयोग करुन घेणे व त्यांना त्यांचा धर्म, कर्तव्य समजावून देणे हे स्वतःचे कर्तव्य न मानता त्यांनी देवाधर्माचे अवडंबर माजविले व खऱ्या देवधर्मास बाजूला ठेवले आणि यातूनच द्वैतवादाचा जगभर प्रचार केला. अद्वैतवाद हा तात्त्विक दृष्ट्या परिपूर्ण आहे. पण आज समाजाला व्यावहारिक तत्त्ववादाची अत्यंत आवश्यकता आहे. तो कोण देणार ? तो देणार नसाल तर कालांतराने देव व धर्म हे केवळ ‘शब्द’ म्हणूनच प्रचारात राहतील.

अनादि कालापासून तो आजच्या क्षणापर्यंत ‘देव हा देव्हाऱ्यातच पूजण्याचा ठेवा आहे,’ हा जणू सिद्धान्तच आमच्या साधकांच्या बरोबरच जन्माला आला आहे. आपण ज्या निसर्गाच्या सतत सहवासात आहोत, त्याच्या निर्मितीस परमेश्वरच कारण आहे. निसर्गाला जो परोपकाराचा धर्म अव्याहत करावा लागत आहे, त्यामध्ये आज क्षणी किंवा पुढे केव्हाही द्वैत निर्माण करावे, म्हणून होणारे नाही. परमेश्वराने या निसर्गाचा ठेवा



जगाच्या परोपकारार्थ निर्माण केला आहे. त्याचा धर्म हा कोणा प्रित्यर्थही नाही व स्व:प्रित्यर्थही नाही. सूर्योदय झाला, अमुक धर्ममंदिरावर त्याचा प्रकाश पडला व अमुकावर अंधार पडला, असेही होत नाही. आज आपण उठता बसता पाण्याचा वापर करीत आहोत. त्याचाही कोणाशी द्वैतभाव नाही. पण ज्या परमेश्वराने याच सृष्टीत मानवाला निर्माण केले आहे, त्या मानवाने प्रथम त्या परमेश्वराच्या ठिकाणीच द्वैत निर्माण केले आहे. कारण देवाच्या ठिकाणच्या सद्भावनेचा उपयोग व्यावहारीक जीवनात असावा या तत्त्वाशीच आजच्या सिद्ध-साधकांचे द्वैत आहे. ज्या परमेश्वराने या सृष्टीला परोपकाराचाच धर्म अव्याहत करण्याचा धर्म लावून दिला, तोच परमेश्वर आज आम्ही देव्हाऱ्यात सकाळच्या एक वेळेच्या पूजेचा ठेवा म्हणून ठेवला आहे. त्यामुळे परमेश्वराशिवाय जीवन व्यर्थ आहे, ही भावनाच निर्माण होत नाही. आजपर्यंत प्रत्येकजण असेच म्हणत आला आहे की, ‘पैशाशिवाय जीवन व्यर्थ’. पण ‘परमेश्वराशिवाय जीवन व्यर्थ’ असे उद्‌गार कोठूनही ऐकू येत नाहीत ! याला कारण वर सांगितल्याप्रमाणे ज्याने जगातला परोपकाराचा धर्म लावून दिला, त्या परमेश्वराच्या ठिकाणी या सिद्ध-साधक, अनुभवी लोकांनी खूप द्वैत निर्माण केले आहे. परोपकारार्थ निर्माण झालेले कोणतेही कार्यकारण आपला उपयोग जर परोपकारार्थ होत असेल तर त्याबद्दल द्वैत भाव निर्माण करणार नाही. उदा. लोखंड हा निसर्गाच्या पोटातील एक खनिज पदार्थ म्हणून आपण ओळखतो. त्याला ज्याने निर्माण केले ते जगाच्या परोपकारार्थ व हितासाठीच आहे. तो खनिज पदार्थ जगात एकेकाळी असाच अशुध्द स्वरुपामध्ये पडलेला होता. पण जेव्हा सूज्ञ बुध्दि जागृत झाली, तेव्हा त्याचा आज उपयोग म्हणजे परोपकार हा काय, हे सांगण्याचे कारणच उरले नाही. गरिबाच्या घरात पैरण अडकवायला ठोकलेल्या खिळ्यापासून राष्ट्रसंपत्तीच्या लोहमार्गापर्यंत त्याचा वापर होत आहे. पण त्या लोखंडाच्या ठिकाणी द्वैत निर्माण होत नाही. त्याच लोखंडाचे तुकडे एकत्र करुन शास्त्राधाराने विमान तयार झाले. त्यामागे विचार होते. लोखंड हे जीवनाला अत्यावश्यक आहे हे समजल्यावर विचारांनी त्यांची उपयुक्तता मनुष्याने शोधून त्या लोखंडात चैतन्य निर्माण केले. आणि आज ते वायुगतीने आकाशात उडत आहे. ही विचाराच्या भावनेची पूर्णावस्था आहे. पण ज्या परमेश्वराच्या ठिकाणी या उपकाराची कारणपरंपरा आहे, त्याला आम्ही पूर्ण अज्ञानाने पुजारी केला आहे, व त्याच्याशिवाय जगू लागलो आहोत. तर यांची उपयुक्तता जीवनात पूर्णपणे आल्याशिवाय नित्य कर्मातील कर्तव्यकारण समजणार नाही. पण तो ठेवा देण्यासाठी व दाखविण्यासाठी कोणी तयार नाही. कारण प्रथमतःच असे सांगितले जाते, की “देव प्राप्तीचा ठेवा पूर्वजन्मांची पुण्याई आहे.

ह्या जन्मात त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केला तर १२ वर्षे तो पावत नाही" अशा भ्रामक कल्पना निर्माण करुन शास्त्राधार पुढे केले जातात. अशा विचारांना भिऊन प्रत्येकजण हेच म्हणत आला आहे, 'ते नाही बुवा आपल्याला जमणार'. मनुष्य पाषाणाला किंवा पंचधातूला पूर्वजन्माचा ठेवा मानून जेव्हा त्याची प्राणप्रतिष्ठा करतो तेव्हा त्या दगडाचा किंवा पचंधातूचा पूर्वजन्माचा ठेवा कोणी शोधत नाही. तो देव प्रतिष्ठित झाल्यावर, त्याच्याकडे पाहणाऱ्याला इच्छित फल देतो. मग त्याच भावनेने दगड किंवा पंचधातूंना प्रतिष्ठित करता, तीच भावना मानवाच्या ठिकाणी निर्माण केली तर वेगळा परमेश्वर शोधावा लागणार नाही. पण असा परमेश्वरकृपेचा ठेवा आज कोणालाही नको आहे. कारण त्याच्याशिवाय जीवन व्यर्थ हा विचार व भावना पूर्णत्त्वाने जीवनात आली तर स्वैर विचारांना आळा घालावा लागेल व लाचलुचपत किंवा अन्य मार्गाने सुख निर्माण करण्याचे प्रयत्न असतील, तर त्यांना सोडावे लागेल, म्हणून परमेश्वर हा सकाळ पुरताच असावा हे बरे.

काही वर्षापूर्वी, आज जी इकडे तिकडे साधक मंडळी आहेत त्यांना एकत्र आणण्याबद्दल कांही प्रयत्न केला होता. हेतू हा की, "शास्त्राने मनुष्याच्या जीवनात काही आदर्श निर्माण व्हावा व पारमार्थिक प्रश्न विचारांनी सुटून त्यांना मार्गदर्शन व्हावे. पण पारमार्थिक विचारांचे व परमेश्वराबद्दलच्या भावनेचे एवढे द्वैत ऐकावे लागले की, तेवढे आज जगात कोणत्याही शास्त्रात नाही. प्रथमतः काहींनी असे विचार प्रकट केले की, आमची ही उपासना व साधना वैयक्तिक आहे. आम्हाला आज्ञा असल्यास आम्ही आलेल्या भक्तभाविकांना भेटतो. आता या विचारामागे स्वार्थ किती आहे तो अभ्यासण्यासारखा आहे. कारण जगात मनुष्य कोणत्या ना कोणत्या प्रकारांनी ईश्वरसेवा ही करतोच आहे. भावनेने वाहिलेल्या फुलाचा उपकारसुध्दा परमेश्वर ठेवीत नाही हे सत्य आहे. तेव्हा जो भक्त-भाविक आपल्यास दुःखाने पीडला आहे, अशांना अशा साधकांचा पत्ता या भक्त-भाविकांना कोणा ना कोणाच्या रूपाने तरी समजतो, व अशा साधकांच्या दर्शनार्थ गेलेल्या भक्तांना वरीलप्रमाणे उत्तर मिळते. ज्या परमेश्वराला जगताचे तंत्र संभाळावयाचे आहे तो अशी कदापीही आज्ञा देणार नाही की, 'तू अमुकाला भेट आणि अमुकाला भेटू नकोस.' परंतु या साधक मंडळींना जगातील गोरगरीब मंडळींकडून आर्थिक लाभ होणारा नसतो म्हणून वरीलप्रमाणे जेव्हा उद्‌गार निघतात, त्याच वेळी आंत त्यांच्याजवळ काही धनिक मंडळी आश्रयासाठी बसलेली असतात. अशा साधकांना गरिबांच्या भावनेमधला परमेश्वर व श्रीमंतांच्या भावनेतील स्वार्थ परमेश्वरासमोर बसून समजत नसेल, 'तर त्याच्या आज्ञेशिवाय आम्हाला भेटता येत



नाही' हे कितपत सत्य आहे ? असे द्वैत, गरीब-श्रीमंत, साधक आणि परमेश्वर, आज्ञा आहे आणि आज्ञा नाही इत्यादी ज्यांच्या आचार-विचारांमध्ये अहोरात्र वसत आहे, त्यांना साधक म्हणून संबोधावे का बाधक हे विचारांती भक्त-भाविकांनी ठरवावे.

आता दुसऱ्या विचाराची बाजू अशी की, आमच्याकडे येणारी भक्तमंडळी स्वामी उपासक आहेत, बाबांना मानीत नाहीत. देवी उपासक आहेत, दत्त परंपरेला मानीत नाहीत इ. आज खरोखर याच विचारांनी आमच्या देवाधर्माबद्दलच्या भावना एकमेकात द्वेष, मत्सर, निंदा, नालस्ती निर्माण होण्यास कारण झाल्या आहेत. परंतू भावनेने कोठेही आचार निश्चित केले तरी परमेश्वरालाच पोहोचणार आहेत, असे निश्चितपणे सांगणारा साधक विरळा ! अशामुळे अज्ञानाने उपासना करणाऱ्या लोकांनाही बऱ्याच दुःखांचा वाटा सहन करावा लागतो. जन्मकारण परंपरेमध्ये दैवीऋणानुबंधनातील वाटा असा आहे की, तुम्ही अमुक एक काळ देवी भक्त होतात. त्या नंतरचा जीवनातील दैवी ऋणानुबंध जर दत्त परंपरेची उपासना करुन ऋणमुक्त होण्यास कारण असेल तर, तुम्ही हे देवा-देवातील द्वैत न शोधता दोन्ही एक आहेत, असा विचार करावयास पाहिजे. उदा. शालेय शिक्षणानंतर विश्वविद्यालयीन उच्च शिक्षणाकडे जाताना ज्ञानामध्ये द्वैत असत नाही. मग परमेश्वरामध्ये का करावे ?

आता तिसऱ्या विचाराची बाजू - हिच्या अभ्यासाकडे या कार्यपध्दतीमध्ये आलेल्या भक्तभाविकांनी दुर्लक्ष करु नये. कारण या कार्यपध्दतीतील सर्व सिध्द सिद्धान्त पध्दती या वैयक्तिक उपासना करायला लावणाऱ्या आहेत. अशा साधकांचा या सिद्धान्त पध्दतींना विरोध आहे. विरोध असण्याचे कारणही बरोबर आहे. कारण कार्याच्या सिध्द सिद्धान्त पध्दतीत जो प्रसाद दुःख निवारणार्थ म्हणून दिला जातो, तो जगातील गरीब, श्रीमंत, ज्ञानी, अज्ञानी अमुक एक धर्मासाठी, अमुक एक जातीसाठी असा दिला जात नाही. हे सत्य पाहिल्यानंतर सूज्ञ बुध्दीला हे पटायला पाहिजे की, धर्माधर्मामधील वाद, जातीय वाद, पंथांचे वाद, देवादिकांचे वाद हे केवळ अज्ञानाच्या भावनेचे खेळ चालले आहेत. हे सत्य समितीला इतके पटले आहे की, यापुढे समितीच्या कार्यपध्दतीमध्ये जर कोणी असा तात्त्विक वाद निर्माण केला की, उपासना ही वैयक्तिक आहे व ती परमेश्वराच्या आज्ञेने लोककल्याणार्थ उपयोगात आणावी किंवा देवी उपासना किंवा दत्त परंपरा श्रेष्ठ असते तर ते अज्ञान आहे व म्हणून असाही वाद कोणी मांडू नये. हे वाद जगतामध्ये सिध्द-साधक, भक्त-भाविक, आस्तिक-नास्तिक मांडतील म्हणून या कार्यपध्दतीचा पाया ज्या पुण्य विभुतींच्या मार्गदर्शनाने आज लोककल्याणास कारण झाला आहे. त्यांनी या सिध्द-सिद्धान्तपध्दती एकाच तत्वावर सिद्ध केल्या आहेत की,

ज्यात मनुष्य व त्याच्या जीवनाला कारण झालेली दुःख परंपरा ही दैवी कृपेने दूर झालीच पाहिजे. आजपर्यंत या कार्यपद्धतीने फल हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, जैन, शीख यांना याच सिध्द पध्दतीने मिळाले व मिळत आहे. तर वर नमूद केलेले वाद निर्माण करण्यास आमचीच सिध्द-साधक मंडळी झाली आहेत, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. या कार्यपध्दतीत आर्थिक प्रश्नाला महत्त्व नसल्याने आलेल्या भक्तास 'कर्तव्याचा धर्म' म्हणजे 'स्वतःची दुःखे स्वतः दूर करण्यास तयार व्हा' असे सूचित केले जाते.

या उलट तिसऱ्या विचारांची साधक मंडळी स्वतःची आर्थिक प्राप्ती लक्षात घेवून मार्गदर्शन असे करतात की, 'ही तुमच्या दुःखाची कारण परंपरा अशी आहे (पण ती प्रत्यक्षात न समजण्यासारखी असते. म्हणजे नातेवाईकांनी करणी केली आहे, मूळ पुरुषाची बाधा आहे इ.) व तिच्या निवारणार्थ मी देवाचे अनुष्ठान मांडतो, होम हवन करतो, ग्रहशांती करतो, जपाचे अनुष्ठान मांडतो इ. आणि त्या प्रित्यर्थ इतका खर्च येईल तो तुम्ही द्या.' केवळ या देवादिकांच्या व धार्मिक विधीच्या नावावर स्वतःचे चार पैसे बुडतील म्हणून हेही सांगितले जाते की, 'हे तुमचे दोष कोणीही काढू शकणार नाही. वेळ प्रसंगी या दोष निवारणार्थ मला माझ्या देवतेच्या गावी किंवा ठाण्यावर जावे लागेल तर मी जाईन पण तुम्हाला सुखी केल्याशिवाय राहणार नाही.' या अज्ञानी विचारांस साधक म्हणावे का ? कारण कोणालाही कोणी सुख देणे म्हणजे प्रेमाची भेट देणे, आहेर देणे, उसने देणे किंवा कर्ज देणे या इतके ते सोपे आहे का ? जर सोपे असते तर आजच्या जगताच्या परिस्थितीला ते हितावहच ठरले असते. सुख हे देवही देत नाही, साधकही देत नाही, नातेवाईकही देत नाहीत, इष्ट मित्रही देत नाहीत, बंधु-बांधवही देत नाहीत, तर देते ती तुमची परमेश्वराबद्दलची निस्सीम भावना ! आणि याच भावनेची जोपासना व्हावी, त्याशिवाय जीवन व्यर्थ आहे असा निश्चय व्हावा, असा आत्मविश्वास निर्माण व्हावा, अशी निष्ठा निर्माण व्हावी, म्हणून समितीच्या कार्यपध्दतीतील निराकरणे 'दुःख निवारणार्थ उपासना' करण्यास मार्गदर्शन करतात. वरील विचारांच्या देवाधर्माबद्दलच्या, भक्तभाविकाबद्दलच्या, कार्यपध्दतीबद्दलच्या बाजू त्या साधकांसमोर मांडल्या गेल्या परंतू या निरनिराळ्या सिध्दसाधकांना एकत्र बोलावूनही या मार्गाचा मानवी जीवनासाठी परोपकारार्थ ठेवा काय आहे हे बहुजन समाजाला समजावण्याचे कार्यकारण निश्चित होऊ शकले नाही.

आज पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये, विशेषतः इंग्लंडमध्ये, अशा सिद्धसाधकांची एक संस्था आहे की, जिच्यात हा परलोकविद्येचा व गूढ विद्येचा अभ्यास केला जातो. मानवी



जीवनानंतर मरणोत्तर जीवनही श्रेष्ठ प्रकारचे आहे या अभ्यासाची प्रगती खूपच झाली आहे. पण हा शास्त्रीय अभ्यास होण्याचे कारण तिकडे आमच्या येथीलप्रमाणे साधकांमध्ये द्वैत नाही. शिवाय या संस्थेस समाजामध्ये खूप मोठा दर्जा प्राप्त झालेला आहे. याला कारण या संस्थेमधील अभ्यासाने परिपूर्ण झालेले मध्यस्थ लोक-कल्याणार्थ आपली सेवा देऊन खोट्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या साधकांची भूमिका ही समाजाला स्पष्ट करून सांगत आहेत. आणि त्यामुळे समाजात पूर्णत्व प्राप्त झालेले मध्यस्थ किंवा साधक हे समाजाला मार्गदर्शन करीत आहेत. जे कोणी मध्यस्थ किंवा साधक, की ज्यांच्यात मानवी जीवनाच्या हितसंबंधांचे गुणधर्म नाहीत, अशांना समाजाची फसवणूक केली किंवा दिशाभूल केली, याबद्दल न्यायालयासमोर उभे केले जात आहे. आज आमच्या भारतात असे शेकडो बाजारी सिद्ध, साधक, मध्यस्थ, मांत्रिक नावांच्या पाट्या लावून किंवा प्रचारक ठेवून समाजाची दिशाभूल करीत आहेत, व त्यांच्या वेड्यावाकड्या अनुभवाने आज समाज खऱ्या मार्गाला मुकला आहे. आज यांच्यापाशी असणारी दैवी साधना ही लोककल्याणाच्या दृष्टीने विचारात घेऊन हे लोक जे मार्गदर्शन करीत आहेत त्यास ते पात्र आहेत हे ठरविण्यासाठी अशांची चाचणी जे पूर्णत्वाने ज्ञानी, अभ्यासू व दैवी सिद्धान्त आत्मसात् केलेले आहेत, अशांनी करावी. ज्या अभावाच्या गोष्टी असतील त्याची प्रत्यक्ष जाणीव त्यांना देऊन त्याची नोंद समाजकल्याणाच्या दृष्टीने व्हावयास पाहिजे. अशा प्रकारचा अभ्यास केलेली संस्था इंग्लंडमध्ये कार्य करीत आहे. तिचे सभासद आज लाखो आहेत. या शास्त्रीय पद्धतीच्या अभ्यासाप्रमाणे हे कार्य आपणा सर्वांसमोर मांडले जात आहे.

वर नमूद केलेल्या परमेश्वराच्या साधनेचा परोपकार जगाला पटावा व देव हा वैयक्तीक उपासनेचा ठेवा आहे असे नाही, हे सिद्ध व्हावे म्हणून गेल्या पाच वर्षांमध्ये जी भक्तभाविक मंडळी प्रथमतः आपल्या प्रापंचिक अडचणी निवारणार्थ आली त्यांना या कार्यपद्धतीतील समितीची लोककल्याणार्थ भूमिका स्पष्ट समजली म्हणून त्यांनी आपणाला येथील कार्यपद्धतीत काही सेवा करण्याचा लाभ मिळावा अशी इच्छा व्यक्त केली. परमेश्वर हा परोपकारार्थच आहे, अमुक एक भक्त त्याचा लाडका, अमुक एक जात त्याची लाडकी, अमुक एक धर्म त्याचा लाडका, अमुक एकच साधना किंवा उपासना त्याला आवडते (उदा. नवविधाभक्तींपैकी किंवा योग, याग, व्रतवैकल्ये, ध्यान, धारणा, समाधि इ.) असे म्हणणे हे अज्ञान आहे. त्यांच्या इच्छेची सिद्धता म्हणून की काय ! या समितीच्या कार्यार्थ, आज जी वरील सेवक मंडळी तयार झाली आहेत व होत आहेत, व जी केंद्रांवर कार्य करीत आहेत, त्यांनाही त्यांची परोपकारार्थ भूमिका, या

कार्याच्या प्रमुख मध्यस्थांनी आत्मसात् करून दिली. यावरून सूज्ञ वाचकांना हे पटेल की, आजपर्यंत या मार्गात जे आचार-विचारांचे द्वैत निर्माण केले, याला कारण कोण आहे ?

वर मांडलेले विचार हे या मार्गातील द्वैत विचार म्हणून आपल्यासमोर मांडलेले आहेत. आता थोडा आचारपद्धतीबद्दल कसा द्वैत-भाव निर्माण झाला आहे तो लक्षात घेणेही आवश्यक आहे. आज समाजात जे सिद्ध, साधक, सत्पुरूष म्हणून ओळखले जात आहेत, त्यांच्यावर असणारी या समाजाची श्रद्धा, भक्ती, प्रेम हे जर लक्षात घेतले तर समाजाच्या भावनेचा ठेवा घेण्यास हे कसे अपात्र आहेत हे पटेल. अशा सत्पुरुष, सिद्ध, साधकांच्या दर्शनास भक्त-भाविक गेले की, आजुबाजूचे पोटभरू, त्यांचे अनुयायी 'महाराजांना विटाळ होईल' म्हणून भावनेने दर्शनास आलेल्या भक्तांवर तोंडसुख घेतात. आता विचार असा करा की, आम्ही अशांना भावनेने परमेश्वररुप समजून दर्शनास गेलो तर आमच्या भावनेला त्यांच्या आचरणाने नाही का विटाळ होत ? शिवाय यांच्या आचार-विचारांचा विटाळ परमेश्वराला झाल्याशिवाय का हे परमेश्वररुप झाले ? पण परमेश्वराने यांचा विटाळ कधींही व्यक्त केला नाही. ज्या परमेश्वरी अवताराला समाजाचा विटाळ खपत नाही व त्याची भावना समजत नाही, त्याला समाजात आपला नावलौकीक व्हावा, लोकांनी आपल्याला परमेश्वर म्हणावे अशी अपेक्षा का ? समाज देवदर्शनास येतो, याचा अर्थ तो शुद्धच असतो. तो शुद्ध नसेल तर तो देवदर्शनाला आला हे चूक ठरेल; तर आज समाजास खरा विटाळ या सिद्धसाधकांच्या आचाराचा झाला आहे ! कोणी कर्मठ विचाराचे ज्ञाते असा विचार प्रकट करतील की, आचार विचारांच्या शुद्धतेला सोवळे-ओवळे म्हणतात. जर सोवळे वस्त्र नेसून आजपर्यंत परमेश्वर प्राप्ती झाली असती तर कापडाच्या गिरण्यांनी सगळी सोवळीच तयार केली असती, व जास्त किंमतीच्या सोवळयांनी लवकर परमेश्वर प्राप्ती झाली असती ! पण असे सोवळयाचे वस्त्र वर्षानुवर्षे खुंटीला टांगून 'मी सोवळयात आहे' असे म्हणणे व रोज जो धूतवस्त्र नेसत आहे ते ओवळे आहे असे म्हणणे यामधील आचारांचे द्वैत हे परमेश्वर प्राप्तीच्या मार्गाचे लक्षण आहे काय ? याचा विचार सूज्ञ भक्त-भाविकांनी करावा.

याहीपेक्षा बुद्धीभेद करणारा विचार लक्षात घेण्याजोगा आहे, तो असा की, आपल्या नित्याचरणात आपले निश्चित कर्तव्यप्रतिपालन करीत असाल व पापपुण्याची कल्पना ज्ञान-अज्ञानाने मनाला शिवली नसेल, अशा वेळी 'अमुक मार्गाने पुण्य होते' व 'अमुक मार्गाने पाप होते' हे कसे ठरवायचे ? कारण 'पुण्य कर' यापेक्षा 'सुखी होशील' असा जर कोणी आशीर्वाद दिला तर त्याचा अर्थ आणखी 'स्वार्थ निर्माण कर' असाच होईल व 'पाप करू नको, केलेस तर प्रायश्चित्त घे' याचा अर्थ पाप करीत रहा आणि 'प्रायश्चित्त घेत जा' ही परवानगी दिल्यासारखेच होईल. आजपर्यंत जगात साधू-संत, महात्मे एवढे झाले त्यापैकी कोणी पाप-पुण्य दाखविण्यासाठी कशातही भरून ठेवले आहे आणि तुम्हाला त्याचे ज्ञान होण्यासाठी ते तुम्हाला दाखविले आहे असे कधीच झाले नाही. मग हे पाप आहे व हे पुण्य आहे, हे तरी ठरविण्याचा अधिकार कोणी कोणाला द्यावा ? यापेक्षा उत्तम मार्गदर्शन हेच होय की, 'तू सेवा कर. इतरांना सुख, समाधान देण्यासाठी काया-वाचा-मनाने प्रयत्न करीत जा. दुसऱ्याच्या शरीराला व मनाला क्लेश देण्याजोगा आचार-विचार करू नको. या नित्याचरणाने तुझ्या ठिकाणी जे निरंतर सात्विक समाधान निर्माण होईल व जे जीवनात निरंतर असेच लाभत रहावे असे वाटेल, तेच पुण्य होय. ऐहिक सुखाच्या क्षुल्लक स्वार्थासाठी जो अविचार निर्माण होईल व त्यापासून झालेले असमाधान ही जाणीव देईल की, माझ्या हातून काया-वाचा-मनाने काही अनित्य कर्म घडले आहे व मी दुसऱ्याच्या शरीराला व मनाला क्लेश देण्यास कारण झालो आहे, हा विचार म्हणजेच पाप होय.' अशा अनेक व्यावहारिक बाजू, की ज्यात एक क्षणही द्वैत मानल्याशिवाय घालवणार नाही, मग पोकळ धर्मवाद काय कामाचा ? व अशा गूढ अज्ञानास परमार्थ किंवा अध्यात्म कसे म्हणावे ?

साधकांच्या ठिकाणी रूढ झालेले वरील आचार-विचार दूर व्हावे म्हणून रोज सकाळ-सायंकाळ जी नित्य उपासना सर्व केंद्रावर चालते, त्यावेळी उपस्थित सेवकांना पूजन-अर्चन करण्यास लावले जाते. यामागील हेतू आपणा भक्तमंडळींना समजण्यासारखा आहे. तो असा की, या समितीच्या गुरूपरंपरेतील अधिदैवते यांची पूजा-अर्चा ही भावनेने केली जाते, विटाळ-चांडाळ, सोवळे-ओवळे, पाप-पुण्य हे दाखवून नव्हे. याशिवाय आणखी एक महत्वाचा मुद्दा मांडणे योग्य होईल; तो असा की, आजपर्यंत समाजात व्यक्तीपूजनाचा जो प्रकार आहे, तो भावनेचे द्योतक असावा असे वाटत नाही. कारण परमेश्वराच्या अंशमात्र कृपेला कारण झालेला हा मनुष्य व्यक्तीपूजनाचे स्तोम किती माजवून बसला आहे, हे ज्यांना-त्यांना आलेल्या अनुभवाने त्यांनी लक्षात घ्यावे. या व्यक्तीपूजनाच्या रूढीमधून परमेश्वराचे अंस्तित्व पूर्णत्वाने मानणे हीच खरी आज अज्ञानाची बाजू आहे ! यासाठी या समितीच्या कार्यपद्धतीत दुःखनिवारणार्थ मार्गदर्शन करण्यासाठी जे सेवक नियुक्त केले जातात, त्यांना कार्यपद्धतीचा विश्वास व जगाच्या दुःखाचे आत्मदर्शन व्हावे म्हणून आठवड्यातून निरनिराळे दिवस सेवेसाठी दिले जातात. त्यामुळे सहजगत्या वरील दोन उद्देशांची

सफलता होत असते. शिवाय ज्या परमेश्वराची अंशमात्र कृपा आपल्यावर आहे, त्याच्यासमोर बसून व्यक्तीपूजा घेणे योग्य नाही, हे समजते. तेव्हा येणाऱ्या भक्त-भाविकाने कोणाही सेवकाची पूजा करू नये अशी समितीची आज्ञा आहे. वेळोवेळी सेवकांनी सूचित केलेल्या आज्ञा तुम्ही भक्त मंडळींनी आचरणात आणून इतरांनाही तसे वागण्याची सवय लावून दिल्यानेच खरी व्यक्तीपूजा होणार आहे.

आता थोडासा आहारामधील द्वैतभाव विचारात घेऊ. बऱ्याच भक्तभाविकांच्या घरी जेव्हा कुलधर्म, कुलाचार, व्रतवैकल्ये, सणवार असतात, अशावेळी कुटुंबवत्सल घरात हे दृश्य पहावयास मिळते. ते असे की, त्या दिवशी घरात गोड खाद्यपदार्थ देवाच्या निमित्ताने केलेले असतात. शिवाय देवदेवतांचे नैवेद्य, ब्राह्मण-सुवासिनी भोजन; हे नैवेद्य झाल्याशिवाय घरात कोणालाही आधी जेवता येणार नाही, अशा रुढीचा पगडा मनावर इतका बसलेला असतो की, जेवणाला झालेल्या उशिरामुळे घरातील लहान मुले-बाळे जेवणासाठी कुरकूर करीत असतात. या करुण प्रसंगाची भावना लक्षात न येऊन, 'नैवेद्य झाल्याशिवाय जेवावयाला मिळणार नाही' असे त्यांना सांगितले जाते. पण खरोखर, नैवेद्य हा कोणासाठी आहे ? आणि नैवेद्य याचा अर्थ तरी काय ? नैवेद्याबाबत अन्य अर्थाची उपपत्ति लावण्यात काहीच अर्थ नाही. त्याचा खरा भावार्थ असा आहे की, नैवेद्य म्हणून परमेश्वरासमोर का ठेवायचा ? तर 'मी जे काही खात आहे, ते तुझ्या कृपाशिर्वादानेच !' एवढ्या भावनेसाठी मुलाबाळांच्या भावनेची अनास्था निर्माण करण्याने देवाला नैवेद्य पोहोचेल का ? तर तुमच्या घरामध्ये जी मुले-बाळे आहेत, ती चालती-बोलती परमेश्वराचीच प्रतिके आहेत. त्यांना संतुष्ट करण्यानेच तुमचा नैवेद्य परमेश्वरापर्यंत पोहोचणार आहे !

खऱ्या अर्थाने आज समाजाची अनावस्था लक्षात घेऊन ही समिती आपली कार्यपद्धती तुम्हासमोर मांडीत आहे. आज समितीला समाजातील आचार-विचारांचे द्वैत बाजूला करून प्राप्त झालेल्या जीवनात निरंतर सुख, समाधान निर्माण करून त्याचा फायदा इतरेजनांना कसा देता येईल हे पहावयाचे आहे. म्हणून आपण दुःख निवारणार्थ येथे आल्यावर जे मार्गदर्शन आपल्याला सुचविले जाते तेच निराकरण जगातील कोणीही आला तरी केले जाईल. येथील कार्यपद्धतीच्या अभ्यासाने तुम्ही हे शिका की, 'माझ्यापेक्षाही दुःखी लोक आज जगात आहेत. म्हणजे मी खूप सुखी आहे, या भावनेची जागृती झाली की, आपोआप देवाबद्दल निःस्वार्थीपणा निर्माण होतो.' नुसते स्वार्थ-निःस्वार्थ हे शब्द घोकून होत नाही. आणि अशा तऱ्हेने प्रत्येकाच्या जीवनाकडे पहाण्याचा अभ्यास करायचा म्हणजे ज्याला तुम्ही 'सुखी' म्हणता, असे लोक किती



दुःखी आहेत व ज्याला तुम्ही 'दुःखी' म्हणता असे लोक किती सुखी आहेत याचा शोध करावयाचा आणि हाच समितीचा मानवधर्म !

--- --- --

## १०. प्रतिमांचे कार्य :

कार्यारंभी जे जे भक्त मला भेटण्यासाठी येत असत, त्यांना जन्माचे कारण समजत नव्हते, किंबहुना आजही ते सर्वांना माहीत नाही. यामुळे जीवनातील दु:खाची कारणमीमांसा अज्ञात राहिली. केवळ आपण दु:खी आहोत, एवढ्या सबबीवर ते कार्यार्थ इकडे आले. त्यावेळी जे मार्गदर्शन झाले, त्यात दोन भाग- १. दु:खाचे कारण काय ? म्हणजे 'निराकरण' व २. ते दु:ख कसे दूर होईल ? यासाठी 'निवारण'. ह्या दोन मार्गांतून 'सेवा' असा तिसरा मार्ग. ह्या मार्गाने जाण्यासाठी, ज्ञान व भक्ती पाहिजे. नुसता देव आहे, म्हणून त्याला भजणे गैर होय. यासाठी जसे दु:खाचे कारण म्हणून निवारण सांगितले; याप्रमाणे जी आपण सेवा म्हणून म्हणतो, तिचा अर्थ काय आहे ? हा भक्तांना समजला पाहिजे. ह्यासाठी संमेलने घेतली गेली. 'सेवा' हा शब्द दोन अक्षरी आहे. परंतु अजून त्याचा अर्थ लागला नाही व लागू नये, अशी सेवा व तिचा अभ्यास, गुरूआज्ञेने मी सतत करीत होतो. त्यात प्रामुख्याने 'ॐकार साधना' व 'गुरूनामस्मरण' हे सिद्ध झाले; व भवितव्यात कुणालाही कष्ट पडणार नाहीत, असा सोपा मार्ग सिद्ध करून, त्याची 'सांगता' एकोणीसशे सत्याऐंशी (१९८७) साली, दीपावली म्हणजे वर्षपाडवा किंवा बलीप्रतिपदेला गोवा येथे झाली. या गुरूकार्याचा वृक्ष मोठा आहे. पण त्याचे फल म्हणजे 'सांगता', ही आंब्याप्रमाणे मधुर आहे. फल अधिक मधुर आहे म्हणून कार्य संकुचित नाही. या कार्याची सांगता म्हणजेच प्रतीक, हे चार प्रतिमांच्या रुपात, तुम्हा सर्व भक्तांच्या घरोघरी आज नांदत आहे; यात सर्व मानवी जीवनाचे सार्थक आहे. या तीन प्रतिमांच्या रुपात ज्ञान (श्रीसाईशक), भक्ती (कारण) व सेवा (महाकारण), प्रत्येक भक्ताच्या हृदयी वास करीत रहावी; म्हणजे त्याची जी जीवनसार्थकता होईल तीच 'नारायणी', म्हणजे चौथी प्रतिमा होय; व त्यावेळी भक्त माध्यमातून 'हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा'; असे अमृतबोल घरोघरी ऐकू येतील.

आपल्या पूजनार्थ ज्या देवाच्या प्रतिमा आंज आहेत व ज्यांचे पूजन आपण सर्व भक्त करीत आहात, त्याबद्दलचे मार्गदर्शन तपशीलवार केले; तेव्हा श्री जगदगुरू साईनाथ महाराज यांची आज्ञा अशी झाली की, "जो कुणी माझा भक्त असेल, त्याने तीन प्रतिमा पूजनार्थ घ्याव्यात; कारण ह्या प्रतिमांमध्ये जे सिद्ध केलेले तत्व आहे, हे नवनाथादि परंपरेपासून आहे. त्याचा लाभ कसा होईल ? तर 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव'; असा त्याचा लाभ होणार आहे."

ह्या प्रतिमा आपल्यावर सक्ती करून त्या घ्याव्यात, असे सांगण्यात आलेले नाही व भवितव्यात सांगणारही नाही. जी गोष्ट ईश्वराच्या कृपेने मला प्राप्त झाली, ती प्राप्ति



सर्वांना लाभावी, अशी इच्छा माझी आहे. म्हणून ज्यावेळी दीपावलीला प्रतिमा देण्याचे कार्य सिद्ध झाले, तेव्हाच प्रतिमा आपल्याला देण्यात आल्या. जीवनामध्ये अडीअडचणी कधीही संपणाऱ्या नाहीत. आपले आयुष्य संपले तरीही अडचणी शिल्लक रहातात. त्या राहू नयेत, म्हणून देवाधर्माला आपण शरण जातो; पण त्यापेक्षा नित्याची प्रार्थना व ह्या प्रतिमांचे पूजन महत्वाचे आहे. सोने हे पिवळे आहे, म्हणून आपण मौल्यवान मानतो; पण त्यापेक्षा ज्या कुटुंबात ह्या प्रतिमा आहेत, ते कुटुंब जगापेक्षा अधिक सुशोभित होईल; असा माझा आत्मविश्वास आहे. म्हणून -

॥ ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ॥

असा प्रतिसाद आपल्याला मिळेल.

आता आपण भक्तांना, ज्या तीन प्रतिमा देण्यात आलेल्या आहेत, त्या प्रतिमा म्हणजे काय ? त्यांच्यामागे परंपरा काय आहे ? त्या सोने-चांदीच्या का केल्या ? आपल्या प्रत्येकाकडे पूजनांत देवदेवतांच्या मूर्ति व टाक असूनसुद्धा, ह्या प्रतिमा पूजनासाठी का दिल्या गेल्या ? याचा आस्थापूर्वक विचार करणे आवश्यक आहे.

कार्यारंभी मी जेव्हा भारताचा प्रवास केला, अनेक तीर्थक्षेत्रे व देवळे पाहिली, त्याचप्रमाणे अनेक भक्तांच्या घरातील देवदेवतांच्या मूर्ति व प्रतिमा पाहिल्या, त्यावेळी असे अनुभवास आले की, ह्या देवदेवतांच्या प्रतीकांमध्ये देवत्व शिल्लक राहिलेले नाही. आज देवतार्जन म्हणून जो काही पूजाविधी होतो, तो केवळ रुढीपरंपरेप्रमाणे केलेले अनुकरण व औपचार म्हणूनच होत असल्याने, त्या देवतार्जनातून जे सुख-शांति-समाधान प्राप्त झाले पाहिजे, ते प्राप्त होत नाही. त्यामुळे प्रत्येक जण आज काही ना काही दु:खाने पीडीत व गांजलेला आहे. अशी परिस्थिती अनुभवास आल्यानंतर, मी प.पू. बाबांकडे अशी विचारणा केली की, "या दु:खी लोकांना काही एक निश्चित मार्ग व सेवा सांगितली पाहिजे; जेणेकरून ते सुखी होतील, असा प्रसाद आपण द्यावा." प.पू. बाबा म्हणाले, "तुझी त्यांच्या दु:खाबद्दलची तळमळ मला समजते; पण त्यासाठी योग्य वेळ आली की, तुला काय करावयाचे ? ते सांगेन. तोपर्यंत तुला सांगितलेल्या मार्गाने, त्यांच्या अडिअडचणीबद्दल मार्गदर्शन कर." त्याप्रमाणे मी आज छत्तीस वर्षे कार्य करीत आलो.

प.पू. बाबांच्या आज्ञेप्रमाणे, आपण भक्तांना प्रथमत: ज्या तीन प्रतिमा दिल्या गेल्या, त्यापैकी पहिली प्रतिमा 'श्री साईशक', दुसरी प्रतिमा 'कारण' व तिसरी प्रतिमा 'महाकारण' होय.

**श्रीसाईशक प्रतिमा :**

ही प्रतिमा घेण्यापूर्वी, आपल्याला पाच दीक्षा, म्हणजे क्रमश: उपासना दीक्षा, नामस्मरण दीक्षा, अनुग्रह दीक्षा, गुरूदीक्षा व कारणदीक्षा ह्या देऊन आपल्याकरवी श्रीसद्गुरूनामस्मरण करून घेतले गेले व त्याप्रमाणे आपण करीत आहात. हे नामस्मरण मी जीवनारंभापासून आजपर्यंत केले असल्याने, ते नामस्मरण आज सिद्ध आहे. त्या नामस्मरणाची सिद्धता, आपल्याला व आपल्या भावी पिढ्यांना हितकारक व्हावी, म्हणून त्या नामस्मरणाचे प्रतीक म्हणून श्रीसाईशक प्रतिमा आहे. ह्या व्यतिरिक्त या प्रतिमेचा लाभ असा आहे की, आपल्या कुटुंबामध्ये गेल्या सात पिढीत ज्या कोणी व्यक्तींनी 'गुरू' केला नसेल, किंवा नामस्मरणाचा उच्चार केला गेला नसेल, तर गतकालामध्ये ह्या ज्या व्यक्तींनी सद्गुरूतत्वाचा लाभ घेतला नाही; अशांनाही या प्रतिमेमुळे पुण्याचा लाभ मिळणार आहे. याशिवाय भवितव्यात भावी पिढ्यांची तरतूद, या प्रतिमेमध्ये केलेली आहे. भावी कालामध्ये योग्य तो गुरू व त्यांचे मार्गदर्शन मिळणार नाही; म्हणून तीही तरतूद या प्रतिमेमध्ये केलेली असून, भावी पिढ्यांना फक्त सद्गुरूनामस्मरण म्हणजे ।। ॐ श्रीसाईनाथाय नम: ।। म्हटल्यावर, इष्ट ते सुख-शांति-समाधान, सहजगत्या प्राप्त होणार आहे. इतका सुलभ मार्ग आपणा सर्वांसाठी श्रीसद्गुरूकृपेने सिद्ध केला आहे.

**कारण प्रतिमा :**

ह्या प्रतिमेचा संबंध घराण्यातील दिवंगत व्यक्तिंशी आहे. जे कोणी गेल्या सात पिढ्यांमध्ये धर्माचरण करू शकले नाहीत; किंवा ज्ञानअज्ञानाने ज्यांच्या हातून पातक-प्रमाद घडले आहेत; व त्यामुळे या दिवंगत व्यक्तींच्या इच्छावासना शिल्लक राहून, आपल्याला जो त्रास होत आहे की, ज्यामध्ये विद्यानाश, संपत्तीनाश व संततीनाश असे प्रामुख्याने तीन दोष कुटुंबात शिल्लक राहिलेले असतात; अशा दोषांचे परिमार्जन केल्याशिवाय, भावी पिढ्यांना विद्या-संपत्ती-संतती यांचा लाभ होणार नाही. यासाठी प.पू. बाबांच्या आशिर्वादाने जे काही विधी केले गेले, त्यामध्ये प्रामुख्याने वंशविमोचन, कर्मविमोचन व ऋणमोचन हे करण्यासाठी, श्रीक्षेत्र नरसोबा वाडी येथे अकरा पौर्णिमेला होमहवनादि विधी करण्यात आले; व मागाहून त्या विधींची सांगता म्हणून 'महारुद्र स्वाहाकार' करण्यात आला. हा विधी सामान्य माणसाला करता येत नाही. त्या



विधीसाठी साधारण अडीच लाख रुपये खर्च केले आहेत; तेव्हा पुन्हा तो विधी होणे शक्य नाही. या विधीसाठी जी शक्ति म्हणजे रुद्रशक्ति, हिला आवाहन केले होते; व मनोभावनेने सेवा करून, त्या शक्तीची धारणा भावी पिढ्यांसाठी आशिर्वाद म्हणून रहावी, म्हणून 'साईधाम'मध्ये श्रीशक्तिपीठाची स्थापना, प.पू. बाबांच्या मार्गदर्शनाप्रमाणे केली आहे. म्हणजेच भावी पिढ्यांची तरतूद, तुम्ही न मागता, प.पू. साईनाथ महाराज यांनी केलेली आहे; की ज्यामुळे जो कोणी जीवनात दु:खी आहे, तो इथे आल्यानंतर निश्चित सुखी होईल, असा माझा आत्मविश्वास आहे.

**महाकारण प्रतिमा :**

ह्या प्रतिमेमध्ये दोन शब्द आहेत; महान व कारण. महान म्हणजे मोठे असे आपण म्हणतो. पण महान असले तरी लहान आहे याचा अर्थ कळला पाहिजे. ज्याप्रमाणे वडाचे झाड मोठे, महान व भव्य असते. पण त्याचे बीज अतिसूक्ष्म व लहान असते. ते जर मनोभावनेने पेरले तर त्या बीजाचा कल्पवृक्ष निर्माण होतो. जेणेकरून तमाम वाटसरूंना त्याच्या छायेमध्ये सुखाचे क्षण अनुभविता येतात.

त्याप्रमाणे आपण जे नाम:स्मरण नित्य करतो, ते जरी लहान असले तरी ते महान आहे. तेव्हा आपली दृष्टि लयास जाऊन त्या नामस्मरणामध्ये काय आहे ? हे विचारण्यापेक्षा स्वत:लाच प्रश्न विचारावा की, "त्यात काय नाही ?" मग याचे उत्तर तुम्ही स्वत:च देऊ शकाल. असे हे बीज पेरण्यासाठी महाकारण प्रतिमा आहे; की ज्यायोगे वंशपरंपरेने भावी पिढ्या सुखात नांदतील असा आशिर्वाद प.पू. बाबांनी दिला आहे. ज्याप्रमाणे घर बांधावयाचे झाल्यास जागा लागते, किंवा काही गोष्ट करावयाची झाल्यास स्थळ, काळ व वेळ पहावी लागते. त्याप्रमाणे आपण जे नामस्मरण करीत आहोत, ते सुरक्षित राहून त्याचा लाभ भावी पिढ्यांना व्हावा, म्हणून ही प्रतिमा आहे. आज नित्याने जी सेवा आपण कराल, तिचा अंतर्भाव ह्या प्रतिमेमध्ये होऊन कालांतराने ही प्रतिमा तुमच्या भावी पिढ्यांशी बोलू लागेल.

अशा तीन प्रतिमा आपणा सर्वांना मिळाव्यात, म्हणून गेली तीस वर्षे माझे प्रयत्न चालू होते. त्या प्रयत्नांना यशस्वीरित्या यश येऊन आज हा प्रतिमारुपी प्रसाद, भक्तभाविकांच्या घरोघरी पोहोचला आहे. "यापेक्षा आनंद काय आहे ?" असा प्रश्न मी स्वत:ला विचारतो.

प्रतिमांचा विषय हा अतिगहन असून, त्यांचे कार्य त्यापेक्षाही गहन आहे. कारण अनेक शतकात हा विषय कोणीही अभ्यासासाठी घेतला नाही. आजपर्यंत जे कोणी या मार्गात आले, त्यांनी येणाऱ्या भक्तांचे भविष्य सांगणे, एवढेच कार्य केले आहे; त्यामुळे

कोणीही भक्त अडचणीत आला की, या मार्गाकडे त्या दिशेने पहात असतो. त्यामुळे 'आपण जन्माला का आलो ? व आपले कर्तव्य काय ?' हा प्रश्न कोणीही विचारात घेत नाही. एखाद्या साधकाला 'दिव्य दृष्टी' प्राप्त झाली आहे, म्हणजे काय ? तर आलेल्या भक्ताच्या भविष्याचे कथन करणे किंवा अद्‌भूत सांगणे, म्हणजे 'दिव्य दृष्टी' का ? हा प्रश्न फार मोठा आहे; व यामुळे समाज सज्ञान होण्यापेक्षा, जास्त अज्ञानी होत चालला आहे. त्यामुळे वर्तमानपत्रात अमुक एकाचे नांव आले की, "ती व्यक्ती असामान्य झाली आहे" असे म्हणावे लागते. विज्ञान युगामध्ये आपण सज्ञान होण्याऐवजी, अधिक अज्ञानी झालो आहोत. याचे कारण मूळ विषय हा 'पुराण' आहे, असे म्हणणारा वर्ग समाजात वावरत आहे. पण त्यांना ज्ञान आहे का ? हा प्रश्न आहे. जगतात अनंत विषय आहेत. त्यांचा शोध लागणे हे अशक्य आहे. एखाद्याने एक विषय अभ्यासासाठी घेतला व तो त्या विषयात पारंगत झाला, तर त्या विषयात इतर विषय शोधणे हे गैर आहे. त्यामुळे सध्या 'अंधश्रद्धा' हा विषय सर्वतोपरी विचारात आहे. ह्या विषयाचे मूळ कोठे आहे ? त्याचा शोध लागत नाही. याउलट जे लोक 'अंधश्रद्धेचा' पाठपुरावा करतात, त्यांचीच श्रद्धा आंधळी आहे असे म्हणावे लागते. म्हणून 'खरे आणि खोटे' असा वाद चालू आहे. एका रुपयाच्या दोन्ही बाजू आहेत. न पेक्षा रुपया खोटा आहे असे म्हणावे लागेल व ह्या जगात तसे म्हणणे हा गुन्हा आहे. तेव्हा ज्याच्या वाटणीला जी बाजू येईल ती खरी आहे असे म्हणता येत नाही. 'अश्रद्धा व श्रद्धा' हे विषय प्रत्येकाने अनुभविल्याशिवाय, त्याचे उत्तर चूक की बरोबर हे ठरविता येत नाही. या जगात जे लोक सज्ञानी आहेत असे भासते, ते खरे अज्ञानी आहेत. जे लोक 'अज्ञानी' आहेत त्यांना 'सज्ञानी' असे म्हणावे लागेल. कारण बहुतांश लोक पुस्तकी ज्ञानी आहेत, त्यांना पुस्तकाचे ज्ञान म्हणजे चैनीने जगणे असा अर्थ समजला आहे. परमेश्वराने हे जीवन आपल्याला का दिले ? हा मुख्य प्रश्न बाजूला ठेवून आपण जगतो आहोत.

आपण भक्तांना ज्या प्रतिमा दिल्या आहेत, त्यांचे कार्य आपल्या स्वतःवर अवलंबून आहे. ज्या भक्तांनी तीनही प्रतिमा घेतल्या आहेत, त्या प्रतिमामध्ये ईश्वर किंवा परमेश्वर, हा सगुण आहे की निर्गुण आहे हे ठरविणे चुकीचे आहे. जो कोणी 'परमेश्वर' आहे त्याचा अनुभव घेतल्याशिवाय तो नश्वर आहे की ईश्वर आहे ? हे समजणार नाही. तेव्हा "तीन प्रतिमा मिळाल्या आहेत म्हणजे सर्वस्वाने आपण सुखी होणार आहोत" असे भविष्य भवितव्यात वदविणे, योग्य होणार नाही. प.पू. जगद्‌गुरू साईनाथमहाराज यांनी जो कृपाशीर्वाद दिला आहे, त्या आशीर्वादात 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव' ह्याप्रमाणे घडणार आहे. व ही जबाबदारी साधकाची नसून भक्तांची आहे, हे भक्ताने विसरता कामा नये. जेव्हा भक्त अनन्य भावाने प्रतिमांचे पूजन व त्याबरोबर आपले



आचार-विचार करेल, त्याप्रमाणे त्याचे फल आपणांस मिळेल. या व्यतिरिक्त ह्या प्रतिमांचे महात्म्य एवढे आहे की, जे देव आपण पूजनासाठी मांडतो, त्या देवामध्ये तीन तत्वांपैकी एकही तत्व सध्या शिल्लक राहीले नाही; मग देव आपल्या इच्छा कधी व कशा पूर्ण करेल ? हे तुम्हाला व तुमच्या देवालाच माहिती ! याकरिता प.पू. बाबांनी तीन तत्वांची सांगोपांग ओळख करून दिली आहे. एवढेच नव्हे तर जे तत्व निर्गुण निराकार होते, ते तत्व सगुण साकार करून, आपल्याला कृपाशीर्वाद म्हणून दिलेले आहे. या प्रतिमांमध्ये उत्पत्ती, स्थिती व लय म्हणजे त्रिगुण तत्व आपल्याला मिळाले आहे. त्या प्रतिमांचे कार्य आपल्याला समजावे, म्हणून 'नारायणी' अशी चौथी प्रतिमा 'अधिक' महिन्यामध्ये (पुरूषोत्तम मास) सिद्ध केली. कारण 'अधिक' महिन्याचे महात्म्य अधिक आहे हे आपल्याला समजत नाही. 'अधिक मास' हा दर तीन वर्षानंतर येतो. असे बारा 'अधिक' महिने म्हणजे छत्तीस वर्षे झाल्यानंतर ही 'नारायणी अवस्था' उदयास आली व 'श्रीशक्तिपीठ' हे छत्तीस वर्षानंतर सिद्ध झाले. अशा दोन प्रतिमा आपणास मिळाल्या आहेत. त्यांचा उदय आपल्या भावी पिढ्यात होणार आहे. यासाठी श्रद्धा व सबुरी आपण भक्तांनी ठेवली पाहिजे. अनेक भक्तांना असे वाटते की, आपल्यापाशी तीन प्रतिमा पूजनात ठेवल्या आहेत; म्हणजे आपला योगक्षेम त्या प्रतिमा वाहतील. परंतु असे नाही. तो एक कृपाशीर्वाद आहे. त्या कृपाशीर्वादाने आपल्याला जे कर्म दुःख म्हणून भासते, त्या दुःखाचे परिमार्जन व्हावे, म्हणून आपणाला त्या प्रतिमा दिल्या आहेत.

जो कोणी जन्माला येतो तो निर्दोष जन्माला येत नाही. तेव्हा आपले दोष आपणच निवारण करण्यास शिकले पाहिजे. कारण पुढच्या काळात 'गुरू' हे तुम्हाला भेटणार नाहीत. गुरू अवस्था समाजामध्ये निर्माण करण्यासाठी त्या व्यक्तीला आपले जीवन देवास वहावे लागते. परंतु आजकाल जे कोणी 'गुरू' म्हणून समाजात वावरत आहेत, ते 'खाबूनंदन' आहेत; व पुढच्या काळात ते ह्याहीपेक्षा अधिक प्रबळ होतील. तर हा धोका भवितव्यामध्ये तुमच्या कुटुंबियांनी सांभाळला पाहिजे.

आपणां सर्वांस ज्या चार प्रतिमा दिल्या आहेत, त्या म्हणजे; १. श्रीसाईशक २. कारण ३. महाकारण ४. नारायणी. जोपर्यंत आपला वंश ह्या जगात जन्माला येतो आहे तोपर्यंत ह्या प्रतिमा तुम्हा भक्तांना प्रसाद देतील. ह्या प्रसादामध्ये ऐहिक व पारमार्थिक अशा दोन्ही सुखांचा ठेवा, श्रीसद्‌गुरुंनी ठेव म्हणून ठेवला आहे. तेव्हा परमेश्वरापाशी मागण्यासारखे काही शिल्लक राहिले नाही. जसे आपल्याला डोळे हे देवाकडे मागितल्यानंतर मिळत नाहीत; त्याकरिता डोळे असून डोळसपणे वागलो नाही,

तर दुःखाला कारण आपणच आहोत, हे विसरता कामा नये. आपण सर्व भक्तांना चार प्रतिमा मिळाल्या आहेत; त्यांचे कार्य जीवनात कार्यान्वित होण्यासाठी, जो महामंत्र पुढे लिहिला आहे तो आपण पूजनादि विधी केल्यानंतर, एकवीस वेळा, प्रतिदिनी घरातील प्रत्येक व्यक्तीने म्हणावयाचा आहे. जे सद्गुरू नाम:स्मरण आपण करीत आहात, ते आपला विकास व्हावा म्हणून आहे; व जो महामंत्र दिला आहे तो जीवन व्यर्थ जाऊ नये, तर जीवनाचा इतरांना उपयोग व्हावा, म्हणून दिला आहे.

**महामंत्र :**

।। सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते ।।

कार्यारंभी जेव्हा मी सेवेसाठी, अडीच वर्षे श्रीऔदुंबर क्षेत्री राहिलो होतो, तेव्हा नित्य नियमाने, तेथेच नदीपलीकडे असलेल्या श्रीभुवनेश्वरीच्या देवळात सूर्यास्तापूर्वी जात असे; व तेथे श्रीदेवी महात्म्याचे पठण करून ह्या महामंत्राचे अनुष्ठान करीत असे. अशी सेवा अव्याहत चालू होती, व आजही करीत आहे. भक्ताला महामंत्र पठन करण्यास सांगण्यापूर्वी, त्या मंत्राची सिद्धता करणे आवश्यक असते. वास्तविक तुम्हाला या प्रतिमा दिल्या, त्या आधीही मी स्वत: या महामंत्राचे पठण करीत होतोच; परंतु तुम्हाला त्यावेळी हा महामंत्र म्हणण्यास सांगण्याची अनुज्ञा मला नव्हती. कारण उच्चारलेल्या शब्दातून जी शक्तिची वलये तयार होतात, ती वलये धारण करून घेण्यास माध्यमाची आवश्यकता असते. नाहीतर ज्या वाणीद्वारा ही शक्ती उच्चारीत होते, त्या वाणीवरच शक्तिचा आघात होण्याचा संभव असतो. म्हणून प्रथमत: श्रीनारायणी प्रतिमा तयार केल्या; व त्या सिद्ध झाल्यानंतरच, श्रीगुरूकृपेने पावन झालेल्या या महामंत्राचा समावेश नित्य साधनेत केला गेला. सध्या जे जग आहे ते 'यंत्रयुगाचे' आहे; व एखादे यंत्र तयार करणे म्हणजे किती अवघड असते हे आपल्याला माहीत आहे. आपल्याला दिलेल्या प्रतिमा हेही यंत्र आहे; पण त्यामागे 'मंत्र' आहे. तरीही यंत्राचे साहित्य आहे, म्हणून जसे यंत्र होत नाही; तसा मंत्र आहे म्हणून प्रतिमा तयार करता येत नाहीत. बाजारात शेकडो यंत्रे तयार मिळतात. पण त्यामागे शक्तिचे कार्य नसल्याने अशा यंत्रांचा उपयोग जीवनात होत नाही. तेव्हा प्रथमत: मंत्र सिद्ध करावा लागतो व मग यंत्र किंवा प्रतिमा तयार होतात; म्हणून आपल्याला ज्या प्रतिमा मिळाल्या आहेत, त्यामागे गुरूशक्ती आहे हे विसरता कामा नये.

तुम्हाला जी चौथी प्रतिमा दिली गेली, तिचे नांव 'श्रीनारायणी प्रतिमा' असे आहे. जो कोणी जन्माला येतो, त्याचे जीवन 'नरा' प्रमाणे असते. पण केवळ खाणे पिणे, असे



जीवन व्यर्थ न घालविता, त्या जीवनात 'नारायण' निर्माण झाला पाहिजे. अशी अवस्था फक्त श्रीगुरू निर्माण करू शकतात. पण हा योग सर्वांना लाभत नाही. म्हणून आपल्या कुटुंबात ह्या प्रतिमांची जरूरी आहे.

पूर्वी आपल्या देवात ज्या मूर्ति होत्या ते देवाचे प्रतीक होते. असे देवत्व सगुण व आकाररुप असून त्या प्रतिमांना वेगवेगळ्या मंत्रांनी सिद्ध करावे लागत होते; पण आपल्याला ज्या प्रतिमा मिळालेल्या आहेत. त्या निर्गुण आहेत. त्यामुळे कोणताही मंत्र म्हटला तरी चालेल. अशा ह्या प्रतिमा आहेत. त्यांना अमुक एक धर्म किंवा कर्म पाहिजे असे नाही. जो कोणी या जगतात जन्माला येतो; व ज्याला उच्चार करता येतो, त्याला कोणत्याही मंत्रोच्चाराने पाहिजे ते फल मिळेल असा सोपा मार्ग प.पू. जगद्गुरू साईनाथ महाराजांनी दाखविला आहे.

वास्तविक पहाता ह्या प्रतिमा, 'वं. दादांनी दिल्या आहेत' म्हणून त्याचा स्विकार आपण भक्तांनी केला. या व्यतिरिक्त त्यांचा अर्थ आपल्याला समजला नाही. आपल्याला चार प्रतिमा दिल्या आहेत, त्या कशासाठी ? आपल्याजवळ पैसे आहेत; व त्या घेण्याची ऐपत आहे म्हणून आपण त्या घेतल्या आहेत का ? तर, महत्वाचा विषय आपण समजून घ्या. तरच भवितव्यात त्याचा लाभ आपल्या कुटुंबियांना होईल. तुम्हा भक्तांच्या घराण्यातील जे देव आहेत, व ज्यांची आपण पूजाअर्चा करतो; असे देव हे पितळेचे किंवा तांब्याचे आहेत. त्याचे तत्व म्हणजे काय ? हे समजून घेतले पाहिजे. केवळ देवामध्ये पूजनासाठी मांडले आहेत, म्हणून त्यांना 'देव' म्हणून संबोधणे हे अज्ञान आहे. त्यामागे अंधश्रद्धा आहे. यासाठी सर्व भक्तांना विनंती अशी की, ज्या प्रतिमा आपल्याला दिल्या आहेत व त्यामागे जो विषय आहे तो जर समजला नाही तर हा विषय हे 'विष' आहे. अनादीकालापासून, 'देवाचे प्रतीक' म्हणजे 'प्रतिमा', असे आपण समजत आलो. परंतु त्याचप्रमाणे आपल्याला या प्रतिमा दिल्या आहेत असे नाही. तर प्रथम 'देवाचे प्रतीक' म्हणजे काय ? हे समजले पाहिजे. विश्वाची धारणा तीन तत्वांमध्ये झाली आहे. ती तत्वे म्हणजे उत्पत्ति, स्थिती व लय. त्यामध्ये जरी स्थिती ही अस्तित्वात असते, तरी त्यामध्ये स्थित्यंतर करणे आवश्यक आहे. उदा. आपल्या घराण्यात एखादे बालक जन्माला येते. त्या बालकावर जर संस्कार झाला नाही, तर त्या बालकाला बोलता-चालता येत नाही, तसेच त्याच्याशी आपण जो विषय बोलतो, तो जर त्याला समजला नाही, तर ते बालक जन्माला येवून किंवा जन्म घेवूनसुद्धा, निरुपयोगी होते. हा संस्कार जो आपण करतो, ती अवस्था बालकाचे 'स्थित्यंतर' असे होय. नुसते बालक आहे, म्हणून आपल्या घरी जर त्याला सांभाळले, तर ते बालक 'हाडामासाचा गोळा' म्हणून

आपले जीवन व्यर्थ खर्च करील. ही जशी स्थित्यंतर होण्याची अवस्था त्या बालकाची आहे, त्याप्रमाणे आपल्या जीवनांत तीन गुण आहेत. त्या गुणांचा विकास झाला पाहिजे. म्हणजे असे की,'उत्पत्ति अवस्था' ही जी स्थिती आहे, त्यामध्ये संस्कार झाल्यानंतर स्थित्यंतर होते. म्हणजे स्थिती अवस्था' ही आपण प्राप्त करून घेतो. त्या अवस्थेप्रत पुन्हा संस्कार केल्यानंतर, 'तिसरी अवस्था' म्हणजे लय अवस्था प्राप्त होते. याप्रमाणे प्रत्येक अवस्थेमध्ये स्थित्यंतर करणे अत्यावश्यक आहे. हे जे संस्कार आपण आपल्या देहावर म्हणजे जीवनावर करून घेतो; त्यामुळे जी जी स्थित्यंतरे आपल्याला पहावयास व अनुभविण्यास येतात, त्या संस्कारांमुळे आपण या जगात राहून , सुखाची पाऊलवाट अनुभवितो. हा संस्कार होताना, पूज्य भावना असल्याशिवाय, स्थितीचे स्थित्यंतर अनुभवास येणार नाही. उदा. आपल्या जीवनामध्ये जे बालक असते, त्या बालकाबद्दल मोह व माया आहे. म्हणून आपण त्या बालकाला सज्ञान करू शकतो. असे बालक भवितव्यामध्ये, आपल्या कुटुंबाचा आधार बनते. त्याचप्रमाणे आपल्याला ज्या प्रतिमा दिलेल्या आहेत, त्या देवाचे प्रतीक म्हणून नव्हे; आपल्या ठायी देवाबद्दल श्रीगुरूंनी जो भाव निर्माण केला आहे, त्या भावनेला जो प्रतिसाद मिळतो, त्या प्रसादास 'प्रतिमा' असे म्हटले आहे.

आपल्याकडील तीन प्रतिमांमध्ये सृष्टीचे गुणधर्म आहेत. म्हणून जशी सृष्टि आपल्याला दिसते, तसे आपले आचार, विचार व उच्चार हे इतरांना अनुभवास यावयास पाहिजेत. जगामध्ये जो कोणी जन्माला येतो, त्या व्यक्तींचे भिन्नाभिन्न गुण म्हणजे आचार, विचार व उच्चार हे समपातळीवर नसल्याने, कुटुंबात म्हणजे जगात, अशांतता सदैव आहे. अनेक वर्षापासून आपण देवधर्म व पुण्यसंचय जरी केला आहे. तरी त्या आचारामध्ये 'देव' नसून, दुसऱ्याबद्दल 'द्वेष' दिसून येतो. त्यामध्ये जरी आपण स्वत:ला 'देवाचे भक्त' असे म्हणतो, तरी मनामध्ये 'हेवा' हा असतोच. या सर्व कारणास आपणच कारणीभूत आहोत. कारण गुरूमार्ग हा केवळ जीवनांतील अडिअडचणी निवारण करण्यासाठी नाही; तर गुरूमार्गामध्ये जीवनाची शिकवण शिकायला मिळावी, म्हणून तो आहे, हे आपण विसरतो. गुरूअंकित झाल्यानंतर, जो जीवनाचा आराखडा आपले गुरू सांगतात, त्याप्रमाणे आपले जीवन व्यतीत व्हायला पाहिजे. वास्तविक, जीवनांत ज्या अडिअडचणी निर्माण होतात, ती अडचण नसून, "जन्माला आपण का आलो आहोत" हे आपल्याला समजावे अशी इच्छा ईश्वराची असते. पण त्याउलट आपला विचार अन्य दिशेने जात असल्याने, आपण सर्वजण दु:खी म्हणजे अज्ञानी आहोत; असे म्हणावे लागेल. या सर्व विचारांचा सांगोपांग विचार करून, 'हे जग कसे सुखी करता येईल ?'



असा प्रश्न माझ्यासमोर कार्यारंभी होता व आजही आहे. त्यासाठी निश्चित एक गुरू केल्याशिवाय, ही सुखाची दिशा प्राप्त होत नाही.

जे आज आपले जीवन आहे, त्यात काय अधिक आहे व काय कमी आहे असा विचार चुकूनही कोणी करीत नाही. जन्माला येऊन दोन टोके एकत्र करून, "आपण सुखी का नाही ?" असा प्रश्न आपण इतरांना विचारीत असतो. अनादिकालापासून धर्म–रूढी–परंपरा आणि योग्य ते संस्कार, यांचा विचार व आचरण आपण सदैव करीत असतो. ही स्थिती आजची नव्हे. त्यामध्ये स्थित्यंतर केल्याशिवाय आपल्याला जगता येणार नाही. असा सुविचार कोणीही मनुष्य कदापिही करीत नाही. पिढ्यान्पिढ्या तेच तेच करणे म्हणजे धर्माचरण; हे एक टोक व दुसरे टोक म्हणजे; देवाला, धर्माला न मानणारा एक वर्ग आज समाजात प्रचलीत आहे की, ज्या व्यक्तींना 'सोयरं–सुतक' याचा अर्थही न समजता फक्त सुख पाहिजे. असा हा वर्ग आपल्या सभोवार वावरत आहे. भवितव्यामध्ये ही पिढी समाजाची शत्रू होणार आहे, हे आपण विसरलो आहोत. यासाठी प.पू. जगद्गुरू साईनाथ महाराज यांच्या आज्ञेप्रमाणे, ह्या जगाचा जीवन जगण्याचा मूळ धर्म बदलला पाहिजे; असा विचार मी केला. तसेच या जगाला जगण्याचा मार्ग दाखविला पाहिजे, अशी शिकवण श्रीसद्गुरूंनी दिली आहे; असे असताना, काहीतरी जगात कार्य निर्माण केल्याशिवाय, हे जग एकाच मार्गाने जाणार नाही, म्हणून 'श्रीसाई अध्यात्मिक समिती' हिची स्थापना, तीस वर्षापूर्वी करण्यात आली व त्यापरत्वे मानवी जीवनाचा कार्यारंभ सुरू केला. जो कोणी जन्माला येतो, त्याच्या जन्माचे काही 'कारण', हे निश्चित असले पाहिजे. कुणीही कारणाशिवाय इहलोकामध्ये जन्माला येत नाही व जात नाही. असे 'कारण' सर्वांना विदीत व्हावे, म्हणून 'निराकरण'. ज्यामध्ये कारण आहे, त्याचे निरसन व्हावे; म्हणजे निराकरण. हे निराकरण जेव्हा आपल्या जीवनात आचार, विचार व उच्चार यामध्ये व्यतीत होईल, तेव्हा जीवनामध्ये जे कारण आहे ते समूळ नष्ट होऊन, जो आपला आचार व विचार देवा प्रित्यर्थ केलेला असतो, तो आचार, 'प्रतिमा' म्हणून आपल्यासमोर उभा रहातो. यासाठी जी प्रतिमा आपल्याला दिली आहे ती 'कारण प्रतिमा' आहे. त्याचे प्रतीक आपण गुरूहस्ते घेतले आहे. जन्माचे कारण व गुरूंचा कृपाशीर्वाद, अशा दोन्ही अंगांनी ही प्रतिमा सिद्ध आहे. 'कारण प्रतिमेमध्ये' अनंत विषय असून, 'कारण प्रतिमा' हाच प्रामुख्याने महत्वाचा विषय आहे, हे कुणाच्याही लक्षात येत नाही. प्रधान प्रतिमा ही 'कारण प्रतिमा' होय. आपणास दोन हात व तिसरे मस्तक, यापैकी एक जर काही नसेल, तर जसे आपले जीवन व्यर्थ होते; त्याप्रमाणे कारण, श्रीसाईशक व महाकारण प्रतिमा या घेतल्या नाहीत, तर जीवन हे व्यर्थ आहे. याचे

कारण, या तीन प्रतिमांमध्ये विश्वाचा जो धर्म आहे तो सामावलेला आहे. उत्पत्ति, स्थिती व लय ही तत्वे एकरूप झाल्यानंतर, विश्वाचे कार्यकारणभाव निर्माण होतात. त्याप्रमाणे या तीन प्रतिमा किंवा उत्पत्ति, स्थिती व लय, ह्या त्रिपुटींचे कार्य व कार्यकारणभाव, म्हणजेच 'श्रीनारायणी प्रतिमा' ही होय.

---



## ११. समाजकल्याणार्थ समितीची भूमिका :

या समितीच्या कार्यपद्धतीचा हेतू हा शास्त्रीय असून तो मानवी जीवनाच्या दृष्टीने पूर्ण अभ्यासिलेला आहे. केवळ लोक जमवून त्यांचा बुद्धीभेद करून भावनेच्या अंधश्रद्धेला बळी पडून केलेला नाही. या कार्याची उभारणी येथे आलेल्या लोकांच्या अनुभवावर केलेली नाही. त्यामुळे येणाऱ्या भक्तांची संख्या वाढली तरी कार्याची पद्धती बदलणार नाही व ती बदलण्याचा प्रयत्न भक्तमंडळींनी आपल्या सोईसाठी करू नये. वर नमूद केल्याप्रमाणे येथील कार्यपद्धतीचा अनुभव आपणा सर्वांस घ्यावयाचा आहे. कारण त्या पद्धती व्यावहारिक किंवा प्रापंचिक जीवनातील नसून सिद्ध स्वरुपाच्या आहेत, म्हणजे ''गुरूप्रसाद'' आहे.

आज समाजामध्ये प्रत्येक कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ही काही ना काही कारणाने बिघडलेली आहे. ती परिस्थिती दूर व्हावी व सर्वांना सुखसमाधान लाभावे म्हणून प्रत्येक जण दुःखनिवारणार्थ काही काही प्रयत्न करीत आहे. सुख निर्माण होण्याची कुचंबणा जर कोठे होत असेल, तर ती स्वतःची असलेली अनिश्चितता, आत्मविश्वासाचा अभाव व दैवी मार्गाबद्दल पूर्णत्वाने नसलेली श्रद्धा. याशिवाय एक मोठा घातुक विचार म्हणजे मी माझे नित्य आचार-विचार कोणासाठीही बदलणार नाही व धर्माचरण करावे लागले तर ते न करता काही चार पैसे परस्पर देऊन कोणी करणारा भेटला तर बरे, म्हणून ज्योतिषी, देवऋषी, मांत्रिक किंवा एखादा आधिदैविक साधक यांचा आश्रय तुम्ही शोधणार आणि स्वतःजवळचा पै-पैसा घालवून आहे त्यापेक्षा परिस्थिती कठीण करणार ! त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून 'ते मला मिळणार आहे' या भविष्योत्तर जीवनाची स्वप्ने स्वतः काही एक न करता बाळगणार !

समितीची समाजकल्याणार्थ भूमिका अगदी स्पष्ट आहे हे पूर्वी लिहीलेल्या निराकरण पद्धतीवरून समजेल. ही निराकरणे कोणाही व्यक्तीचे विचार नाहीत. आज गेल्या काही वर्षांमध्ये दुःखनिवारणार्थ जे मार्गदर्शन केले व मनुष्याला जी काही निरनिराळ्या प्रकारची दुःखे म्हणून असतात, ती जास्तीत जास्त या निराकरण पद्धतीच्या पलीकडे असू शकत नाहीत हा विश्वास तुम्हाला पटावा म्हणून या साधनपत्रिकेमध्ये मानवी जीवनात दुःख निर्माण होण्यास जास्तीत जास्त प्रमुख कारणे कोणती असू शकतील, ती सहा प्रकारांनी आपणासमोर अभ्यासासाठी मांडली आहेत. या दुःख कारण परंपरा शेकडा ८० लोकांच्या दुःखास कारण असतात. बाकीच्यांची म्हणजे शेकडा २० लोकांची दुःखे ही अज्ञानाने निर्माण झालेली असतात. हे स्पष्ट समजावे म्हणून आपणासमोर ही साधनपत्रिका व निराकरणे तुम्ही प्रश्न विचारण्यापूर्वीच ठेवली आहेत.

या निराकरणपद्धती जगातील गरीबात गरीब व श्रीमंतात श्रीमंत जो असेल त्यालाही दु:खनिवारणार्थ आत्मसात करता येतील. शिवाय या निराकरण पद्धतीचा हेतू देवाधर्माबद्दलचे अज्ञान, तिरस्कार, निंदा, नालस्ती हे मनुष्याच्या ठिकाणचे अविचार जावेत असा आहे. कारण बाह्य जागेत देवाधर्माबद्दलचा अर्थ खूपच वेगळा आहे. त्या ठिकाणी देव मानायचा याचा अर्थ आपल्या जीवनांतील नित्य कर्तव्य न करता कोणा व्यक्तीवर, दगडावर, मूर्तीवर, जपातपावर, ज्योतिषशास्त्राच्या खोट्या विधानांवर विश्वास ठेवून झोपी जा, असा केला जातो. आजपर्यंत गादीवर आलेल्या शेकडो भक्तांनी हा भ्रम निर्माण करून ठेवला आहे की, आपण आरतीला आलो, प्रसाद पूजनास घेतला की आपले कर्तव्य संपले. तर अशा विश्वासासाठी हे कार्य नाही. आपल्या आपत्ती दूर होण्यास आपणच कारण झाले पाहिजे व दूर करण्यास शिकले पाहिजे, देव मानायचा तो आळसाने, अविचाराने, खोटेपणाने, दुसऱ्याला बुडवून, नित्याचरण न करून, नित्यानित्य विवेक न सांभाळून केवळ जग ऐहिक सुख भोगत आहे, ते आपल्यालाही मिळावे या वासनेने नाही; व तशी वासना असेल तर सुख मिळणार नाही, उलट असलेली परिस्थिती बिघडण्यास कारण व्हाल. तुम्ही देवाकडे येता तेव्हा एकाच दृष्टीकोनातून येता की, 'मला अमूक एक मिळाले पाहिजे'. पण त्याबद्दल 'मला काय काय सोडले पाहिजे' असे जर विचारलेत तर देव कशाला पाहिजे हे समजेल. तेव्हा वरील सर्व आचार बदललात म्हणजे खरा देव मानलात. पण या समितीच्या समाजकल्याणार्थ भूमिकेशी जे भक्त-भाविक सहमत होण्यास तयार नसतात, ते समितीबद्दलचे वाईट अनुभव पुढे करून बाह्य जगतामध्ये अन्य भक्त-भाविकांची दिशाभूल करीत असतात.

या कार्याची कार्यपद्धती ही पूर्णत्वाने समाजोन्नतीसाठी चाललेली असल्याने ज्या निराकरण पद्धतीने आपल्याला मार्गदर्शन होते, त्यात कोणताही आडपडदा न ठेवता आपणा सर्वांच्या अध्ययनार्थ त्या ठेवण्याचा हेतू असा की, बाह्य जगतात भौतिक किंवा सुधारक लोकांचा असा गैरसमज आहे की, देवादिकांचा मार्ग म्हणजे केवळ भावनेच्या आहारी गेलेल्यांचा बुद्धीभेद करण्याचा मार्ग ! तशी समजूत दूर व्हावी व जे सिद्ध आहे ते शास्त्र आहे, व त्याची प्रचिती तुम्ही अनुभवावी. केवळ नित्याचरण सोडण्यानेच बहुतांशी तुम्ही दु:खी झाला आहात हे या वरील अभ्यासाने आपणांस पटेल. कारण परमेश्वराच्या मार्गाइतका अचूक मार्ग मार्गदर्शन करण्यासाठी नाही. लोककल्याणार्थ खरा मार्ग असेल तर ताबडतोब धर्माचरण करण्यास सांगेल. ज्ञान-अज्ञानाने चुका झाल्या असतील तर कोणत्याही प्रकारे भीड न ठेवता त्या दाखवून नित्याचरणाची सत्यता पटवील, हे या कार्याचे लोककल्याणाचे ध्येय आहे. आपण भक्तमंडळी या ठिकाणी



आलात, पुढेही कोणाला येण्याबद्दल मार्गदर्शन करणार असाल तर क्षणिक सुखाच्या शोधार्थ येऊ नका व दुसऱ्याला पण तसे मार्गदर्शन करू नका. कारण केवळ आपले जीवन आपण सुखी करण्याचा प्रयत्न करणार असाल तर आम्ही मार्गदर्शन करू शकत नाही. कारण या सिद्धसिद्धान्त पद्धती प्रयत्न नसून ते शास्त्र आहे. तेव्हा आपण आपले आचार-विचार निश्चित करणार असाल तर मार्गदर्शन हितावह होईल. आपण आपले जीवन सुखी करू पहातो, पण ते जन्मऋणानुबंधनाने किती परावलंबी आहे हे जर पाहिले व अन्य मार्गाने सुखी होण्याचा प्रयत्न केलात तर तो निष्फळ ठरेल ! पण हा मार्ग कदापिही परावलंबी नाही हे हजारो वर्षांपासून सिद्ध झाले आहे. म्हणजे तुम्हाला उपासना, सेवा व धर्माचरण करायला लावणारा आहे व हे करण्यानेच आपण सुखी होणार आहोत. बऱ्याच भक्तभाविकांची या कार्याबद्दलची कल्पना भ्रामक आहे. तत्संबंधी स्पष्टपणे लिहीणे कर्तव्यच ठरेल. आपणापैकी कोणासही वाममार्गाने (सट्टा, जुगार, रेस इ.) सुख व पैसा मिळवून देणे हे कार्य या समितीचे नाही. शिवाय अध्यात्मिक या शब्दाचा अर्थ मोक्ष मिळेल का, साक्षात्कार होईल का, समाधी लागेल का, वारंवार मनात येणारे विचार प्रत्यक्षात येतील का ? वगैरे प्रश्नांची मिमांसा सांगणे किंवा सिद्धता करून देणे हा अर्थ या कार्याचा नाही, काया, वाचा, मनाने इतरांना सुख, समाधान देण्यासाठी काय काय प्रयत्न करावे लागतील, ते नि:स्वार्थपणे करणे या मानवता धर्माच्या शिकवणीस समिती 'अध्यात्मिक' समजते.

पारलौकिक, पारमार्थिक, आत्मोन्नती या शब्दांचा वापर करून आपला अभ्यास खूप झाला आहे, हा भास निर्माण करणारी बरीच भक्तमंडळी येथे येतात. पण समिती वैयक्तिक, पारलौकिक, पारमार्थिक किंवा आत्मोन्नती याचा अर्थ असा करते, जसे प्रकाश म्हणजे सूर्य नव्हे पण सूर्य म्हणजे प्रकाश, तद्वतच् या शब्दांचा वापर म्हणजे उन्नती नव्हे, तर प्रत्यक्षात आचरण हीच उन्नती होय. उन्नती ह्याचा अर्थ एका अवस्थेची पूर्णावस्था होवून दुसऱ्या अवस्थेमध्ये जाणे. मग आतापर्यंत पारलौकिक, पारमार्थिक, आत्मोन्नती, वैयक्तिक उन्नती झालेली माणसे दु:खी का ? वास्तविक अशी उन्नती झालेल्यांना सुख-दु:खाची कल्पना जाणवू नये, असे तेच सांगतात. मग अशा समाजाची अनावस्था का ? आज समाज सुधारणेच्या कल्पना भौतिक दृष्ट्या किती सुंदर व मोहाला बळी पाडणाऱ्या आहेत ! प्रत्येक जण असा विचार प्रकट करतो की, माझा विचार म्हणजेच समाजसुधारणा ! अशी दहा माणसे समाज सुधारण्यास निघाल्यावर कोणाच्या विचारांची दिशा निश्चित धरावयाची, असा प्रश्न जर समाज सुधारकांना विचारला की, 'आज समाज कल्याणाच्या विचारांनी आपले जीवन आपल्याला अपुरे झाले आहे असे आपण म्हणता, तर हे विचार कोणाच्या कल्याणार्थ आहेत ? देशाच्या, धर्माच्या,

देवादिकांच्या, समाजाच्या का स्वत:च्या ?' तर त्याला उत्तर एकच की, स्वत:च्या स्वार्थासाठी ! आणि हीच सामाजिक उन्नती आहे असे कोणी मानणार असेल तर मानोत. स्वत:च्या स्वार्थापलीकडे समाजाचे काय होणार आहे, तर पुढचे भविष्य आपणच ! या स्वार्थी सामाजिक विचारांना दैवी विचारांनी नि:स्वार्थ बनविणे हाच परमार्थ व हेच अध्यात्म आज जगाला पाहिजे आहे. समाधी किंवा साक्षात्कार हे अवडंबर नको आहे. याची प्रचिती येण्यासाठी या कार्याच्या सेवकांना आलेल्या लोकांना दु:खनिवारणार्थ मार्गदर्शन करण्यासाठी नियुक्त करून आज समाज कसा दु:खी आहे, धर्माबद्दल, देवाबद्दल व स्वत:बद्दल कसे अज्ञान आहे हे दाखवून सेवा धर्म म्हणजे स्वत:चा स्वार्थ नव्हे हे शिकविले जाते. समाजाची उन्नती झाली असे केव्हा म्हणता येईल ? तर ज्या दिवशी समाजातील दैवी मार्गातील व्यावहारिक द्वैत संपेल त्या दिवशी. या अभ्यासाची ओळख आलेल्या भक्त-भाविकांना करून देणे हीच समितीची लोककल्याणार्थ भूमिका आहे.

येथे येणाऱ्या बऱ्याच भक्त-भाविकांची कल्पना अशी आहे की, नुसती आरती, पूजा व प्रश्न निराकरण एवढेच हे कार्य मर्यादित आहे. पण तसे नसून वरील काही विवेचनावरून समाज कल्याणार्थ या कार्यापुढील उद्देश आपणास समजतील. याही पुढे एक महत्वपूर्ण कार्याचा भाग समितीच्या सिद्धसिद्धान्त पद्धतीमध्ये आत्मसात केला गेला आहे. परंतु तो प्रश्न किंवा ती साधना ही काही आर्थिक प्रश्न सुटल्याशिवाय होण्यासारखी नाही. आर्थिक प्रश्न हा काही विशेष प्राधान्याचा भाग या कार्य-पद्धतीमध्ये नाही. जो प्रश्न आहे तो येणाऱ्या आपल्यासारख्या भक्तमंडळींच्या आचार-विचारांचा. प्रथमत: आपल्या निदर्शनास आणले आहे की, आपल्या दु:ख निवारणार्थ समिती पूर्णत्वाने सुख निर्माण व्हावे, अशी इच्छा करीत आहे. आज समितीची प्रत्येक कार्यकेंद्रे ही काही मठ, धर्मशाळा, देऊळ इत्यादी अशी नाहीत. ती आपल्या सारख्याच कुटुंब वत्सल गृहस्थांच्या घरी त्यांच्या सहानुभूतीने व प्रेमाने तुमच्या कल्याणार्थ स्थापन झाली आहेत. याचा आपण कधीही विचार केला नसेल. रोज सकाळी साडेपाच पासून ते रात्री दहा पर्यंत या कार्यकेंद्रांवर आपल्या सारख्या येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या दु:खाचा विचार सहानुभूतीपूर्वक या कुटुंबातील मंडळी करीत असतात. यात त्यांचा काही फायदा आहे का ? हे तुम्हालाच पटण्यासारखे आहे. कारण तुम्ही आपले कर्तव्य कोणत्या प्रकारे करता, हे तुम्हालाच माहीत आहे. तुमच्या घरी चार दिवस जर एखादा पै-पाहुणा आला तर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी आपण नापसंती व्यक्त करता आणि या ठिकाणी तर अव्याहत हे कार्य चालू आहे. तुमच्याप्रमाणेच सामान्य जीवन जगणाऱ्या या कुटुंबियांना इतकी सहनशीलता कोठून येते व आली आहे हा जर विचार आपल्या मनाशी कराल तर



वेगळा परमेश्वर शोधण्याचे कारण पडणार नाही.

आज जगतामध्ये लोककल्याणाची तळमळ असणारी मंडळी काही थोडी नाहीत. परंतु तुमच्यासारख्या भक्त-भाविकांच्या आचरणाने अशी कार्ये मातीमोल होतात. आजच्या समाजात इतकासुद्धा चांगला विचार निर्माण होऊ शकत नाही की, आपल्याला कोणाचे चांगले करता येत नाही तर निदान आपण वाईट करण्यास तरी तयार होऊ नये. समाजातील काही व्यक्तींना आपल्या अशा घातकी आचार-विचारांचा अभिमान वाटतो आणि असे भक्त-भाविक अशा कार्याच्या ठिकाणी श्रद्धेने धर्माचरण व ईश्वरभक्ती करण्यास लागलेल्या इष्ट, मित्र, नातेवाईक लोकांना आपला आचार-विचारांचा खोटेपणा बाजूस ठेवून अशा समाजकल्याणाच्या कार्यात खोटेपणा आहे हे दर्शविण्याचे कार्य करीत असतात. कार्य खरे किंवा खोटे हे खरे-खोटेपणा दाखविण्याने सिद्ध होत नसते. असे जरी असले तरी आज आमचा समाज हा आचार-विचारांनी लुळा झाल्यासारखा आहे. अशी मंडळी एखाद्या कार्याचा उदो-उदो करण्यास कारण होतात व तीच मंडळी कार्याच्या नाशासही कारण होतात. आज या समितीचा हा मार्ग ईश्वरी कृपेच्या आशिर्वादाचा ठेवा आहे म्हणून गेल्या काही वर्षांमध्ये समाजातील अशा मंडळींच्या सुखदु:खाचा विचार नि:स्वार्थपणे करून सुद्धा त्या मंडळींनी कार्याच्या आड येण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु जसा सूर्यप्रकाश कोणी दडवू शकत नाही, त्याप्रमाणे हे कार्यही समाजाआड ते करू शकले नाहीत. पण अशा लोककल्याणाच्या कार्यार्थ ज्यांना स्वत:चे बलिदान करावे लागते, याचा तरी विचार निदान ज्यांना दुसऱ्यास सुख, समाधान देण्याचे विचारसुद्धा सुचत नाहीत अशांनी अवश्य करावा.

आता वर जो आर्थिक प्रश्न म्हणून सांगितला तो असा आहे की, आज आपल्याच देशात ग्रामसुधारणेसाठी आपले राज्यकर्ते बराच प्रयत्न करीत आहेत. तरीसुद्धा काही बाबतीत ते सुख समाधान देण्यास असमर्थ आहेत हे अगदी निश्चित अनुभवाने येथे मांडले जात आहे. हजारो वर्षांपूर्वी ज्यावेळी समाजव्यवस्थेसाठी जी खेडी बसविली, त्याच वेळी त्यांच्या संरक्षणार्थ देवतांचीही स्थापना केली. त्यांनाच आज 'ग्रामदेव' किंवा 'ग्रामदेवता' म्हणतात. वर्षातून एकदा त्या देवतांची जत्रा किंवा ऊरूस करण्याची प्रथा प्रामुख्याने असे. यामागील हेतू सुद्धा समाजकल्याणाचे द्योतकच होता. तो असा की, जर गावातील एकमेकांत काही वैरभाव, भांडणतंटा निर्माण झाला असेल, तर या जत्रेच्या दिवशी अशा एकमेकांत वैर असणाऱ्या लोकांना त्या निमित्ताने एकत्र आणण्याचे काम गावपंचायत करीत असे, व ज्ञान-अज्ञानाने घडलेल्या प्रमादांचे निराकरण होऊन पुन्हा एकमेकांत प्रेमाचा सलोखा निर्माण होत असे. आज अशा शुल्लक कारणासाठी कोर्ट-

दरबार करून शेकडो कुटुंबे कर्जबाजारी होऊन अजून वैरभाव विसरू शकली नाहीत. यावरून त्या कालामध्ये ग्रामस्थ ग्रामदेवतांचे महत्व समाज कोणत्या प्रकारे मानीत होता हे अभ्यासिण्यासारखे आहे. आज प्रत्येकास शहरी जीवनातील विषय सुखाची आसक्ती निर्माण झाली आहे व शहरी जीवनाच्या पगड्यामुळे जत्रा, ऊरुस करणे हे अशिक्षितपणाचे आहे असे वाटू लागले आहे. आज जत्रा, उरूसामध्ये जो करमणूकीचा भाग आपण पहातो, तो अलीकडे काही शतकांमध्येच आलेला आहे. तेव्हा जत्रा, उरुस म्हणजे तमाशाचा 'फड' ही कल्पना त्याच खेड्यातील व शहरातील लोकांनी केलेली आहे. पण देवदेवतांचे पूजन, अर्चन व महाप्रसाद या शिवाय वरील अन्य सोहळा पूर्वी नसे. आज अशा देवतांकडे दुर्लक्ष झाल्याने जरी भौतिक सुख म्हणून कोणी विमान दिले तरी अंतर्यामीचे सुख, समाधान हे भौतिक जीवनातून मिळत नसते, हे अभ्यासण्यासारखे आहे.

या समितीला अशा कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यास जो काही लाभ झाला तो आपणासमोर ठेवीत आहोत. ज्या काही खेड्यांमध्ये समितीच्या कार्यप्रमुखांना जाण्याचा योग आला, तेव्हा तेथील परिस्थिती अशा प्रकारे दृष्टोत्पत्तीस आली की, शेतीवाडी भरपूर आहे, पीक पाणी नाही, भावाभावांची भांडणे इतकी विकोपाला गेली आहेत की, एकमेकांचा खून करण्यापर्यंत एकमेकांना धाक दाखविला जात आहे. नैसर्गिक हवा, पाणी, शरीर प्रकृतीला हितावह असून सुद्धा निरनिराळे रोग भरपूर आहेत. वाडवडिलांच्या वेळेला दोन दोन पाण्याच्या मोटी चालल्या तेथे एक मोट चालणे अशक्य झाले आहे. सुगीनंतर पै-पैसा येत आहे, परंतु हाताला लागत नाही. मुली उपवर झाल्या आहेत पण लग्ने होत नाहीत. याला कारणे काय ? वडिलोपार्जित जे काही होते ते काही कोणी नेले नाही. निसर्गाने आपल्यात यांना दुःख देण्यासाठी काहीही बदल केला नाही. मग बदल कशात झाला ? बदल झाला तो तेथील लोकांच्या विचारात व भावनेत ! वरील दुःखकारण परंपरेची मिमांसा ही ग्रामस्थ ग्रामदेवता यांच्याशी संबंधित आहे; हे त्यांना पटवून त्यासाठी समितीच्या कार्यपद्धतीतील निराकरण सांगितले. यात प्रामुख्याने 'बळी न देण्या'बद्दल सांगितले. 'बळी' देण्याची पद्धत ही सुद्धा दैवी स्वरूपाची आहे, असे वाटत नाही. कारण ज्या ज्या लोकांना त्यांच्या त्यांच्या देवतांना 'बळी देऊ नका, आतापर्यंत दिलात, तो अज्ञानाने दिला आहेत' असे सांगितले त्यांना ते न देण्यापासून जास्त सुखच झाले आहे. (या 'बळी' देण्याच्या पद्धतीचे विवेचन सविस्तरपणे 'निराकरण-पत्रिके'त केले आहे.) या निराकरणानंतर त्या खेड्यातील परिस्थितीत खूपच बदल झाला हे तेथील रहिवाशांनी कबूल केले आहे. एक वेळ शहरातील मनुष्य



ईश्वरीकृपेने मिळालेले फल हे 'नशिबाने मिळाले आहे' असे सांगतो. परंतु खेड्यातील मनुष्य प्रामाणिकपणे 'ईश्वरी कृपेचे फल' म्हणून व्यक्त करतो ! हा अभ्यास सूज्ञ भक्तांच्या दृष्टीने विशेष विचार करण्यासारखा आहे.

आज आपल्या देशात अशी अनेक खेडी आहेत की ज्यात भौतिक सुधारणेने सुखी करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. हे जरी असले तरी हे कार्य भौतिक सुधारकांचे नाही हे अनुभवाने सिद्ध होऊ शकते. आज गेल्या काही वर्षात ज्या भौतिक सुधारणा उदा. धरण बांधणे, ताली घालणे, नाले खोदणे इ. अशा झाल्या, तेव्हा ज्यांच्या हातात अधिकार व सुधारणेसंबंधीचे ज्ञान (उदा. इंजिनिअर इ.) होते, त्यांनी अशा सुधारणा करीत असता या ग्रामस्थ ग्रामदेवता यांचा विचार न करता त्यांना आपल्या स्थानापासून हालवून बाजूस फेकून दिले. पण जेव्हा अशा अधिकाऱ्यांच्या कुटुंबात आजारपण, वेड लागणे इ. असा त्रास सुरू झाला, तेव्हा अनुभवास हे आले की, या लोकांनी अशा देवतांना त्यांच्या स्थानापासून हालविले आहे. काहींनी ते मान्य करून ज्या ठिकाणी ही कामे केली गेली होती, तेथे त्याच देवतांच्या प्रित्यर्थ स्थापना केली; व काहींनी ते अशक्य असल्याने घरीच समितीच्या अनुष्ठान पद्धतीने आपल्या दुःखाचे निराकरण करून घेतले. आज अशा कार्याची जबाबदारी घेण्यास समिती पूर्णपणे सिद्ध आहे. परंतु प्रचाराची भूमिका समितीस मान्य नसल्याने जो भक्त-भाविक एकमेकांच्या ओळखीने येईल, त्याचे इच्छित कार्य समिती केव्हाही आनंदाने करील. या सर्व कार्यपद्धतीस अनुकूल लोकमताची आवश्यकता असते. परंतु स्वतःच्या ऐहिक स्वार्थाची प्राप्ती झाली किंवा ती न होण्यास स्वतःच कारण असणारी भक्तभाविक अन्य प्रचाराची भूमिका अप्रामाणिकपणे करतात. त्यामुळे स्वतःच्या नुकसानीस कारण होऊन दुसऱ्याचे हित होणार असेल तर तेही त्याला मिळू देत नाहीत. अशा समाजातील आचार-विचारांचे जेव्हा निर्मूलन होईल व स्वतःच्या जीवनांतील आचार-विचार हे काहीतरी परोपकार करण्यास कारण होतील, तेव्हाच समाजोन्नती, वैयक्तिक उन्नती किंवा पारमार्थिक उन्नती होईल हे म्हणणे सत्य होईल !

--- --- --

# १२. हा मार्ग हाच सुखाचा ठेवा !

आज जगात या मानवाच्या सुखासमाधानासाठी अनेक बुद्धीवादी शास्त्रे निर्माण झाली आहेत. त्या सिद्धान्तामागे ज्ञान आहे, बुद्धी आहे पण भावना नाही. ती अशी की, ते सुख सर्वांना मिळेलच असे नाही. ह्याचा प्रचार म्हणजेच आजचे अशाश्वत सुख! ते न मिळणे म्हणजे 'मी दुःखी व ज्याला ते मिळाले तो सुखी!' 'मी गरीब' व 'तो श्रीमंत!' खरोखर जीवनाबद्दल सूज्ञपणाने विचार करण्यास कोणासही वेळ नाही; व अशा अविचारांच्या पायी प्रत्येक जण आपले आयुष्य कंठतो आहे. आज सुख प्राप्तीसाठी समाजातील प्रत्येक जण हा काही ना काही मार्गाचा अवलंब करून सुख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नानेच आज समाजाची विपन्नावस्था झाली आहे. आज समाजामध्ये असणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला त्याचा धर्म म्हणजे कर्तव्य प्रामाणिकपणे करायला लावणारा कोणताही मार्ग अस्तित्वात नाही. आज साध्या भिक्षुकापासून ते राज्यकर्त्यापर्यंत कर्तव्याचे पालन होत नाही. आणि प्रत्येकजण आपल्या ऐहिक सुखाच्या पूर्ततेसाठी आपल्याकडे येणाऱ्या गरजू व्यक्तिंना त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेवून समाजात दुःख वाढविण्यास कारण झाला आहे. एखादा धार्मिक विधी असेल तर भिक्षुक आपली प्राप्ती बुडेल या प्रामाणिक स्वार्थाने धार्मिक विधीप्रित्यर्थ जी यादी देतात, वास्तविक यादीतील तितक्या जिन्नसांची जरूर असते किंवा नाही हे समजत नाही, परंतु या यादीच्या निमित्ताने प्राप्ति वाढविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा यजमानास प्रामाणिकपणे 'इतकी दक्षिणा आपणास द्यावी लागेल' हे सांगणे योग्य होईल. कोणत्याही धार्मिक विधीसाठी धार्मिक कर्माची भूमिका समजावून सांगण्यानेच देवधर्म करण्यास समाज प्रवृत्त होणार आहे.

आता दुसरी बाजू म्हणजे वकिलांसंबंधी. वास्तविक या मंडळींचे स्थान समाजात इतके उच्च आहे की, प्रत्यक्ष न्यायदेवतेच्या अधिकाराने एखाद्याला मृत्युच्या दाढेतून कायद्याच्या सल्ल्याने हे सोडवू शकतात. आज समाजाची ज्ञान-अज्ञानाने झालेली विचारांची अधोगती त्याच्याच नाशास कारण झाली आहे. अशा वेळी एकमेकांत होणारी भांडणे - तंटे, मारामाऱ्या, खून इ. या हातून घडलेल्या अज्ञानाच्या व अविचाराच्या कृत्याबद्दल ही मंडळी अशा ज्ञानी माणसांचा सल्ला घेण्यास येतात. आज समाजातील शेकडा पन्नास लोकांना सुविचारांनी सुखी होण्याचे मार्गदर्शन यांच्या हातून होण्यासारखे आहे. परंतु ज्या ज्ञानाचा फायदा आज परोपकारार्थ व्हावयास पाहिजे, तो न होता कैक लोकांच्या घरादाराची राखरांगोळी करण्यास ते ज्ञान कारण झाले आहे! आज समाजामध्ये



अडलेला एखादा, की ज्याचे एखादे काम अन्य कारणाने कोर्ट-दरबारात असते व वारंवार दोन्ही पक्षांकडील वकील आपली प्राप्ती वाढविण्यासाठी तारीख मागून घेतात अशावेळी ज्याच्यासाठी तारीख घेतली त्याला तारखेला हजर राहण्यासाठी स्वतःच्या मुलाबाळांना एकवेळ किंवा ते सुद्धा नाही अशा अन्नपाण्यावर ठेवावे लागते. आणि अशा परिस्थितीच्या कारणानेच त्रस्त झालेला एखादा गुन्हा करण्यास प्रवृत्त होतो. आज समाज व्यवस्थेसाठी कायद्याने गुन्हा करणारा 'गुन्हेगार' ठरतो; पण गुन्हा करायला लावणारा कायदा (वकील) गुन्हेगार ठरू शकत नाही. या बाबतीत या सर्वांचा अधिकार समाज कल्याणाच्या दृष्टीने फार मोठा आहे. कोणासही त्याच्या हिताच्या दृष्टीने कायद्याचा सल्ला देण्याने आशीर्वादच मिळणार आहे. परंतु समाजामध्ये आपली भूमिका परोपकारार्थ आहे ही जाणीव देण्यासाठी मार्ग नाही व आहे त्यावर विश्वास नाही.

आज तीच स्थिती डॉक्टर, वैद्य किंवा त्याप्रकारच्या व्यवसायी लोकांची आहे. या विद्येचे स्थान परमेश्वरापेक्षाही मोठे आहे. जेव्हा एखादा मनुष्य आपल्या जन्म-ऋणानुबंधनाच्या कारणाने एखाद्या व्याधीला कारण होतो, त्यावेळी त्याला त्या यातना म्हणजे कृतकर्माचे प्रायश्चित्त असते. अशा वेळी या व्यवसायातील लोकांचा तो पीडीत आश्रय घेण्यासाठी धावतो. अशा पीडितांना पुनश्च: निरालस आरोग्य प्राप्ती करून देणे हा परोपकार परमेश्वरी कृपेपेक्षाही मोठा आहे. परंतु ही पारमार्थिक विचारांची जाणीव भौतिक विचारांनी नष्ट झाल्याने डॉक्टर म्हणजे परोपकार हा पूज्य भाव जावून डॉक्टर म्हणजे गाडी व बंगला असा तिरस्काराचा भाव आज समाजात निर्माण झाला आहे. मनुष्य नाईलाजाने या ज्ञानी वर्गाकडे जातो, याचा अर्थ त्याच्या अज्ञानाचा फायदा घेण्यास कारण होऊ नये. एखादा रोगी जर सर्वसाधारण औषधांनी बरा होणार असेल तर आपली आर्थिक प्राप्ती वाढविण्यासाठी व गाडी-बंगल्याचे स्वप्न साकार करण्यासाठी औषधांचा मारा करून त्याला कर्जबाजारी करणे योग्य नाही. ही परोपकाराची भूमिका ज्या क्षणी आमच्या समाजातील या अधिकारी लोकांच्या जीवनामध्ये प्रत्यक्षात उतरेल, त्या क्षणी समाजोन्नती होण्यास वेळ लागणार नाही. परंतु हा परोपकाराचा ठेवा निर्माण होण्याचा पाया दाखविणारे शास्त्र हजारो वर्षांपासून जरी अस्तित्वात आहे तरी ते मांडणे कमीपणाचे आहे, असे विचार प्रकट केले जातात.

अशा अनेक परोपकाराच्या बाजू समाजाच्या कल्याणासाठी व हितासाठी आवश्यक आहेत, असे दाखविता येईल. परंतु भौतिक जीवनाच्या ऐहिक सुखासाठी ही लागलेली तहान नित्यानित्य विवेक, परदुःख, परोपकार करण्यासाठी सद्बुद्धि निर्माण होऊन देणार नाही. भौतिक जीवनाने सर्वांना सुख-समाधान प्राप्त व्हावे हे

आवश्यकच आहे. तसेच त्याच्या प्राप्तीसाठी जे विचार अनावश्यक आहेत, ते गेले तरच समाजातील मनुष्याच्या संसारापासून ते राष्ट्राच्या कल्याणापर्यंतचे प्रश्न सुटतील. आज भौतिक जीवनाचा ठेवा सर्वांना मिळावा असा समतावाद निर्माण करून तो मिळणार नाही. कारण उद्या सर्वांच्या सुखासाठी मोटारी स्वस्त झाल्या आणि प्रत्येकाने त्याचा लाभ घ्यावा असा विचार जरी प्रकट झाला, तरी तो घेण्यासाठी नशीब स्वस्त व्हावयास पाहिजे. कारण तो ठेवा विधीलिखीत असल्याने मोटारीसारखी मोटार निघू शकते, पण नशिबासारखे नशीब होऊ शकत नाही. हे द्वैत भौतिक जीवनाची पराकोटी जरी झाली तरी ते कोणीही बदलू शकत नाही. आणि हे न समजल्याने आपल्याला गाडी मिळत नाही किंवा अशाच अन्य प्रकारची सुखे मिळत नाहीत म्हणून मनुष्य अन्य मार्गांनी पै-पैसा मिळवून सुखाचा ठेवा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु जे तुमच्यासाठी नाही ते निर्माण करण्यासाठी जसे तुम्ही अनेक मार्ग निर्माण करता, तसेच ते सर्वस्व जाऊन पुन्हा मुलाबाळांच्या किंवा भावी पिढीला दुःख देण्यास कारण होता, हे वरील विवेचनावरून सूज्ञ माणसाला पटण्यासारखे आहे. आता प्रश्न असा निर्माण होईल की, ही सर्व साधने होत. या साधनांचा उपयोग करून त्यातून राहिलेला वेळ ईश्वरचिंतन, समाजचिंतन, वैयक्तिक उन्नति करण्यासाठी जर खर्च झाला तरच त्याला सुख म्हणता येईल. अशा अशाश्वत सुखांच्या कल्पनांनी स्वतःच्या जीवनाचा नाश करण्याची प्रवृत्ती, एकमेकांच्या सुखाकडे पाहून समाजामध्ये निर्माण झाली आहे. ज्या क्षणी एकमेकांकडे पाहण्याची दृष्टी आदर्श म्हणून निर्माण होईल, तेव्हा खरे सुख आणि समाधान प्राप्त होईल. ही समाधानी वृत्ती निर्माण होण्यासाठी जीवनामध्ये असा आदर्श निश्चित करावा लागेल की, ज्याच्याशी बोलले, ज्याच्याकडे पाहिले, ज्याला आपले सर्वस्व अर्पण केले तरीसुद्धा आपल्या ठिकाणी वासनेचा गंधही निर्माण होणार नाही व नित्य जीवनातील आचार-विचारासंबंधी सहनशीलता निर्माण होईल. असा आदर्श हा पारमार्थिक किंवा अध्यात्मिक मार्गाशिवाय मिळणारा नाही.

हे तुमचे सुविचार तुमच्या ठिकाणी अशी भावना निर्माण करतील की, बाह्य जगताबद्दल मला माझ्या ठिकाणी एकही अविचार निर्माण करावयाचा नाही. हा तुमचा विचार तुमच्या ठिकाणी निर्माण होण्यास जीवनाचा निश्चित आदर्श म्हणून परमेश्वरच मानावा लागेल. भावनासुद्धा दोन प्रकारांनी निर्माण होतात. एक आपण मानव आहोत म्हणून व दुसरी आपण मानव असून ईश्वरभक्त आहोत म्हणून ! पहिली भावना तुमच्या ज्ञानाचे प्रतीक असल्याने त्यात अधिक-उणेपणा असणारच. दुसरी परमेश्वराच्या कृपेचे प्रतिबिंब असल्याने 'त्याचे दुःख म्हणजेच माझे दुःख' ही भावना सदैव जागृत रहाणार !



या भावनेची निरंतर जागृती कुटुंब कल्याणासाठी, समाज कल्याणासाठी, राष्ट्र कल्याणासाठी प्रत्यक्ष आचार-विचारांमध्ये आली की तोच खरा सुखाचा ठेवा !

--- --- --

। ॐ ॥

श्रीसाई स्वाधाय मंडळ, पर्वरी

# साधन-पत्रिका

# २

## मानवी जीवनातील दुःख कारणमीमांसा व त्यास कार्याचे मार्गदर्शन


| | | |
|---|---|---|
| १. | कार्याचा उद्देश | ६९-७१ |
| २. | कार्यपद्धतीस शास्त्राधार | ७२-७६ |
| ३. | कार्यपद्धती | ७७-८३ |
| ४. | वैयक्तिक व सामुदायिक उपासना / साधना | ८४-९५ |
| ५. | स्पर्श संवेदना, ज्ञान संवेदना | ९६-१०० |
| ६. | अभिमंत्रित तीर्थ व गोळ्या | १०१-१०३ |
| ७. | पारमार्थिक उन्नतीसाठी आयुर्वेदाची आवश्यकता | १०४-१०५ |
| ८. | श्रीसाई स्वाध्याय मंडळ | १०६-११४ |
| ९. | कार्यपद्धतीची ओळख | ११५-११७ |
| १०. | परमार्थ प्रश्नावली | ११८-१२१ |
| ११. | सेवक व भक्तभाविक नियमावली | १२२-१३० |
| १२. | उपसंहार | १३१-१३६ |

## १. कार्याचा उद्देश :

प्रापंचिक जीवनात निरनिराळ्या प्रकारांनी झालेली दुःखे दूर व्हावीत म्हणून मनुष्य या मार्गाचा अवलंब करतो. दुःख निवारणार्थ जाणाऱ्या माणसाच्या मनाची परिस्थिती इतकी विचित्र झालेली असते की, समोर बसलेला साधक जे काही अडचणी निर्माण होण्याचे कारण कथन करील, त्यावर त्यास विश्वास ठेवणेच भाग पडते. कारण मानवी जीवनास आशा ही मोठी वेडी असते. जेव्हा असा गांजलेला मनुष्य अशा सिद्धसाधकांकडे जातो, त्यावेळी त्या माणसाची भावना, भक्ती, श्रद्धा ही परमेश्वरावर जेवढी नसेल तेवढी त्या साधकावर असते. हेतू हा की, आपल्या कुटुंबास सुखाचे दिवस यावेत. अशा वेळी या सिद्धसाधकांची भूमिका इतकी स्वार्थी असते की, समोर दुःखाने पिडलेल्यास कोणती सहानुभूती आणि प्रेम दाखविल्याने तो सुखी होणार आहे याचा विचार न करता आपल्याला आलेल्या माणसाकडून जास्तीतजास्त काय प्राप्ती होईल, याचा विचार ते करीत असतात. आणि अशा स्वार्थी भूमिकेतून सांगितलेली निराकरणे ही जरी बुद्धीला पटणारी नसतात, तरी मनुष्य आशेने ते करतो. या जगतातील अशा सिद्धसाधकांचे अनुभव प्रत्यक्ष या कार्याच्या प्रमुख मध्यस्थांच्या कुटुंबास अनेक प्रकाराने आले आणि अशा विश्वासघातकी वृत्तीस असे सिद्धसाधक ईश्वरी कृपेची 'गुरूकृपा' म्हणून लोकांना लुबाडतात. अशा विचारामागील सत्य शोधण्यासाठी प्रथमतः या कार्यास आरंभ झाला तो याच हेतूने की, ईश्वरी कृपा म्हटल्यावर जास्तीत जास्तपणे ती जगातील लोकांच्या सुखास कारण ठरली पाहिजे. प्राप्त झालेल्या जीवनातील दुःख निवारणार्थ आलेल्या मनुष्याजवळील श्रद्धा, भक्ती व भावना ही असल्यानंतर आणखी अन्य देवाण-घेवाण करण्याची आवश्यकता नाही. या सद्‌हेतूस परमपूज्य बाबांच्या कृपाप्रसादाचा आशिर्वाद लाभला व गेली दहा वर्षे याच भूमिकेतून आलेल्या भक्तभाविकांना मार्गदर्शन होत आहे.

अशा कार्याची किंवा सिद्धसाधकांची दुःख निवारणार्थ आलेल्या मनुष्यास मानवी जीवनातील सुखदुःखांबद्दल मार्गदर्शन करीत असता जबाबदारी मोठी असते. परंतु ती स्वतःच न समजून घेता आलेल्यास खूप समाधान वाटावे म्हणून सुखाबद्दल काहीतरी भ्रामक कल्पना निर्माण करून दिलेली असते. वास्तविक मनुष्याच्या जीवनामध्ये कर्मगतिसारखा गुरू नाही. मनुष्याने आयुष्यात कितीही बढाया मारून आकाशाला वेसण घालायचा प्रयत्न एकवेळ केला असेल, परंतु कर्मगती ही त्याला शरणागती पत्करण्यास लावते. कदाचित अशा माणसाने जीवनात देवधर्म, संस्कार, कर्म, प्रारब्ध हे खोटे मानले असेल तर त्याला ते मानण्याशिवाय गत्यंतरच नसते. अशा

वेळी त्याला जीवनाचा खरा अर्थ कळलेला असतो. तोपर्यंत त्याने सुखाची निर्माण केलेली स्वप्ने ही एक रुपया मिळविण्यासमुद्धा कशी निर्बल झालेली असतात हे कटू सत्य त्याला पटलेले असते. अशा वेळी योग्य ते मार्गदर्शन होऊन जर अशा मनुष्यास सुखी केले तर सबंध कुटुंबाची आचार-विचार पद्धत बदलते व ते एक धर्मपरायण सहिष्णुतेचे कुटुंब बनते. परंतु हीच जबाबदारी न ओळखून वेड्यावाकड्या प्रकाराचे मार्गदर्शन असे साधक लोक करतात व अशा कटू अनुभवांची प्रचिती घेतलेले जेव्हा समितीच्या कार्यपद्धतीचा अनुभव घेण्यास आले तेव्हा दोन्हीतील निराकरणाचा फरक हा त्यांच्या बुद्धीला जाणवला व जीवन हे जन्मप्रारब्धाने अशाच सुखदुःखाचे लेणे आहे हे पटवून आजचे आपले जीवन व आपल्या मुलाबाळांचे जीवन सुखी व्हावे या सद्हेतूने त्यांनी समितीच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतलाच. शिवाय हे ही विचारांती निश्चित केले की, जीवनात सुखासाठी ज्या ज्या काही उणीवा आहेत असे वाटते त्यात परमेश्वराची उणीव ही प्रामुख्याने असते. अशी भक्त मंडळी आज आपल्या दैनंदिन जीवनात या कार्यपद्धतीची उपासना नित्य करीत आहेत. या कार्यपद्धतीची स्पष्ट भूमिका या भक्तभाविकांना जीवनातील कर्तव्य व समाजकल्याण हाच पारमार्थिक ठेवा आहे असे सांगते. यामुळे याही भक्तभाविकांना या कार्यपद्धतीची ओळख ही लोककल्याणार्थ आहे, कोणाच्याही वैयक्तिक स्वार्थासाठी नाही हे पटले व असा विश्वास निर्माण झाला की, या कार्यपद्धतीत कोणतीही उणीव किंवा कमीपणा नाही. जो आहे तो आपल्यापाशीच आहे. आणि तो समजावून घेणे म्हणजेच जीवनात निरंतर सुख, समाधान निर्माण करणे हा होय !

याउलट अशी भक्तमंडळी समितीच्या मार्गदर्शनार्थ येतात की, जी वर सांगितलेल्या साधकांच्या तावडीत सापडलेली नाहीत. अशांना कितीही आत्मियतेने व सहानुभूतीने त्यांच्या दुःख निवारणार्थ मार्गदर्शन केले तरी 'नशिबा'बद्दल काहीतरी सांगितले नाही म्हणून समितीच्या कार्यपद्धतीत काहीतरी बरेवाईटपणा आहे, असा ग्रह निर्माण करून जाण्यास कारण होतात. पण बाहेर गेल्याने नशीब तेच न्यावे लागते, हे ते विसरतात. कर्मधर्मसंयोगाने आणखी बाहेरच्या वाईट अनुभवास ते बळी पडतात, याबद्दल दुःख वाटते.

वरीलप्रमाणे येणारा भक्तभाविक हा जरी कोणत्याही हेतूने येत असला तरी समिती आपली भूमिका व उद्देश केव्हाही बदलणार नाही. आज तुमच्यासारख्या येणाऱ्या भक्तभाविकांच्या जीवनात समितीला देवधर्माचे महत्व, संस्काराचे महत्व, नित्याचरणाचे महत्व, कर्तव्याचे महत्व व लोककल्याणार्थ काहीतरी जनसेवा केल्याशिवाय हे जग



सोडता कामा नये असे सांगावयाचे आहे. ही सर्व सेवा निःस्वार्थ बुद्धीने करण्यासाठी सेवक तयार करावयाचे आहेत व केले आहेत. परंतु प्रत्येकास आपली नित्य कर्तव्याची जबाबदारी पार पाडून (उदा. नोकरी, धंदा, व्यवसाय इ.) सेवा करण्यास शिकविले जाते.

--- --- --

## २. कार्यपद्धतीस शास्त्राधार :

या समितीस मानवाच्या कर्तव्याचा संसार त्याला जोडून द्यावयाचा आहे. देवाधर्माच्या नावावर संसार सोडून म्हणजे कर्तव्य सोडून 'परमेश्वराचा शोध कर' किंवा त्याच्या नावावर वाटेल ते कुकर्म करून 'पुन्हा परमेश्वराचे नाव घेत बस' किंवा 'तीर्थयात्रा कर' असे मार्गदर्शन करावयाचे नाही. यासाठी दुःख निवारणार्थ सुचविलेल्या निराकरण पद्धतीमुळे तुम्हाला सुखाचे जीवन लाभू लागते व जीवनात काहीतरी अर्थ आहे, असे वाटू लागते. अशा वेळी प्राप्त झालेल्या जीवनाचे सार्थक करण्यासाठी काहीतरी ध्येयवाद तुम्हास निश्चित करावयास पाहिजे. परंतु तेवढीच चांगली गोष्ट करण्यास मनुष्य तयार नाही. दुःखनिवारणार्थ आत्मसात केलेल्या प्रसादाच्या किंवा प्रतिमांच्या अनुष्ठान पद्धतीमुळे तुम्ही सुखी झालात की तुम्हाला या प्रसादाच्या किंवा निराकरणाच्या शास्त्रीय मीमांसा किंवा आधार शोधण्यास प्रवृत्ती होते व मग त्या निराकरण पद्धतीस तुम्ही आपल्या इष्ट मित्र, ज्योतिषी किंवा या मार्गातील कोणी साधक यांना भेटून 'काही शास्त्राधार आहे का' हे शोधण्याचा प्रयत्न करता. परंतु तुम्हाला तसे शास्त्राधार मिळत नाहीत. याला एक कारण असे की, आजपर्यंत अशा मार्गाने लोककल्याण करण्यासाठी कोणीही साधक पुढे आलेला नाही. शिवाय जे सिद्धसाधक आहेत, त्यांच्या निराकरण पद्धतीत गरीब कुटुंबाच्या संसाराच्या परिस्थितीचा विचार केलेला नाही. म्हणून येथील शास्त्रपद्धतीस त्यांच्याजवळ शास्त्राधार सापडणार नाहीत. या समितीची प्रत्येक निराकरण पद्धत ही पूर्णत्वाने सिद्ध केलेली असल्याने तो 'गुरूप्रसाद' आहे. गुरूप्रसाद कधीही शास्त्राधारात बसणार नाही. जसे सूर्य हा एकच आहे, चंद्रही जसा एकच आहे, तद्वतच समितीच्या लोककल्याणार्थ सद्‌गुरूकृपेचा ठेवा हाही एकच आहे. दुःखनिवारणार्थ त्या पद्धतीप्रमाणे आचार-विचार ठेवणे हाच शास्त्राधार आहे. तुमच्या जीवनात निर्माण झालेली दुःखे याची शास्त्रीय कारणमीमांसा तुमच्यासमोर ठेवल्यावर त्याचे निवारण ज्या निराकरणाने होते ती म्हणजे तुमची निःस्सीम भावना ! भावनेला शास्त्राधार असू शकत नाही. तेव्हा शास्त्राधार मिळत नाही म्हणजे ते शास्त्र खोटे ही कल्पना आहे. ते सत्य नाही. तरी सूज्ञ भक्तभाविकांनी असा विचार करावा की, ज्या मार्गाने आपले कल्याण होणार आहे, त्या मार्गाप्रमाणे आपले आचार-विचार ठेवल्यानेच तुम्ही सुखी होणार आहात. म्हणजे अशा सुखाचे शास्त्राधार तुम्हीच म्हणजेच समितीचे निराकरण !

या समितीच्या निराकरण पद्धती गोरगरिबांच्या कल्याणार्थ आहेत. कारण बाह्य जगतात अशा निरनिराळ्या दुःखाचे निराकरण ज्या निरनिराळ्या मार्गांनी केले जाते,



त्यात होमहवन, पूजा, पाठ, मंत्रानुष्ठान इ.चा समावेश असतो. त्यातील दैवी भाग किती असतो, हे येथील निराकरण पद्धतीवरून तुम्हाला अभ्यासिण्यास मिळेल. प्रथमतः कुलधर्म, कुलाचार आजमितीपर्यंत काही ना काही कारणामुळे न झाल्याबद्दल जे अनुष्ठान समिती सुचविते, ते अनुष्ठान शतचंडी हवनाइतकेच फलदायी आहे. पण प्रथमतः सांगितल्याप्रमाणे हे होम-हवनादि आजच्या परिस्थितीत किती लोकांना शक्य आहेत, हे अभ्यासूनच निराकरण सांगितले जाते. त्याच वेळी कुलस्वामीच्या नावे खोबऱ्याच्या वाटीत भंडारा किंवा गुलाल ठेवून पाच आठवडे कुलस्वामीच्या नावे 'तो पूर्वेला फुंकावा' असे सुचविले जाते. ही सोडवणूक परिस्थितीच्या विचारानेच केली जाते. नाहीतर ज्याचे वरील कुलधर्म, कुलाचार राहिले आहेत, त्यांना अशा प्रकारे हवने करून कुलस्वामी-कुलस्वामिनीच्या निवासस्थानी जाऊन या ऋणातून मुक्त व्हावयास पाहिजे. एखादा श्रीमंत परिस्थितीतील मनुष्य तेही करण्यास तयार होईल. परंतु श्रीमंती ही वर्षानुवर्षे टिकणारी नसल्याने केव्हातरी त्याला या मार्गाचा अवलंब करावाच लागेल. या अनुष्ठान पद्धतीत 'तुम्ही आपल्या देवदेवतांच्या दर्शनास जाऊ नका' असे सूचित करावयाचे नाही. जाण्यास हरकत नाही. परंतु परिस्थितीने जाणे झाले नाही तर कुलधर्म, कुलाचार राहू नयेत हा हेतू आहे. ज्या लोकांना वडिलोपार्जित कुलधर्म, कुलाचार (नवरात्र) माहीत नाहीत, अशांनी नवरात्र महोत्सवाच्या वेळी या अनुष्ठान पद्धतीप्रमाणे नवरात्र बसवावे. मानवी जीवनाच्या सद्यःस्थितीचा विचार करून अशी अनुष्ठानपद्धत आपल्याला कोणीही सांगणार नाही. कदाचित आपल्याला असे वाटत असेल की, पुष्कळ देवधर्म केला की, मनुष्य लवकर सुखी होतो. हे खोटे आहे. जे करणे आवश्यक आहे, तेवढेच निश्चयाने करण्याने दुःखाला कारण झालेली ऋणे मुक्त होतात. दैवी उपासनेच्या साध्यतेसाठी सूज्ञ भक्तभाविकांना अन्य शास्त्र, शास्त्राधार किंवा गुरूआज्ञा शोधण्याचे कारण नाही. याला आधार असा की, तीच पद्धत शेकडो भक्तभाविकांनी अनुभवून प्रचिती घेतलेली आहे. तेव्हा प्रचिती यापेक्षा मोठा शास्त्राधार कोणताही नाही.

समितीच्या या निराकरण पद्धतीत जे पितृविमोचन व वैयक्तिक कर्मविपाक निराकरणे आहेत, त्याला बाह्य जगतात खूपच शास्त्राधार आहेत. आणि त्याप्रमाणे कित्येक जण करण्यासही तयार होतात. ही दोन्ही निराकरणे तुमच्याजवळ असलेले चार पैसे खर्च करून होतील, असा भरवसा बाह्य जगात देत असतात; व आपण ते मान्य करून ते करण्यास प्रवृत्त होता. त्या शास्त्राधारात या पितृविमोचनाबद्दल तीर्थयात्रा, त्रिस्थळी पिंडदान व देवधर्म सांगितलेला आहे. पण त्याबद्दल हा सर्व विधी व्रतस्थ राहून करण्यानेच हे दोष मुक्त होतात हे सांगितले आहे. आज प्रत्येकजण व्रतस्थ राहण्याशिवाय बाकीचे विधी ज्ञान-अज्ञानाने करीत आहे. आज आम्ही व्रतस्थ राहण्याच्या कितीही गप्पा

मारल्या, तरी ते सत्य न पटण्यासारखे आहे. कारण मुळात धोतरच जर नेसता येत नाही, तर व्रतास आरंभ कसा होईल? तेव्हा समितीच्या या निराकरण पद्धतीत या दोषपरिहारार्थ जे निराकरण सांगितले जाते, त्यात वैयक्तिक उपासनेला विशेष महत्व आहे. कारण तुमच्या वाडवडिलांच्या इच्छा, वासना, शास्त्राधारे एखादा भिक्षुक, एखादे तीर्थक्षेत्र, पाच रुपये दानधर्म व पिंडदान करून त्या वासनांपासून तुमचे वाडवडील मुक्त होणार नाहीत. कारण आज समाजात रूढ झालेले विचार हे इतके हीन आहेत की, त्यांच्या खाण्याच्या वासनेने मनुष्य 'जगू शकत नाही' असे विधान करतो. या खाण्याच्या वासना म्हणजे 'मांसाहार'. ज्या लोकांना मांसाहार निषिद्ध आहे, अशी तुम्ही मंडळी तीर्थयात्रा करून येताना किंवा आल्यावर जे तुमच्या वाडवडिलांनी केले नाही ते तुम्ही करता. मग या तीर्थयात्रा, शास्त्राधार आणि पिंडदान यांचा उपयोग काय? जसे आज तुम्हा एखाद्याला काही रक्कम कर्ज म्हणून दिली आहे व कोणी तुम्हास असे सूचित केले की ते येणे तुम्ही विसरून जा, तर प्रामाणिकपणे ते विसरून जाणे तुम्हास शक्य आहे का? याचा विचार करून; आपल्याला त्रास होत आहे, म्हणून वाडवडिलांच्या ऋणाने मुक्त होणे कितपत हितावह आहे? यासाठी समितीच्या निराकरण पद्धतीत ज्याला या त्रासापासून मुक्त व्हावयाचे आहे, त्याच्यासाठी गुरूप्रसादाचे लेणे आहे. पण ते आत्मसात करीत असता प्रामाणिक विचाराने उपासना, सेवा करणे हा शास्त्राधार सांगितला जातो. नुसते तीर्थक्षेत्राच्या निमित्ताने 'वाडवडिलांच्या ऋणातून मुक्त हो' असे अन्य पोकळ शास्त्राधाराने सांगितले जात नाही.

आजपर्यंत समितीने ज्या भक्तभाविकांना पितृविमोचनाने ऋणमुक्त केले आहे, त्यांच्या स्वार्थी विचारांचे कौतुक करावेसे वाटते. कारण या निराकरण पद्धतीत तुमच्या घराण्याच्या सात पिढीतील मृतात्म्यांना त्यांच्या जीवनातील राहिलेल्या इच्छा-वासनांमुळे जर सद्‌गती मिळाली नसेल, तर त्यांच्या इच्छा-वासनांपासून मुक्त होण्यासाठी आवाहन केले जाते. अनुष्ठान पद्धतीची सांगता झाल्यावर होमहवन विधी करून तुम्हाला प्रामुख्याने तीन दोषांतून मुक्त केले जाते व पुढे भावी जीवनात यांची श्राद्धपक्षे करू नका असे सुचविले जाते. तसेच त्यांना त्यांच्या इच्छा-वासनांपासून मुक्त केल्यानंतर पुन्हा श्राद्धपक्षाच्या निमित्ताने त्यांच्या इच्छा, वासना जागृत करू नका असेही शास्त्रशुद्ध आधाराने सांगितले जाते. त्यांना आपलीच मुले-बाळे काही परोपकार, लोककल्याण किंवा धर्म करीत आहेत, आणि तोही 'आमच्या सद्‌गतिप्रित्यर्थ' असे दिसल्याने असे मृतात्मे आपल्या इच्छा-वासनांपासून लवकर मुक्त होतात. परंतु आजपर्यंतचा भक्तभाविकांचा अनुभव असा आहे की, 'श्राद्धपक्ष करू नका' एवढा वैयक्तिक स्वार्थाचा भाग बाबांची आज्ञा मानून मान्य करून घेतला आहे. परंतु त्यानिमित्त



काहीतरी 'परोपकार किंवा लोककल्याण करा' ही आज्ञा दुर्लक्षिली गेली आहे. वास्तविक तुमच्या वाडवडिलांच्या इच्छा-वासनांपासून ते मुक्त होण्यासाठी या कार्याला जेवढी तळमळ आहे, त्यापैकी काही अंशमात्र तळमळ आपण व्यक्त करता. तेव्हा अशा पितृविमोचन करून घेतलेल्या सूज्ञ भक्तभाविकांना असे सूचित करावयाचे आहे की, कालांतराने तुम्हाला श्राद्धपक्ष करण्यास मनुष्य मिळेल किंवा नाही ही शंका वाटते. परंतु ज्यांनी जन्मऋणानुबंध आपल्यापाशी बाकी ठेवला आहे व ठेवला जातो, त्यांच्याप्रीत्यर्थ असा परोपकार करा की जो स्वतःच्या बुद्धीला पटेल. नुसते शास्त्रात सांगितले आहे म्हणजे ते बुद्धीला पटत नसूनसुद्धा शास्त्र म्हणून डोक्यावर घेऊन नाचावे, असे समिती कदापिही सुचविणार नाही. यासाठी तुमच्या जीवनातील कर्तव्य म्हणून व या वाडवडिलांच्या जन्मऋणानुबंधनातून तुम्ही मुक्त होण्यासाठी तुमच्या वार्षिक प्राप्तीतून काही एक रक्कम (उदा. ५.२५, ११, २१रु.) आपल्या परिस्थितीला एखाद्या गरीब, अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणास द्या. प्राचीन कालापासून विद्यादाना-सारखा धर्म किंवा परोपकार नाही. कारण अन्न दिले, वस्त्र दिले, दान दिले तर त्याची स्मृति निरंतर स्वरुपामध्ये टिकत नाही. परंतु विद्यादानाने पिढ्यानपिढ्या त्याची स्मृती दोघांच्याही जीवनात राहते. समितीच्या कार्यपद्धतीत या परोपकारास खूप महत्व आहे. तुम्हास बाह्य जगतात कोणाच्या शिक्षणार्थ ते देणे शक्य नसेल तर 'स्वाध्याय मंडळा'त गोरगरिबांच्या शिक्षणासाठी, वैद्यकीय सहाय्यासाठी ते पैसे द्या. समितीच्या मार्गदर्शनासाठी जे गरीब येतील, त्यांच्या मुलाबाळांसाठी ते पैसे खर्च केले जातात.

वर सूचित केलेली परोपकाराची भूमिका, की ज्यात देव आहे, परोपकार आहे, स्वार्थ आहे, निःस्वार्थ आहे, ऋणमुक्तता आहे हाच शास्त्राधार समितीच्या कार्यपद्धतीचा आहे, हे नमूद करण्यास आजपर्यंतची सद्‌गुरूकृपा कारण झाली असल्याने 'समिती हे करीत आहे' असा अहंकार व्यक्त करावयाचा नसून, समिती हे एक माध्यम आहे, म्हणजे आजपर्यंत आपण आलेले सर्वजण आहात. वरील परोपकारार्थ भूमिका जी आपणा सर्वांस समजाविली आहे, ते आपण आलेले सर्वजण आहोत. दुःखाच्या निमित्ताने सुखाच्या शोधार्थ निघाल्यावर सद्‌गुरूकृपेचा हिरा मिळाला आहे व त्याच्या प्रकाशात मानवी जीवनाच्या सार्थकतेचे आत्मस्वरुप पहावयास मिळाले आहे, तेव्हा ही समिती म्हणजे आपण सर्वजण आहात. आपणाप्रमाणेच जगातील इतरांना सुखसमाधान मिळावे, या भावनेची प्राप्ती करण्यासाठी तुम्ही-आम्ही एकमेकातील दुजाभाव, व्यक्तीमहत्त्व, राग, लोभ, निंदा, नालस्ती हे सर्व सद्‌गुरूचरणाशी अर्पण करून एका आचार-विचाराने निश्चित होऊ या. हा या कार्यस्थापनेचा उद्देश आहे. यात कोणाही व्यक्तिच्या वैयक्तिक जीवनाचा स्वार्थ पूरा करावयाचा नाही. नित्य जीवनातील नोकरी,

दुसऱ्याकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे अशा प्रकारे त्या आज्ञेची पूज्यता प्रत्यक्ष आचरण्यात आणण्याचे कार्य प्रामाणिकपणे करणे या कर्तव्यासच 'समिती' असे नाव आहे. या विचारास उत्तम उदाहरण असे की, एखादी राजाज्ञा प्रजेच्या हितासाठी जेव्हा दिली जाते, तेव्हा प्रजेतील प्रत्येक घटक राजासमोर असणे यांस महत्व नसून ज्याच्या हाती ही राजाज्ञा दिली गेली, त्या आज्ञेची मान्यता त्या व्यक्तिपासून राज्यातील शेवटचा घटक जो कोणी शेतकरी वगैरे असेल, तेथपर्यंत सर्वांना करावी लागते. यासच सुव्यवस्थित राज्यपद्धत म्हणतात. ही राजाज्ञा खरी-खोटी ठरविण्यासाठी प्रत्येकाला राजासमोर जाण्याचे कारण नाही. ज्याच्यात आपले हित आहे, ती आज्ञा राजाज्ञाच होय. तद्वतच या समितीच्या कार्यपद्धतीचा पाया निर्माण करण्याची आज्ञा परमपूज्य बाबांनी दिली. ती प्रत्येकाने मानून आचरण्यात आणण्यानेच जीवनात सुख-समाधान निर्माण होऊन काहीतरी लोककल्याण होईल. तेव्हा सूज्ञ भक्तभाविकांनी व सेवकांनी आपल्याला दिलेल्या आज्ञा या कोणा व्यक्तिच्या वैयक्तिक विचारांच्या आहेत असा विचार निर्माण करू नये. या आज्ञांची निरंतर स्थिरता लोककल्याणार्थ व्हावी म्हणून जे आणखी मध्यस्थ या कार्यपद्धतीसाठी तयार केले गेले व जात आहेत, यांसच 'समिती' असे नाव आहे.

या समितीच्या कार्यपद्धतीत दु:ख निवारणार्थ जे मार्गदर्शन केले जाते, त्याची प्रथमत: मीमांसा लक्षात घेऊन ते दु:ख निर्माण होण्यास जी कारणे असतील त्यांचे निवारण म्हणजे आलेल्या किंवा येणाऱ्या आपत्ती, दु:ख, शारीरिक पीडा या दैवी कृपेने थोपविल्या जात नाहीत, तर त्या दु:खांचे ऋणानुबंध आजच्या जीवनात दु:ख निर्माण होण्यास काय कारण झाले आहेत, त्याचे निराकरण म्हणजे ती ऋणे, की जी मनुष्यजन्मात किड्या-कीटकांपासून ते देवादिकापर्यंत असू शकतात. ही दु:ख कारणमीमांसा मानवी जीवनात तीन प्रकारच्या ऋणांनी युक्त असते. (देवऋण, पितृऋण, गुरूऋण) याशिवाय दु:ख कारणपरंपरेस षोडशादि संस्कार न झाल्याने किंवा यथायोग्य वेळी ते करण्याकडे दुर्लक्ष केल्याने आरंभ होतो. ही दु:ख कारणपरंपरा म्हणजे गर्भाधान विधीपासून ते अंत्येष्टीपर्यंत जे जे संस्कार जीवनाच्या हितसंबंधाच्या दृष्टीने आवश्यक आहेत ते न करण्याने ज्ञान, शक्ती, ऐश्वर्य, बल, वीर्य, तेज यांचे संवर्धन होऊ शकत नाही. हे संवर्धन न होण्याने वरील ऋणानुबंधनातील दु:ख वाढविण्यास कारण होते. शिवाय या दोन्हीतील ऋणानुबंध दूर करण्यास दैवी मार्गाचा अवलंब करून योग्य प्रकारचे आचार-विचार निर्माण झाले नाहीत तर जीवनाबद्दल अविचार निर्माण होऊन ऐहिक सुखाच्या कल्पना या वासनारुप होऊन त्या पुऱ्या करण्याची इर्षा निर्माण होते. आणि ही दु:खे केवळ जीवनाचे कारण म्हणजे ऋणानुबंध धर्मकर्मयुक्त संस्कार हे न



मानण्याने झालेली असतात. ह्यांचे निराकरण व्हावे म्हणून तेरा सिद्धसिद्धान्त पद्धती दु:ख निवारणार्थ आत्मसात केलेल्या आहेत. शिवाय अन्य वासनांनी (पिशाच्चबाधा, देवबाधा, करणी, भानामति इ.) झालेली दु:खे यांच्या निवारणार्थ नऊ सिद्धपद्धती आत्मसात केल्या आहेत. आजपर्यंत या कार्यपद्धतीत जी हजारो दु:खी माणसे आली, त्यांच्या दु:ख कारणमीमांसा या बावीस सिद्धसिद्धान्त पद्धतीमध्ये बसतात आणि अनुभवाने हे ही सिद्ध झाले आहे की, या पलीकडे दु:खे असूच शकत नाहीत.

आता प्रथमत: जेव्हा आपण या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यास येता, तेव्हा आपण आपली बाजू दु:ख म्हणून आमच्यासमोर मांडीत असता व आम्ही ते काहीतरी जन्मजन्माचे ऋण म्हणून अभ्यासित असतो. अशा वेळी आपण विचारलेल्या प्रश्नास आमचे निराकरण परस्पर विरोधी वाटते. उदा. आपण जेव्हा असा प्रश्न विचारता की, 'नोकरीत खूप त्रास होत आहे.' तेव्हा मार्गदर्शन प्रथम अनुष्ठानाचे झाले, तर त्यात कुलधर्म, कुलाचार यांचा संबंध दाखविला जातो. आपणास शंका अशी येते की, नोकरीचा प्रश्न विचारतो आहे व देवधर्म करण्यास सांगत आहेत. म्हणूनच वर नमूद केले आहे की, आपण दु:ख सांगता व आम्ही ऋणमुक्तता करतो. या प्रश्नासारखे आणखी प्रश्न म्हणजे, 'धंदा चालत नाही, पैसा टिकत नाही, घरातील आजारपण संपत नाही.' इ. या सर्व प्रश्नांचे निराकरण हे ऋणमुक्ततेसाठी असते. याप्रमाणे तुम्ही ज्या ज्या दु:खाचे निवारण करून घेण्यासाठी येता, तेव्हा आमची भूमिका तुम्हाला ऋणमुक्त करण्याची असते, की ज्यामुळे पुन:श्च तुमच्या जीवनात किंवा तुमच्या मुलाबाळांच्या जीवनात तशा प्रकारचे दु:ख निर्माण होत नाही. दैवी मार्ग हा चमत्कार करणारा मार्ग नाही. देवाला आपले अस्तित्व केव्हाही कोणाला चमत्काराने दाखविण्याचे कारण नाही. कारण त्याने निर्माण केलेल्या या निसर्गात पाणीसुद्धा हेच सांगते की, ज्याला तहान लागेल तो मला शोधील. मग देवाला आपले देवत्व तेही तुम्हाला की, जो क्षणिक सुखासाठी देवाला मानणार आहे, त्याला 'चमत्काराला मानून मला मान' असे सांगून सिद्ध करावयाचे नाही. म्हणून तुम्हाला केलेल्या मार्गदर्शनाचे अवलंबन तुम्ही करता म्हणजे अनुष्ठान पद्धतीचा अवलंब करता, व आठव्या दिवशी धंद्यात वाढ झाली नाही, नोकरीत बढती मिळाली नाही, आजारपणं संपली नाही इ. प्रचिती येण्याइतकी भावनाच आपण निर्माण केलेली नसते. आपणास दिलेला प्रसाद क्षणिक सुखाची पूर्तता करुन पुन्हा ज्ञान-अज्ञानाने तशा सुखाच्या मागे पळण्यासाठी दिला जात नाही, तर जीवनाची निरंतर सुव्यवस्थितता निर्माण व्हावी, या हेतूने देण्यासाठी समिती मार्गदर्शन करीत असते. परंतु आपण आपल्या जीवनाची भूमिका निश्चित केली नसल्याने 'एका क्षणिक सुखाचेच दु:ख मला आहे, व ते निवारण होण्यासाठी चार पैसे मिळाले तर बरे' या

भावनेने या प्रसादाकडे पाहता. पुष्कळ भक्त-भविकांची हीच दृष्टि असते की, ईश्वरीकृपेने पैसे मिळाल्यावर सुखाला काय कमी ? परंतु नेमका हाच कयास चुकीचा आहे. म्हणून प्रसादपूजन चालूं असता व नंतर 'सुख निर्माण झाले नाही' असे व्यक्त करता. कारण जीवनाचे माध्यम आपण पैसा मानता.

ज्याला खरोखरीच जीवन पूर्णत्वाने सुखासमाधानांत जावे, कुणाच्या पै-पैशाला कारण होऊ नये असे वाटते त्याच्यासाठी या सर्व सिध्दसिध्दान्त पध्दती आहेत. आपले डोके दुखण्यापासून ते वंश निर्वंश, निर्धन होण्यापर्यंत जी दुःखे व यातना असतील, त्या निवारणार्थ क्रमशः प्रसाद घेण्यानेच वरील दुःखकारण मीमांसेपासून आपण ऋणमुक्त होणार आहात. आज जरी तुमच्या जीवनांत अन्य प्रसादांची दुःखपरंपरा नसेल, तरी भावी जीवनांत कोणत्या ना कोणत्या कारणाने ती आल्याशिवाय राहणार नाही. कारण हे जन्मऋणानुबंधाचे संबंध देवादिकांच्या अवतारासुध्दा सुटलेले नाहीत. तेव्हा तुमच्या जीवनातील सुखाच्या दृष्टीने तुम्ही जे प्रश्न विचारता, ते सर्व प्रश्न या प्रसाद पूजनामधून सुटणार आहेत. जी प्रसादांची क्रमवारी आहे ती मागे सांगितलेलीच आहे. तरीसुध्दा पुन्हा आपल्या वाचनासाठी लिहीणे योग्य ठरेल. प्रथमतः आपणास देवऋणातून मुक्त केले जाईल, मग पितृऋणातून मुक्त केले जाईल व शेवटी वैयक्तिक कर्मविपाकात तुमच्याच हातून जन्मजन्मात ज्ञान-अज्ञानाने झालेली पापे व आजच्या दैनंदिन जीवनात ज्ञान-अज्ञानाने हातून घडणारे प्रमाद व पातके यांचे प्रायश्चित्तपूर्वक निराकरण केले जाईल.

आजपर्यंत जगात बहुतेक शास्त्रांची कारणमीमांसा ही अभ्यासण्यासाठी पुस्तकरुपाने अस्तित्वामध्ये आहे. उदा. एखादी मोटार नादुरुस्त झाली तर तिचे कारण समजते, व ती दुरुस्ती करताच पुनश्च गाडी पूर्ववत सुरु होते. आता गाडी बिघडली असता नेमके त्याचे संशोधन होणे, हेच शास्त्र म्हणता येत नाही. तद्वतच मनुष्याच्या जीवनात ज्या कार्यकारणाने जी दुःखे आली आहेत, त्यांचे अचूक कारण समजणे यालाच दैवी शास्त्र असे म्हणतात. या शास्त्राधाराने तुमच्यासमोर दुःखकारणमीमांसेला कोण कारण आहे, हे कोणाही सिध्दसाधकाला किंवा समितीला विचारण्याचे कारण नाही. तुमच्या गेल्या सात पिढ्यांपासून ते आज तुम्ही प्रश्न विचारण्यास पुढे बसता तेथपर्यंत दुःख निर्माण होण्यास काय कारणे झाली, हे आमच्यापेक्षा तुम्ही जास्त जाणता. काही भक्त-भाविक या मिमांसा 'आम्हांला ठाऊक नाहीत' असे समजाविण्याचा प्रयत्न करतात. तसे करण्याने तुम्ही जी आपल्या घराण्याची परंपरा देवादिकांची, परोपकाराची, लोककल्याणाची दर्शविता, तर मग दुःखाला कारण का झालात ? व जर वडिलोपार्जित जहागिरी, इनामदारी, सावकारी किंवा अन्य धंदा व्यवसाय होता असे म्हणता, तर त्यांनी जे तुमच्यासाठी आज स्थावर ठेवले आहे, किंवा ते ठेवूनसुध्दा गेले आहेत, हे जाणण्यास



देव, धर्म, परोपकार किंवा लोककल्याण कारण होईल काय ? कदापीही होणार नाही. तेव्हा वरील निराकरण पध्दती याच हेतूने आपल्यासमोर ठेवल्या गेल्या आहेत की, दुःखाला कोण व काय कारण असू शकते, हे आपणास पूर्ण ज्ञानाने समजावे व भावी जीवनात मुलाच्या मुलाबाळांच्या सुखसमाधानासाठी पै-पैशांपासून ते लंकेचे राज्य जरी देव किंवा अन्य जगत् देण्यास आले, तरी जोपर्यंत तुमच्या कष्टाचा वाटा तो नाही, तोपर्यंत त्याची इच्छा अपेक्षा भावी जीवनाच्या दृष्टीने करु नका, हाच या कार्यपध्दतीतील गुरूप्रसाद आहे. कदाचित काही भक्त-भाविक अशी शंका निर्माण करतील की, आम्हाला अचानक धनलाभ, गुप्त धन, वारसा हे मिळण्याचे आमच्या नशिबात असते, 'याला कारण काय ?' तर त्याला दाखला असा की, अचानक, वेळी-अवेळी जर पीक पाण्यावर पाऊस पडला तर हाती आलेले पीकपाणी नाश होण्यास जसा हा अचानक पाऊस कारण होतो, तद्वतच ही अचानक धनप्राप्ती कुटुंबाच्या सुखासमाधानाला सर्वस्वी नाश करण्यास कारण होते. ज्या वेळी तुमच्या संकुचित विचाराने तुमचे जीवन सुखप्राप्तीच्या वासनेने सर्वस्व धनप्राप्तीच अल्प ठरविते. त्याच क्षणी तुम्ही अज्ञानाने दुःखाला आवाहन केलेले असते. परमेश्वराने मानवी जीवनाचे गणित इतक्या सिद्धसिद्धान्त पद्धतीने सोडविलेले आहे की, 'त्याला मला पैसा पुरत नाही,' किंवा 'माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे मला कठीण आहे' हे म्हणणे सर्वस्वी चुकीचे आहे. कारण तुम्ही जन्माला येण्यापूर्वी तुमच्या जीवनाची निश्चितता अशा तऱ्हेने केलेली आहे की, जर एखादा चतुष्पाद प्राणी तुम्ही पाळणार असाल, तरी त्याच्या खाण्यापिण्यापासून तुमच्या कुटुंबाच्या प्रत्येक व्यक्तिच्या अन्नवस्त्राची व कुटुंबाचे हितसंबंध देवादिकांपासून ते आप्तस्वकियांपर्यंत ज्या ज्या कारणाने तुमच्या जीवनाशी संबंधित होणार असतील, त्यांची तरतूद तुमच्या नशिबात लिहून केलेली आहे. याचा विचार कधीही न करता दुसऱ्याच्या जीवनाची बरोबरी करण्यासाठी आज जगांत अनेक कुटुंबे उसनी श्रीमंती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्या क्षणी मनुष्य स्वतःच्या आचार-विचारांनी आपले जीवन आदर्श बनवील, त्या क्षणी त्याला सुखाच्या शोधाप्रित्यर्थ कोणाचेही पाय धरावे लागणार नाहीत. म्हणजेच आज आपण दुःख सांगून ऋण काय बाकी आहे, हे विचाराल आणि हे विचारण्यानेच आजच्या परिस्थितीत मानवी जीवनाला जी दुःखे म्हणून वाटत आहेत, ती दूर होण्यासाठी अन्य वेड्यावाकड्या मार्गाचा अवलंब करावा लागणार नाही.

समितीच्या कार्यपध्दतीचे लोककल्याणार्थ जे काही उद्देश आहेत, त्यात 'अंधश्रद्धेने कोणाला नमस्कार सुद्धा करु नये' असा एक उद्देश आहे. म्हणून ही कार्यपद्धती तुमच्यासमोर ठेविली आहे. क्षणिक सुखाच्या मार्गदर्शनार्थ आला असाल तर

ते केले जाईल ; व निरंतर सुखप्राप्ती पाहिजे असेल तर त्याबद्दलही निराकरण सांगितले जाईल. कार्यपद्धतीच्या मार्गदर्शनाचे निराकरण कोणताही आडपडदा न ठेवता आपल्यासमोर ठेवले आहे. हे निराकरण तुम्ही कोणत्याही कार्यकेंद्रावर गेलात तरी प्रमुख कार्यकर्त्यांपासून ते नियुक्त सेवकांपर्यंत याच पद्धतीने होईल. समितीने प्रथमतःच सांगितल्याप्रमाणे समिती तुमच्यापेक्षा तुमच्या सुखाचा विचार अधिक करते, हे स्पष्ट आहे. आज समितीने आपली भूमिका स्पष्टपणे तुमच्या सुखदुःखा–प्रित्यर्थ ठेवली आहे. हे जनहिताच्या दृष्टीने परमेश्वरी आज्ञेचे प्रतीक आहे. आता आपण आपल्या जीवनासंबंधी ज्या सुखदुःखाच्या कल्पना निर्माण केल्या आहेत, त्यांचा कयास लागण्याची वेळ आली आहे. कारण, आजपर्यंत आलेल्या कित्येक भक्त–भाविकांनी समितीच्या लोक-कल्याणाची भूमिका बाजूस ठेवून अन्य प्रचार करण्याचा प्रयत्न केला आहे. ती भूमिका समितीची होती किंवा नव्हती हे आपण या साधनपत्रिकेवरून ठरवू शकता.

या समितीच्या निराकरण पद्धतीत वैयक्तिक प्रश्न विचारण्यासाठी खाजगीरित्या कोणासही भेटण्याची परवानगी नाही. याबद्दल बऱ्याच भक्त–भाविकांची नापसंती आहे. परंतु तसे न भेटून देण्यामागील उद्देश आतापर्यंत कोणालाच समजले नसावेत असे वाटते. मानवी जीवनाच्या दुःखकारणमीमांसा अभ्यासण्याचे हे एक उत्तम साधन आहे. कारण बाहेर मनुष्य आपल्या परिस्थितीबद्दल कितीही मोठेपणा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असला, तरी येथे सत्य परिस्थिती कथन करावी लागते, त्यामुळे अभ्यासूस आजचे जग किती प्रकारांनी दुःखी आहे, हे अभ्यासण्यास मिळते. परंतु जेव्हा निराकरण पद्धतीसाठी सामुदायिकरित्या मार्गदर्शन होते, तेव्हा आपल्याही जीवनातील काही कारणपरंपरा असल्या किंवा नसल्या, तरी त्या समजू शकतात. परंतु हा अभ्यास आजपर्यंत येथे आलेल्या कोणाही भक्त–भाविकाने केलेला नाही. त्याशिवाय दुसरा महत्त्वाचा भाग असा की, कदाचित एखादे वेळी भक्त–मंडळींची सत्प्रवृत्ती बाह्य जगताच्या विचारामुळे बदलण्यास कारण झाली व त्यांनी अमुक एक निराकरण मला सांगितले होते असे खोटे सांगून चालणार नाही. कारण वैयक्तिकरित्या जर भेटच होत नाही, तर बाह्य जगताला कथन केलेले निराकरण सांगितले असेल किंवा नसेल ही जबाबदारी समिती राखून ठेवते.

आजपर्यंत या समितीच्या मार्गदर्शनाचे मूल्यही ठरलेले नाही; व आजपर्यंत तसे कोणासही मागितले नाही, हे अभिमानाने सांगावे लागते. निराकरण पद्धतीनंतर त्याला सुखसमाधान लाभल्यावर त्याची इच्छा असल्यास त्याने स्वेच्छेने कार्याची भूमिका लक्षांत घेऊन पै-पैसा परमपूज्य बाबांच्या चरणी ठेवावा. तोही कोणाच्या विनंतीला मानून किंवा कोणाच्या भिडेखातर ठेवू नये. आपल्या सद्विवेकबुद्धीला जर ही



समितीच्या लोक–कल्याणाची भूमिका समजली असेल, तर त्याबद्दल उतराई व्हावे. नाहीतर आपण कोणत्याही आपल्या विचाराने समितीला बाजारी स्वरुपाची देवाण-घेवाण करण्याचे माध्यम बनवू शकत नाही. प्रथमदर्शनी आपण आपले नांव मार्गदर्शनार्थ जेव्हा नोंदविता, तेव्हा कामाच्या दिवशी या सद्गुरुपीठाचा मान म्हणून प्रत्येकी पाच रुपये चार आणे दक्षिणा म्हणून घेतले जातात. याव्यतिरिक्त आपला व समितीचा आर्थिक दृष्ट्या काहीही संबंध येत नाही, हे या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य आहे.

--- --- --

## ४. वैयक्तिक व सामुदायिक साधना :

खऱ्या अर्थाने आज मनुष्य सुखी कोणत्या प्रकाराने होईल ते अनुभविण्यासाठी दैवी मार्गाकडे येतो, किंवा पारमार्थिक साधनेच्या वैयक्तिक उपासनेच्या गप्पा सिद्ध-साधकांपाशी मारतो व सिद्ध मार्गातील मनुष्य घरेदारे बांधून कसे रहाता येईल याचा विचार करतो. कारण दु:खी झालेला, सुखासाठी साधकाला भेटतो व साधक घरे दारे करण्यासाठी देवाला मधे करून दु:खी माणसाला भेटतो आहे. आता खऱ्या परमार्थाची तळमळ दोघांपैकी कोणाला आहे ? आजच्या जगात तरी दोघांनाही नाही. मग जो मार्ग आज हजारो वर्षे तुमच्या ज्ञानाचा ठेवा म्हणून मानवी जीवनाला सुख, शांती, समाधानासाठी मार्गदर्शनीय ठरला आहे; त्या मार्गाची विटंबना ध्यान, धारणा, समाधी या नावाने किंवा एखादे पुस्तक लिहून करावी का ? आज जर देव प्रसन्न होऊन आपल्या पुढे आले व दोघांनाही वैंकुठाला नेण्यास तयार झाले, तर कोणी जाण्यास तयार होईल का ? कोणीही नाही. कारण सगळा आपल्या इच्छा-वासनेचा पसारा, सुखाचा खेळ म्हणून मांडला आहे. त्यातून जोपर्यंत कर्तव्याची जबाबदारी पार पाडून तुम्ही निरासक्त होणार नाहीत, तोपर्यंत देव जेथे आहे व वैकुंठ किंवा मोक्ष जेथे आहे, ते तेथेच राहू द्या, व तोपर्यंत आपण नित्य अविचाराने घडणाऱ्या प्रत्येक वासनामय सुखाच्या कल्पना म्हणजे जीवनाचे सार्थक नव्हे याचा नुसता विचार न करता ते प्रत्यक्ष आचरणात आणा. ते आणण्यासाठी दैनंदिन जीवनामध्ये निश्चित अशी वैयक्तिक व सामुदायिक उपासना करावयास पाहिजे. आजपर्यंत या उपासनेची कसरत प्रत्येकाने आपल्या जीवनात खूप प्रकारांनी केलेली असेल. परंतु ती भावनाशून्य उपासना ही उपासना नसून देवाची उपासमार होती असे दु:खाने सांगावे लागते. अशी भक्तभाविक मंडळी उपासनेसंबंधी खूप विवेचन करतात. ते असे की, प्रथमत: सोमवारपासून ते रविवारपर्यंत यांच्या उपासनेचे व उपवासाचे हे वार असतात. सोमवारी शिवलीलामृतापासून उपासनेला सुरूवात होते, त्याची समाप्ती रविवारी सूर्यकवचाने होते. शिवाय स्नानाच्या वेळी गंगास्तोत्र, स्वयंपाकाच्या वेळी व्यंकटेश स्तोत्र, त्यात एखादा मुलाबाळांना अपशब्द असे अर्धवट पठण, सायंकाळी मुलाबाळांच्या जेवणखाणाच्या, झोपी जाण्याच्या वेळी 'शुभंकरोति कल्याणम्' हे स्तोत्र असा क्रम बहुतांशी प्रत्येकाच्या जीवनामध्ये आहे. त्याशिवाय दु:खनिवारणार्थ जे कोणी दैवी निराकरण सांगतील व त्यात गुरूचरित्र, सप्तशती, देवीमहात्म्य, नवनाथकथासार यांची पारायणे करण्यास सांगितली तर त्या पोथ्या पूर्वी कोणीतरी वाचलेल्या किंवा जुन्या होऊन फाटलेल्या अशा आणून पारायणास सुरुवात करतात. परंतु ईश्वरीकृपेच्या प्राप्तीचे एकही लक्षण वरील उपासना पद्धतीत



असेल असे वाटत नाही. त्याशिवाय सर्वात मोठा जीवनावर बसलेला पगडा हा की, ईश्वरी उपासना दिवसाच व्हावयास पाहिजे. पण आजच्या धामधुमीच्या जगात मनुष्यास सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत चरितार्थासाठी घराबाहेर पडावे लागते. मग सूर्यास्तानंतर घरी आल्यावर जरी इच्छा असेल, वेळ असेल तरी वरील पगडा डोक्यावर असल्याने उपासना करण्याची राहून जाते. पण खऱ्या अर्थाने सूर्यास्त होतो का ? तो तुमच्या देवपूजनाच्या वेळी जरी नसला तरी तो या जगापलीकडे गेला आहे, अशातील भाग नाही. देवपूजा ही सूर्य असेतोपर्यंतच झाली पाहिजे, असे जर असेल तर मनुष्याचा जन्म, मृत्यु रात्री का होतात ? अशा अनेक प्रकारांनी खऱ्या सात्त्विक प्रकारची उपासना आज कोणीही करू शकत नाही. यासाठी समितीने येथे येणाऱ्या भक्तभाविकांस जी उपासना सांगितली आहे, तिचे थोडे मनन करा.

प्रथमत: उपासकास पोथी, पाठ, पारायणे किंवा जपजाप्य हे करण्यास सूचित केले जात नाही. तर सकाळ-सायंकाळ नित्यनियमाने होणाऱ्या आरतीस उपस्थित राहून आरतीच्या सुरूवातीपासून ते संपेपर्यंत तुम्ही मनाने जास्तीतजास्त किती वेळ स्वत: आरती म्हणत असता राहू शकता ? कारण नुसत्या देहाने चोवीस तास जरी देवासमोर बसलात तरी त्याचा काहीही उपयोग नाही. जशी आपल्याला तहान लागते व ती पाण्याने शमन होते म्हणून पाण्यात बसून ती तहान भागणार नाही, तर तहान लागल्यावर पाणी पिण्यानेच ती तहान भागते. याचा अर्थ तहानेला जसा चार घोट पाणी प्यायला नंतर त्याला तृप्ती वाटते. तद्वतच दिवसाकाठी पाच मिनीटे जरी तुम्ही उपासना केली, तरी ती करण्याची तहान लागली असली पाहिजे. नाहीतर नुसते देवासमोर बसण्यात आयुष्यातील वेळ फुकट जावून कोणाच्याही उपयोगी येणार नाही. या नंतरचे दुसरे मार्गदर्शन असे असते की, रोज सकाळ-सायंकाळ जेव्हा तुम्ही आरतीला याल, तेव्हा बाबांसमोर बसून कोणताही विचार मनामध्ये न आणता जास्तीत जास्त किती वेळ बाबांच्याबद्दल पूज्य भावना निर्माण करू शकता ? ही भावना निर्माण करीत असता प्रापंचिक जीवनातील दु:खाबद्दलचा कोणताही विचार पुढे करून 'बाबा, एवढे काम जरा लवकर होऊ द्या' असे जरी मनात आले तरी ती उपासना नसून याचना आहे. बहुतांशी दिवसाकाठी अशीच उपासना तुम्ही करण्यासाठी तुमच्या देवादिकांसमोर बसता, व निराकरणाच्या वेळी छातीठोकपणे असा विश्वास प्रकट करता की, आमच्या कुटुंबात तिन्ही त्रिकाळ उपासना सुरू असते. याचा अर्थ तुम्ही काय सांगावा व आम्ही काय घ्यावा ?

या दोन उपासना पद्धतीनंतर स्तोत्रपठण किंवा पारायण याबद्दल असे मार्गदर्शन

केले जाते की, नुसती पोथी हातात, शब्द तोंडात व देह पाटावर, परंतु तुमचे मन व भावना अन्यत्र ! तर अशा पारायणांच्या संख्येने जन्मऋणानुबंधनातील दु:ख निवारण करण्यासाठी तुम्ही कोणाला आवाहन करता ? देह हा प्रारब्धाने निर्बल झालेला आहे, विचार दु:खाने निर्बल झाले आहेत, भावना लवकर काम होत नाही म्हणून निर्बल झाल्या आहेत. आता राहून राहिला देव व त्याचे स्तोत्र! तर यांची सिद्धता होण्यासाठी या तिहींचे म्हणजे विचार, भावना व शरीराचे निश्चित ध्येय परमेश्वर प्राप्तीसाठी व्हावयास पाहिजे. जी स्तोत्रे, पाठ, पोथी आपण वाचतो, त्यामध्ये तुमच्या सारख्याच एखाद्या भक्तावर आलेली आपत्ती परमेश्वराने कशी निवारण केली किंवा परमेश्वराची स्तुति किंवा गुरूचरित्रासारख्या पोथीतून वाचकाला उपदेश केलेला असतो. अशा वाचनाच्या वेळी आपण स्वत: त्या भूमिकेच्या ठिकाणी आहोत, ही भावना निर्माण करून वाचण्यानेच काही समाधान प्राप्त होईल नाहीतर देवाधर्माच्या नावावर निर्माण झालेला कर्मठपणा, तापटपणा ही लक्षणे ईश्वरी उपासकाची असू शकत नाहीत. शिवाय वर सांगितल्याप्रमाणे स्तोत्र किंवा पोथी वाचीत असता पोथीच्या आरंभापासून समाप्तीपर्यंत तुम्ही किती वेळ पोथी वाचनात व मनाने बाहेर होता हा अभ्यास अतिशय महत्त्वाचा आहे. कारण रोजच्यारोज काहीतरी नवीन वाचून की ज्यामध्ये आपण नसतो याने ईश्वरी उपासनेचे समाधान मिळत नसते. यासाठी येथील भक्तभाविकांस अशी आज्ञा असते की, तुम्ही नित्यनियमाने एक स्तोत्र किंवा एखाद्या पोथीचा एक अध्याय वाचा, व रोज वरीलप्रमाणे आपण आपल्या मनाची व भावनेची ईश्वराच्या ठिकाणी कितीवेळ निश्चितपणे निष्ठा ठेवू शकलो हे अभ्यासा. ईश्वरी उपासना ही नित्याची होणे आवश्यक आहे. मग ती आपण पंधरा मिनीटे ठरवा किंवा काही तास ठरवा. पण तसे होत नाही. बहुतांशी चालढकल करून 'कालची आज करू या' अशी बेरीज वजाबाकी प्रत्येक जण करतो. उपासनेला नित्य धर्म आहे. जसे तुम्हाला झोप आली तर आजची उद्यावर ढकलून चालत नाही, भूक लागली तरी ती पुढे ढकलून चालत नाही, तहान लागली तरी ती पुढे ढकलून चालत नाही. या शरीर धर्माशिवाय नित्य व्यावहारिक जीवनात कर्तव्य म्हणून जी तुम्ही दुसऱ्याची नोकरी करता, धंदा करता, शिकता किंवा अन्य व्यवसाय करता, यात चालढकल केली तर चालते का ? ती तुम्ही करीत नाही. कारण झोपेची चालढकल केली तर शरीरप्रकृती बिघडते. खाण्यापिण्याची चालढकल केली तर शरीर निर्बल बनते. नोकरी-धंद्यात चालढकल केली तर आर्थिक प्राप्ती बुडते. विद्यार्जनात चालढकल केली तर ज्ञानप्राप्ती होत नाही. हे सर्व स्वार्थी विचार समजतात म्हणून ते करण्यासाठी मनुष्य सकाळपासून सायंकाळपर्यंत आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतो. पण या आवश्यकता जशा जीवनांत आहेत असे वाटते, तशी ईश्वरी नित्य उपासना आवश्यक



आहे हे असे का वाटू नये ? वास्तविक वरील सर्व आवश्यकता आहेत असे तुम्हाला वाटते; तर त्या आवश्यकतांचे समाधान त्या त्या आवश्यकतामधून मिळण्यासारखे नाही. यासाठी या सर्व आवश्यकता व त्यापासून समाधान होण्यासाठी नित्य उपासनेस तितकेच महत्त्व द्यावयास पाहिजे. जर आपण भूक पुढे ढकलली, तहान पुढे ढकलली, झोप पुढे ढकलली व एकदम जेवण्याचा, झोपण्याचा प्रयत्न केला तर काय होईल ? तशी स्थिती उपासनेची असते. या करिता नित्य उपासनेची सवय लावून घ्यावयास पाहिजे.

या उपासना पद्धतीने चित्ताची स्थिरता होऊन परमेश्वराबद्दल पूज्य भावना निर्माण होऊ लागते. यालाच 'श्रद्धा' असे म्हणतात. एरव्ही आपण 'श्रद्धा' हा शब्द क्षणोक्षणी वापरतो. पण खऱ्या अर्थाने ती श्रद्धाच असू शकत नाही. नित्य जीवनात श्रद्धेशिवाय कोणतेही कर्म होऊ शकत नाही. मग परमेश्वराबद्दल श्रद्धा हे यात विशेष असे काय अनुभवास येते ? तर परमेश्वरी श्रद्धेची पूर्णावस्था ही नित्य जीवनातील निरासक्तता होय. ही ज्या कमीजास्त प्रमाणामध्ये असेल तितका परमेश्वर आपल्यापासून दूर आहे. त्याशिवाय जी परमार्थ प्रश्नावली नित्य जीवनात ज्ञान-अज्ञानाने घडणाऱ्या कर्माचा आढावा झोपण्यापूर्वी प्रामाणिकपणे प्रत्येकाने स्वत:शी घ्यावा म्हणून दिली आहे. तिचा अभ्यास रोज करण्याने आपल्यात काय सुधारणा होऊ शकली हे पहावे. आजपर्यंत देवदैविक व पारमार्थिक उन्नतीसाठी अनेक तऱ्हेच्या साधना व पर्याय सांगितलेले आहेत. परंतु आजच्या परिस्थितीत त्यापैकी जास्तीत जास्त लोकांना काय करता येण्यासारखे आहे, हा प्रश्न विचारात घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने वरील उपासना सर्वसामान्यपणे प्रत्येक मनुष्यास आपली नोकरी, धंदा, व्यवसाय सांभाळून करता यावी म्हणून सुचविली आहे. आज तुम्हा कोणास अशी इच्छा होते की, काही असाध्य मार्गाची साधना केली तर परमेश्वर प्राप्ति होईल, तर हे निदान साधना-उपासनेच्या दृष्टीने चुकीचे ठरेल. जसे एकदम जर पदवी परिक्षेला बसलो, तर काय प्रचिती येईल ? तीच प्रचिती अशा असाध्य साधनेत येत असते.

आजच्या परिस्थितीत उपासना ही आपल्या नित्य आचार-विचारांस पोषक असणे आवश्यक आहे. आपल्या नित्याचरणाने कुटुंबात किंवा अन्यत्र ती इतरांना त्रासदायक होण्याने त्यास उपासना म्हणता येणार नाही. म्हणजे नुसते देवाला घेऊन न बसता घरातील सर्व कुटुंबियांच्या भावनेचा विचार लक्षात घ्यावयास पाहिजे. यासाठी येथील भक्त-भाविकांना नित्य उपासनेसाठी त्यांच्या भक्तीभावनेप्रमाणे एखादे स्तोत्र व सद्गुरूनामस्मरणाची जपसंख्या अकराशे करण्याची आज्ञा असते. यापेक्षा जास्त अवडंबर कोणी वाढविले व तसे मार्गदर्शन समितीने केले, असे होऊ नये म्हणून

स्पष्टपणे उपासनेच्या आज्ञेसंबंधी विचार प्रकट केले आहेत.

याशिवाय आणखी एक महत्त्वाची सूचना वारंवार येथे आलेल्या भक्तभाविकांना दिली गेली. परंतु पूर्णपणे त्याचा भावार्थ कोणी आत्मसात् केला असेल असे दिसत नाही. कारण बऱ्याच भक्तभाविकांची अंधश्रद्धा अशी आहे की, घरात बरेच देव असले म्हणजे दैवी महात्म्य मोठे असते. म्हणून अज्ञानाने बरेच देव जमा करण्याचा ते प्रयत्न करतात, व अशा काही ना काही निमित्ताने देव वाढत गेले की, स्वत:लाही पूजन-अर्चन करणे अशक्य होते. व काही कारणाने मुलाबाळांना पूजा करण्याची वेळ आली, तर त्यांना त्याबद्दल प्रेम न वाटता, तुमची आज्ञा म्हणून पूजा करावी लागते. यासाठी तुमचे कुलस्वामी व स्वामिनी यांचे टाक किंवा प्रतिमा, तेही मिळणे शक्य नसल्यास पादुका या असाव्यात. हे देव कुलधर्म-कुलाचाराचे असतात; व नसले तर ते असणे आवश्यक आहे. याशिवाय एखादी उपास्य देवतेची तसबीर असावी. इतका आटोपशीर देव्हारा हा दैनंदिन उपासनेला केव्हाही कंटाळवाणा होणार नाही. आजपर्यंत बरीच भक्तभाविक मंडळी कुलदेवतासंबंधी असे विधान करतात की, 'आमचे कुलदैवत दत्त, मारुती, राम, विठोबा, श्रीकृष्ण, गणपति यापैकी आहे' परंतु ही कुलदैवते नसून उपास्य देव आहेत. तुमच्या वाडवडिलांनी काही कारणासाठी उपासना केली व कालांतराने तुम्ही त्यांनाच कुलदैवते म्हणू लागलात. तरी ही कुलदैवते नाहीत हे लक्षात घ्या.

या नंतरचा पुढील मुद्दा असा की, जी मंडळी तीर्थयात्रेसाठी किंवा अन्यत्र देव दर्शनासाठी जातात, तेथे प्रसाद म्हणून त्या देवतांचे फोटो, तसबिरी किंवा प्रतिमा या आणून आपल्या इष्ट मित्रमंडळीस वाटतात. त्या मागील भावना ही जरी चांगली असली, तरी आजच्या परिस्थितीत एखादा जास्त देव पूजनासाठी वाढल्याने बरीच संकुचित परिस्थिती निर्माण होते. मनुष्य भिडेखातर तुम्ही आणलेल्या देवदेवतांचा स्विकार करतो. परंतु तुमच्या पश्चात रोज बरेवाईट शब्द त्या तुम्ही दिलेल्या देवाला ऐकावे लागतात. तरी सूज्ञ भक्त मंडळींनी असा देव देण्याचा परोपकार न दाखविता तीर्थयात्रा किंवा देवदेवतांच्या दर्शनाचा प्रसाद म्हणून श्रीफळ, खडीसाखर किंवा अन्य काहीतरी द्यावे.

आजपर्यंत मार्गदर्शनार्थ येणाऱ्या भक्तभाविक मंडळींच्या अडिअडचणी लक्षात घेवून समितीने सर्व कार्यकेंद्रांवर सामुदायिक उपासनेसाठी दैनंदिन क्रम चालू ठेवला आहे. तो या हेतूने की, आजकालच्या परिस्थितीत जागेची टंचाई बऱ्याच प्रमाणात जाणवते. त्याशिवाय घरातील मुलाबाळांची ये-जा अशा परिस्थितीत थोडा वेळ ईश्वर चिंतन करावे तर ते करण्यास शांतता असावयास पाहिजे, पण ती मिळत नाही म्हणून या कार्यकेंद्रावर दैनंदिन उपासनेसाठी कोणाही भक्तभाविकास तशी उपासना करण्यास



कोणाचीही आडकाठी नाही. तरीसुद्धा आडकाठी आहे ती निश्चयाची. प्रत्येकाला आपल्याला दु:ख नसावे असे वाटते. पण तत्प्रित्यर्थ नित्य उपासना असावी असे कोणासही वाटत नाही. आज काही निराकरण पद्धतीने जरी आपण सुखी झालात, तरी पुनश्च: आपल्याला दु:खे निर्माण होणार नाहीत असे नाही व प्रत्येक वेळी नुसत्या दु:खनिवारणार्थ तरी प्रश्न किती वेळा विचारणार ? यापेक्षा समितीच्या सामुदायिक उपासनेत भाग घेतलात, तर त्यापेक्षा काही जास्त आजच्या प्राप्त झालेल्या सुखासमाधानासाठी कशाचीही आवश्यकता नाही. परंतु प्रत्येक जण असा विचार प्रकट करतो की, देवाने आम्हाला आधी सुखी करावे, मग आम्ही त्याचे नांव घेऊ. तुम्ही नाव घेण्यासाठी देव आपले कर्तव्य करण्यास थांबत नाही. तो अज्ञानी भक्ताची अडचण लक्षात घेतोच. पण याच व्यावहारिक तत्वाने तुम्ही जर आपले व्यवहार बाहेर करू म्हणालात तर काय प्राप्त होईल ? उदा. तुम्ही नोकरी करता. त्याचे मूल्य महिन्याने मिळते. नोकरी पंचवीस किंवा तीस वर्षे करावी लागणार. या हिशेबाने नोकरी लागल्यादिवशीच जर तुम्ही असे म्हणालात की, 'मी नोकरी पंचवीस वर्षे करणार आहे. पंचवीस वर्षांचा पगार मला आधी द्या.' तर असा पगार आजपर्यंत कोणी कोणाला दिला आहे का ? आणि असा मागितला तर उत्तर 'घरी बसा' असे मिळेल. इतके व्यावहारिक गणित रोज तुमच्या जीवनात असून परमेश्वरी उपासनेच्या बाबतीत हेवादावा का करता ? आज बहुसंख्य भक्तभाविकांची कल्पना अशी असते की, आपण कोणा सिद्धसाधकाकडे गेलो, तर दु:ख निवारणार्थ आपल्याला काही दैवी उपासना करण्याची आवश्यकता नाही. अन्यत्र हे विचार जरी प्रकट होत असले, तरी समितीच्या कार्यपद्धतीत या विचारास स्थान नाही. तुमच्या ज्ञान-अज्ञानाने निर्माण झालेली दु:खे यांची कारणमिमांसा सांगणे व त्याबद्दल निराकरण प्रसाद म्हणून देणे हे समितीचे कर्तव्य आहे. इच्छित सुखाची प्राप्ती होणे हे तुमच्या उपासनेवर अवलंबून आहे. ती न करता 'मला काही अजून गुण आला नाही' म्हणणे, म्हणजे जे गहू शेतात पेरावयाचे होते, ते मुठीत धरून बसला व पाऊस पाणी पडून शेतात काही उगवले नाही, म्हणून रडला; तर दोष गव्हात, पाऊस-पाण्यात, का शेतात, का अज्ञानाने मुठीत धरून ठेवण्यात ? याचे उत्तर तुम्ही देऊ शकाल. तद्वतच तुम्ही येथून घेतलेल्या प्रसादाबाबत करीत असता. तरी सर्व भक्तभाविकांना अशी विनंती आहे की, तुमच्या हिताच्या दृष्टीने निराकरणे कोणत्याही अवाढव्य खर्चाची नाहीत. उपासना कोणत्याही आड मार्गाची नाही. नित्य आचार-विचारावर सक्ती नाही. उपासना करण्यास जागेची अडचण नाही. आलात तरी अडवणूक नाही. असे असता तुम्ही जर आपली नित्य कर्तव्य पार पाडू शकत नसाल, तर समितीच्या निराकरण पद्धतीचा अवलंब करून काहीही प्राप्त होणार नाही.

आजपर्यंत आपण शेकडो ठिकाणी अडिअडचणींच्या निवारणार्थ, ज्योतिष विचारण्याच्या निमित्ताने किंवा अन्य सुखाचा मार्ग शोधण्यासाठी गेला असाल, तर त्या साधकाच्या कार्यपद्धतीची ओळख तो विचारलेल्या प्रश्नांव्यतिरिक्त आपणहून देणार नाही. शिवाय नित्य त्याची उपासना काय आहे हे ही कळू देणार नाही. मग तुमच्या दुःख निवारणार्थ त्याने कोणत्या दैवी मार्गाचा अवलंब केला हे ही तुम्हाला समजणार नाही. अशा अज्ञानाने तुम्हाला समिती केव्हाही मार्गदर्शन करणार नाही. समितीच्या कार्यपद्धतीस ज्यांचे कृपाशिर्वाद लाभले आहेत, त्यांची अधिष्ठाने तुमच्यासमोर आहेत. त्यांची पूजाअर्चा येथील सेवकांसह तुम्ही करता. कार्य पद्धत ही सामुदायिकरित्या तुमच्या समोरच केली जाते. त्याप्रित्यर्थ दिला जाणारा प्रसाद हाही तुम्ही आणून दिलेला असतो. इतकी स्पष्ट आणि स्वच्छ, बुद्धीला पटणारी कार्य-पद्धत आपल्यासमोर मांडल्यानंतर जर आपल्या मनात समितीच्या कार्यपद्धतीबद्दल आपलेपणा निर्माण झाला नाही, तर आपण आपले दुःख खऱ्या मार्गाने दूर करण्यासाठी आला नाहीत, हे समजणे अशक्य नाही. तर इतरत्र जसे चार दिवस 'हे कसे काय चालते' हे पहाण्यासाठी जाता, तसेच येथे येता. हा अनुभव आजपर्यंत काही नवा नाही. परंतु आज साधन-पत्रिका लिहीण्याची आज्ञा झाली असल्याने आपल्या बऱ्याचशा शंका आज निरसन होऊ शकतील. पुष्कळशी भक्त भाविक मंडळी आपापल्या आचारा-विचारांच्या बऱ्यावाईट अनुभवांनी या कार्याकडे आस्थेने पहात नाहीत. परंतु हे कार्य कोणाही एका व्यक्तीच्या हितसंबंधाचे नाही. तुम्हास जसे कोणाचे आचार-विचार पटले नाहीत तसे तुमचेही कोणाला पटण्यासारखे नसतील; हा सूज्ञ विचार जर भक्तभाविक निर्माण करतील तर नित्य उपासनेस आडकाठी येण्याचे कारण म्हणजे स्वतः आपणच आहोत हे समजेल. असा अविचार निश्चयाने दूर करणे, पुनश्च जीवनात त्याला स्थान न देणे याचाच अर्थ वैयक्तिक उपासना !

**सामुदायिक उपासना/साधना** - या उपासनेची पद्धत पूर्ण अभ्यासाने सर्व कार्यकेंद्रावर भक्त-भाविकांच्या अडचणी लक्षात घेऊन सुरू केलेली आहे. परंतु येणारे भक्तभाविक आपल्या दुःखाचे कथन जितक्या आत्मियतेने करतात, त्याच्या निवारणार्थ जी वैयक्तिक किंवा सामुदायिक उपासना करावयास पाहिजे, त्याकडे दुर्लक्ष करतात. नित्य उपासनेच्या आवश्यकतेसंबंधी मागे विवेचन केलेलेच आहे. तरीसुद्धा आपण आपली दुःखे जास्तीत जास्त लवकर दूर करून घेण्यास कारण व्हावयास पाहिजे. ही जबाबदारी न ओळखता 'अजून काही म्हणावे तसे समाधान मिळत नाही' असा विचार प्रकट होत असतो. काही भक्त-भाविकांच्या कल्पना अशा आहेत की, फक्त गुरुवारी



आरतीला आलो की झाले. बाकीच्या वेळी आलो नाही तरी चालते. हे येणाऱ्या भक्तभाविकांच्या विचारांनी योग्य आहे. परंतु समितीच्या कार्यपद्धतीत जी नित्य उपासनेसंबंधी आवश्यक अशी बाजू मांडली आहे, ती कोणीही विचारात घेत नाही. प्रथमतःच सांगितल्याप्रमाणे येणाऱ्या कोणाही भक्तभाविकांस दोन्ही प्रकारच्या उपासनेत भाग घेता येतो. पहिल्या उपासनेत तुम्ही सकाळ-दुपार आपल्या सवडीने नामस्मरण, पोथी, पाठ यांचे वाचन करू शकता. दुसऱ्या उपासनेत ज्या काही महत्वाच्या बाजू अभ्यासिल्या आहेत त्या अशा की, वैयक्तिक उपासनेत मनाची निश्चितता व्हावी तशी होत नाही. चित्ताची स्थिरता होत नाही. 'त्यामुळे लगेच उपासनेतून उठून जावे' असे विचार येवू लागतात. याउलट सामुदायिक उपासनेत पारायण, जप यास बसल्यावर ते पूर्ण होईपावेतो बसण्याचा निर्बंध असतो. त्यामुळे मनाची स्थिरता बऱ्याच प्रमाणात होत रहाते. सतत या सामुदायिक पद्धतीने उपासना केल्यावर वैयक्तिक उपासनेत कोणत्याही प्रकारे व्यत्यय आल्यास मनाची स्थिरता ढळत नाही. काही कारणाने वैयक्तिक उपासनेत मनाची स्थिरता होत नाही असे वाटेल, त्यावेळी सामुदायिक उपासनेस बसणे योग्य आहे. कारण आपल्या समवेत बसलेल्या गुरूबंधूंच्या स्थिरतेमुळे आपल्या मनाची स्थिरता होणे शक्य होते. याशिवाय एकमेकांमधील भेदभाव विसरण्यास हे एक उत्तम असे साधन आहे. आज दिवसाकाठी नोकरी, धंदा व प्रपंच सांभाळून काही तरी सेवा हातून घडावी अशासाठी या सामुदायिक पद्धतीने उपासना सर्व कार्यकेंद्रावर सुरू आहे. या वेळी सद्गुरू नामस्मरणाचा जप हाही सामुदायिकपणे मोठ्याने म्हणून केला जातो. आपण विचारलेल्या प्रश्नास जेव्हा काही निराकरण सांगितले जाते, तेव्हा आपल्याला स्वतःच्या जीवनाबद्दल आत्मविश्वास, देवाबद्दल श्रद्धा व सबूरी निर्माण झाल्याशिवाय प्रत्यक्ष देवाला जरी तुम्ही भेटलात, तरी त्या क्षणी तुम्हाला निश्चित काय पाहिजे आहे, हे सांगणे कठीण आहे. आपण वारंवार विचारीत असलेले कित्येक किरकोळ प्रश्न हे उपासनेमुळे निर्माण झालेल्या आत्मविश्वासामुळे सहजगत्या सुटू शकतील. आज बरीच कुटुंबे जीवनाची इतकी अनिश्चितता घेऊन प्रश्न विचारण्यास येतात की, त्या संबंधा मार्गदर्शन करूनसुद्धा ते स्वतः निश्चित नसल्याने सांगितलेल्या निराकरणाबद्दल आत्मविश्वास निर्माण करीत नाहीत. त्यामुळे समितीच्या सिद्धसिद्धान्त पद्धती या जरी दुःखकारणमिमांसेला ऋणमुक्त करण्यासाठी सांगितल्या जातात, तरी त्याचा फायदा तुम्हाला तुमच्या अनिश्चिततेमुळे मिळू शकत नाही.

आता आणखी एक महत्वाचा प्रश्न म्हणजे घराण्यातील काही वडिलोपार्जित उपासना. कित्येक वेळा घराण्यामध्ये वाडवडिलांच्या हातून दत्त उपासना, शंकर

उपासना किंवा अन्य देवतेच्या उपासना या झालेल्या असतात. व पुढील पिढीत जर काही भिन्न देवतांच्या किंवा गुरूपरंपरेच्या उपासना तुम्ही सुरू केल्या; तर त्याचे फल मिळण्यास बराच काळ जावा लागतो. योग्य प्रकारे गुरूपरंपरेतील व्यक्तीकडून मागदर्शन झाले तर त्या वडिलोपार्जित उपासना आजच्या उपासनेला जोडून घ्याव्या लागतात. तरच वडिलोपार्जित पुण्याईचा भाग हा आपल्याला मिळू शकतो. आज बरीच भक्त-भाविक मंडळी आपल्या थोड्याशा उपासनेने अहंकार निर्माण करून असे सांगतात की, 'आमचे सर्वस्व आता बाबा किंवा स्वामी ! मी माझ्या कुलदेवदेवतांचा माझ्या घराण्याशी असलेला संबंध जाणत नाही.' असे विचार प्रकट करण्याने आज जरी तुम्ही तुमची देवदैवते नित्य उपासनेतून बाजूला करीत असला, तरी तुमच्या मुलाबाळांना त्याचीच उपासना करणे भाग पडणार आहे. तेव्हा आपण नित्य उपासनेमध्ये वडिलोपार्जित जे कुलधर्म, कुलाचार आहेत, त्या उपासनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

आता यापुढील महत्वाचा मुद्दा म्हणजे नित्य उपासनेसाठी गुरूदीक्षा घेणे हा होय. तत्संबंधी आज समाजास बराच कटू अनुभव आलेला आहे. तरी सुद्धा काही भक्त-भाविक मंडळी देवधर्माच्या आहारी जाऊन अशा गुरूदीक्षेच्या विधीस बळी पडतात. या विधीसंबंधी जगतात आजपर्यंत प्रत्येकजण अनेक तऱ्हेचे शास्त्राधार सांगत आले आहेत व कालांतराने सांगतील. परंतू या दीक्षेसंबंधी समितीची काही स्पष्ट भूमिका आहे. ती आपणासमोर मांडणे आपल्या हिताचे होईल. या मार्गात गुरूदीक्षेसंबंधी असे स्पष्ट सांगावयाचे आहे की, ज्या कोणा भक्त-भाविकांस जो कोणी सिद्धसाधक अशी गुरूदीक्षा देईल त्याने त्या भक्तास देवऋण, पितृऋण व गुरूऋण यातून स्वतःच्या अधिकाराने मुक्त करावयास पाहिजे. या शिवाय त्या भक्ताच्या जन्मजन्मात काया, वाचा, मनाने जे काही प्रमाद, पातके घडली असतील, त्यासाठी वैयक्तिक कर्मविपाक करावयास पाहिजे. तरच आज घेतलेल्या गुरूदीक्षेचे फल उपासनामार्गाने मिळेल. या गुरूदीक्षा देणाऱ्या सिद्ध-साधकांची जबाबदारी आज समाजाच्या परिस्थितीच्या दृष्टीने फार मोठी आहे व होती. या मार्गासाठी मनुष्य आपले सर्वस्व अर्पण करण्यास काही वेळा तयार झालेला असतो. अशा वेळी सिद्ध-साधकांनी स्वतःचा स्वार्थ न पहाता देवाच्या शोधार्थ निघालेला, उपासनेने वेडा झालेला, सिद्धसाधक म्हणजे सर्वस्व मानणारा असा भक्त यास त्याची ही भावना व श्रद्धा लोककल्याणासाठी कारणी लावायला पाहिजे. परंतु ते न होता अशा परिस्थितीत असे विचित्र मार्गदर्शन होते की, 'तू या क्षणी हिमालयावर जा, बद्रीनारायणास जा किंवा गिरनारला जा म्हणजे तुला देव भेटेल.' अशा या गुरूपदेशाने आज बऱ्याच घराण्यातील लोकांना दुःख व यातना सहन कराव्या लागत असून अशा या



गुरूमहाराजांना आपण केलेल्या उपदेशाची आठवणसुद्धा नाही. गेल्या पन्नास-पाऊणशे वर्षात समाजात जी धार्मिक विचारांची प्रेरणा निर्माण झाली आणि अशा वेळी रूद्राक्षमाळा आणि लंगोटी घातलेले सत्पुरूष म्हणून जे पुढे आले, त्यांच्या पायांवर अनेक लोकांनी भावनेच्या आहारी जाऊन आपले सर्वस्व अर्पण केले. या पैशांचा उपयोग गोरगरिबांच्या कल्याणासाठी झाला असता, तर त्यांचे समाजकार्य आपल्यासमोर असते. परंतु ते न होता तो पैसा चुन्या-मातीची देवळे व मठ बांधण्यासाठी खर्च केला. अशा वेळी या सिद्धसाधकांचा एक शब्द लाखाचा होता. त्याचा उपयोग समाजकल्याणाच्या विचारांनी न करता स्वतःची महती वाढविण्यासाठी करून देवाधर्माचे थोतांड माजविले. यास समाजकल्याण म्हणता येईल का ? आज त्यांच्या पश्चात ज्या ठिकाणी या सिद्धसाधकांनी लाखो रुपयांची समाजाची भावना मातीमोल केली तेथे आज त्यांचे अस्तित्व विटामातीच्या घरांशिवाय काहीही नाही हा सुद्धा समाजात एक अधर्मच झाला.

या सिद्धसाधकांनी त्यांच्या आहारी गेलेल्या प्रत्येक भक्ताच्या मनोमंदिरात माणूसधर्माची स्थापना करून निःस्वार्थपणे पैशाचा विनियोग गोरगरिबांच्या शिक्षणार्थ व रोगनिवारणार्थ केला असता तर आज समाजाची शिक्षण व वैद्यकीय सहाय्याच्या अभावी झालेली विकृत अवस्था दिसली नसती. ज्याला सद्गुरूची कृपा पाहिजे, ज्याला वैयक्तिक उन्नती करून घ्यावयाची आहे किंवा एखादी गुरूपरंपरा चालवावयाची आहे, त्याला आजच्या परिस्थितीत एखादे नवीन मंदिर किंवा मठ किंवा आश्रम स्थापन करावयाची आवश्यकता वाटते, याचा अर्थ काय ? ज्यांना देवाचे अस्तित्व कळते, ज्यांना देवादिकांच्या आज्ञेने दुसऱ्याचा पै-पैसा घेऊन मठ बांधावा हे कळते, त्यांना समाजात काय दुःखे आहेत, हे का कळू नये ? पण ही भावना यावी कशी ? व्यक्तिमहत्वाच्या विषाने धुंद झाल्यावर समाजाची भावना काय व पैसा काय, याचा विचार कोण करणार ? ज्याला खरोखरच धर्मकर्मपरंपरा, गुरूपरंपरा चालवायच्या आहेत, त्यांनी नवीन काही निर्माण न करता आज जी पुरातन देवळे सुंदर व सुसज्ज आहेत त्या ठिकाणी हे सिद्धसाधक जाते तर त्याही देवळांचा जिर्णोद्धार होता ! व नव्याने एखादे देऊळ व मठासाठी समाजाचा वापरलेला पैसा वरील लोककल्याणार्थ किंवा परोपकारार्थ आला असता, तर हे सत्य समितीच्या कार्यपद्धतीपुढे असल्याने आज येणाऱ्या शेकडो भक्तभाविकांच्या भावनेत प्रेमाचे मंदिर, तेही 'मानवता' धर्मासाठी स्थापन करावयाचे आहे व ज्या लोकांच्या प्रेमाने व सहकार्याने कार्य करण्यास वाव मिळेल, तो घेऊन समाजसेवा करावयाची आहे. या सेवेत इतरांना सुख, समाधान

देण्यासाठी अन्नदान, वस्त्रदान, द्रव्यदान या व्यतिरिक्त काया, वाचा, मनाने जे जे प्रयत्न करावे लागतील, ते करीत असता आपल्या हातून कोणाचा अपमान, उपमर्द, तिरस्कार अगर कोणाच्या शरीराला अथवा मनाला क्लेश देण्याजोगे एकही कृत्य घडता कामा नये. यासच समिती वैयक्तिक उपासना समजते. नित्याचरणात याची सवय लावून धनार्जनाच्या कामी असत्य, अन्याय, कपट, फसवेगिरी किंवा चोरी ही कोणत्याही कारणास्तव ऐहिक वासनेच्या सुखा-समाधानासाठी होता कामा नये. याची सदैव आठवण असणे व त्याप्रमाणे जीवनात ज्ञान-अज्ञानाने न घडणे यालाच समिती सामुदायिक उपासना असे समजते. आपणासमोर मांडलेली या कार्याची भूमिका ही वैयक्तिक स्वरूपाची नसून आपण सर्वजण आहात.

वैयक्तिक व सामुदायिक उपासनेला उपासकाशिवाय त्याच्या आप्त, इष्ट, स्वकीय यांच्या कल्पना किती अज्ञानाच्या असू शकतात, हे खूप प्रकारांनी पहावयास मिळते. ते म्हणजे दैवी उपासना ही आर्थिक प्राप्तीसाठी असते, याचे गणित ते सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु दैवी उपासना ही आर्थिक प्राप्तीशिवाय अन्य प्राप्तीचे लक्षण आहे, याचा अनुभव अशांना आलेला नसतो. दैवी उपासना व तिचा मार्ग हा आर्थिक प्राप्ती निरर्थक होऊ नये, यासाठी आहे; हे येथील सेवेचे उपासक झाल्याशिवाय कोणत्याही बाह्य जगातील अन्य शास्त्राधाराने पटण्यासारखे नाही. उपासनेने मन, विचार व बुद्धि यांचे संवर्धन होत असते. ते आर्थिक रुपात दाखविणे कदापिही शक्य होणार नाही. जसे शरीर संवर्धनासाठी व्यायाम केला तर तिसरा हात निर्माण होऊ शकत नाही, किंवा तिसरा पाय निर्माण होऊ शकत नाही, तर त्या शरिरातील ते अवयव व्यायामाने धष्टपुष्ट होऊन रोगप्रतिकार करण्यास समर्थ होतात, तद्वतच उपासनेने आर्थिक प्राप्ती न होता मन, विचार व बुद्धि यांचे संवर्धन होते. त्यामुळे जीवनात येणाऱ्या कोणत्याही आपत्तीत तो आपल्या ध्येयसाधनेपासून परावृत्त होऊ शकत नाही. आज अशा निश्चित उपासना पद्धतीमुळे ज्यांना आपल्या जीवनातील लागलेली व्यसने सोडता आली, ती ते उपासनेशिवाय सोडू शकले असते काय ? जीवनात इंद्रियनिग्रह करण्यासाठी उपासना पद्धतीसारखा मार्ग नाही हे सत्य आपणासमोर नुसते तात्त्विक विवेचन म्हणून मांडले जात नसून पूर्वी जी मंडळी गेल्या चाळीस वर्षांपासून व्यसनाधीन झालेली होती, अशांची व्यसने कायमची सुटली. एकवेळ मनुष्य शारीरिक यातना सहन करील, परंतु व्यसन सोडू शकणार नाही. पण तेही सुटू शकते व ते इंद्रियनिग्रह झाल्यावर सुटते. हा इंद्रियनिग्रह करण्याचा निश्चय म्हणजेच उपासनेचा गुरूप्रसाद ! इंद्रियनिग्रह झाला म्हणजे आर्थिक प्राप्ती झाल्यासारखीच आहे. तर सूज्ञ भक्त-भाविकांनी आपल्या दैनंदिन उपासनेतून आर्थिक प्राप्तीचा लाभ न शोधता निरनिराळ्या वासनांची पूर्तता होऊन किंवा



निरनिराळ्या वासनांपासून जीवन कसे मुक्त झाले आहे याचा लाभ घ्यावा. आर्थिक प्राप्तीची वाढ हा काही जीवनातील निरंतर स्वरूपाचा ठेवा नाही. कदाचित् उपासनेपासून तुम्ही तुमची आर्थिक प्राप्ती वाढवाल, पण तीच जाण्यासाठी तुमची व्यसने किंवा वासना जर कारण झाल्या, तर त्या आर्थिक प्राप्तीचा फायदा काय ? कदाचित् तुमच्या उपासनेमुळे तुमची आर्थिक प्राप्ती वाढली व मुलाबाळांच्या मनावर जर योग्य प्रकारचे संस्कार झाले नाहीत, तर त्या प्राप्तीचा नाश मुले-बाळे करतील; म्हणजे केव्हा ना केव्हा उपासनेपोटी निर्माण केलेला हा अर्थ जीवनात अनर्थ निर्माण केल्याशिवाय रहाणार नाही. तर खऱ्या भक्त-भाविकांनी नित्य उपासनेची सवय स्वतःपासून ते मुलाबाळांपर्यंत सर्वांना लावणे याच्याइतका आर्थिक लाभ जगात कोणताही नाही ! ज्याला प्राप्त झालेल्या जन्माचे कर्तव्य आणि कार्य इतरांना सुखसमाधान देण्यासाठी आहे हे समजत नाही, तोपर्यंत असा स्वार्थी समाज उपासकास उपहासाने आर्थिक प्राप्तीची वाढ विचारीत रहाणार !

--- --- --

## ५. स्पर्शसंवेदना व ज्ञानसंवेदना :

आज पाश्चिमात्य देशात या शास्त्राचा अभ्यास खूपच मोठ्या प्रमाणात झाला असून त्यास जाहीरपणे वैद्यकीय शास्त्रानेही संमती दिलेली आहे. परंतु अजूनही पूर्णत्वाने हे शास्त्र आहे हे मानण्यास थोडेबहुत विरोध आहेत ते असे: जर एखादी विद्या किंवा शास्त्र म्हटले व ते दुसऱ्यास किंवा तिसऱ्यास शिकविता आले नाही, तर ते शास्त्र किंवा विद्या होऊ शकत नाही. शास्त्र किंवा विद्या म्हटले की, ते अभ्यासूस मिळालेच पाहिजे. अशा लोककल्याणार्थ विद्या व शास्त्र भारतात खूप आहेत. पण त्यांचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने केला नसल्यामुळे व केला असल्यास स्वत:च्या व्यक्तीमहत्त्वाच्या विचारांमुळे त्याचा फायदा इतरांना झाला नाही. त्यामुळे या सर्व विद्या व शास्त्र गूढ विद्या म्हणून किंवा पूर्वजन्माची पुण्याई म्हणून ओळखली जाऊन त्याला शास्त्र म्हणून मानण्यास कोणी तयार नाही. या शास्त्राच्या अभ्यासात दोन भाग आहेत. एक स्वत:ची उन्नती करण्याचा व दुसरा लोककल्याणार्थ. पहिल्या मार्गातील मध्यस्थाची किंवा साधकाची भूमिका इतकी विचित्र आहे की, त्यांना भेटताच शास्त्राबद्दल इतकी विचित्र भूमिका ते जगासमोर मांडतात की, सर्वसामान्य परिस्थितीतील व्यावहारिक मनुष्य असे उद्‌गार काढतो की, आम्हाला अशा शास्त्राची आवश्यकताच नाही. जर दैनंदिन जीवनात उपासनेने, निश्चयाने काही आत्मसात होणार असेल तर ते सांगणे बाजूला राहून या जन्मात मिळणार नाही किंवा प्रपंचात राहून याची प्राप्ती होत नाही, असे अनेक तर्कशून्य बुद्धिवाद साधनेचा नवीन अभ्यास करण्यासाठी निघालेल्या भाविकासमोर मांडले जातात. वास्तविक परमेश्वराच्या सेवेत घरात व बाहेर असा फरक असू नये, व परमेश्वर तसा फरक करीत असेल हे म्हणणे चुकीचे होईल. स्वत:च्या जीवनातील कर्तव्यकारण, जबाबदाऱ्या पार न पाडता अमूक एका ठिकाणी मी तुला भेटतो असे देवाने सांगणे म्हणजे कर्तव्याच्या जबाबदाऱ्या पार न पाडता 'तू मला शोध.' असा अर्थ होतो. आणि अशा परमेश्वराची भक्तांना भेटण्याची, आशीर्वाद देण्याची किंवा उन्नती करण्याची भूमिका नाही. अशी भूमिका ज्या सिद्ध-साधकांनी परमेश्वराबद्दल निर्माण केली आहे, त्यास शास्त्र म्हणता येईल काय ?

आता दुसरी भूमिका, हिचा अभ्यास शास्त्रशुद्ध झाला नसल्याने या साधकास कोणत्याच प्रश्नाबद्दल निश्चित असे शास्त्रसम्मत मत अधिकाराने सांगता येत नसते. त्याच्या जवळील दैवी कृपेचा लाभ हा काही वेळा पूर्वजन्माप्रमाणे उदीत झालेला असतो किंवा या जन्मात काही अट्टाहासाने साधना करून प्राप्त केलेला असतो. त्यामुळे केले गेलेले मार्गदर्शन याची दु:ख कारणमिमांसा शास्त्राधाराने किंवा कारणपरंपरेने सांगणे



कठीण असते. अशा दोन साधकांच्या तावडीत सापडलेले व जे मानवी जीवनाच्या उन्नतीला अत्यावश्यक असे शास्त्र आहे, ते या सिद्ध-साधकांनी नवीन माणसाला किंवा अभ्यासूला 'मूर्खपणाचे शास्त्र आहे' असा भ्रम निर्माण करून ठेवला आहे. आज पाश्चिमात्य देशात मानवी जीवनास निश्चितपणे सुखासमाधानाची कल्पना येण्यासाठी या शास्त्राचा अभ्यास मोठेमोठे विद्वान शास्त्रज्ञ करीत आहेत. अन्य शास्त्रांची जशी मानवी जीवनास अत्यावश्यकता आहे, तशी मनाची, विचारांची व भावनेची उन्नती होण्यास या शास्त्राचाच अभ्यास होणे आवश्यक आहे. आज ऐहिक सुखप्राप्तीसाठी जे शास्त्रीय संशोधन झाले, त्या पुढेही असा प्रश्न आहे की, आता काय ? ही शास्त्रीय प्रगती शास्त्राची झाली, तरी मनुष्याच्या आचार-विचारांची प्रगती झाली असेल असे वाटत नाही. एकेकाळी मनुष्य आपल्या शरीर संरक्षणार्थ वल्कले वापरीत होता. तेथून त्याने आपल्या ज्ञानाने त्याच शरीर संरक्षणार्थ इतके तलम कपडे काढले आहेत की; पुनश्च: मनुष्य नग्नावस्थेत आहे असा भास हे तलम कापड वापरून होत आहे. आता यापुढे काय ? प्रथमत: जी आपली रानटी अवस्था होती, ती प्रगतीपथावर जाऊन पुन्हा रानटी झाली नाही, असे म्हणणे कितपत खरे ठरेल ? अशी अनेक प्रकारांनी झालेली प्रगती जरी प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनात दिसत असली तरी मनुष्याच्या त्या विचारातील प्रगती अन्य साधनात निर्माण होऊन ती साधने मनुष्याच्या विचारांचे प्रतीक आहेत, हे जरी खरे, तरी मनुष्याच्या नैतिक विचार-आचारांची प्रगती झालेली नाही, हे सत्य समाजात आज घडोघडी अनुभवास येत आहे. उदा. एखादा पदवीधर किंवा परदेशी जाऊन आलेला अभ्यासू जेव्हा विवाहास समाजापुढे येतो, त्यावेळी स्वत:ची पदवी किंवा विद्या याची किंमत वधू-पित्याजवळ अमूक एका रकमेच्या मागणीने करीत असतो. अशा या नवमतवादी विद्वान सुधारकाची ही विचारसरणी किंवा हा अट्टाहास विद्वत्तेचे समाजकल्याणार्थ, लोककल्याणार्थ किंवा वैयक्तिक कल्याणार्थ प्रतिक होऊ शकेल का ? वास्तविक, उच्च शिक्षणाने मनुष्याचे आचार-विचार हे समाजाच्या दृष्टीने समाजास 'आदर्श' अशा स्वरुपाचे असावयास पाहिजेत. पण आज ही परिस्थिती अगदी विरुद्ध विचारांनी चाललेली आहे. ज्ञानाने मनुष्य नि:स्वार्थ, निरपेक्ष व स्वत:च्या कर्तृत्वाच्या आत्मविश्वासाने स्वत: परिपूर्ण असा व्हावयास पाहिजे. पण आजचा ज्ञानी हा जास्तीतजास्त आपला स्वार्थ पूर्ण करण्यासाठी म्हणजे पदवीधर होईपर्यंत किंवा परदेशातून परत येईपर्यंत आलेला खर्च हा जो ज्या कारणाने भेटेल, त्याच्याकडून वसूल करण्याचा मार्ग शोधीत असतो. ही स्थिती आज समाजात साध्या कारकुनी पेशातील माणसापासून ते वरिष्ठापर्यंत प्रत्येकामध्ये जाणवत आहे. हे सत्य समोर असता जर समाज सुधारक, ज्ञानी आहे असे म्हटले तर विश्वास कसा व कोणी ठेवावा ? व ज्या

शास्त्राच्या अभ्यासाने निःस्वार्थता, निरपेक्षपणा व आपल्या कर्तृत्वाचा आत्मविश्वास निर्माण होतो, त्या शास्त्रास जर वरील विचारांचा सुधारक समाज 'हे शास्त्र नाही' असे म्हणेल, तर ते ज्या शास्त्राने ज्ञानी झाले, त्या शास्त्राच्या अभ्यासाने यांच्या ठिकाणी माणुसकीचा गंधसुद्धा निर्माण होऊ शकत नाही, असे म्हणावे लागेल.

आजपर्यंत भौतिक सुधारणेसाठी ज्या ज्या व्यक्तींनी आपले सर्वस्व जगाच्या कल्याणासाठी पणाला लावले, अशांना समिती किंबहुना सत्पुरुष या भावनेनेच ओळखते. त्यांनी लोककल्याणार्थ जे संशोधन केले ते जोपर्यंत मनुष्याच्या नित्योपयोगी जीवनाचे साधन आहे, तोपर्यंत ते साधन पारमार्थिकच होय. परंतु मनुष्याच्या अविचारामुळे तेच साधन संहारकही ठरते. उदा. जे विमान शीघ्रगतीने मनुष्यास इकडून तिकडे नेते, तेच विमान बॉम्बहल्ला करून संहारास कारण होते. अशा या दोन बाजू या शास्त्रात सामावलेल्या आहेत. जोपर्यंत मनुष्य आपल्या ज्ञानाने सुविचार करीत आहे, तोपर्यंत त्या शास्त्रासारखे सुखच नाही. असे सुखाचे स्वप्न मनुष्य पहातो. पण अविचाराने त्याच शास्त्राने जगाचे काय होणार आहे, हा प्रश्न आज प्रत्येकासमोर आहे. आज अशी अनेक शास्त्रे मानवी कल्याणाच्या हिताची असून मनुष्य ज्ञानी होऊन पुढे संशोधन करीत आहे व स्वतः निर्माण केलेल्या शास्त्रास भीत आहे व समाजासही भिववीत आहे. या सर्व शास्त्रपद्धतीस सूज्ञ मनुष्य शास्त्र म्हणून मानतो. परंतु जे शास्त्र आज हजारो वर्षे मनुष्याच्या कल्याणार्थ अस्तित्वात आहे, की ज्याचा फायदा विनामूल्य समाजातील प्रत्येकास मिळण्यासारखा आहे, त्यास 'शास्त्र नाही' असे म्हणून चालेल का ? तर अशा शास्त्रीय पद्धतीचा अभ्यास विनामूल्य लोकांना मिळावा म्हणून वरील स्पर्शसंवेदना ही साधना आत्मसात केली आहे. यास पाश्चिमात्य देशात Healing Mediums असे म्हणतात. या स्पर्शसंवेदनेसाठी ऋग्वेदात निरनिराळ्या रोगांवर निरनिराळे मंत्र सांगितलेले आहेत. ते मंत्र सिद्ध करून अनेक असाध्य रोगांवर त्याचा इलाज आज समितीच्या कार्यकेंद्रावर केला जात आहे. आजकाल मंत्रविद्येबद्दलही बरीच अनास्था दिसून येते. त्यामुळे दैनंदिन उपासनेत प्रातःसंध्या करण्याने ज्या काही मंत्रांचे फल शरीरसंवंधनार्थ मिळत असे, ते न मिळल्याने वातविकार, रक्तदाब, हृदयविकार यासारखे रोग खूपच प्रमाणात वाढलेले आहेत, ते निवारण करण्यासाठी मनुष्य शेकडो रुपये खर्च करील, परंतु नित्य उपासनेमधून ज्यामुळे दीर्घायुष्य, आरोग्य प्राप्त होते, त्यास तो शास्त्र म्हणण्यास तयार नाही. अशा अनेक कारणांनी प्रत्येकाचे जीवन हे परावलंबी झाले व त्यामुळे जीवनातील आर्थिक समस्या सुटणेही कठीण झाले आहे. आर्थिक प्राप्तीसाठी अन्य मार्गाचा अवलंब करून ती वाढविण्यापेक्षा जी प्राप्ती होत आहे, ती शास्त्रीय पद्धतीने टिकविण्याचे शास्त्र आज समाजकल्याणाच्या दृष्टीने



आवश्यक आहे. आजपर्यंत अनेक लोक हजारो रुपये खर्च करून शरीरप्रकृतीची तक्रार घेऊन समितीकडे आले, त्यांना याच मंत्रांच्या प्रार्थना म्हणून स्पर्शसंवेदना दिल्या व त्यामुळे त्यांना प्रकृति स्वास्थ्य लाभले. या शास्त्रपद्धतीची सिद्धता या कार्यातील प्रमुख मध्यस्थांनी प्रथमतः केली व शास्त्रीयदृष्ट्या तो अभ्यास आहे हे सिद्ध होण्यासाठी तशाच प्रकारचे बरेच मध्यस्थ आज सर्व कार्यकेंद्रावर तयार आहेत. यासाठी मनुष्य शरीरात काही विशेष असे गुणधर्म असावयास पाहिजेत असे नाही, परंतु या साधनेबद्दल परिपूर्ण आत्मविश्वास व निरपेक्ष भावना असावयास पाहिजे. याचेही अध्ययन इतरांना व्हावे की, ज्यामुळे घरातील किरकोळ आजार यावर तुमचे तुम्ही इलाज करू शकाल.

या स्पर्शसंवेदनामुळे बाधक प्रकारांनी जर काही रोग निर्माण झाले असतील किंवा दैवी बाधा होऊनही त्रास होत असेल, तर तोही दूर होतो. त्याशिवाय शारीरिक रोग असतील त्यांचेही निर्मूलन होते. या रोगनिवारणानंतर जी पूर्वीची शारीरिक दुर्बलता निर्माण झालेली असते, ती दूर करण्यासाठी जर काही आधुनिक पद्धतीच्या औषधोपचाराची आवश्यकता वाटली तर आज या समितीच्या कार्यामध्ये प्रत्यक्ष भाग घेणारे वैद्यकीय तज्ज्ञ आहेत. त्यांनी आपला वाटा सेवा या स्वरुपात या कार्यात उचलला आहे. ही सेवावृत्ती भावनारुप आहे. अशामुळे समाजातील सुखदुःखाचा व्यवहार हा सद्गुरू आज्ञेचा ठेवा आहे, हे सिद्ध होते.

**ज्ञानसंवेदना :** वरील स्पर्शसंवेदनाविषयी जे निवेदन केले आहे, त्या संवेदना शारीरिक संवर्धनासाठी दिल्या जातात. आता मानसिक संवर्धन व्हावे म्हणून या ज्ञानसंवेदनांच्या साधनेचा उपयोग केला जातो. मुलांची गर्भधारणेपासून काही कारणाने जी वाढ खुंटलेली असते की ज्यामुळे ज्ञानेंद्रिये पूर्णत्वाने कार्यक्षम झालेली नसतात, तसेच शारीरिक अवयवांचीही वाढ झालेली नसते. अशांसाठी या साधनेचा उपयोग अतिशय महत्वाचा आहे. याशिवाय विद्यार्जनासाठी स्मरणशक्ती वाढावी व बौद्धिक वृद्धि होऊन ग्रहणशक्ती वाढावी असा साधनेचा हेतू आहे. आज अस्तित्वात असलेली समाजातील पिढी यांचे आचार-विचार कशा व कोणत्या प्रकारचे आहेत, हे प्रत्येकाच्या अनुभवाचे आहे; व अशा अनुभवांनी आज आपण आपल्या मुलाबाळांच्या बालवृत्तीवर त्याचा संस्कार करून आपल्यासारखीच भावी पिढी निर्माण करणार. पण याचा विचार सूज्ञपणे मनुष्य 'पिता' किंवा 'माता' या जबाबदारीने करतो का ? प्रत्येक कुटुंबातील कुटुंबप्रमुख भावी पिढीच्या नाशास कारण होणार आहे. कारण तुम्ही स्वतः देवधर्म करणार नाही, मग मुलांना तो नित्य करण्याची सवय कशी लागणार ? तुम्हास जर काही देवादिकांची स्तोत्रे येतील, तर तुम्ही तुमच्या मुलाबाळांना शिकवू शकणार ! परंतु त्या जीवनाचा संस्कार मुलाबाळांच्या भावी आयुष्याचा पाया असूनही तुम्ही रोज

रिकामटेकडी मंडळी जगाची निंदानालस्ती, देवधर्माची कुटाळकी करण्यासाठी व स्वतःचा वेळ घालविण्याचे साधन म्हणून जमविणार ! त्यात निरनिराळया व्यसनांचा आनंद लुटण्यासाठी पैशाचा दुरुपयोग करणार ! ही दृष्ये तुमच्या मुलाबाळांच्या मनावर काय संस्कार करणार याचा विचार सूज्ञ माता, पिता करतील काय ? आणि अशा विचारांची पुनरावृत्ती जर तुमच्या मुलाबाळांच्या जीवनात निर्माण झाली, तर दुःखाला कारण कोण ? यासाठी समितीने या साधनपद्धतीत दर शनिवारी मुलांना देवादिकांची स्तोत्रे, पाठ, प्रार्थना, परमार्थ प्रश्नावली यांचा अभ्यास देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. त्यानंतर ज्ञानसंवेदना दिल्या जातात. या ज्ञानसंवेदनेचे शास्त्र हे काही नवीन नाही. हजारो वर्षांपासून ते चालत आलेले आहे. आशीर्वादाने मनुष्य ज्ञानी होतो, यावर आजच्या लोकांचा जो विश्वास नाही, त्याला हे सत्य अजमावण्यासारखे आहे की, प्रत्यक्ष वाणी आणि स्पर्श यामध्ये काय सामर्थ्य असू शकते !

या संवेदना दिल्यानंतर मुलांची शालेय प्रगती कोणत्या प्रकारांनी झाली याची नोंद ठेवली जाते. आज बरीच भक्तभाविक मंडळी या समितीच्या कार्यपद्धतीकडे हेतुपूर्वक पहात नसल्याने प्रश्नांचे निराकरण सांगण्यापलीकडे समितीला लोक-कल्याणार्थ काही कार्य करावयाचे आहे हे त्यांना समजत नाही. अशामुळे वरील स्पर्शसंवेदना याचा रोगनिवारणार्थ फायदा व ज्ञानसंवेदनेचा स्वतःच्या मुलाबाळांच्या जीवनाचा उत्कर्ष होण्याच्या दृष्टीने जो फायदा आहे, तो विनामूल्य असूनसुद्धा ते घेण्यास तयार नाहीत.

हा उपक्रम सुरू करण्यामध्ये दुसरी एक महत्वाची विचारसरणी अशी की, जिची आवश्यकता समाजास खरोखरीच आहे, ती म्हणजे परस्परांविषयी जिव्हाळा व परस्परांना मदत करण्याची प्रवृत्ती असणे.जे विद्यार्थी येथील कार्यकेंद्रावर ज्ञानसंवेदना घेण्यास येतात, त्यामध्ये प्राथमिक शिक्षणापासून ते विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यंतचे विद्यार्थी आहेत. ज्यांना परिस्थितीमुळे पुस्तके वगैरे घेणे शक्य नव्हते, अशा विद्यार्थ्यांनी ज्यांच्यापाशी ती होती, ती परस्परांविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्यामुळे, एकमेकांच्या अडिअडचणीप्रीत्यर्थ मिळून आपला अभ्यासक्रम यशस्वीपणे पूरा केला. ज्या गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणाचा लाभ होऊ शकत नाही, अशांना शिक्षणार्थ आवश्यक ती सहाय्यता दिली जाते.

--- --- --



# ६. अभिमंत्रित तीर्थ व गोळया :

ही साधना स्पर्शसंवेदनेपैकीच एक भाग आहे. स्पर्शसंवेदना देत असताना मध्यस्थाने जी मंत्र-प्रार्थना म्हणावयाची असते, त्यामुळे त्या मंत्राच्या उच्चाराने मध्यस्थाच्या शरीरात काही सूक्ष्म कंप निर्माण होतात. ते कंप रोगी माणसाच्या शरीरात स्पर्शसंवेदनेने पाठविले जातात. त्यामुळे ज्या कारणाने शारीरिक व्याधी निर्माण झाली असेल तिचे निर्मूलन होते. याचा फायदा जास्तीतजास्त लवकर मिळावा म्हणून हेच मंत्र पाण्यावर अभिमंत्रित केले जातात. त्यामुळे रोगनिर्मूलन करण्याची शक्ती त्या पाण्यात निर्माण होते. असे तीर्थ रोज सकाळ-सायंकाळ आरतीनंतर सर्व केंद्रावर विनामूल्य दिले जाते. आजपर्यंत ज्या ज्या असाध्य अशा रोगांवर ज्या लोकांनी या तीर्थाचा इलाज भक्तिभावनेने केला, त्यांना कोणत्या प्रकारचे जीवदान मिळाले हे समितीने सांगणे म्हणजे आत्मस्तुती होईल. परंतु ज्यांनी ते अनुभवले त्यांनाच त्याचा उपयोग समजू शकेल. आजच्या आधुनिक जगात वैद्यकीय शास्त्राची जरी इतकी प्रगती झाली असली, तरी काही रोगांबाबत हे शास्त्रसंशोधन निर्बल ठरते, हे कदाचित आजची शास्त्रवादी मंडळी कबूल करणार नाहीत; परंतु अशा प्रकारचे काही रोगी, की ज्यांचे बाह्य वैद्यकीय उपचार करून झालेले होते, अशांना आज उत्तम शरीरस्वास्थ्य लाभलेले आहे. प्रामुख्याने या तीर्थाचा गुण चोवीस तासात येतो. पण त्याच रोग्यांना बाह्य वैद्यकीय शास्त्रात काही महिन्यांचा कालावधी लागतो. रक्तदाबाच्या आणि हृदय-विकाराच्या बाबतीत जे तीर्थ किंवा अभिमंत्रित गोळ्या दिल्या जातात, त्यांच्याइतका अचूक इलाज तोही विनामूल्य अन्य शास्त्रात असेल असे वाटत नाही. तसेच स्त्रियांच्या विकारांबाबत आतापर्यंत ज्या ज्या निरनिराळ्या तक्रारींवर इलाज केले गेले, हे जगातील कोणत्याही बुद्धिवादी माणसाने अभ्यासण्यासारखे आहेत व या अभ्यासाने हे निश्चित पटेल की, जास्तीत जास्तपणे रोगाची कारणे आपण आहोत. कारण ज्या काही स्त्रियांना या साधनपद्धतीचा इलाज दिला गेला, तत्पूर्वी शरीरप्रकृतीचे योग्य ते निदान न झाल्याने मूळ रोगापेक्षा कैक पटीने अन्य दोष निर्माण झाले होते. परंतु परमेश्वर कृपेने त्यांचेही निर्मूलन झाले. त्यापैकी काहींना वैद्यकीय शास्त्रदृष्ट्या 'जिवीताची हमी आम्ही देऊ शकत नाही' असेही सांगण्यात आले होते. परंतु अशांनाही सुख-समाधान लाभून त्यांचे अजूनही या मार्गाबद्दलचे अज्ञान गेलेले नाही. समाज परिपूर्ण तऱ्हेने या मार्गाकडे व या शास्त्राकडे अज्ञानाने पहातोच आहे. परंतु ज्यांना जीवदान मिळाले किंवा मिळते, तेही तितक्याच अज्ञानाने या मार्गाकडे पहातात. जगातील कोणत्याही शास्त्राचा पदवीधर याला या जगामध्ये अस्तित्वात असलेल्या शास्त्राचे संशोधन करावयाचे असते किंवा अभ्यास

करावयाचा असतो; व तोही चार किंवा सहा वर्षे. अशा अभ्यासाने तुम्ही जगातील एका शास्त्राचे पदवीधर होता. जगाचे नाही ! तुम्ही आत्मसात केलेले ज्ञान किंवा पदवी यांनी जगातील अन्य शास्त्रे मूर्खपणाची आहेत असे म्हणणे हे ज्ञानी माणसाचे लक्षण आहे काय ? उलट आजपर्यंत या शास्त्राचा अभ्यास केलेल्यांनी आपले आयुष्य त्यात घालविले आहे. परंतु ज्या शास्त्राचा अंतसुद्धा अजून कोणाला लागला नाही, त्यांनी त्याचा अभ्यास व अभ्यासातून प्रचिती आल्याशिवाय उगीच अंगारा-धुपाऱ्याचे शास्त्र आहे, असे उपहासाने म्हणणे सोपे नाही. वैद्यकीय शास्त्रात जेव्हा एखाद्या शास्त्राचे संशोधन होते, तेव्हा ते सृष्टीतील एखाद्या पदार्थाचे विचारांनी शोधलेले तत्व असते; व त्याची रोगनिवारणार्थ जी क्रिया असते, तिलाच तुम्ही लोक संशोधन असे म्हणता. त्याची जास्तीतजास्त सूक्ष्म अवस्था म्हणजे भस्म ही होय. यापलीकडे त्याचे आणखी काही सूक्ष्मात रुपांतर असेल असे वाटत नाही. या विचारांनी निर्माण केलेले एखादे औषध जेव्हा एखादा रोगी घेतो, तरीसुद्धा त्याला लवकर बरे वाटण्यास भावनेची आवश्यकता असतेच. आता आधुनिक शास्त्रात जे अणू-परमाणुंचे शास्त्र आहे, ते किंबहुना त्यांची शास्त्रीय प्रगतीतील शेवटची मर्यादा असेल. पण या शास्त्रात हा आरंभ आहे. भस्म, अंगारा किंवा उदी ही जरी सुधारकास राख वाटत असली, तरी ती निर्माण होण्यामागे हजारो वर्षांची भावना पणाला लागलेली असते. म्हणून हे शास्त्र फाजील विचारवंतांपेक्षा भावनाशील माणसाच्या जास्त उपयोगाचे आहे.

अभिमंत्रित गोळ्या या याच मंत्रांच्या प्रार्थनेने अभिमंत्रित केल्या जातात. साखरेच्या गोळ्यांवर या मंत्रांच्या संवेदनांची आवर्तन देऊन स्पर्श संवेदना किंवा तीर्थ यापेक्षा या जास्त प्रभावी केल्या जातात. कारण निरनिराळ्या रोगांच्या तीव्रतेप्रमाणे जर आवश्यक वाटले, तर तीर्थात या गोळ्या टाकण्यास सांगितले जाते. याशिवाय जी भक्त-भाविक मंडळी परगावी असतात, अशांना स्पर्श संवेदना व तीर्थ नेणे अशक्य असते. अशांना या गोळ्या एकेक आठवड्यापुरत्या दिल्या जातात. याशिवाय बाह्य उपचारासाठी तेलही दिले जाते. निरनिराळ्या त्वचा रोगांवर या तेलाचा उपयोग अतिशय उत्तम तऱ्हेने होतो. या अभिमंत्रित तीर्थाच्या या गुणधर्माशिवाय जर त्याचे अन्य गुणधर्म आपणासमोर मांडले, तर आपला विश्वास यावर बसेल काय ? कारण आपल्या आचार-विचारांची धारणा अशा प्रकाराने झाली आहे की, नवीन शास्त्र संशोधनाचे मानकरी हे पाश्चिमात्य लोकच आहेत, व आपल्याकडे काहीही शास्त्रीय वाद सिद्ध झाला, तरी त्याचा विचार न करता त्या सिद्ध पद्धतीना समाजकल्याणार्थ किंवा लोककल्याणार्थ स्थान न देणे यासाठी प्रयत्न चालू असतो. या तीर्थाचा उपयोग तीर्थाचा उपयोग केवळ मनुष्याच्या शरीर प्रकृतीसाठीच होतो असे नसून त्याचा उपयोग चतुष्पाद प्राण्यांनाही, उदा. गाय, म्हैस,



कुत्रा इ. यांनाही होतो. याशिवाय वनस्पतींनाही हे तीर्थ किती हितावह आहे, हेही सिद्ध झालेले आहे. याचा प्रयोग शेतकी विद्यालयातील पदवी परिक्षेच्या एका विद्यार्थ्याने केला होता. त्याच्या सहाध्यायाने अन्य तऱ्हेची खते वापरली होती, व याने त्याऐवजी अभिमंत्रित तीर्थ घातले होते. एकाच वेळी एकाच जमिनीत थोड्या थोड्या अंतरावर प्रयोगादाखल लावलेल्या मिरच्या यांच्यात बऱ्याच प्रमाणामध्ये फरक जाणवला. त्याचप्रमाणे फळझाडांच्या बाबतीतही उत्तम प्रकारची फळे तयार झाल्याचे आढळून आले आहे. जो फरक बारा वर्षे आढळून आला नाही, तो या तीर्थामुळे आढळून आला. यावरून अभ्यासूला या शास्त्रात काय काय अभ्यासण्यासारखे आहे, हे अभ्यासण्यास मिळेल.

स्पर्श संवेदना, ज्ञान संवेदना, अभिमंत्रित तीर्थ, गोळ्या व तेल हे सर्व आपल्या लोकांसाठी विनामूल्य दिले जात आहे. तरी त्याचे मोल हे तुमच्या आचार-विचारांवर अवलंबून आहे, कारण रोगाची परीक्षा जशी वैद्यकीय शास्त्राने होते व निवारण जसे औषधाने होते; तद्वतच तुमच्या रोगाचे निर्मूलन तुमच्या आचार-विचारांनी होणार आहे. आज जरी बाह्य उपचारास खर्च करावा लागणारा पैसा हा जास्त देण्याने रोग बरा होईल अशी खात्री कोणीही देऊ शकत नाही, तरी त्या ठिकाणी तुम्ही मंडळी शास्त्रावर विश्वास ठेवून भावनेने औषधाच्या आहारी जाता. परंतु या सर्वांचा जो नियंता त्याच्यावर विश्वास ठेवून भावनेने वरील साधनेचा उपयोग जीवनात करून घेण्यास तयार नाही. बाह्य जगतातील कोणत्याही शास्त्राबद्दल व त्याच्या उपयुक्ततेबद्दल समितीचे दुमत नाही. ज्याची ज्यावेळी आवश्यकता आहे, ते योग्य विचारानेच करावयास पाहिजे. आजच्या जगात धनिकाला झालेला रोग हा निरनिराळ्या औषधोपचारांनी बरा होऊ शकेल. त्याबरोबर गरिबाचाही रोग भावनेने बरा होऊ शकेल. यासाठी आपणासमोर मांडलेल्या या साधन-पद्धतीच्या उपयुक्ततेमधून आज जर आपण एक रुपया वाचविलात, तर भावी काळात तुमच्या मुलाबाळांसाठी ते दहा रुपये होणार आहेत. समितीच्या कार्यपद्धतीत प्रचार करण्यास आज्ञा नसल्याने ज्या ज्या लोकांना वरील पद्धतीचे इलाज केले गेले त्यांची नावे व निराकरण येथे देता येत नाही. प्रचाराबद्दल गुरूआज्ञा अशी आहे की, आधी विचार, आचार व तो इतर बंधु-बांधवांच्या सुख-समाधानासाठी निर्माण झाला की तोच प्रचार !

--- --- --

## ७. पारमार्थिक उन्नतीसाठी आयुर्वेदाची आवश्यकता :

आजपर्यंत तुम्ही अनेक शास्त्रांचा अभ्यास केला असेल व कालांतरानेही कराल. परंतु ही शास्त्रे शिकण्यामागे शारीरिक संवर्धन व मानसिक समाधान कितपत लाभू शकेल हे ठरविणे कठीण आहे. कारण ज्या ज्या शास्त्रांची पूर्णता तुम्ही कराल, त्यामागे 'आर्थिक प्राप्ती भरपूर व्हावी व ऐहिक सुख भरपूर लाभावे' एवढाच उद्देश ठरविलेला असतो. स्वत:च्या कष्टाने मिळालेला पै-पैसा, त्याचे समाधान लाभण्यासाठी शरीर जीवनाचे माध्यम आहे. ते शरीर निरोगी, निर्व्यसनी रहाण्यासाठी शरीरशास्त्राबद्दल तुम्हाला ज्ञान झाले नाही, तर त्या शरिराची हानी निरनिराळ्या व्यसनांनी-अविचारांनी होईल; व अशा निर्बल झालेल्या शरिरास जरी भरपूर पै-पैसा किंवा गुरूकृपा किंवा उपासना मार्गातील उन्नती लाभली तरी ते सुख क्षणिक स्वरुपाचे असेच ठरणार आहे. याशिवाय आज जीवनात साध्या डोकेदुखीपासून तुम्हाला घरगुती औषधोपचार माहीत नाहीत. अशामुळे क्षणोक्षणी तुमचा पै-पेसा परदेशी औषधासाठी व्यर्थ खर्च होत आहे. या जीवनातील उणीवा दूर करण्यासाठी जसा अन्य निराकारण पद्धतीचा अभ्यास केलात की ज्यात दु:खाच्या कारण-मीमांसा काय असू शकतात हे तुम्हाला समजेल. आता या निराकरण पद्धतीने तुम्हाला तुमच्या शरिराचे संवर्धन करण्यासाठी काय काय आचार-विचार निश्चित असावयास पाहिजेत हे समजेल. बऱ्याच भक्त-भाविकांची 'उपासना ही उपवासाने पूर्णावस्थेला जाते' अशी कल्पना आहे आणि ती सिद्धता होण्यासाठी अविचाराने ते शरिराशी अन्य तऱ्हेचे प्रयोग करीत रहातात. अशा शरिराच्या अस्वास्थ्यामुळे उपासना मार्गातील कोणत्याही प्रकारची स्थिरता त्यांना राखता येत नाही. यासाठी प्रत्येक भक्त-भाविकांस सर्वसाधारणपणे शरीरशास्त्राची ओळख शास्त्रीय पद्धतीने असावयास पाहिजे. यासाठी जो उपक्रम मार्गदर्शनार्थ चालू केला आहे, त्याचा फायदा प्रत्येक भक्त-भाविकाने घ्यावा.

शरीर निरोगी व निर्व्यसनी केल्याशिवाय कोणत्याही प्रकारची साधना होऊ शकत नाही. तेव्हा प्रात:काली उठण्यापासून ते रात्रौ झोपण्यापूर्वी पर्यंतचा सर्व वेळ निश्चयाने खर्च करण्याची सवय लावली पाहिजे. अनेक लोक व्यसनाच्या इतके आहारी गेले आहेत की, त्यावेळी ते वाटेल त्या मार्गाचा अवलंब करून ती व्यसनाची सवय पूरी करतील. परमार्थ प्रश्नावलीमध्ये एका प्रश्नात असे विचारले आहे की, स्वत:प्रीत्यर्थ होणाऱ्या फाजील खर्चांतून काही बचत केलीत काय ? पण तसा सूज्ञ विचार करून स्वत:च्या व कुटुंबाच्या उद्धारासाठी व्यसन सोडणार नाहीत. आज कित्येक कुटुंबातील मुलाबाळांची शिक्षणे या व्यसनांच्यापायी होत नाहीत. आणि अशा व्यसनाधीन माणसास



सद्‌गुरूकृपा लाभली तरी तो समाधान मानू शकत नाही. कारण व्यसनापायी होणारा फाजील खर्च बाबांच्या कृपेने मिळणार नाही. त्यामुळे ते कर्ज रोजचे वाढणारे आहे व असे वाढलेले कर्ज फेडण्यासाठी पुन्हा दुसऱ्या मार्गाचा अवलंब केला जातो. तो म्हणजे, सट्टा, आकडा, रेस इ. कारण अविचाराची कल्पना अशी आहे की, त्या मार्गाने एकदम पैसा मिळेल. म्हणजे पहिल्या कर्जामुळे अपुरा पडणारा पै-पैसा आणखी अपुरा होतो. मग जो कोंडमारा होतो, तो बायका-मुलांचा. पैसा नाही म्हणजे मुलांना शिक्षण नाही, खाण्यास सकस अन्न नाही. त्यामुळे शरीर निरोगी रहाणार नाही. औषधपाण्यास पैसा नाही. अशा संसाराची धूळधाण झाली की, मग दैवी मार्ग शोधून सुख शोधावयाचे. या मार्गात इंद्रियनिग्रह करावा लागेल व व्यसनासाठी पै-पैसा मिळणार नाही असे सांगितले की, स्वत:स भक्त म्हणविणारे लोक या मार्गास शिव्या देऊन देव-धर्म खोटा आहे, पै-पैसा असणारे लोक खोटे आहेत अशी विधाने करतात. पण अशांनी लोकांचे दोष पहाण्यात आपले आयुष्य खर्च करण्यापेक्षा त्याच्यापाशी पै-पैशाचे समाधान लाभण्यास त्यांनी जीवनाचा आदर्श काय ठरविला आहे तो पहावा. अशा निरनिराळ्या व्यसनांची सवय म्हणजे उच्च संस्कृतीचे लक्षण आहे अशी फोल कल्पना आज समाजात रूढ होऊ पहात आहे. त्यामुळे विश्वविद्यालयात विद्यार्थी धुम्रपानाची घातुक सवय लावून घेऊन बसला आहे.आजची ही पिढी कालांतराने भारताची, समाजाची आदर्श पिढी म्हणून येणार आहे. तेव्हा पुढील पिढीला यांचा आदर्श काय ? नुसती व्यसने, ऐहिक सुखाची तळमळ आणि ती पूरी होण्यासाठी चोरी, फसवेगिरी, लाच-लुचपत यांचा सुळसुळाट होणार आहे. ह्या भविष्योत्तर दृश्याची कल्पना सहन होत नाही. यासाठी समितीच्या कार्यपद्धतीत हा विषय मुद्दाम अभ्यासण्यासाठी घेतला गेला आहे.

बऱ्याच भक्त-भाविकांची कल्पना अशी आहे की, चित्त स्थिरतेसाठी काही व्यसने (गांजा, अफू, भांग इ.) करून जर साधना केली तर ती दीर्घकाल होते. असा प्रयोग करणारी बरीच भक्तमंडळी शारीरिक दुर्बलता करून बसली आहेत. व्यसनांनी चित्ताच्या स्थिरतेस लाभ होऊ शकत नाही. अशा अनेक घातुक सवयी लागून मनुष्य खऱ्या सुखाला व आनंदाला मुकला आहे. म्हणून इंद्रियनिग्रह करण्याचे साधन जर काही असेल, तर सद्‌गुरूकृपा व तिचा जीवनावर होणारा संस्कार; व हा निरंतर हवा असेल तर आहारमीमांसा अभ्यासली पाहिजे, तरच आचार-विचार निश्चित रहातील. निरोगी व निर्व्यसनी शरीरसौख्य म्हणजेच जीवनाची खरी संपत्ती आहे. शरीर निरोगी राखण्यासाठी मिताहार व व्यायाम केला पाहिजे. बुद्धि व मन निरोगी राखण्यासाठी सद्‌गुरू उपासना केली पाहिजे. या दोन्हीचा योग म्हणजे जीवनातील खरे सुख होय.

--- --- --

## ८. श्रीसाई स्वाध्याय मंडळ :

वरील विषयाचे ज्ञान आपण भक्तांना व्हावे; तसेच आपल्या जन्मकारणाचे व जीवनातील कर्तव्याचे ज्ञानही व्हावे, म्हणून वेळोवेळी शिरोडा-गोवा येथे साधना संमेलने घेतली गेली. आम्ही मानव जरी जन्म प्राप्त करते होतो, तरी जीवन जगणे ही कला आहे; व तिचा लाभ गुरूकृपेशिवाय प्राप्त होत नाही. प्रत्येक मनुष्याच्या सुख, शांति, समाधानाबद्दलच्या अपेक्षा असतात; परंतु या अपेक्षांची फलप्राप्ती का होऊ नये ? याचे शास्त्रीय कारण कोणीही विचारात न घेता, ह्या सुखांची प्राप्ती होत नाही, म्हणून स्वतःच्या जीवनात व समाजात अशांतता निर्माण करण्यास, आपण कारणीभूत होत आलो आहोत. त्यामुळे ह्या जगात काही सुखाचा मार्ग आपल्याला प्राप्त व्हावा, म्हणून ज्ञानी होण्याऐवजी मनुष्य अज्ञानी मार्गाचा अवलंब करून, अधिकाधिक अज्ञानी होत चालला आहे. अशा ह्या मानवी जीवनात, निश्चित असा मार्ग आम्हा मानवांना मिळावा म्हणून प.पू. बाबांनी वेळोवेळी मार्गदर्शन, कृपाशीर्वाद म्हणून दिले आहे. हा कृपाशीर्वाद म्हणजे आजपर्यंत हजारो वर्षापासून अवतारी पुरुषांनी, मानवी कल्याणासाठी केलेल्या सिद्धसाधना होत. त्यांची प्राप्ती सर्वसामान्य मनुष्यास सुलभपणे व्हावी, म्हणून एखाद्या 'मध्यस्थ' माध्यमातून, अशी कार्ययोजना ईश्वर करीत असतो. ती कार्ययोजना त्या मध्यस्थ व्यक्तिच्या विचारातून निर्माण झालेली नसते. परंतु अशा कार्यात, मानवी जीवनामध्ये सुख-शांति-समाधानाचा लाभ व्हावा, अशी योजना असूनसुद्धा, अज्ञानामुळे मनुष्य या मार्गाला दुरावतो.

अशा योजनेपैकी वंशविमोचन हे साधन अत्यंत महत्वाचे असून, त्या साधनाचा लाभ आपण भक्तांनी घेतलेला आहे. मानवी जीवनात 'विद्यानाश' व 'संपत्तीनाश' हे प्रामुख्याने निर्माण होणारे दोष असून, एका पिढीत काही व्यक्तीस विद्याविद्यार्जन व ऐश्वर्य यांची सुलभपणे प्राप्ती होते; तर काहीना त्या प्राप्तीस मुकावे लागते; व पुढे कालकालांतराने हे दोष वाढीस लागून, कुटुंबात ऐपत असूनसुद्धा, विद्याविद्यार्जन घेता येत नाही. तर काही वेळा विद्याविद्यार्जन प्राप्त होऊनसुद्धा, कौटुंबिक कर्तव्ये पार पाडण्याची ऐपत उरत नाही. अशा दोषांचे निवारण पूजा, पाठ, नवससायास इत्यादींनी होत नाही. केवळ गुरूकृपाशिर्वादाचा लाभ झाला, तरच ह्या दोषापासून कुटुंबाची मुक्तता होत असते. व आपण प्राप्त जीवनाबद्दल सज्ञानी होऊन, आपल्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी केवळ गुरू हेच तत्व ह्या जगात साक्षी आहे; अशी नितांत आदराची ठेव प्राप्त होते. ही अमोल ठेव प्रत्येकाच्या जीवनात व आपल्या कुटुंबातील पिढ्यानूपिढ्यामध्ये सदैव वास करीत रहावी, याची साक्ष म्हणून 'श्रीसाई स्वाध्याय मंडळ' ही संस्था, अक्षय्य तृतिया श्री साई शके ३ (सन १९८५) या शुभदिनी स्थापन केली.



जगतामध्ये संस्था स्थापन करण्यासाठी लोक पैसा जमा करतात. श्रीसाई स्वाध्याय मंडळ या संस्थेचे हे वैशिष्ट्य आहे की, आपणापैकी प्रत्येकाने या संस्थेचा सभासद व्हावयाचे आहे. पण ते पैशाने नव्हे. तर ज्या श्रीगुरूंना आपण काया-वाचा-मनाने मानले आहे, ती अमोल ठेव म्हणजे 'श्रद्धा', ही आपण वर्गणी म्हणून द्यावयाची आहे. श्रीसाईनाथ महाराजांचा कृपाशीर्वाद व आपण भक्तांनी त्यांच्या चरणी अर्पण केलेली श्रद्धा, यातून 'श्रीसाई स्वाध्याय मंडळ' ही संस्था जे कार्य जगतात करेल, ते कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने 'लोककल्याण कार्य' असे म्हणता येईल. अशा अलौकिक तत्वावर स्थापन झालेली संस्था, ही जगतामध्ये अखंडपणे कार्य करीत राहील; व त्या कार्याचे ब्रीदवाक्य 'जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले' असेच असेल. आपण सर्व भक्तभाविक, ज्यांना श्रीगुरूकृपेने आपल्या जीवनात स्थित्यंतर करवून घेऊन व आपल्या काया-वाचा-मनाचा विकास होऊन, 'ज्ञान' अवस्थेचा लाभ झाला आहे; त्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी ...

॥ आस एकच माझी निववावी गुरूदेवा ।
जन्मोजन्मी घडावी तव चरणांची सेवा ॥

.. हाच भाव जन्मोजन्मी वास करीत रहावा, अशी प.पू. बाबांच्या चरणी प्रार्थना!

प्रत्येक भक्ताच्या कौटुंबिक व सामाजिक कर्तव्याची पूर्तता करवून घेण्यासाठी, श्रीसाई स्वाध्याय मंडळाची स्थापना झाली. तसेच प्रत्येक भक्ताचा देहिक व आत्मिक विकास व्हावा, म्हणून पुढे नित्य साधनेमध्ये 'श्री भीमरूपी' या स्तोत्राचा समावेश श्री गुरू आज्ञेने करण्यात आला. परंतु या स्तोत्राचे महत्त्व काय आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे.

हे स्तोत्र प.पू. रामदास स्वामींनी लिहीले आहे. ते महाराष्ट्रातील एक थोर संत होऊन गेले व त्यांचे निवासस्थान साताऱ्याजवळील 'सज्जनगड' ह्या डोंगरावर आहे. त्यांचे उपास्यदैवत श्रीरामप्रभु होते. श्रीरामदासांनी अध्यात्मावर महत्त्वाचे लिखाण केलेले असून त्यात 'श्रीदासबोध', 'मनाचे श्लोक' इत्यादींचा समावेश आहे. त्यामध्ये 'भीमरुपी' हे स्तोत्र, श्रीरामाच्या आज्ञेने त्यांनी लिहीले आहे. त्याकाळी व आजही त्याची गरज आहे. हे समजून माझ्या वडिलांनी मला वय वर्षे आठ, यावेळी हे स्तोत्र नित्यनियमाने म्हणण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे मी हे स्तोत्र नियमाने म्हणत आलो; व आजही म्हणतो आहे. श्रीशक्तीपीठ स्थापनेची तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर प.पू. साईबाबांची आज्ञा अशी झाली की, "हे नुसते स्तोत्र नसून, त्यात जीवनाचे शास्त्र,

करण्याची सुबुद्धी व्हावी, अशी प्रार्थना शिकव." यासाठी आवश्यक अशी प्रार्थना, "हे भगवंता, नारायणा.." ही प.पू. बाबांनी पूर्वीच दिलेली होती. या प्रार्थनेत सर्व काही म्हणजे कुलाचार, कुलधर्म, कुलोपासना, वास्तुदेवता, उपास्यदेवता, याशिवाय गेल्या सात पिढ्यातील वाडवडिलांची सद्गति यांचा समावेश केलेला आहे. इतकी तरतूद व सिद्धता असल्यानंतर, आलेल्या भक्ताला 'निवारण' ऐवजी 'निराकरण' सांगणे म्हणजे ज्या घडलेल्या पूर्वकर्मामुळे तो आज दुःखी आहे, त्या कर्माचा पुनश्च उच्चार करणे होय. त्यामुळे प.पू. बाबांच्या आशीर्वादाने हे घडून गेलेले कर्म पुन्हा जागे करणे, असा त्याचा अर्थ होतो. म्हणून श्री गुरूकृपेने, 'निवारण साधना' हे सिद्ध केले. येणाऱ्या भक्ताला आशीर्वादाची गरज आहे. त्यासाठी आपली जी रोजची साधना आहे, त्यातील वाटा इतरांना देऊन, त्यांना सुखी करण्याचे कर्तव्य भवितव्यात सेवकांनी करावे, यासाठी प.पू. साईबाबांनी, 'गुरूबीजाची' धारणा, प्रत्येकाला करून दिली आहे.

आपण भक्त प्रापंचिक जीवनातील अडिअडचणीसबंधी विचारणा करण्यासाठी आल्यानंतर आपल्याला मार्गदर्शन करण्याचे कार्य श्रीसाई आध्यात्मिक समिती गेली अनेक वर्षे करीत आहे. यामध्ये आपल्याला धर्माची व देवाची ओळख व्हावी म्हणूनच केवळ हे कार्य स्थापन केलेले नाही. इहजगतात जो कोणी जन्माला येतो त्याला धर्म व देव आहेच. परंतु प्रत्येकाची विचारसरणी अशी झाली आहे की, खाणेपिणे, कपडालत्ता म्हणजेच जीवन. व ह्या सुखांची प्राप्ती व्हावी म्हणूनच केवळ मनुष्य हा देवाचा व धर्माचा आज विचार करीत आहे. आपल्या प्राप्त जन्माचे कारण काय व त्यापरत्वे आपले इहजगतातील कर्तव्य काय, याचा विचार कोणीही करीत नाही. त्यामुळे त्याची ओळख मनुष्याला होत नाही. ज्या देवाने आपणास जन्माला घातले त्या देवाची ओळख आपणास व्हावयास पाहिजे. परंतु मनुष्य आपल्या कर्माची ओळख करून घेण्याच्या प्रयत्नात असतो, व ती ओळखही त्याला पूर्णत्वाने होत नाही. जरी जगतात "जन्माला आलो आहोत" असे आपण म्हणत असलो, तरी खऱ्या अर्थाने जन्मप्राप्ती अजून व्हावयाची आहे. कारण प्राप्त जन्माचे ज्ञान होईल तेव्हाच जन्मप्राप्ती झाली, असे म्हणता येईल. ही अवस्था गुरूभेट झाल्याशिवाय प्राप्त होत नाही. जगात ज्याला 'जन्म' म्हणजे उत्पत्ति अवस्था प्राप्त होते, त्याला 'लय' ही अवस्था आहेच. पण 'स्थिती' प्राप्त होणे म्हणजे जन्म प्राप्त होणे असे म्हणता येईल. त्यासाठी स्थित्यंतर होणे आवश्यक आहे. हे कार्य गुरूकृपेशिवाय होत नाही.

जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जन्मप्राप्तीमध्ये काहीएक निश्चित कारण आहे हे समजावे: म्हणून आजपर्यंत समितीचे ...



महाराजांच्या कृपाशीर्वादाने आपणास करून दिली आहे. प्रत्येक मनुष्याच्या सुख-शांति समाधानाबद्दलच्या अपेक्षा असतात. परंतु ह्या अपेक्षांची फलप्राप्ती का होऊ नये, याचे शास्त्रीय कारण कोणीही विचारात घेत नाही. ह्या सुखांची प्राप्ती होत नाही म्हणून स्वतःच्या जीवनात व समाजात अशांतता निर्माण करण्यास आपण कारणीभूत होत आलो आहोत. त्यामुळे ह्या जगात काही सुखाचा मार्ग आपल्याला प्राप्त व्हावा म्हणून ज्ञानी होण्याऐवजी, मनुष्य अज्ञानी मार्गाचा अवलंब करून आधिकाधिक अज्ञानी होत चालला आहे. अशा ह्या मानवी जीवनात निश्चित असा मार्ग आम्हा मानवांना मिळावा म्हणून परमपूज्य बाबांनी वेळोवेळी कृपाशीर्वाद म्हणून मार्गदर्शन केले आहे. हा कृपाशीर्वाद म्हणजे आजपर्यंत हजारो वर्षापासून अवतारी पुरुषांनी मानवी कल्याणासाठी केलेल्या सिद्धसाधना होत. त्यांची प्राप्ती सर्वसामान्य मनुष्यास सुलभपणे व्हावी म्हणून एखाद्या 'मध्यस्थ' माध्यमातून अशी कार्ययोजना ईश्वर करीत असतो. ती कार्ययोजना त्या मध्यस्थ व्यक्तिच्या विचारातून निर्माण झालेली नसते. परंतु अशा कार्यात मानवी जीवनामध्ये सुख-शांति-समाधानाचा लाभ व्हावा अशी योजना असूनसुद्धा, मनुष्य अज्ञानामुळे ह्या मार्गाला दुरावतो.

अशा योजनेपैकी **वंशविमोचन** हे साधन अत्यंत महत्वाचे असून, त्या साधनाचा लाभ आपण भक्तांनी घेतलेला आहे. मानवी जीवनात संपत्तीनाश, संततीनाश व विद्यानाश हे प्रमुख दोष आहेत. त्यांच्या निवारणार्थ पूजापाठ, नवससायास इत्यादि मानवी प्रयत्न अपुरे पडत असून, गुरूकृपाशीर्वादाचा लाभ झाला तरच ह्या दोषापासून आपली म्हणजे पर्यायाने पुढील पिढ्यांची मुक्तता होत असते. यामध्ये विद्यानाश हा दोष निर्माण झाला तर एका पिढीत काही व्यक्तींचे विद्याविद्यार्जन होते, काहींचे होत नाही. पुढे कालकालांतराने हा दोष वाढीस लागून, कुटुंबात ऐपत असूनसुद्धा विद्याविद्यार्जन करता येत नाही. अशा दोषांचे निवारण गुरूकृपाशीर्वादाचा लाभ झाला तरच होत असते. यासाठी श्रीसद्गुरूकृपेने '**श्रीसाई स्वाध्याय मंडळ**' ही संस्था स्थापन केली असून, समितीच्या प्रत्येक कार्यकेंद्रावर एक वही ठेवण्यात आली आहे. आपण भक्तभाविकांनी व कुटुंबियांनी स्वतःच्या हस्ताक्षरात ह्या वहीमध्ये आपले नाव व पत्ता याची नोंद करून, श्रीसाई स्वाध्याय मंडळाचे सभासद व्हावे.

आपण जे विद्याविद्यार्जन करतो, त्या शिक्षणामुळे पुढे नोकरीधंदा आदि व्यवसाय करून द्रव्यार्जन करीत असतो. परंतु सुखप्राप्ती झाली तरी शांतता आपल्या अनुभवास येत नाही. याचे कारण विद्या ही दान करावयाची असते. पण आपल्या ठिकाणी परोपकाराचा ठेवा नसल्याने त्याचा लाभ आपल्याला होत नाही. भवितव्यात आपल्या

कुटुंबातील जे कोणी विद्याविद्यार्जन करून ज्ञानवंत होतील, त्यांना प्राप्त होणारी विद्या हिचा सदुपयोग जगाला सुखी करण्यासाठी व्हावा, अशी परमपूज्य बाबांची इच्छा आहे. त्यासाठी श्रीसाई स्वाध्याय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. ह्या संस्थेच्या सभासदत्वासाठी काही वर्गणी जमा केलेली नाही. आपण भक्त सभासद व्हावे म्हणून परमपूज्य बाबांचा आशीर्वाद ह्या स्वाध्याय मंडळासाठी प्राप्त झालेला असून, ती ठेव आपण आपली नावे सभासद म्हणून नोंदविण्याआधीच प्राप्त झालेली आहे.

आपण भक्तभाविक आजपर्यंत अडिअडचणीचे निवारण करून घेण्यासाठी श्रीगुरूचरणांशी येत आहात व पुढेही याल. जीवनातील दुःखे दूर होऊन सुख, शांति लाभावी अशी आपली इच्छा जरी असली, तरी विद्येतून जे ज्ञान प्राप्त करावयाचे ते ज्ञान जर नसेल, तर कितीही सुख प्राप्त झाले तरी समाधान ही अवस्था आपणास अनुभवता येणार नाही. कारण 'समाधान' ही अवस्था पै-पैशाने प्राप्त होणारी नसून, विद्यार्जनातून ज्ञानी होण्यामुळे प्राप्त होते; याचा विचार सूज्ञ भक्त-भाविकांनी भवितव्यासाठी केला पाहिजे.

सर्वसामान्यपणे मनुष्य असा विचार करतो की, उच्च शिक्षण घेणे म्हणजे ज्ञानवंत होणे. परंतु 'ज्ञान' ही वेगळी अवस्था असून, ती देहिक माध्यमातील आचार-विचार-उच्चार यामधून व्यक्त झाली पाहिजे. जगात काही लोक असे जन्माला येतात की, ज्यांना असामान्य बुद्धीमत्ता लाभलेली असते. अशा बुद्धीचा सदुपयोग जगाला ज्ञानी करण्यासाठी केला गेला पाहिजे. कारण पूर्वपुण्याईने त्यांना अशी अपूर्व संधी प्राप्त झालेली असते की, विश्वाच्या कार्यामधील 'ज्ञान' ही अवस्था स्वतःच्या ठिकाणी धारण व्हावी. परंतु हे न समजल्यामुळे अशा व्यक्ती विश्वविद्यालयात शिक्षण घेऊन, केवळ आपल्या चरितार्थाचाच विचार करतात. त्यामुळे जगाला ज्ञान देण्याचे कर्तव्य त्यांच्या हातून पार पाडले जात नाही. अशा व्यक्ती जरी सुख प्राप्त करत्या झाल्या, तरी समाधान ही अवस्था अनुभवू शकत नाहीत.

गुरूमार्गात जे ज्ञानी आहेत त्यांनी हे ज्ञान शाळेत किंवा विश्वविद्यालयात प्राप्त केलेले नसून, त्याची प्राप्ती ही स्वयंभू किंवा गुरूमार्गात काही एका विशिष्ट साधनेने होत असते. हेच ब्रह्मज्ञान असून, त्या ज्ञानास 'अपौरुष' असे म्हणतात. ज्ञानाचा आरंभ 'श्री' ने होतो व शेवटही 'श्री' ने होतो. पहिली 'श्री' म्हणजे लक्ष्मी व दुसरी 'श्री' म्हणजे सरस्वती आहे. पहिल्या श्रीची प्राप्ती कोणालाही होत असते; परंतु दुसऱ्या श्रीची प्राप्ती होण्यासाठी पूर्वपुण्याई, पूर्वसंस्कार किंवा कृपाशीर्वादाची आवश्यकता असते. आज जगात असे किती लोक आहेत की, ज्यांना पूर्वपुण्याईने जन्म घेता येतो ? या विसाव्या



शतकात शिक्षणा शिवाय जगणे, आम्हा मानवांना कठीण आहे. ज्ञान हे पूर्वपुण्याईवर अवलंबून असल्यामुळे, जगात बोटावर मोजता येण्याइतकेच लोक, या ज्ञान अवस्थेचा लाभ आज घेऊ शकतात. पण बहुसंख्य लोक पूर्वपुण्याईअभावी व जीवनातील दोषपरत्वे, शिक्षण घेता येत नाही म्हणून दुःखी आहेत. याची जरी कीव आली तरी अशा परिस्थितीत स्थित्यंतर करण्याचा मार्ग आज समाजापुढे नाही. याचा फायदा ज्योतिषी इ. लोक घेत असतात. 'अमुक व्रत, नवस किंवा जप करा, तुमचा मुलगा कालीदास होईल,' असे मार्गदर्शन करतात. पण कालीदास होण्याऐवजी हा मुलगा आपले जीवन इतरांचा दास होण्यात घालवितो. विद्याविद्यार्जन व ज्ञानप्राप्ती न होणे या समस्येमध्ये जगातील पंच्याहत्तर टक्के लोक आज आहेत. तेव्हा 'अशा परिस्थितीतून काही मार्ग आहे की नाही ?' अशी विचारणा मी हे कार्य स्थापन करण्यापूर्वी प.पू. साईनाथ महाराजांना केली होती. 'पुढील काळात जेव्हा वेळ येईल, त्यावेळी मार्ग सुचविन'; असे प.पू. बाबा म्हणाले होते. ती वेळ येण्यास पस्तीस वर्षे लागली. हेच गुरुमार्गदर्शनातील मर्म आहे.

आपल्या जन्मकारणाचे व जीवनाचे ज्ञान आपण भक्तास व्हावे, म्हणून ह्या कार्यपद्धतीमध्ये आजपर्यंत साधना संमेलने घेण्यात आली. या संमेलनामधील प्रमुख विषय म्हणजे, मानवी जन्म जो प्राप्त होतो त्याची 'जीवन उत्पत्ती व कार्य', असा होता. आम्ही मानव जरी जन्म प्राप्त करते होतो, तरी जीवन जगणे ही कला आहे व तिचा लाभ गुरूकृपेशिवाय होत नाही. यामध्ये गुरूभेट होणे व गुरुंना मानणे इतकेच नसून, गुरू जे मार्गदर्शन करतात त्यापरत्वे जे कर्तव्य आहे, ते आपल्यालाच करावे लागते. ही शिकवण ह्या साधना संमेलनांतून भक्तभाविकांना देण्यात आली. याबरोबरच देहिक विकासासाठी आवश्यक अशी सेवा म्हणजे ॐकार साधना व श्रीसद्‌गुरू नामस्मरण ही साधनाही शिकविण्यात आली.

ह्या संमेलनांमधून भक्तभाविकांस ज्या अलौकिक ब्रह्मज्ञानाचा लाभ झाला, त्यामुळे आपण प्राप्त जीवनाबद्दल सज्ञानी होऊन, आपल्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी, केवळ गुरू हेच तत्व या जगात साक्षी आहे, अशी नितांत आदराची ठेव प्राप्त झाली आहे. ही अमोल ठेव प्रत्येकाच्या जीवनात व आपल्या कुटुंबातील पिढ्यान्‌पिढ्यामध्ये सदैव वास करीत रहावी, याची साक्ष म्हणून श्रीसाई स्वाध्याय मंडळ ही संस्था स्थापन केली आहे. आपण सर्वांनी आपल्या कुटुंबासाठी भवितव्यात असा आशीर्वाद प्राप्त करावयाचा आहे की, प्रत्येकाला जन्माला आल्यानंतर विद्याविद्यार्जन ही ठेव जन्मतःच प्राप्त होऊन, ज्ञान या अवस्थेचा लाभ व्हावा. ही ज्ञानज्योत आपल्या कुटुंबात अखंडपणे वास करीत रहावी म्हणून आपण सर्व भक्तांस प.पू. बाबांनी या

मंडळाचे सभासद केले आहे, याचा अर्थ आपल्या घराण्यातील विद्यानाश, जो वंशपरंपरेने पुढे जाणार होता, तो विमोचित केला असून, भवितव्यात आपण घेतलेल्या विद्येचा मोबदला 'दान' म्हणून करण्यानेच हा कृपाशीर्वाद आपण आपल्या कुटुंबासाठी मिळवू शकाल. आपण सर्व भक्तभाविक ज्यांना श्रीगुरूकृपेने आपल्या काया-वाचा-मनाचा विकास होऊन ज्ञान अवस्थेचा लाभ झाला आहे, त्या काया-वाचा-मनाच्या ठिकाणी हाच भाव वास करीत रहावा व या कार्यामध्ये सर्व भक्त-भाविकांनी कर्तव्यबुद्धीने सहभागी व्हावे अशी प.पू. बाबांचे चरणी प्रार्थना !

--- --- --



## ९. कार्यपद्धती :

१. या कार्याची स्थापना पूर्णत्वाने दैविक उपासना परंपरेतील आहे. मंत्रतंत्रविद्यांचा अभ्यास समितीस मान्य नाही.

२. ईश्वरी उपासनेतून मानवी जीवनाची सेवा 'कर्तव्य' म्हणून करावी असा येथील गुरूपदेश आहे.

३. या कार्याची सिद्धसिद्धान्त पद्धत पूर्णत्वाने समितीच्या अभ्यासाची आहे. बाह्यसंबंधित नाही.

४. दु:खनिवारणार्थ होणाऱ्या मार्गदर्शनाचा हेतू-धर्मभावना, नित्य आचार-विचार, संस्कार, जन्म ऋणानुबंधनातील कर्तव्य यांचे पालन करणे हाच धर्म असा आहे.

५. हे कार्य दैविक उपासनेचा पाया असल्याने येणाऱ्या प्रत्येक भक्त-भाविकास धर्माचरण स्वत: करण्यास मार्गदर्शन केले जाते.

## भक्त-भाविकांस सूचना

१. प्रत्येक भक्त-भाविकाने आपले नांव (प्रश्न विचारण्यासाठी) २४ तास आधी नोंदविले पाहिजे. ते कोणाच्या हस्ते किंवा निरोपाचे असू नये.

२. कामासाठी आलेल्या भक्ताचे प्रसाद (नारळ व दक्षिणा रु. ५.२५ पानाचा विडा) प्रथम प.पू. बाबांच्या चरणी पूजनास ठेवले जातात. हा विधी आरतीपूर्वी ५ मि. आधी असतो. त्यानंतर उशिरा आलेल्या भक्त-भाविकांचा प्रश्न विचारांत घेतला जाणार नाही. तेव्हा तशी भीड घालण्याची भूमिका ठेवू नये.

३. आपल्याला मार्गदर्शन करणारी सेवक मंडळी आपल्यासारखीच नोकरीधंदा पेशातील आहेत. परंतु येथील कार्यार्थ त्यांनी आपले कर्तव्य अनुभवांनी ठरविले आहे. तेव्हा त्यांच्याशी प्रेमाने व आपुलकीने वागावे.

४. प्रत्येकाचे काम नोंदपद्धतीने असल्याने कोणासही वैयक्तिकरित्या भेटता येणार नाही. तसा भेटण्याचा प्रयत्न कोणीही करू नये.

५. येथील एखाद्या कार्यपद्धतीस किंवा तात्विक विचारांस आपला विरोध असेल, तर त्याची चर्चा करू नये.

६. येथे आलेल्या भक्त व सेवकांनी राजकीय व सामाजिक, पारमार्थिक विषयाबद्दल आपले विचार प्रकट करू नयेत. तसेच बाहेरील गुरूकुलाची तुलना ह्या

## १०. परमार्थ प्रश्नावली :

दैनंदिन जीवनात ऐहिक सुखप्राप्तीसाठी मनुष्य ज्ञान-अज्ञानाने अनेक तऱ्हेची कर्मे करीत असतो. कित्येक वेळी हातून घडलेली पातके व प्रमाद यांची आठवण कोणी करून दिली, तरच ती त्याला होते; व ती देऊनसुद्धा ती मान्य करण्यास सहसा कोणी तयार होत नसतो. पण अशाने जीवनाचे खरे सार्थक कशात आहे हे समजणे कठीण होते. रोजच्या व्यावहारिक जीवनात काया-वाचा-मनाने हातून घडणाऱ्या कृत्यांचा जबाब प्रामाणिकपणे झोपण्यापूर्वी प्रत्येकाने आपल्या मनाला विचारण्याची सवय लावून घेतली पाहिजे. नुसती पुस्तकी ज्ञानाची पाखंडी मते बोलण्याने उन्नती होत नसते. जी 'परमार्थ प्रश्नावली' या ठिकाणी दिली आहे, त्यातील प्रत्येक प्रश्न सर्वसाधारणपणे प्रत्येक मनुष्याच्या हातून घडलेला किंवा घडणारा असतो. अशा घडणाऱ्या चुकांमुळे कुटुंबाची आचार-विचारांची उन्नती ध्येयवादी होण्यास या 'परमार्थ प्रश्नावली'ची विचारणा प्रत्येकाने आपल्याशी करून पुनश्च: कोणत्याही परिस्थितीत अशी कर्मे घडणार नाहीत याचा अभ्यास केला पाहिजे व दैनंदिन जीवनात ती सवय जास्तीतजास्तपणे आपल्याला कशी लागेल याचा अनुभव घेतला पाहिजे. अशा नित्य सवयीमुळे परमेश्वरी मार्गाकडे जाण्याची पहिली पायरी तुम्ही निर्माण करू शकाल. नाहीतर देवासमोर बसून तुमच्या आचार-विचारांची स्थिरत्ता होणार नाही. कारण देहाच्या ठिकाणी क्षणाक्षणाला निर्माण होणारे विकार हे त्याला जीवनात स्थिरता, निश्चितता लाभू देत नाहीत. आजकालच्या नवमतवादी सुधारकांची विचारसरणी अशी आहे की, अशा मार्गाचा अवलंब वृद्धापकाळी करावा. परंतु तोपर्यंत जे हातून घडले जाणार आहे, त्यास जबाबदार कोण ? या सवयीने जर मनुष्य आपले आचार-विचार जगाच्या हितसंबंधांशी प्रामाणिकपणाने ठेवील, तर आजची समाजातील परिस्थिती, की ज्याच्यात लाचलुचपत, असत्य-अन्याय, कपट-फसवेगिरी इ. मार्गाचा अवलंब करून ऐहिक सुखाची प्राप्ती करण्याचा प्रयत्न केला जात आहे, की ज्यामुळे सामान्य माणसास आपले जीवन नकोसे झाले आहे, ती बदलून एकमेकांबद्दल जिव्हाळा व प्रेम निर्माण होऊन एकमेकांच्या सहकार्याने अनेक अडिअडचणी दूर होतील.

या कार्यपद्धतीच्या दैनंदिन उपासनेत रोज रात्री आरतीनंतर सामुदायिकपणे या प्रश्नावलीचा आढावा घेण्याची सवय प्रत्येक भक्त-भाविकांस लावली जाते. या प्रश्नावलीचा नुसता उच्चार करून उपासना होणार नाही. तर सकाळपासून सायंकाळ



पर्यंत तसा उच्चार केल्याप्रमाणे 'एखादे कृत्य हातून घडले आहे काय' याचे स्मरण व्हावयास पाहिजे, व तसे प्रसंग घडण्यास मी किती कारण झालो, हे अभ्यासिले पाहिजे. तुमच्या ठिकाणी या सवयीमुळे जो सात्त्विक आनंद निर्माण होईल, त्याच सवयीने कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस त्याची सवय लावली पाहिजे. विद्यार्थी वर्गासाठी ज्या ज्ञानसंवेदना दिल्या जातात, त्या दिवशी विद्यार्थ्यांनाही ही परमार्थ प्रश्नावली शिकविली जाते. आज जरी पूर्णत्वाने या प्रश्नावलीचे मर्म त्यांना आत्मसात झाले नाही, तरी भावी जीवनात त्यांना त्याचा भावार्थ लक्षात येईल. दैनंदिन उपासनेत एकवेळ तुमची पूजा, पाठ राहिला तरी चालेल; परंतु परमार्थ प्रश्नावलीचा आढावा घेतल्याशिवाय कोणीही भक्त-भाविकाने झोपू नये. या सवयीने कुटुंबामध्ये जो सलोखा निर्माण होईल, त्यासच 'आदर्श कुटुंब' म्हणजे 'सद्गुरूकृपेचे कुटुंब' म्हणता येईल.

ही प्रश्नावली सर्वसाधारणपणे प्रत्येक कुटुंबात ज्ञान-अज्ञानाने घडणाऱ्या ज्या चुका आहेत त्या लक्षात घेऊन कुटुंबाची पारमार्थिक उन्नती होण्यासाठी तयार केली गेली आहे. ही प्रश्नावली मेजर सदुभाऊ गुणे यांनी तयार केली आहे व तिचा फायदा समितीच्या कार्यपद्धतीस अमोल स्वरुपाचा झाला आहे.

### परमार्थ प्रश्नावली :

१. मनोनिग्रह करण्याजोगे किती प्रसंग आज उद्‌भवले व त्यापैकी किती प्रसंगात निग्रहाचा प्रयत्न यशस्वी झाला ?

२. धनार्जनाच्या कामी असत्य, अन्याय, कपट, फसवेगिरी अथवा चोरी यांचा अवलंब केला गेला काय ?

३. आपण मिळविलेल्या धनावर आपल्याखेरीज इतरांचाही यथायोग्य प्रमाणात हक्क आहे, या जाणिवेचा विसर पडण्याजोगे काही कृत्य आज आपल्या हातून घडले काय ?

४. ऐपतीप्रमाणे दानधर्म अगर परोपकाराचे काही कृत्य आज आपल्या हातून घडले काय ?

५. अन्नदान, वस्त्रदान अथवा द्रव्यदान या व्यतिरिक्त इतरांना सुख-समाधान देण्यासाठी कायेने, वाचेने अगर मनाने आज आपण काय काय प्रयत्न केलेत ?

६. अतिथी व अभ्यागत यांचा खऱ्या मनाने परामर्ष घेण्यात आला की जुलुमाने व रंजिसपणाने त्यांची बोळवणूक केली गेली ?

७. कुटुंबातील सर्वांशी- नोकराचाकरांशीसुद्धा - प्रेमाने व मनमोकळेपणाने बोलणे चालणे शक्य असता आज आपण कोणाशी निष्कारण अबोला धरला काय ?

८. आज आपल्या हातून कोणाचा अपमान, उपमर्द, तिरस्कार अगर कोणाच्या शरीराला किंवा मनाला क्लेष देण्याजोगे काही कृत्य घडले काय ?

९. आपणा स्वत:स करता येण्याजोगी कामे आळसामुळे अगर आपला त्रास वाचविण्याच्या हेतूने दुसऱ्याकडून करून घेतली काय ?

१०. दिवसाकाठी आज आपल्या हातून जे काही कार्यक्रम घडले ते शक्य तितक्या सुंदर, सफाईदार व यथायोग्य रितीने पार पडावेत या हेतूने करण्यात आले की कसेतरी ओढून काढले ?

११. कार्यक्रमात, सद्‌विचारात अथवा ईश्वरचिंतनात व्यतीत करता येणे शक्य होता असा किती काळ आपण आज झोपेत, आळसात किंवा रिकामटेकडेपणात घालविलात ? कालच्यापेक्षा कमी की अधिक ?

१२. श्रद्धेने धर्माचरण व ईश्वरभक्ती करणाऱ्या कुटुंबातील इतर व्यक्तिंचा बुद्धीभेद होऊन सन्मार्गावरील त्यांची निष्ठा कमी होण्यास कारणीभूत होईल अशा तऱ्हेची एखादी कृती अगर उद्‌गार आपल्या तोंडून निघाले काय ? याच्या उलट त्यांच्या श्रद्धेला उत्तेजन मिळून ती वृद्धिंगत होईल असा काही प्रयत्न आज आपण केला काय ?

१३. असत्य भाषण, चहाडी-चुगली, दुसऱ्याची अपरोक्ष निंदा आज आपल्या हातून घडली काय ?

१४. खाणे-पिणे, कपडालत्ता, ऐषाराम अथवा करमणूक यांबाबत केवळ स्वत:प्रित्यर्थ होणाऱ्या फाजील खर्चांतून परोपकारार्थ अथवा केवळ इंद्रियनिग्रह करण्याच्या हेतूने काही बचत केलीत काय ?

१५. काम, क्रोध वगैरे षड्‌रिपुंच्या तावडीत सापडण्याजोगे किती प्रसंग आज उद्‌भवले ? व त्यापैकी किती प्रसंगात विवेकाने त्याचा पगडा चालू दिला नाही ?

१६. नामजपाप्रित्यर्थ किती वेळ खर्च केलात व जपसंख्या काय झाली ?

१७. सुखात अथवा समाधानात गेला असे ज्यास तुम्ही म्हणू शकाल असा किती काळ आज आपण अनुभवलात ? ते कशामुळे घडून आले ?

१८. त्याचप्रमाणे 'दु:खात अथवा असमाधानात' गेला असे ज्यास तुम्ही म्हणू



शकाल असा किती काळ आज आपण अनुभवलात ? ते कशामुळे घडून आले ?

१९. प्रापंचिक कर्मे निरासक्त बुद्धीने करण्याकडे मनाची प्रवृत्ती उत्तरोत्तर वाढत आहे ना ? आज सकाम कर्मे कोणती घडली ?

२०. आजचा दिवस यथायोग्य रितीने पार पाडल्याचे समाधान या क्षणी आपणास लाभत आहे ना ?

--- --- --

## ११. सेवक व भक्तभाविक नियमावली :

तुमच्या नित्य जीवनात अशांतता निर्माण झाली व बिकट आर्थिक परिस्थितीला किंवा इतर प्रतिकूल परिस्थितीला कंटाळून जाऊन जीवनांत सुख, समाधान निर्माण करण्यासाठी परमपूज्य बाबांच्या शोधात तुम्ही आलात. वास्तविक अशा वेळी तुम्ही बाबांचा शोध घेण्यासाठी येत नाही, तरी 'मी कोणत्या प्रकाराने सुखी होईन' हे पाहण्याचा प्रयत्न करण्यासाठी येता. जो पर्यंत बाबांच्या कृपाप्रसादाने जीवनांत सुख, शांती लाभलेली नसते, तोपर्यंत तुम्ही येथील प्रत्येक आचार-विचाराच्या नियम बद्धतेशी सहमत असता. परंतु एकदा तो कृपाशीर्वाद लाभला व आराम वाटू लागला की 'येथील कार्यपध्दतीत काही चुका आहेत, काही सुधारणा व्हायला पाहिजे' असे तुम्हाला वाटते. पण एवढ्यावरच तुम्ही न थांबता आपले आचार-विचार इतर भक्त-भाविकात फैलावण्याचा प्रयत्न सुरु करता. अशा वेळी जर एखाद्या कार्यपध्दतीसमोर येणाऱ्या जाणाऱ्या भक्त-भाविकांसाठी कार्याच्या हिताच्या दृष्टीने नियमावली नसेल, तर कार्यपध्दत ही प्रत्येकाच्या इच्छा वासनेचे बाहुले बनते. यासाठी ही नियमावली तुमच्या समोर अध्ययनार्थ ठेवली आहे. तिचा अभ्यास प्रत्येकाने जर प्रामाणिकपणे केला, तर समितीच्या कार्यपध्दतीचा फायदा जास्तीत जास्त लोकांना होण्यास कारण तुम्ही व्हाल.

ज्या कोणा भक्तभाविकास या ठिकाणी येऊन काही वर्षे झाली आहेत. व ज्यांना जीवनात सुख, समाधान मिळाल्यामुळे आपल्याही हातून काहीतरी सेवा व्हावी, अशी इच्छा असेल त्यांनी हा आपला हेतू वैयक्तिक जीवनापुरता मर्यादित न ठेवता जे संकटांनी रंजले गांजले आहेत अशांच्या दुःख निवारणार्थ परमपूज्य बाबांच्या कृपा-छायेखाली सेवा करण्यास स्वयंस्फूर्तीने पुढे येणे हेच कालांतराने समाजाच्या सुख शांतीचे कर्तव्य ठरणार आहे. कारण तुम्ही ज्यांना सद्गुरुस्थानी मानले आहे, त्या सत्पुरुषानेसुध्दा आपले सारे जीवन लोककल्याणासाठीच व्यतीत केले. तेव्हा हा या जनसेवेच्या परंपरेचा वाटा निःस्वार्थपणे व कर्तव्य बुध्दीने उचलण्यास तयार होण्याची जबाबदारी ही तुमची आहे. या सेवेचा वाटा तुम्ही प्रामाणिकपणे उचललात की, खऱ्या अर्थाची ईश्वरसेवा तुम्ही करु लागलात हे सिध्द होईल. या साठी तुम्हास सेवक बनणे आवश्यक आहे. जर तुम्हास महाराज, स्वामी, सद्गुरु, परमहंस इत्यादी बनावयाचे असेल तर त्यासाठी ही कार्यपध्दती नाही. आता तुम्ही सेवक या अवस्थेची पायरी चढण्यास आरंभ करणार आहात. अशावेळी स्वतःचा तोल सांभाळणे आवश्यक आहे. कारण अशावेळी गादीवर येणाऱ्या भक्तभाविकांचे परिचय वाढून तुमच्या ठिकाणी स्वार्थबुध्दी, अहंभाव इ. मनोविकार बळावू लागतात व आलेल्या दुःखी लोकांना 'माझ्यामुळे सुख समाधान प्राप्त



होत आहे' या फाजील विश्वासाने तुम्ही उपस्थित भक्तभाविकांशी वागू लागता. त्यामुळे समोर चढण्यास सोपी आणि सुलभ अशी सद्गुरुकृपेची वाट दिसत असली, तरी अहंकाराच्या मदांधतेमुळे तुम्ही ती चढू शकणार नाही. ती चढण्यासाठी तुम्ही जो यशस्वी पाया निर्माण करणार आहात, तो ढोंगी व स्वार्थी असा असता कामा नये व इतरांनाही तो असा आहे हे वाटता कामा नये.

लोककल्याणार्थ ज्या कार्याची स्थापना ईश्वरी आज्ञेने केली गेली आहे, तिला तुमच्या आचार विचारांमुळे यत्किंचितही कलंक लागून त्याची बदनामी होईल असा कोणताच अनुचित प्रकार घडता कामा नये, म्हणून अत्यंत सावधानतेने, आत्मविश्वासाने, जिव्हाळ्याने, प्रेमाने 'सेवक' या अवस्थेची पायरी आत्मसात करावयाची आहे. त्यासाठी ज्याला खरोखर प्रामाणिकपणे आपली जबाबदारी ओळखून ती जगताच्या हिताच्या दृष्टीने पार पाडावयाची आहे, त्यानेच आपले जीवन या कार्यपध्दतीत व्यतीत करणे योग्य होईल. नुसते येथील उपस्थितीत 'जुना भक्त आहे, म्हणून कार्यपध्दतीत ढवळाढवळ करण्याचा अधिकार मला आहे.' ही बेजबाबदारपणाची भूमिका कदापिही निर्माण करु नका. जर तुम्हास तुमचे आचार विचार समितीच्या कार्यपध्दतीस पोषक अशा स्वरुपामध्ये बदलता येत नसतील, तर तटस्थपणाने ते सुधारण्याकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावयास पाहिजे. या सर्व शिस्तपध्दतीचे आचरण कशा प्रकारचे असावे यासाठी खालील नियमावली समितीने भक्तभाविक व सेवक यांच्यासाठी आत्मसात केली आहे. ज्याला या नियमबध्दतेची जबाबदारी पेलणार नसेल, त्याने प्रामाणिकपणे आपली भूमिका व्यक्त करावी. परंतु दुसऱ्याचे अहित होईल असा विचार किंवा आचार प्रकट करु नये.

**नियमावली :**

१. ही कार्यपध्दत सद्गुरु आज्ञेच्या प्रेरणेने चालली आहे. ती कोणाच्याही इच्छा वासनेसाठी किंवा सोयीसाठी बदलली जाणारी नाही. ती सद्गुरू आज्ञा असल्याने तिचे पालन करणे हे तुमचे कर्तव्य आहे. कार्याच्या दृष्टीने त्याची यथायोग्यपणे अंमलबजावणी होत असता ती करणारा सेवक हा नवा, जुना असा भेदभाव कोणीही प्रकट करु नये. आणि अशा गुरुआज्ञांशी तुम्हाला एकनिष्ठ रहावयाचे आहे, ही दृढनिष्ठा असली पाहिजे.

२. प्रत्यक्ष कार्य आणि तुम्ही सेवक यात महदंतर आहे. याची जाणीव पूर्णपणे सेवकास असावयास पाहिजे. कोणतेही काम करतांना येणाऱ्या व्यक्तीचे दुःख संयमाने व सहनशीलतेने ती व्यक्ती जे जे काही सांगेल ते ऐकून घ्या. मात्र तुम्ही त्यांच्याशी

बोलताना उगाच पाल्हाळ न लावता किंवा इतरेजनांचे अनुभव पुढे न करता त्यांना सुख समाधान देण्यासाठी त्यांच्या प्रश्नाला अनुसरुन, त्यांना सहज समजेल अशा सोप्या व सरळ भाषेत उत्तर द्या. समितीच्या मार्गदर्शनार्थ आलेला कोणीही भक्तभाविक यास तुच्छ लेखून उद्धटपणाने वागू नका. तुमचे बोलणे हे गोड, स्नेहभावनेने मन जिंकणारे असे असू द्या. त्यांच्या दुःखात जास्तीत जास्त समरस होण्याच्या कर्तव्यास कदापिही विसरु नका.

३. तुम्ही जेव्हा समितीच्या कार्यपद्धतीचे कार्य हाती घेऊन आलेल्यास दुःख निवारणार्थ मार्गदर्शन करता, ते तुम्ही करत नसून तुमच्याकडून करविले जात आहे हे विसरु नका. तेव्हा असे काम हाती घेतल्यावर अत्यंत शुद्ध आणि पवित्र मनाने करा. हा गरीब, हा श्रीमंत, हा हिंदू, तो क्षुद्र असा भेदभाव निर्माण न करता किंवा हा जवळचा, हा नात्यागोत्याचा, हा ओळखीचा अशी भावना निर्माण करुन कोणतेही काम केले जाऊ नये.

४. तुम्ही या ठिकाणी दुःख निवारणार्थ मार्गदर्शन व्हावे म्हणून येता. आल्यावर सहज परस्परांविषयी बंधुभाव निर्माण करता. पण ही भावना सात्विकतेचे प्रतिक असतेच असे नाही. कारण ज्या अडिअडचणींच्या निवारणार्थ तुम्ही येथे आलात त्यासाठी गुरुप्रसादाने दुःख निवारण करुन न घेता गादीला, कार्याला, सेवकाला मध्यस्थ करुन अगर मानून पैशासंबंधी देवाण-घेवाण, उधार उसनवारी अगर • अन्य व्यवसायासंबंधी व्यवहार करण्याचा प्रयत्न करता. केलेल्या व्यवहाराची जबाबदारी पूर्णपणे पार पाडण्याचे कर्तव्य तुम्ही न करण्याने कार्यास अपवाद निर्माण होतो. अशासाठी कोणाही भक्तभाविकाने किंवा सेवकाने आपल्या परस्परांतील बंधुभाव व लोभ यांचा फायदा घेऊन पै पैशाचा व्यवहार करु नये. तसे केल्यास पुनश्चः त्यांनी समितीच्या मार्गदर्शनार्थ येऊ नये.

५. समितीच्या कार्यपद्धतीत जी सामुदायिक उपासना म्हणजे आरती आहे. तिला बसतेवेळी आपणापासून बाजूच्या कोणासही उपद्रव होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपण एकटेच परमपूज्य बाबांचे गुणगान गाण्यात व आरतीत खूप तन्मय झालो आहोत असे भावनावश होऊन हातवारे करणे, सारखा नमस्कार करणे, वेडेवाकडे डोलणे किंवा बाबांच्या पायाशी दृढ मिठी मारण्यासाठी आपल्याला बोलाविले जात आहे असा आभास निर्माण करु नये. त्याचप्रमाणे आरती चालू असता आपल्यात काही दैवी संचार आहे. असाही भाव निर्माण करुन तन्मयतेच्या भावनेचे विडंबन कोणीही करु नये. तशा प्रकारचे दैवी संचार कोणाही भक्तभाविकात किंवा सेवकात असल्यास त्याची या



कार्यपद्धतीस आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे आरती संपल्यावर 'आपली सम्मधी लागत आहे' असे वाटून कोणीही बसून राहू नये व तसे बसल्यास शेजारच्या सेवकाने त्यास सावध करुन उगाचच जागा न अडविण्याबद्दल सूचना करावी.

६. जे कोणी सेवक आलेल्या भक्तभाविकांना मार्गदर्शन करतात किंवा निराकरण सूचवितात त्यांनी त्यापासून त्रास झाला आहे किंवा त्याची बाधा आपल्यावर आली आहे असे समजून स्वैर हावभाव प्रकट करुन कार्यपद्धतीच्या कामकाजात अडथळा निर्माण करु नये. तशा प्रकारच्या बाधा किंवा त्रास परमपूज्य बाबांच्या कृपेने होत नाही. व झाल्यास त्या सेवकाने व भक्तभाविकांने त्याचे प्रदर्शन इतरांसमोर न करता तो त्रास कमी होण्यासाठी सद्गुरु नामस्मरण करीत बाजूला बसावे.

७. समिती जे मार्गदर्शन करते, त्यावेळी जो प्रसाद, विभूती किंवा आशीर्वाद दिला जातो त्याचा उपयोग दुसऱ्याला द्वेष भावनेने पाहण्यासाठी किंवा सूड बुद्धीने दुसऱ्याचे वाईट होण्यासाठी दुष्ट इच्छेने कोणीही करु नये. प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या तरी परमेश्वराचा भक्त आहे ही गोष्ट कदापिही विसरू नये. तेव्हा तुम्ही घेतलेला प्रसाद, विभूती, आशीर्वाद याचा उपयोग स्वतःचे कल्याण होण्यासाठी करावा.

८. या कार्यार्थ ज्या भक्तभाविकांनी आपली भूमिका सेवक म्हणून ठरविली आहे त्यांनी आपापसात कोणताही भेद निर्माण करु नये. अमूक सेवकाने जे सांगितले ते चूक व मी सांगतो तेच खरे किंवा मी खूप जुना म्हणजे अनुभवी व तो नवा; असा अहंभाव म्हणजे कार्य नव्हे. कारण अशा परिस्थितीत नवीन येणारा भक्तभाविक गोंधळून जाऊन खऱ्या मार्गाचा अवलंब करु शकणार नाही. यासाठी सेवकांनी समितीच्या कार्यपद्धतीचे अध्ययन करुन कार्याच्या दृष्टीने एकसूत्रीपणा निर्माण करावा.

९. तुमची येथील उपस्थिती ही आचार विचाराने कमालीची शिस्तबद्ध व आत्मियतेच्या भावनेने असावयास पाहिजे. बाह्य जगतातील तुमचे आचार विचार हे तुमच्या दृष्टीने जरी यथायोग्य असले तरी ते येथील पवित्र मंगल अशा वातावरणास योग्य असतीलच असे नाही. तेव्हा तुम्ही आचार विचारांनी येथील कार्यपद्धतीत सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न करु नका. या ठिकाणी येण्यापूर्वी तुमच्या आचार विचारास जर घातुक सवयी लागलेल्या असतील तर संस्कारांनी त्या तुम्ही बदलून घेण्यानेच तुमचे हित होणार आहे. यासाठी येथे आल्यावर शांतता, नम्रता, विनय, स्नेहभाव, मधुरवाणी, आपलेपणा व कार्याची तत्परता या अंगानी तुम्ही युक्त व्हावयास पाहिजे. तरच तुम्ही उपासक किंवा 'सेवक' आहात. नाहीतर तुमच्या आचार विचारांचा पगडा इतरांच्या मनावरही अयोग्य तो परिणाम केल्याशिवाय राहणार नाही. व अशाने कार्यास स्थैर्य व

प्रगती लाभणार नाही. तेव्हा उपस्थित सेवकांनी आपल्या वैयक्तिक आचार-विचारांची ओळख बारकाईने सद्गुरुसान्निध्यात बसून करुन घ्यावी. ते शक्य नसल्यास नुसती उपस्थिती संख्या वाढविण्यास कारण होऊ नये.

१०. तुम्हाला जीवनात स्वतःच्या उन्नतीसाठी फारच थोडा वेळ मिळतो. तो बहुमोल वेळ येथे आल्यावर आरती, पाठ, पारायणे, जपजाप्य व चिंतन यात खर्च करणे हे केव्हाही कार्याच्या प्रचारापेक्षा जास्त हितावह होणार आहे. कारण तुम्हाला मिळणारा वेळ तुम्ही स्नेही, सहाध्यायी, गुरुबंधु यांच्याशी निष्कारण गप्पा मारण्यात व कार्याच्या कार्यपद्धतीसंबंधीचे अनुभव किंवा प्रचिती सांगण्यात खर्च करता. तीच सवय बाह्य जगतातही एकमेकांना भेटल्यावर चालू ठेवता. अशाने तुम्ही कार्याचे एकनिष्ठ सेवक आहात हे सिद्ध होत नाही. तुमच्या एकनिष्ठतेचे लक्षण हे असावयास पाहिजे की, 'मला स्वतःची उन्नत्ती करुन घेऊन इतरांच्या सुखासमाधानासाठी काहीतरी ध्येयवाद निश्चित करावयाचा आहे! यासाठी मिळणारा प्रत्येक क्षण हा मोलाचा आहे. ही जाणीव ठेवून जी जबाबदारी तुम्ही स्विकाराल, ती पार पाडण्यासाठी पराकाष्ठा म्हणजेच तुमची एकनिष्ठता! याचा विचार प्रत्येक भक्तभाविकाने व सेवकाने करावा.'

११. या कार्यपद्धतीचा पाया परिपूर्ण तऱ्हेने निःस्वार्थ सेवा करण्याचा आहे. तेव्हा कोणाही सेवकाने कोणत्याही कारणाप्रित्यर्थ कोणाही भक्तभाविकाजवळ पै-पैसा मागू नये व त्याप्रमाणे सेवेचे धोरण ठरवू नये. येणाऱ्या भक्तभाविकाने कार्याची भूमिका पूर्णपणे समजावून घेऊन ज्ञानाने आपल्या सद्सद्विवेकबुध्दीला स्मरून जी गुरुदक्षिणा म्हणून ठेवावयाची असेल, ती परमपूज्य बाबांच्या चरणी ठेवावी.

१२. ज्या कोणा सेवकास वैयक्तिक उपासना अगर अन्य साधनामार्गाचा अवलंब करावयाचा असेल, किंवा तिर्थक्षेत्रांच्या किंवा यात्रेच्या स्थळी जाऊन सेवा करावयाची असेल, त्यास समितीतर्फे आज्ञा दिली जाणार नाही. कारण समितीतर्फे करण्यात येणारे मार्गदर्शन यात 'वैयक्तिक कर्तव्याची जबाबदारी प्रथमतः स्विकारावी व सहजगत्या नित्य सेवेची सवय लावून घ्यावी', अशी शिकवण दिली जाते. वर्षातून एकदा अशी सेवा करण्याने ईश्वरी कृपा कदापिही लाभणार नाही. तेव्हा नित्य उपासना व साधना करुन तुम्ही आपली प्रगती निश्चित करु शकाल. यासाठी कार्यपद्धतीत नमूद केलेल्या उपासनेत भाग घ्यावा.

१३. 'सद्गुरुप्रसाद' म्हणून देताना सेवकांनी 'उदी' हाच प्रसाद द्यावा. याशिवाय कोणी नारळ, पेढे किंवा खडीसाखर आणल्यास ती नैवेद्य दाखवून द्यावी. याशिवाय निरनिराळ्या देवदेवतांच्या तसबिरी, प्रतिमा, स्तोत्रांची पुस्तके, पोथ्या, अंगठ्या किंवा



गळ्यातील ताईत (लॉकेट) देऊ नये. कारण क्षणोक्षणी आपल्याला व्यवसायाच्या निमित्ताने इकडे तिकडे जावयाचे असते. अशावेळी योग्य ते पावित्र्य ठेवता येत नाही.

१४. तुमच्या येथील उपस्थितीत तुम्ही स्वतःस गरुबंधु यापेक्षा जास्त स्वतःची ओळख येथे आल्यावर ठेवता कामा नये. कारण या कार्याची भूमिका सहकार्याने काम करण्याची वृत्ती निर्माण करावयाची अशी आहे. यासाठी एकमेकाने एकमेकास सांगितलेली कामें किंवा केलेली विनंती ही 'गुरुआज्ञा आहे' इतक्या पूज्यतेने मानली पाहिजे. तिची अवज्ञा अगर अव्हेर करुन 'तू मला कोण सांगणार ?' 'तुला काय अधिकार' हे अपशब्द अशा कार्याच्या भूमिकेत कदापीही बसत नाहीत. यासाठी प्रत्येकाने आपापसात सहकार्य व सक्रिय सहानुभूती निर्माण करणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. दैनंदिन उपासनेत ही एक प्रकारची उपासनाच आहे. कारण पारमार्थिक उन्नत्तीची जी अनेक लक्षणे आहेत. त्यात सहनशीलता हे एक प्रमुख लक्षण आहे.

१५. या कार्याच्या स्थापनेचा हेतू वादविवाद, खंडनमंडन, तुलना, चर्चा असा नसून तात्विक मिमांसेतून जीवनाचे प्रत्यक्ष दाखले देत देत आवश्यक त्या आचार विचारांचे बीज सामान्य मनुष्याच्या जीवनांत रुजवून त्याचे आचार विचार मानवता धर्माची सेवा करण्यासाठी तयार करावयाचे असा आहे. याशिवाय धर्माचरण, ईश्वरभक्ती या संस्काराच्या जीवनाने जीवनात सुख, शांती, समाधान निर्माण करण्यासाठी या समितीची कार्यपद्धत स्वयंविचार, स्वयंतत्त्व व स्वयंनिराकरण यावर अधिष्ठीत तत्त्वांनी चाललेली आहेत. तेव्हा कोणाही भक्तभाविकाने अथवा सेवकाने कोणत्याही प्रकारचे वादविवाद चर्चा किंवा तत्त्वज्ञान विषयक विचार एकमेकांसमोर मांडून एकमेकांतील अभ्यासू वृत्तीचा कमी जास्तपणा दाखवू नये. तुमची अभ्यासू वृत्ती ही ज्या ज्या ज्ञानाने परिपूर्ण झालेली असेल, त्याचे मूल्यमापन तुमच्या आचार विचारावरुन होत असते. या कार्याचे तात्त्विक ध्येय सेवा करावयाची असे आहे. तेव्हा मानवतेची सेवा हाच खरा धर्म व तीच नित्य उपासना आहे असे समिती मानते.

१६. येणाऱ्या भक्तभाविकाने कोणाही सेवकास महाराज, गुरु, स्वामी वगैरे नावाने संबोधू नये. तसेच तिलक लावून, हार फूले घालून, पंचारती ओवाळून पूजा करु नये. कोणाही सेवकास तशी पूजा घेण्याचा अधिकार पोहोचत नाही. फार तर सेवकांना विनम्रपणे नमस्कार तो ही हात जोडून करावा. ज्यांना हार फुले समर्पण करावयाची असतील ती त्यांनी सद्गुरुचरणी अर्पण करावी. या कार्यपद्धतीत व्यक्ति पूजनास महत्त्व नसून कार्याची पूज्यता मानण्यास महत्त्व आहे. हे कार्य म्हणजे येणारा प्रत्येक भक्तभाविक व सेवक होय. तेव्हा कार्याकडे दुर्लक्ष करुन वैयक्तिक पूजनाचे महत्व

वाढवू नये.

१७. एखाद्या भक्तभाविकास किंवा सेवकास एखाद्याच्या चुका किंवा दोष निदर्शनास आणावयाचे असतील तर ते एकमेकात न फैलावता किंवा सूडबुद्धीने चार चौघांसमोर व्यक्त करुन वाद निर्माण करण्यास कारण होऊ नये. जर खरोखरीच अशा चुका किंवा दोष या कार्य पद्धतीस पोषक नसतील, तर त्याबद्दल योग्य तो विचार जरूर केला जाईल. पण व्यक्तिगत काही विचार कारण नसतांना मांडावयाचे असतील किंवा सुव्यवस्थितपणे चाललेल्या कार्यपद्धतीत दोष दाखवायचा असेल तर त्या व्यक्तिने आपली उपस्थिती येथे न ठेवणे हे उत्तम!

१८. प्रत्येक कार्यकेंद्र हे एखादे मंदिर, मठ, धर्मशाळा अगर अन्नछत्र अशासारखे सार्वजनिक स्थान नाही. हे स्थान एका कुटुंबवत्सल मनुष्याच्या कुटुंबात त्याच्या परवानगीने व त्याच्या सदिच्छेनुसार अधिष्ठित केलेले आहे. तेव्हा त्या कुटुंबाच्या नित्य व्यवहारात कोणत्याही तऱ्हेचा त्रास अगर अडचण न होईल अशा तऱ्हेने सेवकाने आपल्या सेवेची भूमिका ठेवावी. सेवेच्या वेळे व्यतिरिक्त या ठिकाणी येऊन बैठकीच्या अड्ड्याचे स्वरुप किंवा विश्रांती स्थान बनवू नये. त्याचप्रमाणे कोणाही सेवकाने कोणत्याही कार्यकेंद्रावर गेल्यावर कामाव्यतिरिक्त पाहूणचार घेत राहू नये.

१९. ज्या सेवकांना या कार्यात सद्गुरु आज्ञेने कार्याची सेवा करण्याची आज्ञा दिलेली आहे व पुढेही अन्य कोणास दिली जाईल त्याने सेवा कर या आज्ञेचा अर्थ आपले विहित कर्म किंवा कर्तव्य बाजूला सारुन किंवा नोकरी अगर व्यवसाय सोडून आपले जीवन संपूर्णपणे या कार्यासाठी वाहून घ्यावे व सद्गुरुचरणी जमणाऱ्या पै-पैशावर उदरनिर्वाह करावा, असा घेवू नये. कारण या कार्यपद्धतीत मार्गदर्शनार्थ आलेल्या भक्तभावविकाकडून पै-पैसा घेतला जात नाही किंवा भक्तभाविक प्रामाणिकपणे तसा देतही नाही. याशिवाय सेवेचे मूल्य मासिक पगारासारखे असू शकत नाही. म्हणून प्रत्येक सेवकाने आपल्या कर्तव्याची जाबबादारी सांभाळून आयुष्यातील राहणारा वेळ अन्य तऱ्हेने खर्च न करता तो सत्कारणी लावावा हेच या कार्यपध्दतीचे वैशिष्ट्य होय.

२०. पूर्वीपासून ज्या देवदेवतांच्या तसबिरी आहेत. त्यामध्ये कोणत्याही कारणास्तव कोणीही स्वेच्छेने आपल्या पसंतीनुसार अप्राप्य म्हणून देवादिकांच्या तसबिरींची संख्या अधिक वाढवू नये. त्याचप्रमाणे ज्या सेवकांना ज्या कार्यकेंद्रावर ज्या प्रकारची सेवा करण्याची आज्ञा झालेली असेल त्या केंद्राशिवाय अन्य केंद्रावर काम करण्यास आज्ञेशिवाय मनाई आहे. कारण सेवकास निरनिराळ्या कार्यकेंद्रावर काम



करण्याचा मान अगर संधी प्राप्त झाली आहे असे वाटून त्याच्या ठिकाणी अहंभाव वाढेल व आपण इतरांपेक्षा कोणी विशेष श्रेष्ठ आहोत असे वाटून तो सेवक आपल्या सहकाऱ्यांना तुच्छतेने पाहू लागेल. ही गोष्ट संघटीत कार्यपद्धतीस घातकच होय.

२१. आलेल्या भक्तभाविकांच्या दुःखनिवारणार्थ ज्या सिद्धसिद्धान्त पद्धती निराकरण म्हणून सांगितल्या जातात. त्या दुःखमिमांसेच्या दृष्टीने पूर्ण अभ्यासिलेल्या आहेत. तेव्हा याव्यतिरिक्त कोणत्याही ऐच्छिक स्वरुपाचे निराकरण कोणाही सेवकाने आलेल्या भक्तभाविकांस सांगू नये व भक्तभाविकानेही समितीच्या कार्यपद्धतीशिवाय सांगितलेले निराकरण मान्य करू नये.

२२. समितीच्या कार्यपद्धतीची ओळख म्हणून जे सूचनापत्र जाहीर झाले आहे, त्याचा अभ्यास प्रत्येक सेवक व भक्तभाविक याने करून आपली भूमिका त्या कार्यपद्धतीत बसविण्याचा प्रयत्न करावा. कोणत्याही नियमाचे ज्ञान-अज्ञानाने उल्लंघन होऊ नये, याची खबरदारी प्रत्येकाने घेतलीच पाहिजे. तसेच होणाऱ्या चुका निदर्शनास आणून देण्याची वेळ आणू नये.

२३. पुणे केन्द्र येथील गादीची प्रतिष्ठा ही आद्य होय. तेव्हा या केंद्रावर ज्या आवश्यक व योग्य अशा सुधारणा कराव्या लागतील त्या प्रत्येक कार्यकेंद्रावर झाल्याच पाहिजेत असा तेथील सेवकांनी अट्टाहास धरणे हे चुकीचे आहे. हेकेखोरपणाने या आद्य गुरूपीठाची हुबेहूब प्रतिकृति करण्यासाठी कोणाही सेवकाने वर्गणीच्या रुपाने, देणगीच्या रुपाने किंवा मार्गदर्शनाचा मोबदला म्हणून पै-पैसा जमा करून स्पर्धा करण्याचा विचार मनात आणू नये. आद्य गादीच्या परवानगीशिवाय कोणत्याही सुधारणा किंवा कार्यपद्धतीत बदल कोणाही सेवकाने आपल्या इच्छेने करू नये.

२४. या कार्यपद्धतीचे परिपूर्ण मार्गदर्शन हे प्रमुख मध्यस्थाकरवी ज्या दिव्य-पुण्य विभूतिंनी केले होते, त्यातील उपदेश म्हणून जो काही भाग आहे, तो सामान्य माणसाच्या जीवनाला कशा प्रकारे पोषक आहे, याचा विचार सेवकांनी करावा. त्यास शास्त्राधार शोधीत बसण्याने कदापिही तुम्ही आपली उन्नती करून घेऊ शकणार नाही. ते मार्गदर्शन ज्या ओजस्वी व रसाळ अशा मधुरवाणीने तुम्हाला ऐकावयास मिळते, तो अमृतवर्षाव चाखण्यानेच जीवनात अवीट गोडी निर्माण होणार आहे. त्या स्फुल्लिंग वाणीशी तुम्ही समरस होऊन तन्मय झालात की तुमच्यातूनही ती वाणी त्याच ओजस्वी व मधुरतेने पाझरेल. याचा अर्थ 'माझ्यात विभूतिंचा संचार होणार आहे' असा विचार चुकूनही कोणी मनात आणू नये. कारण जेव्हा एखाद्या लोककल्याणाचे कार्य ईश्वरी आज्ञेने निर्माण होते, तेव्हा ती आज्ञा ही एका प्रमुख मध्यस्थाचे साध्य असते व इतरांचे

ते साधन असते. याशिवाय या कार्यात लोककल्याणार्थ जे मध्यस्थ तयार केले गेले आहेत व पुढे केले जातील, त्यांनी आपल्यामध्ये निर्माण केलेल्या मध्यस्थाच्या गुणधर्माचे महत्त्व हे दुसऱ्यांशी तुलनात्मक दृष्टीने पडताळून पाहू नये. या दृष्टीने प्रत्येकाचे कार्यकारण हे महत्त्वाचे आहे. तेव्हा आपल्या ठिकाणी निर्माण केलेला गुण तो परिपूर्ण तऱ्हेने वाढविणे व जोपासणे हे कर्तव्य सेवकांनी विसरता कामा नये. प्रकृतिधर्माप्रमाणे प्रत्येकात काही ना काही गुणांचा अभाव हा रहाणारच. तेव्हा त्या बाबतीत 'आपण खूपच दुर्दैवी आहोत' असे वारंवार वाटणे चुकीचे आहे.

२५. समितीच्या कार्यपद्धतीत लोककल्याणाच्या कामाप्रित्यर्थ जे सेवक नियुक्त करण्यात आले आहेत, त्यांना काही अपरिहार्य कारणामुळे येथील कार्यकेंद्रावर अनुपस्थित रहाणे भागच असेल तर परस्पर आपल्या अधिकारात त्यांनी ती जबाबदारी दुसऱ्यांवर न सोपवता तशी सूचना २४ तास अगोदर केंद्रप्रमुखास देऊन आपल्या सहाध्यायी सेवकबंधूस ते काम करण्याबद्दल विनंती करावी.

२६. नियुक्त सेवकांनी त्यांच्यावर कार्याची जी जबाबदारी सुपूर्द करण्यात आलेली आहे, ती कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने त्यांच्या जीवनात निश्चितता निर्माण व्हावी, उपासनेची सवय लागावी व याचबरोबर पावित्र्य आणि सिद्धतेच्या दृष्टीने पोषक असलेला आत्मविश्वास निर्माण व्हावा, म्हणून नित्य किमान एक तास तरी उपासनेत व्यतीत करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे भक्तभाविकांनी देखील आपल्यावर येणाऱ्या आपत्तीचे किंवा दुःखाचे निवारण होण्यास सहाय्य लाभावे म्हणून रोज एक तास श्रीसद्गुरू उपासना करणे जरूरीचे आहे.

२७. कोणाही सेवकांस कोणी भक्तभाविकाने आपल्या अडिअडचणी समजाविण्यासाठी किंवा त्याची राहती जागा पहाण्यासाठी बोलावल्यास त्याच्या इच्छेला मान देऊन तुम्ही जाऊ शकता. मात्र तेथील सर्व परिस्थिती समजावून घेतल्यानंतर तेथेच त्यांच्या घरी दुःखनिवारणार्थ निराकरण सांगत बसणे किंवा निराकरण करणे हे योग्य नाही. त्यांना निःसंकोचपणे समितीच्या कार्यपद्धतीबद्दल योग्य ती माहिती देऊन कार्यकेंद्रावर येण्याप्रित्यर्थ नम्रतापूर्वक सूचना द्यावी. या कार्यपद्धतीत 'मी एक सेवक म्हणून व्यक्तिशः अशा प्रकारचे काम पाहतो' हे न दर्शविता या कार्यपद्धतीमागे 'श्रीसाई आध्यात्मिक समिती'ची संघटित व शिस्तबद्ध विशाल योजना आहे व ही समिती म्हणजे 'आपण सर्व आहोत' हे तत्त्व प्रत्ययास आणून देणे प्रत्येक सेवकाचे आद्य कर्तव्य होय.

--- --- --



## १२. उपसंहार :

आज समाजाची या मार्गाकडे पाहण्याची दृष्टी इतकी शंकेखोर झाली आहे, याला कारण आजपर्यंत या मार्गातील लोकांनी केलेली वैयक्तिक उपासना. खरोखर 'उपासना ही देवाप्रित्यर्थ आहे का ?' असे विचारल्यास त्याचे उत्तर मिळू शकणार नाही. देवाची उपासना स्वतःप्रित्यर्थच असते हे इतके रूढ झाले आहे की, देवासमोर बसून शिव्या जरी दिल्या तरी ती उपासनाच ! असे म्हणणारा वर्ग समाजात होता व आहे. वास्तविक अशा प्रकारची उपासना ही उपासना नसून ती उपासमार आहे ! त्यामुळे देव असून नसून सारखाच. यासाठी देवांची उपासना याचा अर्थ नित्य आचाराची निश्चितता व आपल्या इंद्रियवासनेची उपासना; याचा अर्थ मनोनिग्रह करण्यानेच उपासना होणार आहे व आजच्या क्षणाला समाजातील आस्तिक किंवा नास्तिक या दोघांनाही समाजकल्याणार्थ ती आवश्यक आहे.

आपण भक्तमंडळी अनेक प्रश्न विचारण्यासाठी येता. त्यांचे निराकरण सांगून समिती संस्काराचे जीवन निर्माण करू मागते आहे. ते आपल्या जीवनात निरंतर निर्माण व्हावे या सदिच्छने येथील 'निराकरण' पद्धतीचा अभ्यास करा. पुष्कळ आलेल्या भक्तांना प्रचिती अशी आली आहे की, अडचणी निवारणार्थ सांगितलेले निराकरण म्हणजे विचारलेल्या प्रश्नापेक्षाही मोठे संकट आहे असे त्यांना वाटते. ही भक्तमंडळी अज्ञानाने जातात याचे दुःख वाटते. वास्तविक अडचणी प्रित्यर्थ विचारलेल्या प्रश्नाची मिमांसा ही दोन प्रकारांनी जाणवते. १) जन्मजन्मांतरातील राहिलेला ऋणभाग २) या जन्मात त्यात काय अर्थ आहे, असे म्हणून दुर्लक्ष केलेला भाग, पण आजपावेतो असा एकही भक्त किंवा भाविक येथे आला नाही की, ज्याला अशी तळमळ आहे की हे जीवन पूर्णत्वाने गुरूकृपेचे बनवावे, जीवनातील इच्छा पूर्णत्वास येण्यास व फलदायी होण्यास कालावधी लागतोच आणि त्या कालपावेतो आपली भावना म्हणजेच विचार निश्चित होण्यासाठी व पुढेही तसेच रहाण्यासाठी दैवी संस्कार होणे आवश्यक आहे.

जगातील कोणताही धर्म, कोणतेही शास्त्र भावनेशिवाय निर्माण झालेले नाही. निरंतर भावनेची स्थिरता हीच श्रद्धा होय. श्रद्धा ही ईश्वरप्रणितच असते, हा बुद्धिवाद चुकीचा आहे. जीवनातील प्रत्येक क्षणाला श्रद्धेची आवश्यकता आहे. येथे येणारी बरीच भक्तमंडळी श्रद्धेचा पाठपुरावा केल्याचा भास निर्माण करतात. परंतु ही श्रद्धा संस्काराशिवाय वाढणारी नाही. त्यामुळे कितीही श्रद्धावान असल्याचा भास निर्माण केला तरी ते समजल्याशिवाय रहाणार नाही. कारण श्रद्धा वाढली म्हणजे भावना जोपासू

लागते. आणि मन हळूहळू ऐहिक जीवनाबद्दल आसक्तीचे विचार कमी होऊन सद्‌गुरूशिवाय किंवा धर्माचरणाशिवाय जीवन व्यर्थ आहे ही भावना जागृत होते. या नि:स्वार्थ भावनेपोटी जे कार्य किंवा कारण निर्माण करण्याची बुद्धी होईल तोच 'परोपकार' किंवा 'मानवता धर्म' होय. पण इतका सूज्ञ विचार होईपर्यंत आम्ही येथे राहू तेव्हा ! एक प्रसाद पूजला, तोही वेडावाकडा की आम्ही देवाचे गणित सोडविण्याचा प्रयत्न सुरू करतो. म्हणजे येथे आलेल्या नव्या जुन्या लोकांना त्यांना आलेले अनुभव विचारतो. तोही विचारावा, पण ज्याला स्वत:च्या जीवनाचे गणित सुटले असेल त्याला! प्रत्येकाला अनुभव येणार तो आपल्या विचाराप्रमाणे. कारण पूर्ण भावनेने परमेश्वराजवळ गेल्याशिवाय त्याचा अनुभव येत नाही. आपण ऐहिक सुख निर्माण करण्याची इच्छा करतो आहोत. हे अज्ञान हाच त्या परमेश्वराचा अनुभव. बाह्य जगतात अशाच न जोपासलेल्या किंवा संस्कार न झालेल्या भावनेला घेऊन फिरलात. पण त्या ठिकाणी संस्काराचा पाया निर्माण करणे म्हणजेच दैवी निराकरण हा ध्येयवाद तेथे नव्हता. त्यामुळे येथे आल्यावर आपण जे विचार प्रकट करता की, 'मला अमुक इतके मिळू दे, मी इतके बाबांना देईन' याचे कौतुक वाटते. अहो, अमुक आणि तमुकासाठी बाबांनी आपले जीवन निर्माण केले नव्हते. मग तुम्हाला अशा प्रकारचा अनुभव पाहिजे असल्यास आपण आपला वेळ व्यर्थ फुकट घालवू नका. त्यासाठी हे समितीचे कार्य नाही.

खरोखर, ऐहिक सुखाने जगण्याचा प्रयत्न करून आपण आज अनेक दु:खे निर्माण केली आहेत. वास्तविक तुम्ही जेव्हा जन्माला आलात, तेव्हा दु:खी म्हणून आलात का ? त्यावेळी तुमचे नाव ठेवल्यावर तुमच्या मातापितरांनी साखर पेढे वाटले ते या आशेने की आता घराण्याचा उध्दार झाला. भावी काळात आता आपल्याला कशाचीही उणीव रहाणार नाही. विचार करा. प्रत्येकाच्या जीवनात हे दृष्य येत असते. त्यावेळी त्या मातापितरांना तुम्ही म्हणजे सर्वस्व वाटता. इतकी श्रद्धा तुमच्या ठिकाणी ठेवून त्यांनी तुम्हाला लहानाचे मोठे केले. ज्ञानी केले. म्हणजे संस्कारच केले. गुरुने विद्या शिकविली व तुम्ही ज्ञानी झालात तोही संस्कारच होता. अशा जीवनाने ज्ञानी झाल्यावर आपण या संस्कारास विसरलात व म्हणू लागतात 'आई वडिलांनी काय केले ?' पण त्यांनी जो आपल्या कर्तव्याचा भाग पुरा केला तो तुम्ही तुमच्या मुलाबाळांसाठी करु शकता का ? कदाचित होईल किंवा होणार नाही आणि म्हणून तुम्ही येथे येता. येथे ज्याच्यासाठी आलात ते मिळाल्याशिवाय राहणार नाही. पण त्याचे मूल्य फार मोठे आहे हे आपल्याला न कळल्यामुळे आपल्याला जो अनुभव येतो, किंवा दुसऱ्यांना अनुभव



विचारता, तो अनुभव समितीचा नसतो. उदा. एखादा पदार्थ पाण्यावर तरंगला म्हणजे पाणी हलके आहे म्हणून चालणार नाही. तद्वतच आपल्या विचारांचे होत असते. आज समितीला तुम्हाला लाख देऊन स्वत:कडे काही हजार ठेवावयाचा स्वार्थ नाही. मानवी जीवनाचा पाया श्रद्धा व सबुरी या तत्त्वांवर निर्माण करावयाचा आहे. याचसाठी तुम्ही मार्गदर्शनाचा अनुभव घ्या. लोकांच्या विचारांचा नको. प्रत्येक निराकरण हे संस्कार घडविण्यासाठी मांडण्यास सांगितले जाते. ते यथायोग्यपणे मांडण्यानेच दु:ख दूर होणार आहे.

आज आमच्या समाजाचे जितके अध:पतन झाले आहे. तितके जगात कोणत्याही देशात किंवा धर्मात झाले असेल असे नाही. आज आपल्या भारतात अनेक धर्म आणि धर्म संस्था आपापल्या परीने आपल्या धर्माचा प्रचार करीत आहेत. पण त्यामध्ये लोककल्याण किंवा जनसेवा करण्याचे कार्य एकटा ख्रिस्ती धर्म जितक्या सुख समाधानाने करतो आहे, त्याचा अभ्यास म्हणून त्यांच्या मानवता धर्माच्या जीवनाचा आदर्श आज आमच्या समाजात कोणापुढे आहे का ? इंग्लंडमध्ये मजुरी करणारा मनुष्य दर महिन्याला मिळणाऱ्या आपल्या मासिक प्राप्तीतून धर्म प्रचारार्थ काही अंशत: रक्कम त्यांच्या धर्म संस्थांना देतो आहे. तो पैसा हिंदुस्थानात येऊन त्या पैशावर जगताच्या सुखा समाधानाचे कार्य अव्याहत चालले आहे. पण ज्यांनी अजून हिंदुस्थानसुध्दा पाहिलेला नाही, केवढी त्यांची धर्मावर श्रद्धा आहे! आणि आम्ही मात्र त्यांच्या आंग्ल भाषेचे पांघरुण घेऊन नास्तिक आहोत असे भासवतो. परंतु त्यांचा परोपकारार्थ जीवन जगणे हा आदर्श बाजुला ठेवतो आहोत. एवढ्यावरच आम्ही थांबत नाही, तर ज्या आईवडिलांचे ऋण घेऊन आम्ही पदवीधर झालो ते ज्ञान 'ज्ञानेश्वरी खरी का खोटी' हे शोधण्यासाठी खर्च करीत आहोत. परंतु ज्ञानेश्वरांनी ज्या वयात जगाच्या कल्याणार्थ आपले जीवन पूर्ण केले त्या वयात आम्हाला आमचे आई वडील एक वेळा जेऊन कसे शिकवत आहेत, हे सुद्धा समजू शकले नाही. हीच आमची आजची साधुसंतांबद्दलची श्रद्धा की, ज्यांनी आज मितीपर्यंत आपल्या नि:स्वार्थ जीवनाचा परिमल टिकविला आहे !

आज पाश्चिमात्य देश शिक्षणाने पुढे जात आहेत. त्यांच्यात खूप ज्ञानी विद्वान मंडळी आहेत. परंतु या क्षणापर्यंत कोणीही आपल्या ज्ञानाने बायबल खरे आहे की खोटे आहे, हे शोधण्यास गेला नाही. ज्या धर्म संस्था लोककल्याणार्थ कार्य करीत आहेत त्यांची निंदा नालस्ती करण्यासही कारण झाला नाही. धर्माची बंधने राजा सुद्धा पालन करीत आहे. त्या परदेशी धर्मसंस्था आमच्याच देशात येऊन आमच्या बंधुबांधवांच्या दु:खाला आपले दु:ख समजून त्यांची सेवा करीत आहेत. त्यात कोणाचे काही बरे वाईट

लक्षात न घेता, शांतपणाने धर्माज्ञा पालन करीत आहेत. धर्म म्हटले की द्वैत हे नाहीच! या भावनेने स्वत:च्या सुखाचा विचार कोणत्याही प्रकारे न करता आमच्या देश बांधवांच्या हितासाठी स्वत:चे आयुष्य वेचीत आहेत ! आज त्यापैकी कोणी कोठेही असले तरी धर्मगुरु, धर्मसंस्था हा शब्द उच्चारला की मानाने त्याचा स्विकार करतील. तर आमची मंडळी त्यावर चर्चा, वाद व शेवटी एखाद्या वर्तमान पत्राचा आश्रय घेतील. पण असा विचार करणार नाहीत की आपल्यासारखीच ही मंडळी आहेत. त्यांना जगातील लोक सुखी व्हावेत असे वाटत आहे, याला कारण काय व आपल्या ठिकाणी तितका सुध्दा चांगला विचार येऊ शकत नाही, याला तरी कारण काय ? तर प्रथमतः स्वत:बद्दलचे पूर्ण अज्ञान व दुसरे देव व धर्म यांचे न मानलेले संस्कार किंवा योग्य वेळी न झालेले संस्कार.

आज धर्माची अवनती व समाजाची अनावस्था पाहिली तर काय दिसेल ? (या ठिकाणी धर्म हा शब्द आचार-विचार याअर्थी घेतला आहे.) ज्या समाज-कल्याणाची आंदोलने समाजात होत आहेत, त्याच्या मुळाशी काय आहे ? आज बहुतांशी समाज कल्याण वैयक्तिक विचारांनी, आचारांनी चाललेले आहे. विचारांनी समाजास सुखी करणे हे बोलण्यास जितका वेळ लागणार नाही त्याच्या शेकडो पटींनी तो आचाराने सुखी होणे कठीण आहे. दैवी मार्ग किंवा पारमार्थिक मार्ग हा सुद्धा समाजकल्याणाचा ठेवा आहे. त्याचे मार्गदर्शन आज शेकडो वर्षे साधुसंतांनी केले आहे. म्हणून काही चांगली माणसे आज समाजात लोककल्याणार्थ आपले आयुष्य वेचीत आहेत. समाजकल्याणाचे पुढारीपण कोणीही केले तरी भावी काळासाठी ते हितावहच होईल, या हेतुने आपली कार्यपद्धती सुरु आहे. समाज सुधारणेसाठी नुसत्या सुधारणा असून चालणार नाही. तर सुविचाराची धारणा व्हावयास पाहिजे व ती होण्यास दैवी किंवा पारमार्थिक मार्गाचे आचरण होणे आवश्यक आहे.

आजच्या समाजातील आस्तिक नास्तिकांची भूमिका परिस्थितीच्यामुळे बनलेली आहे. दैवी मार्गाचा अवलंब करणारे शास्त्र म्हणून किंवा त्याविना जीवन व्यर्थ म्हणून याचा अवलंब करुन जीवनास योग्य वळण, सवय लावण्यास तयार नाही. परिस्थितीने गांजला आहे म्हणून त्याला परमेश्वराची आठवण झाली आहे. मुळातच जी भावना गांजली आहे, ती ईश्वररूप कशी होऊ शकेल. अशी भावना जीवनात कोठेच स्थिरता करुन देत नाही. मग अशा दु:खी माणसास साधे जीवन सुखी करण्यासाठी बरेच ज्योतिषी व दैवी मार्ग लागतात व अशा अनुभवांनी हताश झाल्यावर देवाधर्माला नावे ठेवण्यास, ज्याला पै-पैसा आहे, त्यांच्याकडे विषारी हेतूने पाहण्यास असे लोक तयार



होतात. आज समाजात अशांची संख्या खूप वाढली आहे, ती फाजील ऐहिक सुखांच्या कल्पनांनी. जे सुख मिळाले आहे ते न अनुभवता, जे नाही किंवा नव्हते ते शोधण्यासाठी दैवी मार्गाकडे तो गेला. पण दैवी मार्गाकडे सुख शोधावयाचे नाही, तर ज्या सुखामुळे विचार व विकार वाढतात व ज्यामुळे जीवनाचा नाश होतो ते सुख, मला कोणत्या उपासना मार्गाने सोडता येईल याचा शोध घ्यावयाचा, हीच विचाराची तात्त्विक बाजू आज समितीला प्रत्येक मानवाच्या जीवनात निश्चित करावयाची आहे. म्हणजेच दु:खाचे कारण न शोधता त्या दु:खाची मीमांसा अभ्यासावयाची. या मीमांसेच्या अभ्यासासाठी साधनेचे अनेक मार्ग सांगितले आहेत. तरी आपण मार्गात असल्याशिवाय व आचरणात देवत्व असल्याशिवाय जीवा-शिवाच्या सिद्ध-सिद्धांत पद्धतीचा उपयोग होणार नाही. खरे समाधान, शांती जनसेवा करण्यानेच होणार आहे. या कार्यपद्धतीची गुरुपरंपरा हेच शिकवत आली आहे. प.पू. साईनाथ महाराजांचे जीवन याच कार्यार्थ होते. तीच कृपा समितीच्या कार्यपद्धतीस लाभली, ते मार्गदर्शन झाले व ते साधनपत्रिका म्हणून अभ्यासून पुढे ठेवले.

आज प.पू. बाबांचे असंख्य उपासक व साधक समाजात किड्या मुंगीसारखे वावरत आहेत. ह्या अवतारी सत्पुरुषाच्या जीवनाचा उपयोग स्वत:चा उदरनिर्वाह करण्यासाठी होत आहे, ही खेदाची गोष्ट आहे. एवढ्यावरच हे लोक थांबत नाहीत, तर बाबांच्या बरहुकूम वेष करुन गावोगाव हिंडतात. खरोखर, आपण त्या योग्यतेला पोहोचलो आहोत किंवा नाही याचा विचार ते करीत नसल्याने, त्याचा वाईट अनुभव घेतलेला समाज स्वत:ला नास्तिक म्हणतो व या अनुभवाची बाजू समितीसारख्या लोककल्याणाच्या कार्यास आड येते. प.पू. बाबांच्या अवतार कार्याची थोरवी कोणीही शब्दांनी वर्णन केली तरी शब्दांनी सिद्ध होणारी नाही कारण ज्यांनी जगाच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले, त्यांनी सेवा, श्रद्धा व सबुरी या व्यतिरिक्त गुरुअमृत निर्माण केलेच नाही. ज्यांनी धर्म, जात हा भेद न पाहता मानवता धर्माला ब्रह्म मानले, त्याची कृपा शब्दाच्या पलिकडे आहे. ती साधकाने, बाधकाने, आस्तिकाने, नास्तिकाने, भक्ताने, याचकाने प्रत्यक्ष सेवा करुनच अनुभवली पाहिजे. ती परिपूर्ण नि:स्वार्थ भूमिकेने अनुभवलीत तर स्वत:चे कल्याण करुन, समाज कल्याणातून राष्ट्रकल्याण करण्याचे कर्तव्य पार पाडू शकाल. नाहीतर जन्माला आलात व गेलात याशिवाय जीवनात काही निर्माण केले नाहीत. म्हणजे तुम्ही जन्माला कशाला आलात याचा शोध घेतला नाहीत. तो शोध घेणे म्हणजेच दु:ख कारणमीमांसा अभ्यासिणे.

ही साधनपत्रिका समितीने लोककल्याणार्थ कार्य म्हणून आपल्यापुढे ठेवली

आहे. त्यात देवाधर्माबद्दल, साधकाबद्दल अपरोक्ष निंदा केलेली नाही. प्रत्यक्ष परिस्थितीतील सत्य समाजापुढे ठेवून देवाला अंतराळात न शोधता, स्वतः शोधला तर सामाजिक परिस्थिती आचार-विचारांनी कर्तव्याची होऊन स्वतः सुखी होणे म्हणजे इतरांस दुःख देणे या विचारास स्थान राहणार नाही. त्या जागी हा विचार यावा लागेल की, 'दुसऱ्यांना सुख समाधान देण्यासाठी काया, वाचा, मनाने मला आज काय कर्तव्य केले पाहिजे.' ते यथायोग्यपणे करण्याची सवय लावून घेणे हीच पारमार्थिक उन्नत्तीची व्याख्या होय. ही निश्चित एका कुटुंबात झाली की त्या समाधानाने विश्वबंधुत्व, विश्वशांती पर्यंतचे कार्य एकमेकांच्या सहकार्याने करण्यास सद्‌गुरूकृपेची जोड जोडली पाहिजे, त्यासाठी देवाधर्माचे, जाती-पाती, ज्ञानी-अज्ञानी, आस्तिक-नास्तिकाचे वाद शोधण्याचे किंवा ते नष्ट करण्याचे कार्य करण्याची आवश्यकता नाही. जे 'मानवता धर्माला' पोषक ते टिकविणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. ते करण्याचे कार्य जसे आज 'श्रीसाई स्वाध्याय मंडळ' करीत आहे. तसे प्रत्येकाने कोणासाठी म्हणून न करता जीवनातील कर्तव्य म्हणून करावे, अशी श्रीसद्‌गुरू चरणी प्रार्थना.

।। शुभं भवतु ।।